# स्वामी रामानंदतीर्थ यांची दैनंदिनी

संपादक : प्रा. वि. पां. देऊळगावकर



महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

# पूज्य स्वामी रामानंदतीर्थ यांची
# दैनंदिनी

संपादक

**प्रा. वि. पां. देऊळगावकर**

**महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई**

अनुक्रमणिका

**प्रथमावृत्ती :** सप्टेंबर २००१

**प्रकाशक**

सचिव
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ
मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय इमारत
१७२, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय मार्ग
दादर, मुंबई ४०० ०१४.

© महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

**मुद्रक**

व्यवस्थापक
शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय
चर्नी रोड स्टेशनजवळ
नेताजी सुभाष रोड
मुंबई ४०० ००४.

**किंमत :** रुपये ६०

## अनुक्रमणिका



पी. व्ही. नरसिंह राव

## अनुक्रमणिका

**पी. व्ही. नरसिंह राव**
P. V. Narsimha Rao

9, Motilal Nehru Marg,
New Delhi 110011

दिनांक : १ फेब्रुवारी २०००.

श्री. वि. पां. देऊळगावकर यांनी संपादित केलेली "पू. स्वामी रामानंदतीर्थ यांची दैनंदिनी" स्वामीजींच्या विचारांचा, प्रगल्भ चिंतनाचा अमूल्य ठेवा आहे. या दैनंदिनीत स्वामीजींच्या शालीन व अष्टपैलू व्यक्तिमत्त्वाचा, खंबीर नेतृत्त्वाचा, त्यांच्या अंतरंगाचा आणि प्रामुख्याने निःस्वार्थ बुद्धीने, देशप्रेमाने प्रेरित होऊन केलेल्या विविध कार्यांचा आढावा आहे. म्हणूनच ही दैनंदिनी वाचकांना उच्च विचारसरणीसाठी प्रेरणादायी तर ठरेलच, परंतु तरुण पिढीत, नवयुवकांत समर्पणाची भावना निर्माण करून त्यांच्यात परिवर्तन घडवून आणू शकेल याची मला खात्री आहे.

दिनांक १ फेब्रुवारी २०००.

**पी. व्ही. नरसिंह राव**

अनुक्रमणिका

**SWAMI RAMANANDA TIRTHA MEMORIAL COMMITTEE**

110-342, Swami Ramananda Tirtha Marg, Begumpeth, Hyderabad 16, A. P. Ph. 776 17 58, 776 09 50

*Chairman* P. V. Narsimha Rao
*Former Prime Minister*

*Secretary* *Padma Vibushan*
Govinddas Shroff

*Treasurer* A. V. R. Krishna Murthy

It is matter of great pleasure for me to go through the diary of Pujya Swamiji. This is a rare treasure of inspiration and reflection. Swamiji's personality and spirit of service are vividly reflected in the pages of the diary.

I am sure those who read it will get deep insights in high thinking. It can transform the youth and create a sense of devotion in them. I congratulate Sri Amrut Rao Deshmukh for handing it over the Maharashtra State Sahitya and Sanskruti Mandal for publishing.

Dt. 22nd January 2000. P. V. Narsimha Rao.

# स्वामी रामानंदतीर्थ स्मारक समिती

११०-३४२, स्वामी रामानंदतीर्थ मार्ग, बेगम पेठ, हैदराबाद १६, आंध प्रदेश;
फोन ७७६ १७ ५८, ७७६ ०९ ५०

अध्यक्ष : पी. व्ही. नरसिंहराव, माजी पंतप्रधान
चिटणीस : पद्म विभूषण, गोविंददास श्रॉफ
खजीनदार : ए. व्ही. आर. कृष्णमुर्ती

**मराठी अनुवाद**

पू. स्वामीजींची दैनंदिनी मला वाचायला मिळाली याचा मला खूप आनंद होतोय. स्फूर्तीचा व चिंतनशीलतेचा हा अनमोल ठेवा आहे. या दैनंदिनीच्या पानापानांतून पू. स्वामीजींचे व्यक्तिमत्त्व आणि

अनुक्रमणिका

सेवाप्रवृत्तीचे अगदी स्पष्ट दर्शन घडते. जे कोणी ही दैनंदिनी वाचतील त्यांना उच्च विचारांची सखोल दृष्टी प्राप्त होईल; तरुणामध्ये परिवर्तन घडून आणून निष्ठेची व समर्पणाची भावना निर्माण होईल.

श्री. अमृतराव देशमुखांनी ही दैनंदिनी प्रकाशित करण्यासाठी महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या स्वाधीन केली याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो.

दिनांक २२ जानेवारी २०००. **पी. व्ही. नरसिंह राव**

अनुक्रमणिका

# निवेदन

## मराठवाड्याचे स्वातंत्र्यसेनानी : स्वामी रामानंदतीर्थ

आज महाराष्ट्राचा अविभाज्य भाग असलेल्या मराठवाड्यावर स्वातंत्र्यपूर्व काळात कित्येक वर्षे निजामी राजवट होती. ही राजवट धर्मांध, जुलमी व अत्याचारी होती. बहुसंख्य प्रजा हिंदू असली तरी त्यांना ना धर्मस्वातंत्र्य होते, ना विचारस्वातंत्र्य होते. अस्मिता हा शब्द या राजवटीत मोडीत निघालेला होता. विशेषतः रझाकारांच्या काळात प्रजा या अन्यायाला, अत्याचाराला वैतागलेली होती. या राजवटीत प्रजेची उर्मी, प्रजेचा हुंकार दबला-दाबलेला होता. या दबल्या-दाबलेल्या उर्मीला, हुंकाराला मुक्तरूप देण्याचे काम मराठवाड्यातल्या ज्या महनीय व्यक्तींनी केले, त्यामध्ये स्वामी रामानंदतीर्थ हे अग्रभागी होते.

स्वामीजींनी लिहिलेल्या या रोजनिशीतून त्यांच्या विकसित होत गेलेल्या व्यक्तिमत्त्वाचे दर्शन जसे आपल्याला होते त्याप्रमाणेच मराठवाड्याच्या स्वातंत्र्यलढ्याची साद्यंत माहिती या रोजनिशीतून मिळते. या दृष्टीने स्वामीजींच्या या रोजनिशीचे विशेष महत्त्व आहे.

स्वामीजींचे शिष्य अमृतराव देशमुख यांनी ही रोजनिशी जिज्ञासू वाचकांसाठी उपलब्ध करून दिल्याबद्दल तसेच श्री. वि. पां. देऊळगांवकर यांनी या रोजनिशीवर आवश्यक ते संस्कार करून ती प्रसिद्धीसाठी महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाला दिल्याबद्दल मंडळ या उभयतांचे आभारी आहे.

**रा. रं. बोराडे,**
अध्यक्ष,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ.

दिनांक ८ ऑगस्ट २००१.

अनुक्रमणिका

# ऋणनिर्देश

पूज्य स्वामी रामानंदतीर्थ हे महान योगी पुरूष होते.नुसते ते योगी नव्हते, तर एक थोर राजकारणी होते.

“जगाच्या कल्याणा संताच्या विभूती” या तुकाराम महाराजांच्या उक्तीप्रमाणे ते श्रेष्ठ संतही होते. हैदराबाद संस्थानातील निजामाच्या एकतंत्री जुलुमी राजवटीमुळे व रझाकारांनी चालविलेल्या अनिर्बंध अत्याचार, हिंसाचारादी दहशतवादी कृत्यांमुळे संस्थानातील जनता त्रस्त झाली होती. अशा वेळी पूज्य स्वामी रामानंदतीर्थांनी जनतेचे नेतृत्व करून हैदराबाद मुक्ति संग्रामाचे रणशिंग फुंकले. जनतेने प्रचंड आंदोलन उभे केले. लढा यशस्वी झाला. हैदराबाद संस्थान हिंदी संघराज्यात विलीन झाले. संस्थानात लोकशाही राजवट आली. अशा रीतीने पू. स्वामीजी हैदराबाद मुक्ति संग्रामाचे सरसेनानी म्हणून प्रसिद्ध झाले. पण मूळात ते विरक्त व खरे संन्यासी होते. नंद वंशाची व तेथील अमात्य आर्य चाणक्य यांची कथा सर्व परिचित आहे. नंदकुळाचा निःपात करून मगधभूमीला मुक्त करण्याची प्रतिज्ञा चाणक्याने खरी करून दाखविली. पण तो शेवटपर्यंत झोपडीतच राहिला. तसेच पू. स्वामी रामानंदतीर्थ यांनी आपली राजकीय भूमिका अत्यंत बिकट परिस्थितीला तोंड देत मोठ्या धैर्याने पार पाडली. पण थोड्याच दिवसात त्यांनी विरक्ती स्वीकारली. राजकारणातून निवृत्त होऊन ते शांति आश्रमात राहायला गेले.

अशा रीतीने निवृत्त झाल्यानंतर इ.स. १९६६-६७ च्या दरम्यान पूज्य स्वामीजींनी मला मुद्दाम बोलावून घेतले. पूर्वीपासून त्यांचा माझ्यावर विशेष लोभ होता. त्याच आत्मियतेने आपण लिहिलेली दैनंदिनी व इतर लिखाण असलेल्या वह्या त्यांनी माझ्या स्वाधीन केल्या. वास्तविक ते सारे हस्तलिखित पूर्वीच्या काळासंबंधीचे आहे. आपल्या विद्यार्थी दशेपासून ते संन्यास दीक्षा घेतल्यानंतरच्या काही काळापर्यंतच्या घटनांची नोंद त्यांनी त्याच काळात करून ठेविली होती.

माझे चुलत बंधू श्री. व्यंकटेश अण्णा व श्री. अनंतराव यांनी १९२०-२१ मध्ये एक राष्ट्रीय शाळा हिप्परगे येथे सुरू केली होती. तेथे माझे चुलत बंधू श्री. अनंतराव काकाच प्रमुख होते. त्यांनी तेथे देशसेवेला सर्वस्व अर्पण करू इच्छिणाऱ्या ध्येयवादी मंडळींचा एक संघ स्थापन केला होता. अनंतराव काकांच्या अमोघ वक्तृत्वाने ती मंडळी प्रभावित झाली होती. त्या मंडळींनी संघ कार्याला वाहून घेण्याच्या प्रतिज्ञा घेतल्या होत्या. त्या मंडळींमध्ये पू. स्वामीजी, श्री. बाबासाहेब परांजपे, आदी पन्नास-साठ व्यक्तींचा समावेश होता.

पूज्य स्वामीजी विरक्त व आध्यात्मिक वृत्तीचे असल्यामुळे शाळेत बिन पगारी काम करीत होते. त्यानंतर शाळेतून पैसे न घेता भिक्षांदेहीचे व्रत त्यांनी स्वीकारले. असे करीत १९३२ च्या जानेवारीत संक्रातीच्या शुभमुहूर्तावर त्यांनी संन्यास दीक्षा घेतली. त्या काळात पूज्य स्वामीजी नेहमी आपल्याबरोबर मला भिक्षेला घेऊन जात असत. आम्ही भिक्षेचे अन्न आनंदाने सेवन करीत होतो.

अशा रीतीने पूज्य स्वामीजींच्या सहवासात मला नेहमी राहता आल्यामुळे त्यांचे माझ्यावर विलक्षण अद्वितीय प्रेम जडले ते कायमचेच. ते पुढेही मला कधी विसरले नाहीत. मी शिकून मोठा व्हावे अशी त्यांची मनोमनी इच्छा होती. मी मॅट्रीक पास झाल्यानंतर माझ्या पुढील शिक्षणासाठी हरतऱ्हेने प्रयत्न करण्याचे व शक्यतो आर्थिक मदत देण्याचे त्यांनी आश्वासन दिले. अत्यंत कळकळीने पत्राद्वारे त्यांनी माझे मार्गदर्शन

केले. पण माझ्या घरची खाजगी व आर्थिक परिस्थिती अतिशय बिकट असल्याकारणाने नाईलाजाने मला सरकारी नोकरी धरावी लागली होती. तेव्हा पू. स्वामीजींच्या अपेक्षेप्रमाणे मी पुढील शिक्षण घेऊन पदवीधर होऊ शकलो नाही हे माझे दुर्भाग्य आहे.

पण ज्याअर्थी, पू. स्वामीजींनी मला प्रत्यक्ष बोलावून घेऊन स्वतः लिहिलेले आत्मचरित्र व इतर लिखाण अत्यंत आत्मियतेने माझ्या स्वाधीन केले. त्याअर्थी, त्यांचा प्रसाद म्हणून मी ते स्वीकारले, एवढेच नव्हे तर तो सर्व हस्तलिखित मजकूर छापून प्रकाशित करणे हे माझे कर्तव्यच आहे असे समजून ते छापून काढण्याचा निर्धार मी केला.

पण माझी आर्थिक परिस्थिती बिकट असल्याकारणाने बरीच वर्षे ते मी प्रकाशित करू शकलो नाही. पण ते सर्व लिखाण कित्येक वर्षांपासून अत्यंत काळजीपूर्वक सुरक्षित ठिकाणी जपून ठेवले ते सर्व प्रकाशित करण्याचा मार्ग शोधीत असता "प्रयत्नांती परमेश्वर" या म्हणीप्रमाणे एक योग जुळून आला. महाराष्ट्राचे माजी मुख्य मंत्री सन्माननीय श्री. सुधाकरराव नाईक एका कार्यक्रमासाठी हैदराबादला आले होते. त्यांना मी भेटलो. पू. स्वामीजींचे आत्मचरित्र व इतर हस्तलिखित मजकूर त्यांना दाखविला व ते सर्व प्रकाशित करण्यासाठी आर्थिक सहाय्य करण्याची विनंती केली. त्यांनी पू. स्वामीजींविषयी खूप आदर दाखविला व ते सारे प्रकाशित करण्यासाठी लागणारा एक लाख रुपयांचा निधी देण्याचे मला त्यांनी आश्वासन दिले.

त्यानंतर थोड्याच दिवसानंतर पू. स्वामीजींची दैनंदिनी व इतर लिखाण प्रकाशित करण्याचे काम महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडे सोपविले. त्याप्रमाणे कळविलेही. अशा रीतीने माननीय श्री. सुधाकरराव नाईकांनी पू. स्वामीजींच्या हस्तलिखितांबद्दल आस्था दाखविल्यामुळे प्रकाशनाच्या कार्यास प्रोत्साहन मिळाले. महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाचे त्यावेळचे अध्यक्ष डॉ. य. दि. फडके यांनी ते लिखाण प्रसिद्ध करण्याची जबाबदारी स्वीकारली. याबद्दल माजी मुख्य मंत्री श्री. सुधाकरराव नाईक व डॉ. य. दि. फडके यांचा मी अतिशय ऋणी आहे. त्यांनी हाती घेतलेले काम मंडळाचे नंतरचे अध्यक्ष श्री. द. मा. मिरासदार यांनी अतिशय चिकाटीने पूर्ण केले याबद्दल मी श्री. मिरासदार यांना मनःपूर्वक धन्यवाद देतो. महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे सध्याचे अध्यक्ष डॉ. सुरेश द्वादशीवार यांनी या कामी खूपच लक्ष घातले. याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

तसेच प्रा. वि. पां. देऊळगावकर यांनी त्या दैनंदिनीचे व अन्य हस्तलिखिताचे संपादकीय कार्य अत्यंत परिश्रमाने व यशस्वी रीतीने पार पाडले याबद्दल मी त्यांचा अत्यंत आभारी आहे.

तसेच प्रा. वि. पां. देऊळगावकरांनी सर्व हस्तलिखितांचे संपादकीय कार्य मोठ्या परिश्रमाने पार पाडले. एवढेच नव्हे तर पू. स्वामीजींचे निकटवर्ती सहकारी व भारताचे माजी पंतप्रधान माननीय श्री. पी. व्ही. नरसिंहराव यांचा शुभसंदेशही प्राप्त करून घेतला. याबद्दल मी मान्यवर श्री. पी. व्ही. नरसिंहराव यांचा अत्यंत ऋणी आहे. कारण तो संदेश मिळवावा अशी माझी फार दिवसांपासूनची तीव्र इच्छा होती. ती इच्छाही श्री. देऊळगावकरांनी पूर्ण केली. याबद्दल मी त्यांचा अत्यंत आभारी आहे.

अनुक्रमणिका

अशा प्रकारे माझ्याजवळ जपून ठेवलेले पू. स्वामीजींचे लिखाण प्रकाशित करण्याचे माझे स्वप्न साकार होऊन माझे जीवन सार्थक झाले या भावनेने मोठ्या आनंदाने माझे कृतज्ञतेचे बोल पू. स्वामीजींच्या चरणी अर्पण करून त्यांच्या पावन स्मृतीस अत्यंत नम्रतापूर्वक वंदन करतो.

**अमृतराव देशमुख**

अनुक्रमणिका

# अनुक्रमणिका

निवेदन ................................................................ ८
ऋणनिर्देश ................................................................ ९
संपादकीय निवेदन व पूज्य स्वामीजींचा अल्प जीवनपट ................................ १४
पूज्य स्वामीजींनी उद्‌धृत केलेल्या महात्मा गांधीच्या इंग्रजी उताऱ्यांचा मराठी अनुवाद ........ ३६
मूळ मराठीतील लेखन व इंग्रजीतील लेखनाचा मराठी अनुवाद ................................ ४७
माझ्या दैनंदिनीतील एक पान (दैविकता कशी शिकवावी) ................................ ७२

==================================================================

## संपादकीय निवेदन व
## पूज्य स्वामीजींचा अल्प जीवनपट

## भाग १ ला

==================================================================

अनुक्रमणिका

# संपादकीय निवेदन व पूज्य स्वामीजींचा अल्प जीवनपट

पू. स्वामी रामानंदतीर्थ यांचे एक विद्यार्थी श्री. अमृतराव देशमुख यांच्याजवळ पू. स्वामीजींनी आपल्या दैनंदिनीच्या दोन वह्या दिल्या होत्या. त्या वह्यांतील पू. स्वामीजींचे छोटेसे आत्मवृत्त प्रकाशात येण्याचा योग महाराष्ट्र राज्य, साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या प्रोत्साहनाने येत आहे ही आनंदाची गोष्ट. त्या दैनंदिनीच्या संपादनाचे काम माझ्यावर सोपविल्याबद्दल मी साहित्य आणि संस्कृती मंडळाचा अत्यंत ऋणी आहे. विशेषतः मंडळाचे त्यावेळचे अध्यक्ष डॉ. य. दि. फडके यांचा मी अत्यंत आभारी आहे. त्याचे कारण या दैनंदिनीच्या आरंभी मी लिहिलेले निवेदन व पू. स्वामीजींचा जीवनपट हा भाग मी त्यांना वाचून दाखविताना त्यांनी तो काळजीपूर्वक ऐकून समाधान व्यक्त केले होते.

ही दैनंदिनी मोठी वैशिष्ट्यपूर्ण आहे. दोन वह्यांतून आहे. बराचसा भाग इंग्रजीतून लिहिलेला आहे. काही भाग मराठीत आहे. इंग्रजी लेखनाचा मी मराठीत अनुवाद करून तो सलग एकत्र जुळविला आहे. अर्थात मूळ मराठी लेखनाला जोडूनच त्या मराठी अनुवादाचा क्रम लावला आहे. त्यामुळे वाचकांना ही दैनंदिनी मराठीत सरळ वाचून पू. स्वामीजींच्या जडणघडणीचा मागोवा घेता येईल. जिज्ञासूंच्यासाठी इंग्रजी लेखनही शेवटी परिशिष्ट म्हणून जोडले आहे. त्यामुळे मूळ इंग्रजीतील वैशिष्ट्यपूर्ण शैलीचा वाचकांना आस्वाद घेता येईल.

आपल्या दैनंदिनीच्या आरंभीच पू. स्वामीजींनी महात्मा गांधींच्या 'सत्याचे प्रयोग' (My experiments with Truth) या आत्मवृत्तातील अनेक उतारे उद्‌धृत केले आहेत. मुळात त्यांनी त्या उताऱ्यापुढे पानाचे आकडे दिले आहेत. पू. स्वामीजींनी आत्मवृत्ताची जुनी प्रतच (१९२७ मधील) वाचली असणार. त्यानंतर महात्मा गांधी जन्म शताब्दीनिमित्त नवजीवन पब्लिशिंग हाऊस, अहमदाबाद-१४ या संस्थेने 'महात्मा गांधींचे निवडक ग्रंथ' (The selected works of Mahatma Gandhi) या ग्रंथमालेत प्रसिद्ध केलेले पहिले दोन खंड त्यांच्या आत्मवृत्ताचेच आहेत. मी या पुस्तकांतूनच ते उतारे शोधून काढले आहेत. या नव्या आवृत्तीतील पृष्ठसंख्या पू. स्वामीजींनी दिलेल्या पृष्ठसंख्येशी जुळत नाही. म्हणून त्या उताऱ्यापुढील पृष्ठसंख्येने वाचकांनी बुचकळ्यात पडण्याचे कारण नाही. ज्यांना मूळचे उतारेच वाचावयाचे असतील त्यानी कृपया The selected works of Mahatma Gandhi या मालेतील Vol. I (खंड पहिला) व Vol. II (खंड दुसरा) या पुस्तकांतील पुढील पाने वाचावीत. पहिल्या खंडातील Introduction (प्रस्तावना) पाने XIX, XXI, XXII, XXIII त्याच खंडातील पाने ८४, १३०, पान २९४, ३०८, ३०९, ३१३.

पुढे पुन्हा त्याच मालिकेतील दुसऱ्या खंडातील पुढील पाने ४०६, ४१०, ४४४, ४५३, ४६१, ४७३, ४७८, ४९१, ५१२, ७५२ ते ७५४ वाचावीत. श्री. श्रीमन्नारायण अग्रवाल यांनी या खंडांचे संपादन १५ ऑगस्ट १९६८ मध्ये केले आहे.

महात्मा गांधींचे हे उतारे पू. स्वामीजींनी बुद्धिपुरःस्सरच येथे उद्‌धृत केल्यासारखे दिसतात. महात्मा गांधींच्या 'सत्याच्या प्रयोगात' व्यक्त झालेल्या विचारांचा पू. स्वामीजींवर किती परिणाम झाला होता हे त्यावरून स्पष्ट होते. तसेच पुढे पू. स्वामीजी व लखनौचे पू. आर. एस. नारायणस्वामी यांच्यामधील संवाद पू. स्वामीजींनी जवळजवळ जशाच्या तसाच दिल्यासारखा दिसतो. तो संवाद देण्यातही हाच उद्देश दिसतो की, पू. नारायणस्वामीजींची गुरूनिष्ठा, त्यांची साधी राहणी, भंग्यांपासून ते श्रेष्ठ उपदेशकांपर्यंत त्यांनी वठविलेल्या भूमिका वाचत असताना कुणीही वाचक प्रभावित झाल्याशिवाय राहणार नाही. पू. स्वामी

अनुक्रमणिका

रामनंदतीर्थांनी तर त्यांच्याकडूनच संन्यास दीक्षा स्वीकारली होती. त्यामुळे त्यांच्या मनात पू. नारायणस्वामींच्या उदात्त जीवनाबद्दल आदराची भावना निर्माण होणे साहजिक होते. पू. नारायणस्वामींनीही पू. रामनंदतीर्थांना (पूर्वाश्रमीच्या व्यंकटेश खेडगीकरांना) तावून सुलाखून घेऊनच शिष्यत्व बहाल केले होते हे ध्यानात ठेवण्यासारखे आहे. व्यंकटेश खेडगीकरांना अध्यात्माचा व परित्यागाचा वारसा त्यांच्या वडिलांकडून लहानपणीच मिळाला होता. त्या वृत्तीची जोपासना होत गेली. महात्मा गांधींच्या, स्वामी रामतीर्थांच्या, त्यांचे पट्टशिष्य पू. नारायणस्वामी व हिपारग्याच्या शिक्षणसंस्थेचे संचालक श्री. अनंतरावकाका कुलकर्णी यांनीच श्री. व्यकंटेश खेडगीकरांना सन्यास घेण्याची प्रेरणा दिली. श्री. काका आनंदमूर्ती महंत या नावाने ओळखले जात. श्री. काकांना पू. रामानंदतीर्थ गुरू म्हणून संबोधितात व स्वतःला गुरूभक्त म्हणवून घेतात त्यामुळे ही दैनंदिनी केवळ नियमाचे पालन म्हणून केलेले लिखाण नाही हे वाचकांच्या सहज ध्यानात येईल. त्यामध्ये एका साधकाची उन्नयनाच्या दिशेने चाललेली वाटचाल जशी दिसते तशी अंतःकरणाची निर्मलता, दैवीप्रेम, चराचर सृष्टींशी एकरुप होण्याचा प्रामाणिक प्रयत्न या सर्व दैवी गुणांचा प्रत्यय येतो.

हिप्परगा येथे श्री. अनंतराव कुळकर्णींनी (काका) एक विलक्षण असे आध्यात्मिक वातावरण निर्माण केले होते असे दिसते. त्या वातावरणाचा पू. स्वामीजी आपल्या दैनंदिनीत वारंवार उल्लेख करतात. एवढेच नव्हे तर काकांनी स्थापना केलेल्या सत्संघात व त्यांच्या अंतर्वर्तुळात प्रवेशच मिळाला नव्हता. त्यामुळे पू. स्वामीजी खूपच अस्वस्थ झालेले दिसतात. प्रवेश मिळावा म्हणून त्यांना खूप तळमळ लागली होती. त्यासाठी खूप प्रयत्नही त्यांनी केले. शेवटी आपली आंतरिक तळमळ काकांना पत्राने कळविली. शेवटी कुठे पू. स्वामीजींना प्रवेश मिळतो.

श्री. काकांच्या भोवती एक फार मोठे गूढ वलय निर्माण झाले होते असे अनुमान करता येते. त्या वलयामुळे तेथील सारा परिसरच सम्मोहित झाला होता (हिप्नोटाईज्ड) असे वाटते. पू. स्वामीजी त्यामुळे संपूर्णपणे भारावून गेल्यासारखे दिसतात. काकांना ते प्रथम गुरु मानतात. देव मानतात व स्वतःला गुरुभक्त मानून हे सारे लिखाण करतात. काकांच्या अंतर्वर्तुळात प्रवेश मिळाल्यानंतर ते स्वतःला पूर्णपणे विसरून जातात. शेवटी तर काकांना “आई” म्हणून संबोधून त्यांना जे लिहिले ते वाचून सामान्य वाचक बुचकळ्यात पडला तर त्याचे आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. त्या वाचकाला हा सारा लडिवाळपणा म्हणजे अतिरेकी भाबडेपणा आहे असे वाटण्याची शक्यता आहे. पण साऱ्या चराचर सृष्टीशी एकरूप होऊ पाहणाऱ्या साधकाची ती उच्चकोटीची अवस्था असते हे ध्यानात आले की, कुणाचीही शंका दूर होऊ शकते. “जावे त्यांच्या वंशा तेव्हा कळे” हेच खरे. “दैवी प्रयोगाचा एक नवा व अद्भूत अनुभव” हे प्रकरण वाचत असताना आपल्याला महर्षी अरविंद यांच्या (Life Divine—दिव्य जिवन) या प्रसिद्ध ग्रंथात वाचलेल्या मनाच्या अवस्थेचे चित्र आपल्यासमोर उभे राहते. त्यामध्ये (Mind and Super Mind) मानस व अति मानस असे वर्णन येते. पू. स्वामीजी हिप्परग्याच्या वातावरणात उच्च पातळीवर पोहोचल्याचे स्पष्ट जाणवते. म्हणूनच या दैनंदिनीत पू. स्वामीजींनी स्वतःचे अगदी पारदर्शी चित्र रेखाटले आहे.

या दैनंदिनीत एका पानावर लखनौच्या प्रवासातील खर्चाचे टिपण आहे. तेसुद्धा अत्यंत बोलके आहे. सार्वजनिक संस्थेत काम करणाऱ्यांनी किती काटेकोरपणे पैशाचा उपयोग करून त्याचा पै अन् पैचा हिशोब कसा ठेवावा याचे हे टिपण म्हणजे प्रात्यक्षिकच समजायला हवे.

एकूण ही दैनंदिनी अत्यंत उद्‌बोधक आहे. अनेक दृष्टींनी ती नवोदित कार्यकर्त्यांना व सर्व सामान्य वाचकांना मार्गदर्शक ठरावी अशी अपेक्षा आहे. ही दैनंदिनी व पू. स्वामीजींचा पुढील प्रकरणात मी जो संपूर्ण जीवनपट दिला आहे त्यावरून पू. स्वामीजींच्या आदर्श व्यक्तिमत्त्वाचा वाचकांच्या मनावर एक अमिट ठसा उमटला तर माझे श्रम कारणी लागले असे मी समजतो.

पू. स्वामीजींची या निमित्ताने अल्पशी सेवा करण्याची संधी मला उपलब्ध करून दिल्याबद्दल, श्री. अमृतराव देशमुख, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे त्यावेळचे अध्यक्ष, डॉ. य. दि. फडके त्यांचे सर्व सहकारी यांना माझे हार्दिक धन्यवाद. काही तांत्रिक अडचणींमुळे ही दैनंदिनी प्रकाशित होऊ शकली नाही पण साहित्य आणि संस्कृती मंडळाचे सध्याचे अध्यक्ष प्रा. द. मा. मिरासदार यांनी विशेष लक्ष घालून ते काम हातावेगळे करण्याचा निर्णय घेतला त्याबद्दल मी त्यांचाही अत्यंत आभारी आहे.

पू. स्वामी रामानंदतीर्थ हे नाव आज इतिहासजमा झाले आहे. पण १९३७ ते १९६२ पर्यंत महाराष्ट्रात विशेषतः भूतपूर्व हैद्राबाद संस्थानात तरी ते नाव सर्वांच्या चांगले परिचयाचे होते. हैदराबाद संस्थानाला धर्मांध निजामाच्या एकतंत्री जुलमी राजवटीच्या जोखडातून मुक्त करण्यासाठी जो तीव्र लढा जनतेने दिला, त्या ऐतिहासिक लढ्याचे कणखर नेतृत्व केले होते पू. स्वामी रामानंदतीर्थांनीच. एका अर्थाने पू. स्वामीजींनी हिंदुस्थानचे स्वातंत्र्य पूर्ण केले. एवढेच नव्हे तर हैदराबाद संस्थानचा इतिहास व भूगोल दोन्ही पूर्णपणे बदलून टाकला.

किडकिडीत शरीरयष्टीच्या व पायाने अधू असलेल्या एका संन्याशाने हिंदुस्थानच्या आधुनिक इतिहासात फार मोठी महत्त्वपूर्ण कामगिरी बजावली. हिंदुस्थानच्या स्वातंत्र्य लढ्यात म. गांधींना जे स्थान तेच हैदराबादच्या मुक्ति संग्रामात पू. स्वामी रामानंदतीर्थांना आहे. शरीराने दुबळ्या, पण मनाने खंबीर अशा पू. स्वामीजींच्या राजकीय क्षेत्रातील ऐतिहासिक भूमिकेविषयी थोडीबहुत माहिती त्यांनी स्वतः लिहिलेल्या Memoirs of Freedom Struggle in Hyderabad या इंग्रजी पुस्तकातून मिळू शकते. या पुस्तकाचे मराठी, तेलगू व कन्नड भाषांतूनही अनुवाद प्रसिद्ध झाले आहेत. तसेच कै. श्री. अनंतराव भालेराव यांनी लिहिलेल्या पू. स्वामीजींच्या चरित्रावरूनही पू. स्वामीजींच्या असामान्य व्यक्तिमत्वाचा परिचय होऊ शकतो. पण एखाद्या व्यक्तीच्या अंतरंगाचा खराखुरा परिचय करून घेण्यासाठी त्या व्यक्तीने लिहिलेली दैनंदिनी अधिक उपयुक्त ठरते. सुदैवाने पू. स्वामीजींची विशिष्ट कालखंडातील दैनंदिनी आज उपलब्ध झाली आहे. ती दैनंदिनी त्यांनी आपले पट्टशिष्य श्री. अमृतराव देशमुख यांच्या हवाली केली होती. ती पुढेमागे केव्हातरी प्रकाशित व्हावी अशी स्वतः पू. स्वामीजींची इच्छा होती की नाही हे कळण्यास मार्ग नाही. श्री. अमृतरावांना त्या दैनंदिनीच्या प्रकाशनासंबंधी त्यांनी काही सूचना दिल्या नसण्याची शक्यताच अधिक दिसते. कारण सार्वजनिक क्षेत्रात कार्य करणाऱ्या एक दोन संन्याशांशी माझा संबंध आला आहे. एखाद्या सभेत त्याचा परिचय करून देण्याचा प्रसंगही माझ्यावर आला आहे. त्यावेळी त्यांच्याकडून त्या पूर्वाश्रमाची माहिती मिळविण्याचा जेव्हा मी प्रयत्न केला तेव्हा त्या यतिवरांनी कटाक्षाने असे सांगितले की, "माझ्या पूर्वायुष्याविषयी काहीच सांगू नका व मला काही विचारूही नका."

एकूण संन्याशाचा पूर्वाश्रम हा लोकांना समजू नये, असाच जणू संकेत किंवा अलिखित नियम असावा अशी मी माझी समजूत करून घेतली. पण श्री. अमृतराव देशमुखांना मात्र आपल्या स्वाधीन केलेली पू. स्वामीजींची दैनंदिनी प्रकाशित होऊन लोकांच्या हातात पडावी अशी तीव्र उत्कंठा लागून

अनुक्रमणिका

राहिल्यासारखी दिसते. कारण पू. स्वामीजींच्या निकटवर्तीयांपैकी अनेकांना त्यांनी ती दाखविली व ती प्रकाशित व्हावी अशी इच्छा त्यांनी व्यक्त केली.

त्यांच्या इच्छेला आज मूर्त स्वरूप प्राप्त होत आहे. याचे श्री. अमृतरावांना खूपच समाधान लाभत असेल यात शंकाच नाही. ते योग्यच होय. ही दैनंदिनी घेऊन ते महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृति मंडळाच्या अध्यक्षांना भेटले. मंडळाचे अध्यक्ष श्री. डॉ. य. दि. फडके यांनी स्वतः ती पाहिली. मंडळाच्या अन्य सदस्यांना ती दाखविली. सर्वांच्या अनुमतीने ती मंडळातर्फेच प्रकाशित करण्याचे ठरेल. हे कळताच श्री. अमृतरावांनी डॉ. य. दि. फडके यांचे आभार मानून मला ही आनंदाची वार्ता कळविली. श्री. अमृतरावांच्या चिकाटीने चालविलेल्या प्रयत्नास यश ऐकून मलाही आनंद झाला. मी श्री. अमृतरावांना अभिनंदनाचे पत्र पाठविले.

योगायोगाने काही दिवसानंतर माझ्याकडे महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृति मंडळाच्या चिटणीसांकडून एक पत्र आले. त्या पत्राद्वारे पू. स्वामीजींची ही दैनंदिनी संपादित करण्याची जबाबदारी माझ्यावर सोपविल्याचे कळविण्यात आले. ते पत्र वाचून मला प्रथम आश्चर्य वाटले. आनंदही झाला. या कामासाठी माझीच निवड करण्यामागे दोन कारणे असावीत असे मला वाटले. एकतर राजकीय क्षेत्रात पू. स्वामीजींच्या मार्गदर्शनाखाली काही काळ काम करण्याचे भाग्य मला लाभले होते. दुसरी गोष्ट म्हणजे पू. स्वामीजींनी इंग्रजीतून लिहिलेल्या Memoirs of Freedom Struggle in Hyderabad या पुस्तकाचा मराठी अनुवाद मीच केला आहे. इंग्रजी पुस्तकाप्रमाणे माझा मराठी अनुवादही मुंबईच्या पॉप्युलर प्रकाशकानेच प्रकाशित केला आहे. कारणे काही का असेनात. ही दैनंदिनी संपादित करण्याचे काम माझ्यावर सोपवून पू. स्वामीजींच्या सान्निध्यात घालविलेल्या काळातील स्मृतींना उजाळा मिळण्याची संधी महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृति मंडळाने मला प्राप्त करून दिली असे मी मानतो. गतकालातील घटनांच्या आठवणीने मनाला एक आगळाच आनंद प्राप्त होत असतो. तो आनंद मी अनुभवत आहे. याबद्दल महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृति मंडळाला माझे मनःपूर्वक धन्यवाद! त्यावेळचे अध्यक्ष डॉ. य. दि. फडके यांचाही मी अत्यंत आभारी आहे.

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृति मंडळाकडून मूळ दैनंदिनीची अधिकृत फोटोस्टेट प्रत माझ्याकडे येण्यापूर्वीच श्री. अमृतरावांच्या सौजन्याने मी ही एक प्रत काढून ठेवली होती. ती वाचायलाही मी आरंभ केला होता. आता तर अधिक तपशिलात जाऊन ती वाचण्याची आवश्यकता निर्माण झाली.

**या दैनंदिनीचे स्वरूप**

या दैनंदिनीच्या दोन वह्या माझ्या हाती आल्या. एका वहीतील बरेचसे लेखन हे इंग्रजी भाषेतील आहे. सामान्यतः शालेय विद्यार्थी वापरतात तशा ८·५" × ७·४" अशा एक्झरसाईज वह्यांत ही दैनंदिनी लिहिली आहे. शंभर पानाच्या दोन तीन वह्या एकत्रित शिवल्यासारख्या दिसतात. काही ठिकाणी पानावर आकडे घातले आहेत. पानावर मी माझ्या सोयीच्या दृष्टीने क्रमवार आकडे घातले आहेत. एका वहितील दैनंदिनी एकूण २९६ पृष्ठांची आहे. दुसऱ्या वहितील दैनंदिनी १११ पानांची आहे. त्यांनी बरेचसे लेखन कागदाच्या एका बाजूने केले आहे. पहिल्या वहित पहिल्याच पानावर वरच्या भागावर मधोमध ॐ हे अक्षर लिहिले आहे. त्याखाली पुढील मजकूर आहे:—

**“रामतीर्थ माझा देव आहे**
**सेवा हा माझा धर्म आहे.”**

काका.

**“काका हा माझा देव आहे**
**सेवा हा माझा धर्म आहे.”**

गुरुभक्त.

**“As long as I live**
**So long I learn”**

Vivekanand.

**“Struggle is the end of life.”**

*Vivekanand*

वरील तीन उताऱ्यांवरून पू. स्वामी रामानंदतीर्थ यांच्या अंतरंगाचा परिचय करून घेण्यास बरेच सहाय्य होण्यासारखे आहे असे मला वाटते. याचा प्रत्ययही दैनंदिनी वाचताना सहज येऊ शकतो. वरील उताऱ्यानंतर त्यांनी महात्मा गांधींच्या आत्मवृत्तातील अनेक उतारे आपल्या दैनंदिनीत लिहून काढले आहेत. पहिल्या वहितील पान ३ ते ४४ पानापर्यंत हे उतारे आहेत. ते उतारेसुद्धा त्यांच्या चिंतनशील वृत्तीवर प्रकाश पाडणारे आहेत.

ही दैनंदिनी पू. स्वामीजींच्या जीवनातील एका विशिष्ट कालखंडातील आहे. तो कालखंड त्यांच्या जीवनाला कलाटणी देणारा ठरला असे म्हणता येईल. हा कालखंड आहे, इ. स. १९२९ ते १९३५ पर्यंतचा. या कालखंडापर्यंत येण्यासाठी आपणास त्यांच्या पूर्वायुष्यातही थोडेसे डोकावे लागेल; त्या काळाचाही मागोवा घ्यावा लागेल. म्हणजेच त्यांच्या आयुष्यातील निरनिराळ्या घटनांची संगती लावता येईल.

## पू. स्वामीजींचा जीवनपट

पू. स्वामीजींचे पूर्वाश्रमीचे नाव होते व्यंकटेश खेडगीकर. वडिलांचे नाव होते भवानराव खेडगीकर; आईचे नाव होते यशोदाबाई. हे घराणे मूळचे विजापूर जिल्ह्यातील खेडगी या गावचे. भवानरावांचे शिक्षण त्या काळातील कन्नड सातवीपर्यंत. (व्हर्नाक्युलर फायनल) झाले होते. त्यावेळी ती सरकारी परीक्षा असे. हे शिक्षण झाल्यानंतर शिक्षक होण्यासाठी तीन वर्षांचा प्रशिक्षणाचा अभ्यासक्रम होता. हे शिक्षण संपवून भवानराव शिक्षक झाले. त्यांची नेमणूक विजापूर जिल्ह्यातील सिंदगी येथे झाली. खेडगीकरांकडे गावचे कुलकर्णीपणही होते. सामान्यपणे कुलकर्णीपण सांभाळणाऱ्या कुटुंबाची आर्थिक स्थिती बेताबेताचीच असायची. भवानरावांची स्थितीही फारशी समाधानकारक नव्हती. पण भवानराव छक्के पंजे करणाऱ्या कुलकर्ण्यांपैकी नव्हते. प्रामणिकपणे आपले काम करणारे होते. अतिशय सात्त्विक स्वभावाचे, पापभिरू म्हणून त्याची ख्याती होती. याशिवाय त्यांच्या बाबतीत विशेष उल्लेखनीय एक गोष्ट होती ती म्हणजे त्यांची वैराग्यशीलवृत्ती.

जनरीतीप्रमाणे भवानरावांचा योग्य वेळी विवाह होऊन ते गृहस्थाश्रमी बनले होते. पण संसारसुखाकडे त्यांचे पहिल्या पासूनच फारसे लक्ष नव्हते. वैवाहिक जीवनाकडे त्यांनी जणू पाठच फिरवली होती. ते आपल्या अध्यात्म साधनेत बहुतेक मग्न असायचे असे त्यांना जवळून पाहिलेल्या काही

अनुक्रमणिका

वृद्ध माणासांकडून कळाले. थोडक्यात जवळ जवळ संन्यस्तवृत्तीने ते रहात असत. पण त्यांच्या अध्यात्मिक गुरूंना हे सारे कळल्यानंतर गुरूंनी त्याना रीतसर संसार करीत अध्यात्म साधना करण्याचा उपदेश केला. असा संसार चालला असतांना भवानरावांना सात अपत्ये झाली. पहिल्या दोन मुली (१) गंगाबाई, (२) यमुनाबाई तिसरा मुलगा (३) अण्णाजी. चौथी मुलगी. (४) तुंगाबाई पाचवा मुलगा (५) व्यंकटेश. पुन्हा सहावी मुलगी (६) कमळाबाई व सातवा मुलगा (७) भीमसेन. आपले चरित्र नायक व्यंकटेश खेडगीकर हे भवानरावांचे पाचवे अपत्य. आज त्याचे सगळ्यात धाकटे बंधू भीमराव खेडगीकर हे अंबाजोगाई येथे राहात. ते तेथील योगेश्वरी नूतन विद्यालय प्रशालेचे मुख्याध्यापक होऊन सेवानिवृत्त झाले. त्या संस्थेच्या व्यवस्थापक मंडळाचे ते अध्यक्षही होते. दुर्देवाने त्यांचे दोन वर्षापूर्वी निधन झाले.

व्यंकटेशचा जन्म ३ ऑक्टोबर १९०३ मध्ये सिंदगी येथे झाला. व्यंकटेशच्या प्राथमिक शिक्षणास तसा सिंदगी येथेच आरंभ झाला. पण पुढे व्यंकटेशच्या चुलत्यांनी त्याला आपल्या बरोबर सोलापुरास नेले. त्यांच्या चुलत्यांचे नाव रामराव होते. ते प्रथम रेल्वेत नोकरी करीत होते. पुढे ते रेल्वे कामगारांचे पुढारी बनले. रामरावांनी व्यंकटेशला सोलापूर येथील नार्थकोट हायस्कूलमध्ये प्रवेश दिला. त्यावेळी ते एकच सरकारी हायस्कूल तेथे होते.

सिंदगी येथे शिकत असल्यापासूनच व्यकंटेश खेडगीकरात वडिलांची विरक्तवृत्ती दिसून येऊ लागली. लहानपणीच वडिलांनी व्यंकटेशला “तू लग्न करून घेणार का?” असा प्रश्न विचारला होता. लगेच व्यंकटेशने उत्तर दिले होते “नाही, कधीच नाही” आणखी एका प्रसंगी नदीकाठी बसलेल्या एका ध्यानस्थ संन्याशापुढे तो जाऊन बसला. त्याची समाधीअवस्था टक लावून पाहात राहिला. थोड्या वेळाने संन्याशाने डोळे उघडून व्यंकटेशकडे पाहिले मात्र. तुला काय पाहिजे आहे असे सन्याशाने विचारताच लगेच व्यकंटेशने आपले मनोगत व्यक्त केले. “मला तुमच्यासारखे संन्याशी व्हायचे आहे.” ‘तथास्तु’ असा सन्याशाने आशीर्वाद दिला. बाळ व्यंकटेशाचे हे स्वप्न पुढे १९३२ मध्ये साकार होऊन व्यंकटेशचे नामांतर झाले व ते स्वामी रामानंदतीर्थ बनले. व्यंकटेशपासून स्वामी रामानंदतीर्थ पर्यंतच्या प्रवासांचे टप्पे जाणून घेणे उद्‌बोधक ठरणारे आहे. त्या मार्गावरून जाणे सर्वसामान्य माणसाला कठीणच. पण व्यंकटेशने तो कंटकाकीर्ण मार्ग जाणीवपूर्वक स्वीकारला.

व्यंकटेशच्या ठिकाणी असलेल्या दोन प्रमुख प्रवृत्तींचा परिचय आपल्याला त्यांच्या लहानपणापासूनच होतो. एक अध्यात्माकडे असलेला त्यांचा कल व दुसरी प्रवृत्ती महणजे देशसेवेची उर्मी. एकाच नाण्याच्या या दोन बाजू असे म्हटले तर ते अधिक संयुक्तिक. त्यादृष्टीने नार्थकोट हायस्कुलात असताना लोकमान्य टिळक व महात्मा गांधी या थोर नेत्यांचे त्यांना झालेले दर्शन. त्या दोन्ही प्रसंगाचे वर्णन मोठे वाचनीय झालेले आहे. लोकमान्यांच्या देहावसानाच्या वृत्तामुळे त्यांच्या कोवळ्या मनावर झालेला परिणाम व त्या दिवशीच मावळत्या सूर्याला अर्ध्य देऊन देशसेवेसाठी आपले जीवन समर्पित करण्याची त्यानी घेतलेली प्रतिज्ञा. या सर्व घटना अत्यंत बोलक्या आहेत.

मॅट्रिकपर्यंतच्या शिक्षणकाळात दुसऱ्यावर भार होऊन न राहता तेथील वसतिगृहात पडेल ती कामे करून व्यकंटेश खेडगीकर आपले शिक्षण घेत होता. त्याच वयात शालेय अभ्यासाव्यतिरिक्त अवांतर वाचन, मित्र मंडळीत राजकीय परिस्थितीवर चर्चा, पुढाऱ्यांची भाषणे ऐकणे अशा विविध उपक्रमांद्वारे व्यंकटेश आपल्या व्यक्तिमत्त्वाचा विकास करून घेत होता. नार्थकोट हायस्कुलात व्यकंटेशच्या मनाचा कोंडमारा होत होता. पहिल्या महायुद्धाचा तो काळ होता. सोलापूरचा जिल्हाधिकारी (कलेक्टर) दर

अनुक्रमणिका

आठवड्याला शाळेला भेट देत असे. मुलांना इंग्रजांच्या युनियन जॅकचे झेंडे व खाऊ वाटण्यात येत असे. अशावेळी व्यंकटेशचे मन आतल्या आत बंड करून उठे. त्यानी ते झेंडे फेकून द्यायचे ठरविले. एवढेच नव्हे तर आपल्या बऱ्याचशा मित्रांना सुद्धा ते झेंडे फेकून द्यायला लावले. यासाठी त्याला शिक्षाही भोगावी लागली.

अशा काळातच लोकमान्यांनी सोलापुराला भेट दिली. त्यांच्या स्वागतासाठी आपल्या शाळेतील कुणीही स्टेशनवर जाऊ नये व त्यांच्या भाषणालाही जाऊ नये असा आदेश मुख्याध्यापकांनी काढला. मुलांना तशी ताकीद देण्यात आली. मुलांनी टिळकांच्या भाषणाला जाऊ नये म्हणून त्याच वेळेला एका विषयाची परीक्षा ठेवली. पण व्यंकटेश आपल्या काही साथीदारांसह भाषणाला गेलाच. त्याबद्दल शिक्षाही सहन केली. पण मनात देशभक्ती व देशाच्या स्वातंत्र्याविषयी विचार अधिकच पक्के झाले. काँग्रेसमधील जहाल व मवाळ या दोन गटांच्या विचारसरणींचाही तो विचार करू लागला. टिळकांचा जहाल पक्षच योग्यरीतीने चाललेला आहे अशी त्याची त्या वयातच पक्की धारणा झाली.

थोड्याच दिवसात लोकमान्यांचे निधन झाले. त्या घटनेमुळे व्यंकटेश खूप अस्वस्थ झाला. त्याने दिवसभर उपवास केला. संध्याकाळी सोलापुरच्या कंबर तलावाकाठी जाऊन बसला. त्या प्रसंगाचे वर्णन त्याने एका ठिकाणी असे केले आहे.

“मी तळ्याच्या पायऱ्यावर बसलो. तळ्याचे पाणी पायापर्यंत होते. मी खूप खूप रडलो. कितीवेळ ते आठवत नाही. बाहेरच्या जगाचा मला विसर पडला होता. मी अगदी शून्य मनस्क बसलो, न कोणता विचार, न कसली जाणीव, संध्याकाळ झाली. सूर्य अस्तास चालला होता. एकदम मी उभा राहिलो. दोन्ही हाताच्या ओंजळीत तळ्याचे पाणी घेतले आणि मावळत्या सूर्यास अर्ध्य दिले. ते देताना मी स्वतःशीच पुटपुटलो. “या क्षणापासून माझे पुढील जीवन मी पूर्णपणे मातृभूमीच्या सेवेसाठी अर्पण करीन; सर्वसंग परित्याग करून आजन्म ब्रह्मचारी राहीन.” मी अर्ध्य दिले अन् ध्यानमग्न झालो. तेव्हापासून माझा जीवनप्रवाहच बदलला.

एखाद्या भावनेच्या भरात घेतलेली प्रतिज्ञा पूर्ण करण्याचे भाग्य सगळ्यांनाच लाभते असे नाही. पण त्यांना जे लाभते अशीच माणसे समाजापुढे आदर्श निर्माण करतात. असे आदर्शच समाजाला तारक ठरतात. तळ्याकाठी घेतलेली प्रतिज्ञा व्यंकटेशने पूर्ण केली. कशी ती या दैनंदिनीवरून थोडेसे स्पष्ट होते.

लोकमान्यांच्या नंतर भारतीय राजकारणाची सुत्रे महात्मा गांधींच्याकडे आली. थोड्याच दिवसात महात्माजींनी असहकाराच्या चळवळीला आरंभ केला. त्यासाठी प्रचारार्थ त्याचे दौरे सुरू झाले. सोलापुरलाही ते गेले. त्यांच्या दर्शनासाठी व्यंकटेशही गेला. प्रचंड गर्दीत तो रेटला गेला. पण योगायोगाने तो महात्माजींच्या डब्यासमोरच येऊन थांबला. त्याच्या पायाला स्पर्श करून अत्यंत विनम्र भावनेने त्यांचे दर्शन घेतले. महात्मा गांधीजींनी व्यंकटेशचे खांदे धरले व त्याला उठविले आणि संदेश दिला. “देशासाठी काहीतरी करा.”

गांधीजींच्या या आदेशाचे शब्दशः पालन करण्याचे व्यंकटेशने ठरविले. त्याची पूर्वतयारी म्हणून त्यांनी विद्यार्थ्यांची एक संघटना उभी केली. प्रचलिंत विषयांवरची पुस्तके वाचायची, चर्चा करायची, देशभक्तांची भाषणे ऐकायची असे कार्यक्रम चालले. एकदा कै. तात्यासाहेब केळकरांचे या मित्रमंडळींच्या

अनुक्रमणिका

समोर भाषण झाले. त्यांचे भाषण झाल्यानंतर व्यंकटेश बोलायला उभा राहिला. त्याने त्या सभेपुढे पुढील प्रतिज्ञा घेतली. "पारतंत्र्यात असलेल्या देशाची मुक्तता करण्यासाठी मी त्यागाची पराकाष्ठा करीन." अशी प्रतिज्ञा घेणारा व्यंकटेश एकटाच निघाला. तरीपण व्यंकटेश निराश झाला नाही. त्याने आपला निर्धार प्रत्यक्षात अंमलात आणण्यास सुरुवात केली. मॅट्रिकची परीक्षा जवळ आली असताना त्याने सरकारी शाळा सोडली. राष्ट्रीय विद्यापीठाची मॅट्रिक परीक्षा त्याने दिली. ती उत्तीर्ण झाल्यानंतर अमळनेर येथील राष्ट्रीय महाविद्यालयात तो पुढील अभ्यासासाठी गेला. तेथे मोठ्या कष्टात त्याने दिवस काढले. त्याचे हृदयस्पर्शी वर्णन या दैनंदिनीत आहे. तेथेही विद्यार्थ्यांचे पुढारीपण व्यंकटेशकडेच होते. त्याच्या तेथील विद्यार्थ्यांवरील व प्राध्यापकांवरील प्रभावाची कल्पना या दैनंदिनीवरून येते. तेथे त्याच्या देशभक्तीच्या प्रवृत्तीला खतपाणीच मिळत गेले. तेथून व्यंकटेश खेडगीकर पुण्याला आला. तेथे टिळक महाराष्ट्र विद्यापीठातून बी. ए. ची परीक्षा पहिल्या श्रेणीत उत्तीर्ण झाला. इतिहास, अर्थशास्त्र राजनीती हे त्यांचे विषय. त्याला तेथील फेलोशिप मिळाली. एम्. ए. च्या अभ्यासाची संधी मिळाली. 'लोकशाहीचा विकास' या विषयावर प्रबंध लिहून त्याने तेथील M. A. ची पदवी प्राप्त करून घेतली.

यावेळेपावेतो व्यंकटेश खेडगीकरांचे अवांतर वाचनही खूपच वाढले होते. देशसेवेसाठी नक्की कोणते क्षेत्र निवडावे हे मात्र अद्यापी निश्चित झाले नव्हते. तरीपण गांधीजींच्या जीवनाचा व त्यांच्या कार्याचा त्यांच्या मनावर खूपच परिणाम होत चालला होता. त्या काळात कै. श्री. नारायण मल्हार जोशी कामगार क्षेत्रातील आंतरराष्ट्रीय कीर्तीचे एक नेते होते. (मराठीतील एक प्रसिद्ध लेखक व विचारवंत कै. वामन मल्हार जोशी यांचे ते बंधू होते) त्यांना आपल्या कामात साह्य करणाऱ्या एका कार्यकर्त्याची आवश्यकता होती. त्यासाठी वर्तमानपत्रात जाहिरातही देण्यात आली होती. पण अर्जदाराने 'भांडवल आणि श्रम' या विषयावर एक सविस्तर प्रबंधच लिहून पाठवावयाचा होता. व्यंकटेश खेडगीकरांचा हा अभ्यासाचा विषय होता. त्यांनी प्रबंध तयार केला व पाठवून दिला. श्री. जोशींना तो आवडला. व्यंकटेश खेडगीकरांना त्यांनी मुलाखतीला बोलाविले. जोशींनी खेडगीकरांची निवड करून लगेच कामावर रूजू होण्यास सांगितले. जोशींचे कार्यालय मुंबईस होते. खेडगीकर तेथे गेले. थोड्याच दिवसात मुंबई कामगार संघाचे उपसंघटक म्हणून ते काम पाहू लागले. यामुळे खेडगीकरांना कामगारांच्या जीवनाचा जवळून परिचय करून घेता आला. अशारीतीने देशातील दलित व शोषित वर्गाशी जवळून संबंध येत गेला. त्या वर्गाचे अठराविश्व दारिद्र्य व अज्ञान यामुळे भांडवलदारांकडून त्या वर्गाचे पद्धतशीर शोषण चालले होते. याचा प्रत्यक्ष अनुभव खेडगीकरांना येऊ लागला. व्यापक अशा क्षेत्रात त्यांचे काम सुरू झाले. असे काम करीत असतांना खेडगीकरांना जोशींच्या बरोबर दिल्लीला जाण्याचा प्रसंग आला. श्री. जोशी त्यावेळी केंद्रीय कायदेमंडळाचे सदस्य होते.

दिल्लीच्या वास्तव्यात खेडगीकरांच्या नाजूक प्रकृतीवर तेथील विलक्षण थंडीचा वाईट परिणाम झाला. त्याना अर्धांगवायूचा झटका येऊन त्याचे पाय लुळे पडले. त्यांना लगेच मुंबईला नेण्यात आले. तेथे काही दिवस उपचार झाले. पण फारसा गुण दिसेना. तेथून पुणे येथेही उपचार झाले. शेवटी अहमदनगर येथे आयुर्वेद महाविद्यालयाचे संस्थापक प्राचार्य श्री. गंगाधरशास्त्री गुणे यांच्याकडे खेडगीकरांना ठेवण्यात आले. गुणेशास्त्रींनी आपले वैद्यकीय ज्ञान पणाला लावले. त्यांनी अत्यंत मनोभावाने केलेल्या उपचारांनी खेडगीकरांना बरे वाटू लागले. गुणेशास्त्री हे अमळनेर येथील महाविद्यालयाचे प्राचार्य श्री. जनार्दनपंत गुणे यांचे बंधू होते. (जनार्दनपंत हे पुढे स्वामी कुवलयानंद म्हणून प्रसिद्ध पावले.) जवळ जवळ दीड वर्षेपर्यंत रुग्णावस्थेत खेडगीकरांना काढावे लागले तेव्हा कुठे त्यांना थोडेसे चालता येऊ लागले. प्रदीर्घ काळ

खोलीत एकटेच पडून राहिल्यामुळे खेडगीकरांची मुळातली एकांतप्रियता अधिकच वाढली. चिंतन व मनन सारखे चालले होते. १९२८ च्या ऑगस्ट महिन्यात खेडगीकर पुण्याला गेले.

श्री. जोशींनी त्याना पुन्हा कामावर रूजू होण्यास सांगितले. पण मुंबईचे हवामान मानवणार नाही म्हणून त्यांनी खेडगीकरांना सोलापुरला काम करायला सांगितले. तेथे जाऊन कामाला सुरुवातही झाली. त्यावेळी तेथे कामगारांचा फार मोठा संप चालला होता. त्या संपाचे नेतृत्त्व खेडगीकरांकडे ओघानेच आले. संप शांतपणे चालला होता. पण शांततामय निदर्शकांवर लाठीमार इत्यादींचा पोलिसांनी अवलंब केला. कामगारही खवळले. पोलिसांना तेच हवे होते. त्यानी खेडगीकरांना व आणखी काही कामगारांना अटक केली. काही दिवसानंतर त्यांची सुटका झाली. तोपर्यंत कामगारात बरीच फूट पडल्याचे खेडगीकरांना दिसून आले. त्याच सुमारास देशात गाजत असलेल्या मीरत खटल्यातही खेडगीकरांना गोवण्यात आले होते असे कळते. पण श्री. जोशींच्यामुळे खेडगीकरांचे नाव त्या यादीतून वगळण्यात आल्याचे कळते.

या सर्व घटनांच्यामुळे खेडगीकरांच्या प्रकृतीवर बराच परिणाम जाणवू लागला. एकूण कामगार चळवळीतील धक्काधक्कीचे जीवन त्याना मानवेना. त्या कामातून स्वतःची सुटका करून घ्यावी असे खेडगीकरांना वाटू लागले. तशी श्री. जोशी यांना विनंती केली. पण श्री. खेडगीकरांनी कामगारक्षेत्र सोडू नये असे जोशी यांना वाटले होते. पण त्यांची प्रकृती त्यांना साथ देईना हे जाणून जोशींनी त्याना कामगार क्षेत्र सोडून जाण्यास अनुमती दिली. वर्दळीपासून दूर अशा एखाद्या ठिकाणी जाऊन काही विधायक कार्य करता आले तर पाहावे असे खेडगीकरांना वाटू लागले.

तसा विचार करीत ते सोलापुरीच राहिले होते. पुढे काय हा विचार त्यांच्या मनात सारखाच घोळत असला पाहिजे. आपली इच्छा प्रबळ असली की मार्ग आपोआपच सापडतो हा प्रत्यय त्यांना आला. त्यावेळी त्यांची व श्री. अनंतराव कुळकर्णी यांची भेट झाली. त्यावेळच्या निजामी राज्यातील उस्मानाबाद जिल्ह्याच्या ‘हिप्परगे’ या गावी श्री. व्यंकटराव देशमुख व त्यांचे बंधू श्री. अनंतराव देशमुख यांनी १९२१ च्या दसऱ्याच्या मुहुर्तावर एका राष्ट्रीय शाळेची स्थापना केली होती. श्री. व्यंकटराव देशमुख हे वकील होते. हे अनंतराव देशमुख हे पुण्यास बी. ए. च्या वर्गात शिकत होते पण असहकार चळवळीत त्यांनी कॉलेजवर बहिष्कार घालून ते बाहेर पडले होते. श्री. अनंतराव पुढे दत्तक गेले. म्हणून त्यांचे आडनाव कुलकर्णी असे पडले. पुढे ते अनंतराव कुलकर्णी या नावानेच परिचित झाले. त्यांनीच ही संस्था चालविण्याची जबाबदारी स्वीकारली. श्री. व्यंकटराव आपल्या व्यवसायातील बरीचशी प्राप्ती संस्थेला देत असत. श्री. अनंतरावांनी काही ध्येयवादी मंडळींची शिक्षक म्हणून निवड करून ही संस्था चालविली. या संस्थेतील विद्यार्थ्यांवर देशभक्तीचे संस्कार करून देशसेवकांची एक पिढी निर्माण करणे हाच या संस्थेचा प्रमुख उद्देश होता. म्हणून सर्वसामान्यपणे चालविल्या जाणाऱ्या शिक्षण संस्थेहून या संस्थेचे स्वरूप अगदीच भिन्न होते. पहिली गोष्ट म्हणजे ती शाळा निवासी स्वरुपाची होती. एका ओढ्याच्या काठावरील माळरानावर घातलेल्या झोपड्यातून शिक्षक व विद्यार्थी राहात. त्यामुळे चोवीस तास विद्यार्थी व शिक्षक एकत्रच राहात, एकत्र जेवत, एकत्र सर्व उपक्रमांत भाग घेत. भारतीय संस्कृतीचा व देशभक्तीचा संस्कार घडविण्यासाठी निरनिराळे उपक्रम तेथे चालत. ते गाव जरी निजामी इलाख्यात होते तरी मुंबई मॅट्रिकच्या अभ्यासक्रमानुसार तेथे निरनिराळे विषय शिकविले जात. खाजगी रीतीने मुंबई इलाख्यातील सरकारमान्य शाळेतील पूर्व परीक्षेला बसवून पुढे त्या शाळेचे विद्यार्थी म्हणून मॅट्रिकच्या परीक्षेसाठी मुले पाठविली जात.

पहिल्यापासून त्या शाळेला निष्ठावंत शिक्षक लाभत गेले. फलटणचे कृष्णाजी शंकर केसकर, शिखर शिंगणापुरचे श्री. अंबादासराव, श्री. राघवेंद्रराव दिवाण, श्रीनिवासराव रायचूरकर, सोलापूरचे श्री. बा. गो. दाते, इतिहास संशोधक श्री. न. शे. पोहनेकर, प्रसिद्ध पत्रकार श्री. ह. रा. महाजनी, ग. धों. देशपांडे, एस. आर. देशपांडे, डॉ. डी. आर. दास, दादाराव गवळीगुरुजी, श्री. ग. ग. देव असे शिक्षक त्या संस्थेला लाभले होते. या शिक्षकांच्या हातून तयार झालेले विद्यार्थीसुद्धा पुढे निरनिराळ्या क्षेत्रात चमकले. याच शाळेतून पुढे दलित नेते म्हणून प्रसिद्धीस आलेले श्री. तुळशीराम कांबळे, प्रसिद्ध संशोधक, मंत्री व राजकीय नेते श्री. देवीसिंह चव्हाण, प्रसिद्ध राजकीय कार्यकर्ते श्री. विश्वंभरराव हराळकर, लातूरचे प्रसिद्ध वकील श्री. भगवानराव देशमुख, श्री. दासराव बोकील, लोहाऱ्याचे श्री. नारायणराव लोहारेकर वकील, नारायणखेडचे श्री. व्यंकटराव पंपाळ वकील अशी कितीतरी नावे घेता येतील. अशा रीतीने ध्येयवादी मंडळींनी चालविलेली निजाम इलाख्यातही एक आदर्श संस्था होती.

या संस्थेचा आर्थिक भार संभाळण्याची जबाबदारी श्री. व्यंकटराव देशमुखांनी स्वीकारली होती तर शालेय व्यवस्था श्री. अनंतराव पहात होते. श्री. व्यंकटराव 'अण्णा' या नावाने ओळखले जात. श्री. अनंतराव 'काका' या नावाने. काका स्वतः शिकवीत व संस्थेचे चिटणीस म्हणूनही काम करीत. ते नेहमी चांगल्या शिक्षकाच्या शोधात असत. अशा शिक्षकांना हेरून त्यांना आपल्या पाशात ओढण्याचे सामर्थ्य त्यांच्या शब्दात होते. कामगार चळवळीतून निवृत्त होऊन सोलापुरी विश्रांती घेत असलेल्या श्री. व्यंकटेश खेडगीकरांविषयी काकांना खेडगीकरांचे मेहुणे श्री. भीमराव जोशी यांच्याकडून माहिती मिळाली. श्री भिमराव जोशी हिरप्परग्यास चित्रकला शिक्षक होते. काकांनी खेडगीकरांची सोलापुरी भेट घेतली. आपल्या संस्थेचे ध्येयधोरण त्यांच्यापुढे स्पष्ट केले व खेडगीकरांनी मुख्याध्यापक म्हणून तेथे यावे असा आग्रह केला. खेडगीकरांनी काकांच्या सूचनेस होकार दिला व ते १९२९ च्या जून महिन्यात हिप्परग्यास गेले. यथावकाश तेथील मुख्याध्यापकाची सूत्रेही त्यांनी हाती घेतली.

तेथील वातावरणाशी ते एकदम कसे समरस होऊन गेले याचे यथार्थ चित्रण या दैनंदिनीत पहायला मिळते. हिप्परग्यास जाण्यापूर्वी त्यांच्या मासिक वेतनासंबंधी श्री. काका आणि खेडगीकरात झालेला संवाद खेडगीकरांच्या त्यागी व सेवावृत्तीवर प्रकाश टाकणारा आहे. 'तुम्ही वेतन काय घ्याल? — काका. "वेतन घेऊन काम करण्याची अगर नोकर म्हणून राहण्याची मला सवय नाही व तशी इच्छाही नाही. पोटापुरते अन्न व अंग झाकण्यापुरते वस्त्र एवढ्याच माझ्या गरजा.या दोन्ही गोष्टींची सोय झाली की मला काहीच लागणार नाही." —खेडगीकर. हे उत्तर ऐकून अनंतरावकाकांना खेडगीकरांच्या त्यागी वृत्तीचे व निःस्वार्थी सेवाभावनेचे खूप कौतुक वाटले. संस्थेला हवी असलेली व्यक्ती येऊन मिळाली याचा खूप आनंद झाला. काकांनी त्यांच्या वेतनासंबंधी पुढील योजना आखली. दर महिन्याला पन्नास रुपये खेडगीकरांच्या नावे जमा करायचे व त्यातून खेडगीकरांना लागतील तसे खर्चाला पैसे द्यायचे. पण उल्लेखनीय गोष्ट अशी की, खेडगीकरांच्या नावे असलेल्या रकमेतून पैसे काढण्याची वेळच आली नाही. एवढेच नव्हे तर खेडगीकरांनी संन्यास घेतल्यानंतर आपल्या नावे जमा असलेली सगळी रक्कम त्यांनी ती संस्थेला देऊन टाकली.

खेडगीकर हिप्परग्याच्या संस्थेत आल्यापासून तेथील प्रशांत वातावरण, तेथील विविध उपक्रम, तेथील शिक्षक व विद्यार्थ्यांमधील अत्यंत प्रेमाचे संबंध, भातृभाव यामुळे भारावून गेले होते. काकांच्या मूळ उद्देशाची त्यांना स्पष्ट कल्पना आली. काकांचा व्यासंग दांडगा. विशेषतः वाङ्मयावर त्यांचा अधिकार. शाळेच्या तासाव्यतिरिक्त मुलांच्यावर संस्कार करण्यासाठी विशेष तास ठेवण्यात येई. त्याशिवाय काकांच्या

नेतृत्त्वाखाली तेथे एक अध्यात्मिक स्वरूपाचा एक सेवक संघही स्थापन झाला होता. तेथे भजन, पूजन, काकांची प्रवचने इत्यादी कार्यक्रम चालत. पण त्या संघात सरसकट सर्वांना प्रवेश नसे. काही कसोटी लावूनच प्रवेश दिला जाई. खेडगीकरांना एकदम त्या वर्तुळात प्रवेश मिळाला नव्हता. काकांची भजने व प्रवचने बाहेरून जेवढे कानावर पडत तेवढ्यावरच त्यांना संतुष्ट राहावे लागले होते.

काकांची वाणी रसाळ होती असे सांगतात. विषय देशभक्तीचा असो वा देवभक्तीचा. काका त्याविषयाशी इतके समरस होऊन जात की आपोआप त्यांच्या डोळ्यांतून अश्रुधारा वाहू लागत. समोरचे श्रोते मंत्रमुग्ध होऊन त्यांचीही समाधी लागल्यासारखी स्थिती व्हायची असे त्यांच्या पट्टशिष्यांकडून ऐकू येते. श्रोत्यांवर एक प्रकारची मोहिनी पडत असे. खेडगीकरही असे मोहित झाल्याचे दिसून येते. काकांच्या भजनाला स्थल व काळाचे बंधन नव्हते. कधी विहिरीच्या काठावर, कधी झाडाखाली, कधी पाण्यात उभे राहून, कधी झोपडीत बसून भजने चालत. भजने सुरू झाली की संघाच्या सदस्यांचा घोळका भक्तिभावनेने ती भजने ऐकत सभोवताली उभा राही. तल्लिनतेने ऐकत असता त्यांच्याही डोळ्यांतून आनंदाश्रू ओघळत. किंबहुना असेही ऐकण्यात येते की, हा अश्रुपात हा रामभक्तीचा एक महत्त्वाचा निकषच मानला जात असे. त्याच प्रक्रियेला संघ वर्तुळात 'आह्निक' असे नाव रूढ झाले. ते आह्निक केव्हा कोठे झाले याची नोंद संघीयांनी आपल्या दैनंदिनीत ठेवावी असा दंडक होता. ही भजने कधी रात्री कधी भर दुपारी उन्हात तर कधी पहाटे चार वाजतासुद्धा होत. भजनाचे विषय देशप्रेम, स्वार्थत्याग, दरिद्री नारायणाची सेवा, मातृभूमीसाठी बलिदानाची तयारी इत्यादी असत. या सर्व वातावरणाचा प्रभाव खेडगीकरांच्या मनावर प्रकर्षाने पडू लागला. त्या संघातले प्रमुख होते श्री. रा. गो. तथा बाबासाहेब परांजपे, श्री. विश्वंभरराव हराळकर, श्री. व्यंकटराव पंपाळनंतर बऱ्याच लोकांचा संघात प्रवेश झाल्यासारखा दिसतो. त्या संघाचा सदस्य होण्यासाठी महत्त्वाच्या दोन अटी होत्या. पहिली अट म्हणजे सर्वांनी श्री. काकासाहेबांना गुरू मानायचे व दुसरी गोष्ट म्हणजे ते सांगतील त्या आज्ञा पाळायच्या. खेडगीकरांनी यथावकाश काकांचे शिष्यत्व पत्करले.

काका स्वामी रामतीर्थांना गुरू मानीत. स्वामी रामतीर्थांचे पट्टशीष्य पू. नारायणस्वामी हे लखनौ येथील रामतीर्थ केंद्राचे प्रमुख होते. त्यांच्याशी काकांचा नेहमी पत्रव्यवहार चालत असे. त्यांचे मार्गदर्शन त्यांना लाभत असे. एकूण एकीकडे देशभक्त व दुसरीकडे देवभक्त असे स्वयंसेवक काकांना तयार करायचे होते. म्हणून निवडक लोकांवर प्रयोग करायचे त्यांनी ठरविले असेल. या निवडक मंडळीतून हैदराबाद मुक्तिपथक त्यांना तयार करायचे होते असे दिसते. या पथकाचे नाव 'रामाचे शंभर सैनिक' असे ठेवले होते. सूफी संप्रदायात 'चहल दरवेष' नावाची सर्वसंग परित्याग करणाऱ्यांची एक परंपरा आहे. तशीच एक संघटना काका निर्माण करू इच्छित होते. काही विद्यार्थ्यांनी हैदराबादला मुक्त करण्याच्या शपथाही घेतल्या होत्या. काही प्रसिद्ध पुढारी व काही क्रांतिकारकसुद्धा हिप्परगे येथे राहून गेले होते.

एकूण त्याकाळी शिस्तबद्ध व ध्येयधुंद विद्यार्थ्यांचा एक गट तयार होत होता. काकांच्या संघातील सदस्यांना दैनंदिनीसुद्धा एका विशिष्ट पद्धतीनेच लिहावी लागे. दैनंदिनी सुरू करताना वरच्या बाजूस प्रथम ॐ त्याखाली राम व त्याखाली 'काका' असा लिहिण्याचा प्रघात होता. खेडगीकरांनी आपल्या दैनंदिनीची सुरुवात त्या संघाच्या नियमावर हुकूम केल्यासारखी दिसते. या दैनंदिनीचे पहिले पान त्याच धर्तीवर लिहिले आहे. काकांच्या मार्गदर्शनाखाली व तेथील एकूणच प्रसन्न वातावरणात खेडगीकर अधिकच अंतर्मुख कसे होत चालले हे या दैनंदिनीतून स्पष्ट होते. येथेच काकासाहेबांच्या आज्ञेवरून संन्यास

अनुक्रमणिका

ग्रहणाचा त्यांनी संकल्प केला. त्यांच्या निकटवर्तीयांकडून त्यासंबंधीची कळलेली हकीगत अशी. १४ जानेवारी १९३१ म्हणजे त्या दिवशीच्या संक्रांतीच्या दिवशी—

**'अमृत म्हणे मज भिक्षा डोहळे । येती अशा लहरी ।**
**अशाश्वत संग्रह कोण करी । कोण करी घर माड्या सोपे ।**
**झोपडी हीच बरी । नित्य नवे जे देईल। भक्षू तेचि घरी ।**
**अमृत म्हणे मज भिक्षा डोहळे । येती अशा लहरी ॥'**

हे अमृतरायाचे सुप्रसिद्ध पद अत्यंत तन्मयतेने गुणगुणत असताना काकानी 'तुम्ही भिक्षा मागून राहा' असे खेडगीकरांना सांगितले.

आधीच त्यागमय जीवन जगत असलेल्या खेडगीकरांनी भिक्षा मागायला सुरुवात केली. पाचसहा घरे जाऊन भिक्षा मागायची व ती आणून कुण्या विद्यार्थ्याला बरोबर घेऊन जेवण करण्याचा प्रघात सुरू झाला. प्रत्यक्ष संन्यासाश्रमात पदार्पण करण्याची ही जणू पूर्वतयारीच होती.

खेडगीकरांना पू. स्वामी रामतीर्थांच्या पट्टशिष्यांकडून दीक्षा द्यावी असे काकांनी ठरविले. त्यासाठी आधी त्यांची भेट घेऊन येण्यासाठी श्री. खेडगीकर व श्री. भगवानरावांना लखनौला पाठविले. श्री. भगवानराव हे श्री. व्यंकटराव देशमुखांचे चिरंजीव व अनंतरावांचे पुतणे. त्यांचे शिक्षण हिप्परग्यासच चालले होते. जसे श्री. बाबासाहेब परांजपे यांचे टोपण नाव युवराज ठेवले होते. तसे भगवानरावांना 'मोहन' हे नाव ठेवण्यात आले होते ते दोघे लखनौला कसे गेले, तेथे किती मुक्काम झाला, पू. नारायणस्वामीजींशी झालेला संवाद यासंबंधी सविस्तर माहिती या दैनंदिनीत पहायला मिळते. आधी पू. नारायणस्वामी खेडगीकरांना संन्यास द्यायला एकदम तयार झाले नाहीत. त्याचे कारण एका व्यक्तीला संन्यास दिल्यानंतर त्या व्यक्तीने पुन्हा गृहस्थाश्रमात पदार्पण केले होते. ते उदाहरण पू. नारायणस्वामींनी सांगितले पण खेडगीकरांचा पूर्वेतिहास व त्यांचा दृढसंकल्प पाहून पू. नारायणस्वामींनी खेडगीकरांना हिप्परग्यास जाऊनच संन्यास दीक्षा देण्याचे मान्य केले.

त्याप्रमाणे १९३२ च्या १४ तारखेस म्हणजे संक्रांतीच्या दिवशी हजारो लोकांच्या समक्ष पू. नारायण स्वामींनी संस्थेचे मुख्याध्यापक श्री. व्यंकटेश खेडगीकरांना विधिपूर्वक संन्यासाश्रमाची दीक्षा दिली. श्री भगवानराव देशमुखांनीच खेडगीकरांच्याकरिता तयार केलेली भगवी वस्त्रे पू. नारायणस्वामींच्या- कडून खेडगीकरांना दिली. खेडगीकरांचे नाव 'स्वामी रामानंदतीर्थ' असे ठेवण्यात आले. दैनंदिनीत त्या नावासंबंधी लखनौ येथे पू. नारायणस्वामींशी चर्चा झालेली हकीकत येते. श्री. आर. एस. नारायणस्वामी असे नाव ते लिहीत असत. त्यांचे स्पष्टीकरण नारायणस्वामीनी असे केले. रामतीर्थस्वामी या दोन नावाची आद्याक्षरे घेऊन आर. एस. असे केले. म्हणजे आपल्या नावाआधी आपल्या गुरुचे नाव आलेच. त्याच धर्तीवर आपण स्वतः संन्यास घेतल्यानंतर आपले नाव काय असावे याचाही विचार येऊन गेला. त्यांना प्रथम वाटले 'पूर्णानंद' हे ठेवून घ्यावे. पण नुसते पूर्णानंद हे नाव नको. सध्या त्यांना गुरुभक्त म्हणून संबोधितात पण गुरभक्तात गुरुचा जरी संबंध आला तरी 'काका' या शब्दाचा उठाव येत नाही. तेव्हा खेडगीकरांना वाटले की आपणास K. Purnanand असे नाव असावे. K म्हणजे काका पण नंतर 'स्वामी रामानंदतीर्थ' हे नाव निश्चित झाले. या नावातसुद्धा खेडगीकरांची इच्छा पूर्ण झाली आहे असे आपणास दिसून येईल. या नावात रामतीर्थातील 'राम' शब्द आला तसेच काकांना 'आनंदमूर्ती' असेही नाव प्राप्त

अनुक्रमणिका

झाले होते. त्यामुळे स्वामी रामानंदतीर्थ या नावात रामातीर्थांचे नाव तसेच काकांचे आनंदमूर्तीतील 'आनंद' अशी दोन्ही नावे आली."

खेडगीकरांची संन्यास घेण्याची बालपणीची इच्छा अशा रीतीने पूर्ण झाली. भीक्षावृत्ती तर आधीच स्वीकारली होती. त्यामुळे संन्यासाश्रम त्यांना नवा वाटला नव्हता. भगवी वस्त्रे तेवढी नवी आली. असंग्रहाची पहिल्यापासून सवय होतीच. हिप्परगे येथील शिक्षण संस्थेत आता एक संन्यासी मुख्याध्यापक काम करू लागला. त्यामुळे तेथील वातावरण अधिक त्यागमय. मंगलमय बनण्यास साह्य झाले. संस्थेची कीर्ती संस्थानभर पसरू लागली. विद्यार्थ्यांची संख्या वाढत चालली. विद्यार्थ्यांचे पालक संस्था पाहण्यासाठी येत राहिले. त्यांच्याकडून संस्थानातील सामाजिक व राजकीय परिस्थितीविषयी माहिती मिळू लागली. पू. स्वामी रामनंदतीर्थ व इतर मंडळी त्यावर गांभीर्याने विचार करू लागली. निजामाच्या एकतंत्री जातीय राजवटीविरुद्ध जनतेत जागृती निर्माण करण्याचे विचार येथे सुरू झाले.

मुलांना देशभक्तांची चरित्रे वाचून दाखविण्यात येत होतीच. मुलांच्या तोंडी सतत देशभक्तीपर गीते असावीत म्हणून एक काव्यसंग्रह प्रकाशित झाला. सुमारे पंचवीस मराठी कविता व चारपाच हिंदी कविता समाविष्ट केल्या गेल्या. प्रत्येक कवितेला श्री. वि. स. खांडेकरांची रसग्रहणात्मक अशी प्रस्तावना होती. 'काव्यज्योती' या नावाने प्रसिद्ध झालेला तो संग्रह महाराष्ट्रात त्यावेळी खूप गाजला. त्या पुस्तकाचे संपादक श्री. भगवानराव देशमुख होते. अशा विविध उपक्रमांमुळे संस्थेची प्रसिद्धी वाढत चालली तशी सरकारची वक्रदृष्टीही इकडे वळू लागली. उस्मानाबादच्या कलेक्टराने तर ही शाळा बंद करून टाकण्याची सरकारकडे शिफारस केली होती. पण प्रत्यक्षात तसे घडले नाही याचे कारण तेथे शैक्षणिक दृष्टीने खऱ्या शिक्षणाचा येथे प्रामाणिकपणे प्रयोग चालला होता. हे जाणणारेही बरेच अधिकारी होते. निरनिराळ्या क्षेत्रातील प्रमुख मंडळींना निमंत्रित करून मोठमोठे समारंभ घडून आणले जात. त्यावेळी विद्यार्थ्यांची शिस्त, विद्यार्थ्यांचे विविध गुणदर्शनाचे कार्यक्रम पाहून कुणीही खुष होऊन जाई. राजा धनराजगिरीजीसारख्या धनिकापासून साहित्यसम्राट नरसिंह चिंतामण केळकर, वि. स. खांडेकर, वामन मल्हार जोशी यांसारख्या ज्येष्ठ व श्रेष्ठ साहित्यिकांपर्यंत अनेक प्रतिथयश व्यक्ती तेथे येऊन गेल्या, प्रभावित झाल्या. वि. स. खांडेकरांनी तर किर्लोस्कर मासिकात लिहिलेल्या एका लेखात या संस्थेचे वर्णन हिप्परग्याच्या माळरानावरील बाग असे केले आहे. ते वर्णन अगदी यथार्थ होते. या बागेची मशागत करून तिला फुलाफळांनी समृद्ध करण्यात श्री. व्यंकटेश खेडगीकरांचा (पू. स्वामी रामानंदतीर्थांचा) सिंहाचा वाटा होता.

संस्था नावारूपाला येत चालली. एक दिलाने मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी अहर्निश झटणाऱ्या गुरुजनांचा एक चांगला संच जमा झाला होता. पण व्यक्तीच्या जीवनासारखेच संस्थेच्या जीवनातही चढउतार पाहायला मिळतात. काही कारणांमुळे तेथील मंगलमय वातावरणाला क्षती पोचेल की काय अशी शंका पू. स्वामीजी व त्यांच्या सहकाऱ्यांना वाटू लागली. त्या शंकेविषयी कुणाशी चर्चा करणे, एकूण शहानिशा करण्याचा सर्वसामान्य मार्ग अवलंबिणे इत्यादी भानगडीत पू. स्वामीजी कधीच पडले नाहीत. त्यांनी स्वतःपुरता निर्णय घेतला व १९३५ च्या जून महिन्यात त्यांनी त्या पवित्र परिसराचा निरोप घेतला. त्यांच्याबरोबर श्री. बाबासाहेब परांजपे, श्री. बाबुराव कानडे, श्री. ग. धों. देशपांडे व आणखी काही मंडळींनी शाळा सोडली. या मंडळींच्या जाण्याने जनमानसात शाळेबद्दलची आदराची भावना ओसरत जाणे साहजिकच होते. बरेचसे विद्यार्थीही शाळा सोडून गेले. अशा स्थितीत शाळा बंद करावी काय असाही

विचार संचालकापुढे आला. पण श्री. व्यंकटराव अण्णा व श्री. अनंतराव काकांनी शाळा कसल्याही स्थितीत चालू ठेवण्याचा निर्धार केला. श्री. अण्णासाहेबानी तर आपले सर्वस्व संस्थेला अर्पण केले होते.

पुन्हा शिक्षकांची जुळवाजुळव करून नव्या जोमाने कामाला आरंभ झाला. एकामागून एक असे मोठमोठे समारंभ शाळेत होऊ लागले. प्रसिद्ध मंडळींना प्रमुख पाहुणे म्हणून पाचारण करण्यात आले. लवकरच राजकीय संघटना उभी करून निजामी राजवटीविरुद्ध चळवळीचे मनसुबे तयार होऊन त्यात अनंतराव काकांनीच अगोदर पुढाकार घेतला होता. हैदराबाद संस्थानातील मराठवाडा विभागापुरती (औरंगाबाद, नांदेड, बीड, परभणी व उस्मानाबाद व आताचे जालना व लातूर हे जिल्हे) 'महाराष्ट्र संघ' नावाची एक संस्था स्थापन झाल्याची घोषणासुद्धा प्रतिष्ठित मंडळींच्या बैठकीत झाली होती. त्या संघाचे रीतसर अधिवेशन घेण्याचेही घाटत होते. पण तेवढ्यात कै. श्री. काशीनाथराव वैद्य यांच्या नेतृत्त्वाखाली 'महाराष्ट्र परिषद' हे नाव घेऊन एक संस्था निघाली. तिचे पहिले अधिवेशन परभणी जिल्ह्यातील परतूर या ठिकाणी प्रसिद्ध वकील श्री. गोविंदराव नानल यांच्या अध्यक्षतेखाली भरविण्यात आले होते.

ही राजकीय संघटनेची बांधणी चालली होती. त्यावेळी पू. स्वामी रामानंदतीर्थ, श्री. बाबासाहेब, श्री. ग. धों. देशपांडे ही मंडळी अंबाजोगाई येथील योगेश्वरी नूतन विद्यालयास जाऊन मिळाली. तेथे प्रश्न फारच निराळा होता. केवळ प्राथमिक स्तरापर्यंत स्थानिक मंडळींनी ती शाळा चालविली होती. तिची वाढ करून तिला हायस्कूलचा दर्जा प्राप्त करून देण्याची जबाबदारी पू. स्वामीजी व त्यांच्या सहकाऱ्यांवर पडली. खाजगी शाळेला सहसा मान्यता द्यायची नाही हे निजाम सरकारचे धोरण असल्यामुळे प्राथमिक शाळेचे रूपांतर हायस्कूलमध्ये करणे वाटले तितके सोपे नव्हते. प्रथमपासूनच विद्यार्थ्यांत स्वाभिमान व देशभक्तीचे संस्कार देण्यावरच या मंडळींनी भर दिला. त्यामुळे सरकारमान्यता देण्यास मागेपुढेच पाहात होते. पू. स्वामीजींनी पालकांची बैठक घेऊन त्यांच्यापुढे स्पष्टपणे आपली भूमिका मांडली. सरकारची मान्यता मिळाली नाही तरी आपली मुले यांच्या शाळेत पाठविण्यास किती पालक तयार आहेत याची त्यांनी चाचणी घेतली. त्यांना प्रतिसाद चांगला मिळाला. अशा तऱ्हेने सातवीपर्यंत मुले जरी आली तरी मान्यता आली नाही. शेवटी त्या मुलाना गुलबर्ग्याच्या शाळेतून सातवीची परीक्षा द्यावी लागली. ती मुले दहावीत आली तरी मान्यता नव्हती. शेवटी पू. स्वामीजींनी हैदराबादला जाऊन त्यावेळचे प्रसिद्ध व वजनदार लोकनेते कै. श्री. वामनराव नाईक यांची भेट घेऊन त्यांना परिस्थिती समजावून सांगितली. श्री. वामनराव नाईकांनी पू. स्वामीजींना सहाय्य करण्याचे आश्वासन दिले. श्री. वामनराव नाईकांवर पू. स्वामीजींच्या आगळ्यावेगळ्या व्यक्तिमत्वाचा खूपच प्रभाव पडला होता. पू. स्वामीजींच्या प्रयत्नांना यश येऊन दहावीतील मुलांची परीक्षा येण्यापूर्वी योगेश्वरी नूतन विद्यालयास हायस्कूलची परवानगी मिळाली व विद्यार्थ्यांची पहिली तुकडी अत्यंत उज्ज्वल यशाने बाहेर पडली. संस्थेचा लौकिक वाढत गेला.

पण इकडे राजकीय परिस्थितीही झपाट्याने बदलत चालली होती. वर उल्लेखलेले महाराष्ट्र परिषदेचे पहिले अधिवेशन परतूरला जून १९३७ मध्ये भरले. त्यावेळी पू. स्वामीजी शाळेतील काही निवडक स्वयंसेवकाचे पथक घेऊन परतूरला गेले होते. तेथे स्वयंसेवकाचीच भूमिका त्यानी अधिक स्वीकारली होती. तरीपण त्यांना परिषदेची घटना तयार करण्यासाठी नेमलेल्या कमिटीवर घेण्यात आले. ते काम ते अंबाजोगाई येथील शाळेचे काम संभाळूनच करीत राहिले. पण ही अवस्था फार काळ टिकणे शक्य नव्हते. मराठवाड्यात श्री. आनंदराव वाघमारे, श्री. गोविंददास श्रॉफ इत्यादींच्या नेतृत्वाखाली एक तरुण गट तयार होत होता. त्यांचेच पुढे महाराष्ट्र परिषदेवर वर्चस्व प्रस्थापित झाले. मवाळांचा गट मागे पडत गेला.

अनुक्रमणिका

महाराष्ट्र परिषदेचे दुसरे अधिवेशन १९३८ च्या जूनमध्ये झाले. तेथे सरकारने अनेक बंधने लादली होती. त्या बंधनांचा निषेध म्हणून अधिवेशन मध्येच स्थगित करण्याचा निर्णय बहुमतांनी घेण्यात आला.

या अधिवेशनानंतर पू. स्वामीजी महाराष्ट्र परिषदेचे चिटणीस म्हणून काम करू लागले. त्यांना श्री. गोविंददास श्रॉफ गटाचा संपूर्ण पाठिंबा मिळाला. आता शाळा व राजकीय क्षेत्रातील काम यातील एका क्षेत्राची निवड करणे अपरिहार्य होते. त्यांनी शेवटी संस्थेच्या संचालकांकडून संस्था सोडून राजकीय कामास वाहून घेण्याची परवानगी मिळविली.

मग त्यांचा मुक्काम हैदराबादला झाला. हैदराबाद हे राजधानीचे गाव. तेथे अनेक लोकांशी संपर्क ठेवून राजकीय चळवळीचे वातावरण निर्माण करण्याची योजना त्यांनी आखली. सरकार कोठल्याही उघड उघड राजकीय संघटनेला परवानगी देण्यास तयार नव्हते. म्हणूनच तेलंगणात आंध्रसभा, कर्नाटकात कर्नाटक परिषद व मराठवाड्यात महाराष्ट्र परिषद अशा प्रांतिक परिषदांच्याद्वारे जनजागृतीच्या कामाला आरंभ झाला होता. महाराष्ट्र परिषदेच्या पहिल्या व दुसऱ्या अधिवेशनाला पू. स्वामीजी उपस्थित होते. त्यावेळी अजून अंबाजोगाई येथे मुख्याध्यापक म्हणूनच काम करीत होते. पण त्यानंतर त्यानी पूर्णपणे राजकीय क्षेत्रात पदार्पण केल्याचा उल्लेख आलाच आहे. हैदराबादला मुक्काम हलविण्यापूर्वी हैदराबादी भरलेल्या शिक्षण परिषदेत पू. स्वामीजींचे एक अत्यंत अभ्यासपूर्ण भाषण झाले होते. त्यावरून तेथील प्रतिष्ठित पुढाऱ्यांवर पू. स्वामीजींच्या सखोल अभ्यासाची, मुद्देसूद भाषण करण्याची छाप पडली. ही व्यक्ती आता राजकीय क्षेत्रात पदार्पण करून जनजागृतीसाठी हैदराबादेतच वास्तव्य करणार होती हे ऐकून हैदराबाद येथील पुढाऱ्यात थोडीशी खळबळ निर्माण होणे साहजिकच होते. कारण त्यांच्या मवाळ नेतृत्वाला शह बसणार होता हे त्यानी हेरले होते. सर्वसंग परित्याग करून देशसेवेचे कंकण हाती बांधलेला एक संन्यासी व त्याच्याविरुद्ध आपला व्यवसाय, आपला संसार व सरकारची वक्रदृष्टी आपल्यावर पडू न देण्याची दक्षता बाळगणारे लब्धप्रतिष्ठित पुढारी अशी परिस्थिती निर्माण झाली.

स्वामीजींना प्रथम हैदराबाद येथे राहायला एखादे ठिकाण मिळणेच कठीण झाले. चळवळ्या संन्याशाला घरात जागा देऊन नसते संकट ओढवून घेण्यास कोण सुखासुखी तयार होईल? शेवटी स्वामीजींचे एक जुने स्नेही व सेवानिवृत्त न्यायाधीश श्री. रत्नाळीकर यांनीच स्वामीजींना आपल्या घरी ठेवून घेतले. हैदराबादेतील नेत्यांशी संपर्क साधून आपल्या योजना त्यांना समजावून सांगून संघटना उभी करणे स्वामीजींच्या दृष्टीने महत्त्वाचे होते. हैदराबादेतील नेते बहुतेक वकिलीच्या व्यवसायातले होते. त्यामुळे त्यांना भेटायचे म्हणजे रात्री ९॥, दहाच्या नंतर. पण न कंटाळता स्वामीजी दररोज काही लोकांना भेटत. त्यांच्याबरोबर श्री. दिगंबरराव बिंदू असायचे. अशा विचारमंथनातून हैदराबाद संस्थानात हैदराबाद स्टेट काँग्रेसची स्थापना करण्याचे ठरले. त्याची पूर्वतयारी सुरू झाली. सभासद नोदणी सुरू झाली. रीतसर त्या नावाची घोषणा करण्यासाठी पं. जी. रामाचारी वकिलांच्या घरी ९ सप्टेंबर १९३८ ला एक सभा बोलावण्यात आली. पण सरकारने ती सभा होण्यापूर्वीच ती सभा बेकायदेशीर असल्याचे कळविले. त्या संदर्भात पुढे सरकार व श्री. काशिनाथराव वैद्य यांच्यामध्ये खूप दिवस पत्रव्यवहार चालला. स्टेट काँग्रेसच्या नावालाच सरकारचा विरोध होता. एवढेच नव्हेतर ती संस्था जातीय स्वरूपाची आहे असा आक्षेप घेण्यासही सरकारने कमी केले नाही. नाव बदलण्याचा आग्रह सरकारने धरला. दोन तीन नावांचे पर्याय पुढे आले. पण स्वामीजींनी स्टेट काँग्रेस नावाचाच आग्रह धरला. त्याच प्रश्नावर त्यांनी सत्याग्रहाला आरंभ करण्याचे ठरविले. त्यापूर्वी पूर्वी जी स्टेट काँग्रेसची समिती रचण्यात आली होती ती रद्द करून श्री. गोविंदराव नानल वकील यांच्या अध्यक्षतेखाली पुढील व्यक्तींचा समावेश असलेली एक समिती नेमण्यात आली :—(१) श्री.

गोविंदराव नानल (अध्यक्ष), (२) श्री. रामकिशन धूत (सरचिटणीस), (३) श्री. नारायण रेड्डी (तेलंगणा), (४) श्री. श्रीनिवासराव बोरीकर (मराठवाडा) व (५) श्री. जनार्दनराव देसाई (कर्नाटक).

या पाच जणांनी २४ ऑक्टोबर १९३८ ला हैदराबादच्या सुलतान बाजार येथील भर वस्तीत कायदेभंग करून सत्याग्रह केला. हा आरंभ करण्यापूर्वी स्वामीजींनी संस्थानभर झंझावाती दौरा काढला. मराठवाडा संपूर्णपणे त्यांच्यामागे उभा राहिला. कर्नाटकातील व तेलंगणातील काही तरुण मंडळी स्वामीजींना मिळाली. सत्याग्रहींच्या याद्या व तारखा ठरवून स्वामीजींनीही २७ ऑक्टोबर १९३८ ला सत्याग्रह केला. त्यांच्या तुकडीत लातूरचे राघवेंद्रराव दिवाण वकील, तेलंगणचे राजरेड्डी व कर्नाटकचे अप्पाराव यांचा समावेश होता.

श्री. नानल यांच्या तुकडीस केवळ एक महिन्याची शिक्षा देण्यात आली. पण स्वामीजींना दीड वर्षांची शिक्षा ठोठविण्यात आली. सरकारने हे बरोबर हेरले होते की संस्थानातील चळवळीचे बंडखोर नेतृत्त्व स्वामीजीच करणार. जेलमध्ये त्यांना नानाप्रकारे छळण्यात आले. त्यांच्यावर निरनिराळे आरोप ठेवून त्यांना अंधार कोठडीचीसुद्धा शिक्षा भोगावी लागली. उपजीविकेचे साधन नसलेला हा एक उपटसुंभ मनुष्य आहे असे समजून त्यांच्यावर चॅप्टर केसही सरकारने दाखल केली. एकूण इतरांच्या मानाने स्वामीजींना तुरुंगात फारच अपमानास्पद व कडक वागणूक मिळाली.

या स्टेट काँग्रेसच्या सत्याग्रहाच्या सुमारास संस्थानात हिंदु महासभा व आर्यसमाज या संस्थांच्या वतीनेही संस्थानव्यापी सत्त्याग्रहाची मोहीम सुरू झाली होती. हैदराबाद संस्थानातील या सर्व राजकीय घडामोडींकडे महात्मा गांधीजींचे पूर्णपणे लक्ष होते. ‘हरिजन’ साप्ताहिकातून ते लेखही लिहीत होते. स्टेट काँग्रेस, हिंदू महासभा व आर्यसमाज या संस्थांकडून चालविलेल्या सत्त्याग्रहाची भूमिका यामध्ये तत्त्वशः फरक होता. पण सर्वसामान्य जनतेला तो कळत नव्हता. त्यामुळे महात्माजींनी स्टेट काँग्रेसचा सत्त्याग्रह स्थगित करण्याचा सल्ला दिला. त्याप्रमाणे २४ डिसेंबर १९३८ ला श्री. काशिनाथराव वैद्य यांच्या नेतृत्त्वाखाली शेवटच्या तुकडीने सत्त्याग्रह केला. श्री. वैद्यांनी आपल्या निवेदनात सत्त्याग्रह स्थगित केल्याची घोषणा केली. पुढे चार महिन्यांनी १० एप्रिल १९३९ ला स्टेट काँग्रेसच्या सर्व सत्याग्रह्यांची सरकारने मुक्तता केली. पुढे काय करायचे हा प्रश्न काँग्रेसजनापुढे होताच, त्यासाठी कार्यकर्त्यांची एक बैठक मनमाड येथे १२ व १३ सप्टेंबर १९३९ ला झाली. त्या बैठकीत मवाळ पुढाऱ्यांनी स्टेट काँग्रेस हे नाव बदलण्याचा विचार मांडला. पण स्वामीजी व त्यांच्या सहकाऱ्यांना तो विचार पटला नाही. पुन्हा श्री. गोविंदराव नानल यांच्या अध्यक्षतेखाली एक काँग्रेस समिती स्थापन झाली. स्वामीजी तिचे सरचिटणीस होते. मध्यंतरी नाव बदलून नॅशनल कॉन्फरन्स असे नाव ठेवू असे सरकारला कळविले. पण सरकारने त्यालाही नकार देऊन स्टेट काँग्रेसवरील बंदी चालूच ठेवली. ती बंदी उठविण्यासाठी पुन्हा सत्त्याग्रहाचा विचार स्वामीजींचा जहाल गट करीत होता. पण नुकतेच महायुद्ध सुरू झाले होते. भारताच्या जनतेला विश्वासात न घेता ब्रिटिश सरकारने हिंदुस्थान हे युद्धमान राष्ट्र घोषित केले. त्याविरुद्ध महात्मा गांधींनी वैयक्तिक सत्याग्रहाची घोषणा केली. पहिले सत्याग्रही म्हणून विनोबा भावे यांची निवड झाली. काही व्यक्तींचीच त्यांनी सत्याग्रही म्हणून निवड केली. हैदराबाद संस्थानातील स्वामीजी, मोतीलाल मंत्री, अच्युतभाई देशपांडे, प्राणेशाचार्य, हिरालाल कोटेचा, श्रीनिवासराव हवालदार या मंडळींचा अंतर्भाव होता. स्वामीजींना १२ सप्टेंबर १९४० ला अटक झाली. या सर्वांची १६ सप्टेंबर १९४१ ला सुटका झाली. पण स्टेट काँग्रेसवरील बंदीचा प्रश्न सुटलाच नव्हता. प्रांतिक परिषदांची अधिवेशने भरत होती. त्या परिषदांतून राजकीय स्वरूपाचे ठराव पास करण्यात येऊ लागले. स्वामीजी या अधिवेशनात हजर राहत. पण

शेवटपर्यंत ते स्वतःला स्टेट काँग्रेसचाच प्रतिनिधी म्हणून काम करीत राहिले हे लक्षात ठेवणे आवश्यक आहे.

१९४० च्या वैयक्तिक सत्त्याग्रहानंतर ऑगस्ट १९४२ चे क्रांतीपर्व सुरू झाले. त्यावेळीही १६ ऑगस्ट १९४२ ला स्वामीजींना अटक करण्यात आली. त्यावेळी संस्थानात सत्याग्रह व मोडतोडीचे कार्यक्रम अशा दुहेरी स्वरूपात चळवळ झाली. १५ डिसेंबर १९४३ ला स्वामीजी व त्यांच्याबरोबरच्या प्रमुख व्यक्तींना सोडून देण्यात आले. तरीपण स्टेट काँग्रेसवरची बंदी तशीच होती. शेवटी दुसरे महायुद्ध संपले. ब्रिटिश सरकारने हिंदुस्थानला स्वातंत्र्य देण्याचे ठरविले. त्यावेळी निजाम सरकारने स्टेट काँग्रेसवरील बंदी उठविली. आठ वर्षांनंतर स्वामीजींच्या प्रदीर्घ चिकाटीला यश आले व ३ जुलै १९४६ ला बंदी उठविण्यात आली. लगेच तिन्ही प्रांतिक परिषदांच्या स्थायी समितींच्या संयुक्त बैठकीत त्या समितींचे स्टेट काँग्रेसमध्ये विलीनीकरण करण्यात आले. त्या परिषदांना हैदराबाद स्टेट, आंध्र प्रदेश काँग्रेस कमिटी हैदराबाद स्टेट, महाराष्ट्र (मराठवाडा) प्रदेश काँग्रेस कमिटी व हैदराबाद स्टेट कर्नाटक काँग्रेस कमिटी असे नामांतर करण्यात आले. ही संयुक्त बैठक हैदराबाद येथे १६, १७ ऑगस्ट १९४६ ला झाली. या बैठकीतच स्वामीजींची स्टेट काँग्रेसच्या स्थायी समितीचे अध्यक्ष म्हणून निवड झाली. त्यावेळी जहाल व मवाळ गटात अध्यक्षपदासाठी चांगली चुरस दिसून आली. मवाळ गटाने श्री. बी. रामकृष्णरावाचे नाव सुचविले. पण त्यांचा पराभव होऊन स्वामीजीच निवडून आले. त्यांनी पुरोगामी गटातील व्यक्तींना आपल्या कार्यकारणीवर घेतले. माडापाटी रामचंद्रराव यांना सेक्रेटरी केले. या वेळेपासून मवाळ व जहाल यांच्यातील दरी वाढतच गेली. मवाळांचे धोरण सरकारधार्जिणे असल्याचे अनेक प्रसंगी दिसून आले. अशा या वातावरणात हैदराबाद स्टेट काँग्रेसचे पहिले अधिवेशन जून १९४७ मध्ये भरले. इंग्रजांनी भारताला स्वातंत्र्य देण्याची घोषणा केली. पण संस्थानिकांच्या बाबतीत कुटील नीतीचा त्यांनी अवलंब केला होता. स्वातंत्र्य देण्यापूर्वी भारताचे विभाजन होऊन हिंदुस्थान व पाकिस्तान असे विभाजन करण्यात आले. संस्थानिकांना तीन पर्याय देण्यात आले. (१) हिंदुस्थानात विलीन व्हावे, (२) पाकिस्तानात विलीन व्हावे किंवा (३) ते स्वतंत्रही राहू शकतात. शेवटच्या पर्यायाचा आश्रय घेऊन हैदराबादच्या निजामाने आपण स्वतंत्र झाल्याची घोषणा केली. हे हैदराबादीतील जनतेला एक मोठे आव्हान होते. ते स्वामीजींनी धैर्याने स्वीकारले आणि स्टेट काँग्रेसच्या अधिवेशनात दोन महत्त्वाचे ठराव एकमताने पास करून घेतले. (१) हैदराबाद संस्थानचे भारतीय संघराज्यात विलिनीकरण झालेच पाहिजे तसेच (२) हैदराबाद संस्थानात जबाबदार राज्यपद्धतीचा अवलंब केला पाहिजे.

या अधिवेशनानंतर या मुद्यावर सरकारविरुद्ध लढा देण्याच्या तयारीला स्टेट काँग्रेस लागली. १९४७ च्या ऑगस्टपासून सत्त्याग्रहास आरंभ करावयाचा. १५ ऑगस्टला दिल्लीच्या लाल किल्यावरील युनियन जॅक खाली उतरवून त्या जागी तिरंगा ध्वज फडकविण्याचा कार्यक्रम रात्री १२ ला मोठ्या धुमधडाक्यात पार पडला. इकडे हैदराबादेत एकीकडे भारताचा राष्ट्रध्वज घेऊन सत्याग्रह सुरू झाला. जातीयवादी मुस्लीम जनतेला हे सारेच असह्य होते. त्यांनी १५ तारखेच्या रात्री आगगाड्यावर लावलेले भारतीय ध्वज फाडून टाकले. गाड्यांवर हल्लेही केले.

रणशिंग फुंकले गेले. १९४२ च्या मध्ये 'चले जाव' चळवळीने जे स्वरूप धारण केले तेच हैदराबादेत स्टेट काँग्रेसने सुरू केलेल्या चळवळीलाही प्राप्त झाले. एकीकडे सत्त्याग्रह तर दुसरीकडे स्वसंरक्षणार्थ सीमारेषेवरील काही ठिकाणी शस्त्रास्त्रांचे प्रशिक्षण देऊन तयार केलेल्या तरुण कार्यकर्त्यांची शिबिरे स्थापन झाली. निजाम आसन स्थिर करण्याच्या उद्देशाने इकडे राष्ट्रीय भारत सरकारशी पत्रव्यवहार करीत

राहिला तर दुसरीकडे संयुक्त राष्ट्र संघटनेकडे आपले शिष्टमंडळ पाठवून तेथे आपली स्वतंत्र राहण्याची भूमिका मांडू लागला. एकूण शक्यतो भारतीय संघराज्यात विलीन होण्याची पाळीच आपल्यावर येऊ नये अशी त्याची तयारी चालली. त्याला सर्वतोपरी साह्य होत होते. इत्तिहादुल मुस्लीम या संघटनेचे. त्या संघटनेने एक सशस्त्र असे स्वयंसेवक दलच निर्माण केले होते त्याचे नेतृत्व कासीम रझवी करीत होते. या स्वयंसेवक दलाला रझाकार असे म्हणत. या रझाकारांना संस्थानात चोहोकडे हिंसाचाराद्वारे लोकात दहशत निर्माण करण्याचे आदेश देण्यात आले होते. अशा रीतीने संस्थानातील परिस्थिती अतिशय स्फोटक बनत चालली होती. हिंदूंच्या घरावर हल्ले, जाळपोळ, लुटालूट हे प्रकार सर्रास सुरू झाले.

१५ ऑगस्टलाच स्वामीजींना पकडून तुरुंगात डांबण्यात आले. तुरुंगात जाण्यापूर्वी काँग्रेस कार्यकारिणीने लढ्याचे मार्गदर्शन करण्यासाठी एक कृती समिती नेमली होती. तिचे अध्यक्ष होते श्री. दिगंबरराव बिंदू व श्री. गोविंदभाई श्रॉफ, श्री. जमलापूरम केशवराव, डॉ. जी. एस. मेळकोटे, श्री. प्राणेशाचार्य जे. के. हे सदस्य होते. त्या समितीने पुढे चळवळीचे नेतृत्व केले. काँग्रेसची चळवळ फोफावत चालली तसतशी रझाकारांच्या हिंसक कार्यवाहीलाही धार चढत चालली. निजाम व भारत सरकारमधील वाटाघाटीचे चऱ्हाट वळणे वाढतच चालले. नोव्हेंबरमध्ये दोघात 'जैसे थे करार' ही झाला. हा करार काँग्रेसला मान्य नव्हता. स्वामीजींनी त्यास विरोध दर्शविलाच. एकीकडे हे नाटक चालले असतांना हैदराबादेतील मवाळ पुढारी इतिहादुल मुस्लीम व सरकारशी काही समझोता करण्याचा प्रयत्न करीत होते. ५० जागा हिंदूंना तर ५० मुस्लीमांना अशाही एक प्रस्तावास मवाळ नेते तयार झाले. त्यावर विचारविनिमय करण्यासाठी स्वामीजींना व त्यांच्या कार्यकारिणीच्या सदस्यांना सरकारने तुरुंगातून मुक्तही केले. पण कार्यकारिणीने मवाळांचा डाव हाणून पाडला. मध्यंतरीच्या काळात स्वामीजी केंद्रीय नेत्याची भेट घेऊन आले. मुंबई, मद्रास इत्यादी ठिकाणी त्यांनी सभा घेतल्या. तेथील लोकांना आपली भूमिका समजावून सांगितली. त्याचा संपूर्ण पाठिंबा त्यांना मिळाला. ते परत हैदराबादला येताच त्यांना अटक करून पुन्हा तुरुंगात डांबण्यात आले.

रझाकारांचे अत्याचार वाढतच चालले. कृती समितीच्या वतीने पं. नेहरू व सरदार पटेल यांच्याकडे शिष्टमंडळ पाठविण्यात आले. त्यांनी आपली बाजू समर्थपणे मांडली. शेवटी गृह मंत्री सरदार पटेलांना हिंदी सैन्य हैदराबाद संस्थानात पाठविण्याचा निर्णय घ्यावा लागला. १३ सप्टेंबर १९४८ ला चोहोकडून हैदराबाद संस्थानात घुसण्याच्या उद्देशाने हिंदी सैन्याने कूच केले. १७ सप्टेंबरला सैन्य हैदराबादेत घुसले. निजाम शरण आला. हैदराबादचे हिंदी संघराज्यात विलीनीकरण झाले. पुढे १९५२ मध्ये सार्वत्रिक निवडणूक होऊन लोकप्रतिनीधींचे सरकार हैदराबादेत स्थापन झाले. स्वामीजींच्या कणखर नेतृत्वाखाली स्टेट काँग्रेसने घोषित केलेली दोन्ही उद्दिष्टे सफल झाली. त्याचे सारे श्रेय पू. स्वामीजींना व त्यांच्या सहकाऱ्यांनाच द्यायला हवे.

एवढी मोठी कामगिरी त्यांनी पार पाडली. मवाळांना स्वामीजींचे नेतृत्त्व नको होते. त्यांच्याविरुद्ध पंडितजीकडे व विशेषतः सरदार वल्लभभाई पटेल यांच्याकडे कागाळी करण्याचा त्यानी विडाच उचलला. त्यामुळे स्टेट काँग्रेसचे अध्यक्षपद त्यांना सोडावे लागले. त्यांच्याबरोबरचे साथीदार श्री. गोविंदभाई, श्री. वैशंपायन इत्यादी मंडळींनी काँग्रेस सोडून दिली. हैदराबादच्या दृष्टीने फार मोठी हानी झाली.

पण स्वामीजी काँग्रेसमध्येच राहिले व त्यांनी आपल्या परीने पुरोगामी विचारांकडे मंत्रिमंडळाला वळविण्याचा प्रयत्न केला. १९५२ मध्ये स्वामीजी गुलबर्गा मतदार संघातून लोकसभेवर निवडून गेले व

अनुक्रमणिका

१९५७ मध्ये औरंगाबाद मतदार संघातून लोकसभेवर निवडून गेले. लोकसभेतील त्यांची भाषणे मोठी मुद्देसुद असायची. आपले पुरोगामी विचार ते अगदी परखडपणे मांडायचे. नळगुंडा जिल्ह्यात कम्युनिस्टांनी जो धुमाकुळ माजविला होता त्यामुळे तेथील गरीब जनता भयभीत झाली होती. त्यांना धीर देण्यासाठी स्वामीजी तेथे धावले. ते तेथे ठाण मांडून बसले. त्याचा खूप परिणाम झाला. शांततामय मार्गाने आर्थिक व सामाजिक समस्यांचा परिहार निघू शकतो हे त्यांनी प्रत्यक्ष दाखवून दिले. पू. विनोबांच्या भूदान चळवळीने तर स्वामीजींच्या कार्याला बळ लाभत गेले.

याबरोबरच संस्थानातील शिक्षणाकडे त्यांनी लक्ष पुरविले. ठिकठिकाणी महाविद्यालये स्थापन केली. खादी समितीतर्फे ठिकठिकाणी खादी उत्पत्ती केंद्रे उघडली.

हैदराबाद संस्थानाचे भारतीय संघराज्यात विलीनीकरण व हैदराबाद संस्थानात लोकप्रतिनीधींचे राज्य या दोन गोष्टींबरोबरच हैदराबाद संस्थानचे विसर्जन करून 'तेलंगण' आंध्र राज्यात, 'मराठवाडा' महाराष्ट्र राज्यात व कर्नाटकाचे तीन जिल्हे कर्नाटक राज्यात विलीन करून टाकण्याचे ध्येय्यही स्वामीजींनी उराशी बाळगले होते. या योजनेस पंडित जवाहरलाल नेहरूंचा तीव्र विरोध होता. पण स्वामीजींनी त्याबाबतीतही जनमत अनुकूल करून घेऊन राज्य पुनर्रचनेचे विधेयक हैदराबाद विधानसभेत पास करून घेतले. संयुक्त महाराष्ट्र चळवळीशी स्वामीजींचा घनिष्ठ संबंध आला. फाजलअली कमिशनसमोर मराठवाड्याची बाजू स्वामीजींच्या नेतृत्वाखाली एका शिष्टमंडळाने मांडली. त्या समितीचा अहवाल बाहेर पडून मुंबईसह गुजरात व महाराष्ट्र मिळून एका द्वैभाषिक राज्याची योजना पुढे आली. आश्चर्याची गोष्ट अशी की, कॉंग्रेसपैकी अनेकजणांनी ही योजना उचलून धरली. पण स्वामीजींनी आपला या योजनेस असलेला विरोध अगदी स्पष्टपणे पण तितक्याच ॠजुतेने पंडित नेहरूंच्या पुढे व्यक्त केला. तसेच मराठवाड्याने महाविदर्भात सामील व्हावे म्हणून स्वामीजींचे मन वळविण्याचा प्रयत्न झाला. पण तेथेही स्वामीजींनी विरोध केला. एवढेच नव्हे तर कसलीही अट न घालता मराठवाडा संयुक्त महाराष्ट्रात सामील होईल असे सांगून टाकले. त्यातूनच पुढे संयुक्त महाराष्ट्राच्या संदर्भातील प्रसिद्ध नागपूर करारास सर्वांची संमती मिळवून घेण्यात स्वामीजींनीच पुढाकार घेतला.

अशा रीतीने भारताच्या स्वातंत्र्य लढ्याची यथोचित सांगता करण्यापासून ते भारताच्या राज्याची पुनर्रचना करण्यापर्यंत सर्व प्रक्रियेत स्वामीजींचा सिंहाचा वाटा होता हे इतिहासकाराला नमूद करावेच लागेल. अशी व्यक्ती लोकसभेत असावी असे पंडित नेहरूंना फार वाटायचे. म्हणून तिसऱ्या लोकसभेसाठी त्यांनी पुन्हा उभे राहावे असा पंडित नेहरूंनी खूप आग्रह केला. पण स्वामीजींनी अगदी विनम्रपणे लोकसभेचे तिकीट नाकारले. उर्वरित आयुष्य विधायक कार्यांच्या माध्यमातून जनसेवेत घालवावे असे त्यांनी ठरविले. मागे सांगितल्याप्रमाणे खादी व ग्रामोद्योगाचे कार्य व शैक्षणिक कार्याकडे त्यांनी विशेष लक्ष पुरविले.

याबरोबरच त्यांच्या मनात फार दिवसापासून एक विचार घोळत होता. तो म्हणजे आपले परात्परगुरु स्वामी रामतीर्थांच्याच आश्रमात आपण जाऊन राहावे. तो विचार त्यांनी लगेच अंमलातही आणला. १९६५ मध्ये स्वामी रामतीर्थांच्या आश्रमात गेले. स्वामीजींचे आणखी एक गुरुबंधू ओंकारस्वामी पितापुरम येथे होते. त्यांच्या सहकार्याने स्वामीजींनी जयप्रकाशजी व विनोबांशी विचारविनिमय करून "स्वामी रामतीर्थ इन्स्टीट्यूट ऑफ पीस" या संस्थेची स्थापना केली. त्यामागची कल्पना अशी होती की, समाजसेवा करू इच्छिणाऱ्या तरुणांना एकत्र करून त्यांच्यावर अध्यात्म व विज्ञान याचे संस्कार करावेत.

तसे साहित्य निर्माण करावे. प्रशिक्षणासाठी एक नियमित अभ्यासक्रम आखावा आणि देशभर अशी केंद्रे वाढवावीत. थोडक्यात रामकृष्ण मिशनच्या धर्तीवर काम करणाऱ्या तरुणांची एक संघटना निर्माण करण्याची त्यांची कल्पना होती. ती थोड्याशा प्रमाणात अमलात आणून एक 'शांती आश्रम' ही आंध्रात गोदावरी जिल्ह्यात त्यांनी स्थापन केला. रामतीर्थांचे समग्र वाङ्मय प्रकाशित करण्याची व्यवस्था त्यांनी केली. पण शांती आश्रमात असतानाच त्यांची प्रकृती १९७१ मध्ये एकदम बिघडली. औषधोपचारासाठी ते प्रथम अंबाजोगाईला गेले. तेथून त्यांना हैदराबादी आणण्यात आले. त्यांचे निकटवर्ती सहकारी डॉ. जी. एस. मेळकोटे यांच्या सल्ल्याने स्वामीजींवर औषधोपचार सुरू झाले. त्यावेळी माजी पंतप्रधान श्री. पी. व्ही. नरसिंहराव आंध्रचे मुख्यमंत्री होते. ते स्वामीजींच्या शिष्योत्तमांपैकी एक. त्यांनी हैदराबादच्या शासकीय रुग्णालयात स्वामीजींवर तज्ज्ञांकडून काळजीपूर्वक उपचार करण्याची सोय केली. पण प्रकृतीत सुधारणा होईना आणि शेवटी २२ जानेवारी १९७२ रोजी दुपारी साडेतीनच्या सुमारास स्वामीजींचा आत्मा अनंतात विलीन झाला.

दिनांक २३ जानेवारीस सकाळी निघालेल्या स्वामीजींच्या अंत्ययात्रेत हजारो लोक सामील झाले. 'स्वामीजी अमर हैं' अशा घोषणात अंत्ययात्रा बेगमपेठ स्टेशननजिक असलेल्या स्वामीजींच्या निवासस्थानी पोचली. स्वामीजींना सर्व शासकीय सन्मानाने बेगमपेठ येथील त्यांच्या आश्रमासमोर असलेल्या टेकडीवर समाधिस्त करण्यात आले. लहानपणी घेतलेल्या प्रतिज्ञेची पूर्ती केलेल्या समाधानात स्वामीजी तेथे विसावले आहेत.

त्या टेकडीवर लगेच एक समाधी बांधण्यात आली व समाधीचा अंतर्भाव करून एक सुंदर प्रार्थनामंदिर उभे केले आहे. स्वामीजींच्या पुण्यतिथीला दरवर्षी जुन्या हैदराबाद राज्यातील तेलंगण, मराठवाडा व कर्नाटकातील कार्यकर्ते बेगमपेठ येथील या समाधीस्थळी एकत्र येतात. एखाद्या विधायक कार्याच्या संदर्भात चर्चासत्र आयोजित केले जाते. समाधी मंदिरात प्रार्थना होते व कार्यकर्ते नव्या उत्साहाने प्रेरित होऊन परततात. स्वामी रामानंदतीर्थ स्मारक समितीतर्फे दरवर्षी हा कार्यक्रम आयोजित केला जातो. राष्ट्रीय एकात्मता व विधायक कार्याच्या दृष्टीने प्रगती साधण्यासाठी स्वामी रामानंदतीर्थ संशोधन संस्थाही कार्यरत आहे.

पू. स्वामीजींचा हा जीवनपट निश्चितच मोठा उद्बोधक आहे. विशिष्ट कालखंडातील त्यांनी लिहिलेली दैनंदिनी त्यांच्या जीवनाचा आलेख समजून घेण्यास फार उपयोगी आहे असे मला वाटते. मनाचा संकल्प व त्या संकल्पाच्या सिद्धीसाठी लागणारा निर्धार या दोन्हींच्या बळावर पू. स्वामीजींनी आपला जो विकास साधला तो कुणालाही अभिमानास्पद वाटावा असाच आहे. हैदराबाद संस्थानातील जनतेला स्वामीजींच्या स्वरूपात एक तारणहार भेटला. 'मोडेन पण वाकणार नाही' या निर्धाराने ते निजामाविरुद्ध लढले अन् विजयी झाले.

ही दैनंदिनी वाचताना आपल्या डोळ्यासमोर त्यांची जी प्रतिमा उभी राहते ती एका भावुक भक्ताची. सर्वाभूती ईश्वर पाहाण्याच्या त्यांच्या मूळ प्रवृत्तीला जोड मिळाली त्यांच्या चिंतनशीलतेची. कित्येकवेळा पथभ्रष्ट होऊन अधःपतनाच्या कड्यावर उभे असताना या चिंतनशीलतेनेच त्यांना कसे तारले आहे हे आपणांस दिसून येते. या दैनंदिनीतील प्रत्येक पान तसे महत्त्वाचे आहे पण "A Novel experience of Love Divine" ("दैवी प्रेमाचा नवा अनुभव") हे प्रकरण अत्यंत मार्मिक अन् वाचनीय आहे. एका साधकाचा हा अनुभव इतरांनाही निश्चितच मार्गदर्शक ठरणारा आहे. पण हा साधक स्वतःला गिरीकंदरात

अनुक्रमणिका

कोंडून घेऊन स्वतःच्याच मोक्षाची चिंता बाळगणारा नव्हता. तर समर्थ रामदास स्वामींप्रमाणे साऱ्या विश्वाची चिंता बाळगून त्या विश्वाचीच सेवा करायला निघालेला परिव्राजक होता. शोषणरहित समाज निर्माण करण्याचा ध्यास लागलेला संन्यासी होता. ही समानता निर्माण करायची तर ती गांधीप्रणित अहिंसक मार्गानेच. यावर पूर्ण विश्वास असणारा हा संन्यासी कुठे मठ बांधून राहिला नाही. कुठल्या पारंपारिक कर्मकांडात अडकून पडला नाही. स्वामीजींसंबंधी कै. अनंतराव भालेरावांनी आपल्या पुस्तकात लिहिलेला पुढील परिच्छेद अत्यंत अन्वर्थक आहे. ते म्हणतात "स्वामीजी एक परिव्राजक होते. एका पार्थिवाखेरीज त्यांचे असे काही नव्हते. प्रपंच नव्हता. घरदार नव्हते. जसा जन्मला तसा एक आत्मा निःसंग परतला. पार्थीव ज्याचे त्याला स्वाधीन करून एका अनिकेताची इहलोकाची यात्रा संपली. अनेकांना सनिकेत करणारा स्वतः अनिकेत होता. अनेकांच्या प्रपंचात सुख समाधानाचे दिवस यावेत म्हणून धडपडणारा हा लोकविलक्षण संन्यासी होता. संपूर्ण विश्वात या वैराग्यवंताचे घर सामावले होते. त्याग आणि अपरिग्रहाचे प्रतिक म्हणून भगवी वस्त्रे धारण करणारा हा त्यागशील नेता हैदराबादच्या जनतेला इतिहासावर पानोपानी आपल्या व्यक्तिमत्त्वाचे, चारित्र्याचे आणि धीरोदात्ततेचे ठसे उमटून अंतर्धान पावला." त्या परिव्राजकाच्या स्मृतीला माझे अनेकानेक दंडवत.

**प्रा. वि. पां. देऊळगावकर**

❑❑

अनुक्रमणिका

========================================================================

# दैनंदिनीच्या आरंभी
# पूज्य स्वामीजींनी उद्धृत केलेल्या
# महात्मा गांधींच्या इंग्रजी उताऱ्यांचा
# मराठी अनुवाद

# भाग २ रा

========================================================================

अनुक्रमणिका

# पूज्य स्वामीजींनी उद्धृत केलेल्या महात्मा गांधीच्या इंग्रजी उताऱ्यांचा मराठी अनुवाद

सत्यान्वेषकाने धुळीपेक्षाही अधिक विनम्र असायला हवे. जग आपल्या पायाखाली ती धूळ तुडवीत असते. पण सत्यशोधकाने धूळच त्यांना तुडवू शकेल इतके स्वतः विनम्र बनले पाहिजे. केवळ तेव्हाच त्याला सत्याचे ओझरते दर्शन होईल तोपर्यंत नाही.

**सत्याचे प्रयोग**
**खंड १. प्रस्तावना**
**पान** XXII

माझ्यासारख्या शंभर व्यक्तींचा नाश झाला तरी चालेल, पण सत्त्य टिकले पाहिजे.

**खंड १. प्रस्तावना**
**पान** XXII

“जे एकाला शक्य आहे ते सर्वांनाच शक्य असते.”

**खंड (१) प्रस्तावना**
**पान** XIX

जोपर्यंत माझ्या कृतीने माझ्या बुद्धीचे व मनाचे समाधान होते तोपर्यंत मी माझ्या मूळच्या निर्णयांना दृढपणे चिकटून राहिले पाहिजे.

**खंड १. प्रस्तावना**
**पान** XX

अद्यापी मला ईश्वर भेटला नाही. पण मी त्याच्या शोधात आहे. या माझ्या शोधाचा पाठपुरावा करीत असताना मला सर्वात अधिक प्रिय असलेल्या वस्तूंचा त्याग करावा लागला तरी चालेल. त्यात प्रत्यक्ष प्राणत्यागाची गरज असेल तर तोही देण्याची माझी तयारी होईल अशी मी आशा करतो.

**खंड १. प्रस्तावना**
**पान** XXI

त्याचे माझ्या प्राणाच्या प्रत्येक श्वासावर नियंत्रण आहे आणि मी त्याचेच अपत्य आहे याची मला पूर्ण जाणीव असूनही, मी त्याच्यापासून इतका दूर आहे ही गोष्ट मला सतत डाचणारी आहे. माझ्यामधील दुष्ट वासनाच मला त्याच्यापासून दूर ठेवीत आहेत हे मी जाणतो; तरी मी त्याच्यापासून दूर राहू शकत नाही. ज्याला देवाशी सख्य करायची इच्छा आहे त्याने एकटेच राहावे किंवा साऱ्या जगालाच आपले मित्र बनविले पाहिजे.

अनुक्रमणिका

**पान ५३. प्रस्तावना**

साऱ्या जगात प्रतिज्ञांचा अर्थ लावणे हे वादंग माजविण्याचे एक उपयुक्त साधन बनले आहे. प्रतिज्ञा कितीही स्पष्ट असो, पण लोक आपल्या स्वतःच्या उद्देशाला अनुकूल होईल अशा रीतीने प्रतिज्ञेचा मजकूर हवा तसा बदलून, फिरवून टाकतात. असे लोक समाजाच्या सर्व स्तरात श्रीमंतांपासून गरीबापर्यंत, राजापासून ते शेतकऱ्यापर्यंत आढळतात. स्वार्थामुळे ते आंधळे बनतात व दोन्हीकडे लागू होऊ शकतील अशाच संदिग्ध शब्दांचा उपयोग करून स्वतःची फसवणूक करून घेतात व जगाला व देवाला फसविण्याचा प्रयत्न करीत असतात. दुसरी तऱ्हा म्हणजे जेथे दोन रीतींनी अर्थ लावण्याची शक्यता असते तेथे अधिक दुर्बल पक्षाने लावलेला अर्थ स्वीकारण्याची. या दोन्ही पद्धती नाकारल्या की त्यातून असत्यांत खोलवर रूजलेल्या अन्यायाचा व संघर्षाचा उगम होतो.

**पान ८४**

मौन हे सत्योपासकाच्या आध्यात्मिक शिस्तीचाच एक भाग आहे असे माझ्या अनुभवाने मला शिकविले आहे.

ज्या कुणाला आपल्या स्वतःच्या आध्यात्मिक सामर्थ्याचा गर्व होतो त्याने तो धुळीत विलीन झाल्याचे पाहिले नाही काय?

**पान १०४**

कसे तरी कुठून तरी साह्य येते हा माझा अनुभव आहे. कुठून हे मला माहीत नाही.

**पान १०६**

आध्यात्मिक सिद्धीमध्ये गुरूसंबंधीचे हिंदू तत्त्व व गुरूच्या महत्त्वावर माझा विश्वास आहे. खरे ज्ञान गुरूशिवाय होणे शक्य नाही. या सिद्धांतात बरेच तथ्य आहे असे मला वाटते. लौकिक विषयासंबंधी एखादा अर्धवट शिक्षक चालू शकेल; पण आध्यात्मिक बाबतीत असा अर्धवट शिक्षक चालत नाही. केवळ पूर्ण ज्ञानीच गुरूस्थानी विराजमान होण्यास योग्य असतो. म्हणून पूर्णत्वाकडे जाण्यासाठी सतत प्रयत्न होत राहिले पाहिजेत. कारण ज्याच्या त्याच्या योग्यतेनुसार गुरू भेटत असतो. पूर्णत्वाकडे जाण्यासाठी अमर्याद प्रयत्न करणे हा प्रत्येकाचा हक्क आहे. तेच त्याचे पारितोषिक, बाकीचे ईश्वराधीन असते.

**पान १३०**

अंतःकरणाची उत्कट आणि शुद्ध इच्छा नेहमीच पूर्ण होत असते. या नियमाची सत्यता मी माझ्या अनुभवातून पडताळून पाहिली आहे. गरीबांची सेवा ही माझ्या अंतःकरणाची इच्छा. आणि त्या इच्छेने नेहमी मला गरीबांमध्ये नेऊन टाकले आहे. आणि त्यांच्याशी स्वतःला एकरूप होण्यास मला समर्थ बनविले आहे.

अनुक्रमणिका

आपल्या बांधवांची अवहेलना झालेली पाहून आपला सन्मान झाल्यासारखे लोकांना का वाटते हे मला नेहमीच एक कोडे झाले आहे.

जेथे सहिष्णुता, औदार्य आणि सत्य असते तेथे भेदसुद्धा साह्यभूत ठरतात.

जोपर्यंत एखादी व्यक्ती सेवेत सुख मानीत नाही, तोपर्यंत सेवेला काही अर्थ असू शकत नाही. जेव्हा ती सेवा केवळ देखाव्यासाठी किंवा लोकमताच्या भीतीने केली जाते. तेव्हा ती सेवा माणसाला खुरटून टाकते, आणि त्याचा उत्साह चिरडून टाकते. आनंदाशिवाय केलेल्या सेवेमुळे न सेवकाला साह्य होते न सेवेला. म्हणून आनंदी वृत्तीने केलल्या सेवेने इतर सगळी सुखे व प्राप्ती व्यर्थ ठरतात.

जेव्हा स्वातंत्र्य आणि शिक्षण यामध्ये निवड करावयाची असते त्यावेळी स्वातंत्र्याची निवड केली पाहिजे असे कोण म्हणणार नाही.

मुलांना जन्म देणे व त्यानंतर त्यांचे संगोपन करीत राहणे हे सार्वजनिक सेवेशी विसंगत आहे अशी माझी दृढ श्रद्धा बनली आहे.

प्रतिज्ञा पालनासाठी जिभेवर ताबा असणे ही पहिली आवश्यक गोष्ट आहे.

जेव्हा मन उपवाशी शरीराशी सहकार्य करते तेव्हा उपवास हा उपयोगी ठरतो. याचा अर्थ असा की शरीराला ज्या गोष्टी दिल्या जात नाहीत त्या गोष्टींविषयी मनामध्ये तिटकारा निर्माण झाला पाहिजे.

मुमुक्षूला ईश्वराचे नाव आणि ईश्वराची कृपा यांचाच अंतिम आधार असतो.

**पान ३१५**

या आत्मशुद्धी आणि त्यागासाठी मला सारखी तळमळ लागून राहिली पाहिजे. असे मला वाटते.

**पान ३५२**

अमर्याद सहनशीलतेच्या शिवाय कोणतेही काम करण्यासाठी लोक मिळविणे फार कठीण आहे.

**पान ३२५**

लोकांचा आवाज हा देवाचा आवाज असतो.

सेवा ही कुत्र्याच्या छत्रीप्रमाणे झटपट वाढणारी वस्तु नाही. त्यासाठी आधी इच्छा हवी आणि मग अनुभव.

* * *

अनुक्रमणिका

मी चालविलेल्या अनेक सार्वजनिक संस्थांतील माझ्या भरपूर अनुभवावरून माझी अशी पक्की धारणा झाली आहे की, कायम स्वरूपाच्या निधीवर संस्था चालविणे चांगले नाही. कायम स्वरूपाच्या निधीतच संस्थेच्या नैतिक पतनाचे बीज रूजलेले असते. सार्वजनिक संस्था म्हणजे लोकांच्या पैशांतून लोकांच्या संमतीने चालविली जाणारी संस्था. जेव्हा अशा संस्थांना लोकांचे साहाय्य मिळणे बंद होते, त्यावेळी त्या संस्थेला टिकविण्याचाच हक्क उरत नाही. कायम स्वरूपाच्या निधीवर चालणाऱ्या संस्था पुष्कळदा लोकमताकडे दुर्लक्ष करत असलेल्या दिसतात आणि नेहमी त्या संस्थांकडून लोकमताच्या विरुद्ध काही कृत्ये घडत असतात. आपल्या देशात पावलोपावली आपल्याला असा अनुभव येतो. काही तथाकथित धार्मिक संस्थांनी हिशेब देणेही बंद केले आहे. विश्वस्त मालक बनले आहेत आणि ते कुणालाच जबाबदार नाहीत. सार्वजनिक संस्थांच्या ध्येयात दिवसेंदिवस बदल होत जातात याबद्दल मला शंका नाही.

लोकांचा आश्रय मिळविण्यात ज्या संस्था अयशस्वी होतात त्या संस्थांना सार्वजनिक संस्था म्हणून राहण्याचा अधिकार नाही. एखाद्या संस्थेला जी वार्षिक वर्गणी मिळते ती त्या संस्थेच्या लोकप्रियतेची व व्यवस्थापक मंडळाच्या प्रामाणिकपणाची कसोटीच असते. प्रत्येक संस्थेने या कसोटीला उतरावे असे माझे मत आहे.

**पान २९४**

यावेळेपावेतो मला यश आले नव्हते. कारण माझ्या ठिकाणी इच्छेचा अभाव होता, आणि माझ्यावरच माझा विश्वास नव्हता; परमेश्वराच्या कृपेवर विश्वास नव्हता; म्हणून माझे मन शंकेच्या प्रक्षुब्ध सागरावर हेलकावे खात होते. प्रतिज्ञा घेण्यास नकार दिला की मनुष्य प्रलोभनाला बळी कसा पडतो व प्रतिज्ञेने बद्ध होणे म्हणजे स्वैराचाराकडून एक पत्नित्वाच्या विवाहाकडे जाण्यासारखे कसे असते याची मला जाणीव झाली.

'माझा प्रयत्नावर विश्वास आहे. प्रतिज्ञेने मी स्वतःला बांधून घेऊ इच्छित नाही.' ही दुर्बलतेतून निर्माण झालेली प्रवृत्ती असते व त्यातून त्याज्य वस्तू विषयीची सूक्ष्म इच्छाच नकळत व्यक्त होत असते, नसता अंतिम निर्णय घेण्यास अडचण कोणती असू शकेल? साप मला चावेल हे मला माहीत असते म्हणून सापापासून पळून जाण्याचा मी प्रयत्न करतो. मी सापापासून पळून जाण्याचा नुसता प्रयत्न करीत नाही. नुसता प्रयत्न म्हणजे मृत्युही होऊ शकतो हे मी जाणतो. नुसता प्रयत्न म्हणजे, साप मला मारूनच टाकणार या निश्चित वास्तवाचे अज्ञान होय. म्हणून केवळ प्रयत्नावर मी समाधान मानायचे याचा अर्थ असा की निश्चित कृतीच्या आवश्यकतेची मला अद्यापी जाणीव झाली नाही. पण समजा माझी मते पुढील काळात बदलली तर मग त्या प्रतिज्ञेशी मी बद्ध राहू शकेन का? ही शंका आपणास पुष्कळदा भेडसावते. पण ही शंकासुद्धा एखाद्या गोष्टीचा त्याग केलाच पाहिजे यासंबंधी स्पष्ट कल्पनेचा अभावच व्यक्त करीत असते. म्हणूनच निष्कलांनदाचे गीत म्हणते—

'तिटकाऱ्याशिवाय त्याग हा टिकावू नसतो' म्हणून जिथे इच्छाच नाहीशी होते तेथे त्याग हे त्याचे नैसर्गिक व अनिवार्य फळ असते.

**पाने ३०८, ३०९**

अनुक्रमणिका

सेवा कार्य करण्याचा मला एकच मार्ग माहित आहे; तो म्हणजे स्वतःच्या अनुभवाचा व ज्ञानाच्या शोधात असणाऱ्या व्यक्तींशी चर्चा करण्याचा.

**पाने ३९७**

देवाला भिऊन असणाऱ्या व देवाला समोरासमोर पाहू इच्छिणाऱ्या साधकाला विचार आणि उच्चारावर जितके बंधन ठेवणे आवश्यक आहे तितकेच बंधन आपल्या आहाराच्या प्रमाणावर व शुद्धतेवर ठेवणे जरूरीचे असते.

**पान ४०६**

मनुष्य आणि त्याच्या कृती या दोन भिन्न गोष्टी आहेत. एखाद्या चांगल्या कृतीला पसंती किंवा मान्यता मिळाली पाहिजे. आणि दुष्ट कृतीला नापसंती. कृती करणारा मग तो चांगला असो की दुष्ट परिस्थितीनुसार आदरास किंवा दयेस पात्र ठरला पाहिजे. 'पापाचा द्वेष करा—पाप्याचा नको.' ही शिकवण समजायला सोपी असली तरी ती शिकवण क्वचितच अंमलात आणली जाते; आणि म्हणूनच द्वेषांचे विष जगभर पसरते.

**पान ४१०**

सत्याच्या शोधात ही अहिंसा मूलभूत असते. मला दररोज याची जाणीव होत आहे की, अहिंसेच्या आधाराशिवाय केलेला सत्याचा शोध हा व्यर्थ असतो. एखाद्या पद्धतीचा प्रतिकार करणे व त्या पद्धतीवर प्रहार करणे हे योग्य आहे. पण त्या पद्धतीचा अवलंब करणाऱ्याचा प्रतिकार करणे व त्याच्यावरच हल्ला करणे म्हणजे स्वतःचाच प्रतिकार करण्यासारखे आहे. कारण आपण सर्वच एकाच कुंचल्याने रंगविले गेलेलो आहोत आणि त्या एकाच निर्मात्याची मुले आहोत; आणि म्हणून आपल्यामध्ये वास करीत असलेली दैवीशक्ती अपार आहे. एखाद्या मानव प्राण्याचा अवमान करणे म्हणजे दैवी शक्तीचाच अवमान करणे होय आणि अशा रीतीने त्या प्राण्यालाच आम्ही इजा पोचवतो असे नव्हे तर साऱ्या जगालाच इजा पोचवतो

**पान ४११**

"मी त्याला पाहिले नाही किंवा मी त्याला जाणतही नाही. देवावरील जगाचा विश्वास हा मी माझा स्वतःचा मानतो, आणि माझा विश्वास हा निश्चल असल्यामुळे तो विश्वास म्हणजे अनुभवच असे मी मानतो.

**पान ४१६**

एकदा एखादी गोष्ट सुरू केली की नैतिक दृष्टीने चुकीची आहे हे सिद्ध झाल्याशिवाय ती गोष्ट सोडू नये.

**पान ४१७**

अनुक्रमणिका

आपल्यामध्ये जो देव आहे तोच दुसऱ्यामध्ये पाहण्याचा प्रयत्न करणाऱ्या श्रद्धाळू व्यक्तींना सर्वांच्यामध्ये पुरेशा अलिप्तपणे राहता आले पाहिजे.

**पान ४१८**

सेवा हे पत्रकारितेचे मुख्य ध्येय असले पाहिजे.

**पान ४२६**

मला हे पटले आहे की, "सार्वजनिक कार्यकर्त्याने एखाद्या गोष्टीविषयी स्वतःची खात्री करून घेतल्याशिवाय निवेदने देत जाऊ नयेत." सर्वात महत्त्वाचे म्हणजे सत्याच्या एकनिष्ठ उपासकाने तर अधिकाधिक खबरदारी घेतली पाहिजे. ज्या गोष्टीची सत्यता पडताळून पाहिली गेली नाही अशा गोष्टीवर विश्वास ठेवणे म्हणजे त्या गोष्टीशी तडजोड करणे होय.

**पान ४३२**

"अन्टु दी लास्ट" (रस्किनच्या या पुस्तकाचा महात्मा गांधींवर मोठा परिणाम झाला होता) या पुस्तकाची माझ्या दृष्टीने पुढील शिकवण आहे :—

(१) सर्वांच्या हितात व्यक्तीचे हित सामावलेले आहे.

(२) वकिलाच्या कामाला तेच मूल्य आहे जे न्हाव्याच्या कामाला आहे, कारण आपल्या कामातून आपला चरितार्थ चालविण्याचा सगळ्यांना सारखाच अधिकार आहे.

(३) एका मजूराचे जीवन म्हणजे शेतात राबणाऱ्या भूसेवकाचे आणि हस्तकला कुशल कारागिराचे जीवन सारखेच महत्त्वाचे आहे.

यापैकी पहिली शिकवण मला माहीत होती. दुसऱ्या गोष्टीची मला स्पष्ट जाणीव झाली नव्हती. तिसऱ्या गोष्टीचा मला विचारच सुचला नव्हता. 'अन्टु दी लास्ट' मुळे मला हे सूर्यप्रकाशाइतके स्पष्ट झाले आहे की दुसऱ्या व तिसऱ्या शिकवणीचा पहिल्यात समावेश झाला आहे.

ही तत्त्वे आचरणात आणण्याच्या तयारीने मी पहाटेच उठलो.

**पान ४४६**

माझ्या अनुभवाने मला असे आढळून आले आहे की, मनुष्याने आखलेल्या योजना पुष्कळदा ईश्वरी संकेतानुसार विफल होतात; पण मला असेही आढळून आले आहे की, जिथे सत्याचा शोध हेच अंतिम ध्येय असते तिथे माणसाच्या योजना कितीही विफल झाल्या तरी, परिणाम हा कधीच हानिकारक असत नाही, तर पुष्कळदा अपेक्षेपेक्षा तो अधिक चांगला असतो.

अनुक्रमणिका

**पान ४५३**

ज्याला नवीन अनुभव घ्यायची इच्छा आहे त्याने स्वतःपासून आरंभ करावा हेच दाखविण्याचा माझा उद्देश आहे. त्यामुळे सत्याचा अधिक लवकर शोध लागतो, आणि परमेश्वर प्रामाणिकपणे प्रयोग करणाऱ्याचे संरक्षण करतो.

**पान ४५८**

“अंतिमतः खरं सौंदर्य हे अंतःकरणाच्या शुद्धतेतच असते.”

अंतःकरणपूर्वक मानवतेची सेवा करू इच्छिणाऱ्याला ब्रह्मचर्याशिवाय ती करता येणार नाही.

**पान ४७०**

परमेश्वराच्या कृपेला निःसंकोचपणे शरण गेल्याशिवाय आपल्या विचारावर ताबा मिळविणे अशक्य आहे.

**पान ४७३**

निसर्गाशी जुळवून घेण्याची कला साध्य करून घेण्यासाठी कितीही प्रयोग केले तरी ते थोडेच आहेत आणि कितीही त्याग केला तरी तो थोडाच आहे.

**पान ४७८**

माझ्यापुरते पाहिले तर गंभीरपणे घेतलेल्या प्रतिज्ञेपासून कितीही अडथळे आले तरी मी माघार घेऊ शकत नाही; आणि या मागची जी प्रेरणा आहे ती माणसाला हितावह असते.

**Vol. II, पान १७४**

सर्व प्रकारच्या स्वार्थाचा त्याग हा आत्म्याला हितावह असतो याबद्दल मला शंका नाही.

**पान ४८८**

उत्कट आत्मशोध ईश्वराच्या चरणी रूजू केल्याशिवाय व ईश्वराची करूणा भाकल्याशिवाय मनातील उच्छृंखल लालसांचे निर्मूलन होणे शक्य नाही.

**पान ९१**

अनुक्रमणिका

जेथे गुरू आणि शिष्यामध्ये खरे प्रेम नसते आणि जेथे शिष्याच्या कर्तव्यच्युतीचा, त्याच्या अपराधाचा गुरूच्या अस्तित्त्वावर परिणाम होत नाही तेथे उपवासाला स्थान नाही—नव्हे उपवास हानिकारक सुद्धा ठरतो.

**Vol. II, पान ५१२**

एखादे कार्य बिगर राजकीय स्वरूपाचे असून त्याला जेव्हा राजकीय स्वरूप दिले जाते, तेव्हा त्या कार्याची हानी होते. उलट त्याचे बिगर राजकीय स्वरूप तसेच सीमित ठेवले तर त्या कार्याला साह्य होते.

**पान २८२**

कोणत्याही क्षेत्रातील निरपेक्ष भावनेने केलेली सेवा ही शेवटी देशाला राजकीय दृष्टीने साह्यभूत ठरते.

सभ्यतेचा अर्थ एखाद्या प्रसंगविशेषी तयार केलेल्या भाषणातील नाटकी नम्रता असा नसून जन्मजात विनम्रता व विरोधकाचे भले करण्याची इच्छा म्हणजे खरी सभ्यता होय.

**Vol. II, पान ४३५**

सत्याग्रहाच्या आंदोलनाचा अवलंब करण्याच्या माझ्या तीव्र उत्सुकतेने माझ्यामध्ये जगण्याची प्रबल इच्छा निर्माण झाली होती. आणि माझ्या प्रतिज्ञेच्या केवळ शब्दालाच चिकटून बसण्यावर मी समाधान मानले आणि त्या प्रतिज्ञेतील मूळ आशयाकडे दुर्लक्ष केले. कारण जेव्हा मी प्रतिज्ञा घेतली, तेव्हा माझ्या डोळ्यासमोर जरी गाईचे किंवा म्हशीचेच दूध होते तरी साहजिकपणे त्यात सर्व जनावरांच्या दुधाचा समावेश गृहीत धरला होता. दूध हा मनुष्याचा नैसर्गिक आहार नाही अशी जोपर्यंत माझी धारणा होती तोपर्यंत कोणतेच दूध घेणे योग्य नव्हते हे सगळे कळत असूनसुद्धा शेळीचे दूध घेण्यास मी कबूल झालो. म्हणजे सत्यनिष्ठेपेक्षा जगण्याची इच्छा अधिक प्रबळ ठरली. आणि सत्याग्रह लढा सुरू करण्याच्या उत्साहात सत्योपासकाने आपल्या पवित्र ध्येयाशी प्रतारणा केली. या कृत्याचे स्मरण झाले की आजसुद्धा माझ्या सदसद्विवेक बुद्धीला बोचणी लागते आणि मला पश्चात्ताप होतो आणि म्हणून शेळीचे दुधही कसे सोडून द्यायचे याचा मी सारखा विचार करीत आहे. परंतु अतिशय सूक्ष्म अशा प्रलोभनापासून मी अद्यापी स्वतःला मुक्त करून घेऊ शकत नाही. ते प्रलोभन म्हणजे सेवा करण्याची इच्छा. त्या इच्छेने मला अजूनही बद्ध करून ठेवले आहे. शेळीचे दूध मी वापरतो ही गोष्ट आहाराच्या आणि अहिंसेच्या दृष्टीने मला त्रस्त करीत नसून मी प्रतिज्ञेचा भंग केला आहे ही गोष्ट मला अधिक त्रस्त करीत आहे. मला असे वाटते की, अहिंसेपेक्षा मला सत्याचे तत्त्व अधिक समजले आणि जर सत्यावरची माझी पकड ढिली झाली तर अहिंसेचे कोडे मला कधीच सोडविता येणार नाही असे माझा अनुभव मला सांगतो. सत्याचे तत्त्व असे सांगते की घेतलेल्या प्रतिज्ञा या शब्दार्थ व त्यामागील आशय या दोन्ही दृष्टींनी पूर्ण केल्या गेल्या पाहिजेत.

केवळ बाह्य रूपालाच चिकटून बसल्याने माझ्या प्रतिज्ञेचा आत्माच नष्ट झाला आहे. तीच गोष्ट मला त्रस्त करते. हे स्पष्ट कळत असूनही मी माझा मार्ग पाहू शकत नाही. दुसऱ्या शब्दात सांगायचे तर कदाचित सरळ मार्गाने जाण्याचे माझ्यात धैर्य नसेल. मूलतः दोन्हींचा अर्थ एकच आहे कारण श्रद्धेच्या अभावातून

अनुक्रमणिका

किंवा दुर्बल श्रद्धेमुळे अपरिहार्यपणे शंकेचा प्रादुर्भाव होतो म्हणून ‘देवा मला श्रद्धा दे’ अशी मी रात्रंदिवस प्रार्थना करतो.

**पान ६७९, ६८०**

माझ्या नेहमीच्या अनुभवावरून माझी अशी खात्री झाली आहे की, सत्याहून निराळा देव नाही. सत्याच्या प्राप्तीसाठी अहिंसा हे एकच साधन आहे असे जर प्रत्येक पानातून आणि प्रकरणांतून वाचकापुढे घोषित होणार नसेल तर ही प्रकरणे लिहिण्याचे माझे श्रम वाया गेले असे मी समजेन आणि या संबंधीचे माझे प्रयत्न व्यर्थ ठरले तरी वाचकांनी असे समजावे की हा तत्त्वाचा दोष नसून तो तत्त्व सांगणाऱ्याचा दोष आहे. काही झाले तरी, अहिंसेसाठी मी कितीही प्रयत्न केलेले असले तरी ते अद्यापि दोषपूर्ण व अपुरेच आहेत. मला सत्याचे जे ओझरते दर्शन झाले आहे त्यायोगे आपण दररोज आपल्या डोळ्यांनी पाहात असलेल्या सूर्यापेक्षा लक्षावधीपट प्रखर असलेल्या सत्याच्या अवर्णनीय स्वरुपाची सहसा कल्पना करता येणार नाही. वस्तुतः मला जे दिसते ते त्या प्रचंड प्रकाश झोताचे अंधुकसे दर्शन होय. पण मी खात्रीपूर्वक हे सांगू शकतो की अहिंसा पूर्णपणे साध्य झाल्यानंतरच सत्याचे पूर्ण दर्शन घडू शकते.

सत्याचे विश्वात्मक आणि सर्वव्यापी असे तत्त्व प्रत्यक्ष समोरासमोर पाहायचे असल्यास माणसाला शुद्रातील शूद्र प्राण्यावर स्वतःसारखे प्रेम करता आले पाहिजे; आणि जो मनुष्य असा प्रयत्न करू इच्छितो तो जीवनाच्या कोणत्याही क्षेत्रापासून दूर राहू शकणार नाही. म्हणूनच सत्यावरच्या माझ्या निष्ठेने मला राजकारणाच्या क्षेत्रात ओढले आहे; आणि अगदी निःसंकोचपणे तरी अत्यंत नम्रतेने मी हे सांगू शकतो की धर्माचा राजकारणाशी काही संबंध नाही असे सांगणारे जे लोक आहेत, त्यांना धर्म म्हणजे काय हे कळले नाही.

**पान ७५२**

आत्मशुद्धी शिवाय प्रत्येक सजीव प्राण्याशी समरस होणे अशक्य आहे; आत्मशुद्धी शिवाय अहिंसेचे नियम पाळणे हे पोकळ स्वप्न ठरते. ज्याचे अंतःकरण शुद्ध नाही त्याला हे कधीच साध्य होणार नाही. आत्मशुद्धी म्हणजे जीवनातील सर्वक्षेत्रात शुद्धता. शुद्धता ही अतिशय सांसर्गिक असल्यामुळे एकाच्या शुद्धतेने त्याच्या सभोवतालचा परिसरही शुद्ध होतो.

**पान ७५३**

पण आत्मशुद्धीचा मार्गही कठीण आणि उंच कड्यासारखा असतो. परिपूर्ण शुद्धता साध्य होण्यासाठी माणसाने विचार, उच्चार आणि आचार या तिन्हीत संपूर्ण विकार रहित बनले पाहिजे. निरंतर अविश्रांतपणे प्रयत्न करीत असूनसुद्धा मला या तिन्ही बाबतीत अद्यापि शुद्धता प्राप्त करता आली नाही याची मला जाणीव आहे. त्यामुळे जगाने केलेल्या स्तुतीचा माझ्यावर परिणाम होत नाही. खरं तर ती स्तुती मला बोचते. शस्त्रांच्या साह्याने हे भौतिक जग जिंकण्यापेक्षा सूक्ष्म विकार जिंकणे अधिकच अवघड वाटते. हिंदुस्तानात परत आल्यापासून माझ्याकडे सुप्त विकार दडून बसल्याचा मला अनुभव येत आहे त्यांच्या जाणिवेने मला लाजिरवाणे वाटते. परंतु मला पराभूत केले नाही. माझ्या अनुभवानी व प्रयोगांनी मला तारले आहे आणि मला खूप आनंद झाला आहे. पण अजूनही मला माझ्या समोरचा कठीण असा मार्ग

आक्रमायचा आहे याची मला जाणीव आहे. मला लीन होऊन शून्यवत बनले पाहिजे. जोपर्यंत एखादी व्यक्ती आपल्या स्वतंत्र इच्छेने आपल्या साथीदारामध्ये आपले स्वतःचे स्थान अगदी शेवटचे आहे असे मानीत नाही तोपर्यंत त्याला मुक्ती नाही, आणि ती लीनतेची अंतिम मर्यादा होय.

तात्पुरता का होईना वाचकांचा निरोप घेताना, त्यांना मी अशी विनंती करतो की, मन, वाणी आणि कृतीत मला अहिंसेचा वर प्रदान करण्यासाठी त्यांनी त्या सत्यदेवतेची माझ्याबरोबर प्रार्थना करावी.

**पान ७५४**

❑ ❑

अनुक्रमणिका

==================================================================

## दैनंदिनीतील आरंभीचे
## मूळ मराठी लेखन व इंग्रजीतील लेखनाचा
## मराठी अनुवाद

## भाग ३ रा

==================================================================

अनुक्रमणिका

# मूळ मराठीतील लेखन व इंग्रजीतील लेखनाचा मराठी अनुवाद

**अश्विन वद्य १८५३**

पाय तुझे गुरुराया, माझी देवपुजा देवपुजा हे चरण म्हणत झोपडीत बसलो होतो. त्यापूर्वी शंकर पाटील ह्यांच्यापाशी भजन करीत होतो. सहज विचार आला. आपल्याला गुरुच्या पायाची पूजा तर करावयाची आहे. मग पाय कुठे आहेत? एकदम वाटले हा सारा संघ म्हणजे गुरुच. त्यातील प्रत्येक व्यक्तीची सेवा ही गुरुपादसेवा आहे. 'गुरुभक्त', तुला विश्वात गुरुचे पाय पाहायचे कारणच नाही. तुझ्यासाठी सद्‌गुरुने अत्यंत सानुले स्वरूप धारण केले आहे. "माझ्या बाळाला विराट स्वरूप पाहण्याची यातायात कशाला?" असे वाटूनच की काय हे चिमुकले स्वरूप घेतले आहे गुरुने तुझ्या! बरे झाले बुवा फार छान झाले एक एक पाय घ्यावा व जन्म भर आजन्म देवांची पूजा करावी मग मुक्ति हीच! वाः खूपमजा! मुक्ती नाही! मोक्ष नाही! काही नाही माझी देवपूजा, देवपूजा पायी तुझ्या गुरुराजा.

गुरुभक्त

जगातील सारे व्यवहार देवाणघेवाणीच्या तत्त्वावर चालले आहेत. कोणताही पदार्थ फुकट-बिनमोलाने मिळत नाही. काही पदार्थ अगर वस्तु द्यावी तेव्हां कुठे दुसरा पदार्थ मोबदल्यात मिळतो. गुरू जे देतो ते मोबदल्याखातरच व शिष्य जे घेतो ते ही मोबदल्यातच. कुणी कुणाला काही फुकट देत नाही, घेत नाही. सगळा रोखी व्यवहार. देवाच्या एकाही व्यवहारात परतीची भाषा नाही. पैसे टाकाल तर माल मिळेल! भीड मुरवत कुणाची चालायची नाही अं! त्या भानगडीत पडू नका. द्यायला पदार्थ असला तर जा घ्यायला. नाहीतर विन्मुख परत यावे लागेल! तो फार लबाड आहे. विश्वाच्या आदीपासून सारखा ओरडतो आहे; "अरे मी अव्यक्त आहे, निर्गुण आहे, निराकार आहे. देत नाही नी घेत नाही!" आता बोलणेच खुंटले आहे! स्वस्थ बसावे की काय? असा विचार करतो तर तो म्हणाला "हे बघ बाळ, मी बघ होतो 'अं' व्यक्त; तुझे रुप धारण करतो. घेतो सारे गुण तुझे! व्यवहारच करावयाचा ना तुझ्याशी मग खुशाल देतो मी आनंद! पण तू काय देणार? मी विचार करू लागलो. "काय द्यावे त्याला? हे लचांडच झाले! तो म्हणाला मी इतर पदार्थ घेणार नाही अं! मी देईन; पण मोबदला प्राण घेईन! अरे बापरे! पण नको बुवा! जा, घे हा घे प्राण! आता तर झाले ना? असे जेव्हा म्हणावे तेव्हा देव दिसतो! एकूण काय? सारी फसवेगिरी! अव्यक्त म्हणून तिकडे फसवावे, व व्यक्त होऊन इकडून पेच घालावा! खासा न्याय, बरे झाले बुवा!

गुरुभक्त

**संपादकीय टीप :** इथे पू. स्वामीजींच्या अंतर्मुख होऊन चिंतन करण्याच्या प्रवृत्तीचा प्रत्यय येतो. मनात त्या जगन्नियंत्याच्या दर्शनाची ओढ. त्यासाठी गुरुपाद सेवा हा मार्ग चोखाळावासा वाटतो. पण तेथे ईश्वराचे कोणते स्वरूप स्वीकारावे? व्यक्त की अव्यक्त. यासंबंधी मनात संभ्रम निर्माण झालेली अवस्था प्रकट होते.

ॐ

हा मजकूर इंग्रजीत आहे. त्याचा स्वैर मराठी अनुवाद.

अनुक्रमणिका

तुला त्या सर्वात्म्याशी एकाग्रता प्राप्त करून घ्यायची आहे काय? तर मग तो निर्झर, वा दरी, ती हिरवळ यांना होणारी स्पंदनेच तुला होतात का? अशी तुला खात्री आहे का? सर्वव्यापी तत्त्व तू आत्मसात करू इच्छितोस काय? मग असं कर. एक सजीव वस्तू—शक्य तो मानवप्राणी घे त्याच्याशी मानाने, वाणीने आणि कृतीने एकरूप होऊन जाण्याचा प्रयत्न कर. त्याच्याशी एकचित्त व्हायला हवे. त्या प्राण्याच्या सर्व भावनांचा, संवेदनांचा व उर्मींचा तुला अनुभव घ्यायला हवा. नाहीतर तू त्याच्याशी एकरूप होणार नाहीस. पहिल्या अवस्थेत तू ज्या व्यक्तीशी समरस होऊ इच्छीतोस त्या व्यक्तीच्या अंतःकरणातील व तुझ्या अंतःकरणातील व्यवहारात तफावत आढळेल. अनेकदा त्या व्यक्तीत एक निराळीच नस (नाडी) प्रवाहित असलेली आढळेल. अशी विरोधी प्रवृत्ती असताना पुढे कसे जायचे? तोच प्रश्न आहे. तू अशा स्थितीत अगदी काठावर येऊन पोहोचलेला असशील. मग एकच मार्ग असतो. तू ती सजीव वस्तू बदलू शकत नाहीस. तू प्रयत्न केलास तर ती व्यक्ती ते मान्य करणार नाही. ते एकच बरं तर मग पुढे काय? तुला थोडेसे बदलावे लागेल. मग कोठपर्यंत? त्याच्या सर्व भावभावना तुझ्याच आहेत अशी जाणीव होईपर्यंत तुला बदलावे लागेल. मी हे थोडेसे एका उदाहरणाने अधिक स्पष्ट करू इच्छितो. समजा राम आणि नारायण अशा दोन व्यक्ती आहेत. राम भणंगभिकारी आहे व नारायण लक्षाधीश आहे. नारायणाला रामासारखेच व्हायचे असेल तर सगळ्यात सोपा मार्ग म्हणजे त्याने रामाला आपल्या श्रीमंतीच्या पातळीवर आणण्याचा प्रयत्न न करणे हाच सगळ्यात सोपा मार्ग होय. कारण ती अशक्य कोटीतील गोष्ट आहे. उलट रामाच्या निर्धन अवस्थेपर्यंत आपण स्वतः जाऊन पोहचण्याचा सर्वतोपरी प्रयत्न करणे व तसेच मानसिक स्तरावर तशी तयारी करणे हाच मार्ग उरतो. समजा एक दयाळू आणि दुसरा क्रूर असेल तर आणि जर समरसता व एकरूपता साधायची असेल तर एकाने आपल्या स्वतःच्या भावनांचा त्याग करून दुसऱ्याच्या भावनांचा स्वीकार करणे हीच उत्तम पद्धती ठरेल. म्हणून प्रत्येकाच्या निरनिराळ्या भावना वैयक्तिकपणे स्वीकारून त्यांचा अनुभव घ्यायला हवा. तर मग एखाद्याला इतराशी समरस होणे शक्य आहे. ज्यांना आत्मसाक्षात्काराचे ध्येय साध्य करायचे आहे त्यांना तो अत्यंत खात्रीचा व अचूक असा टप्पा आहे.

निर्जीव वस्तूशी एकात्मता साधणे हे सजीव प्राण्यांशी एकात्मता साधण्यापेक्षा सोपे आहे. कारण निर्जीव वस्तूंना भावना नसतात, संवेदना नसतात. म्हणून तुमच्या अंतःकरणातील भावनांचा निचरा करून टाकला की तुम्ही त्यांच्याशी एकरूप होऊन जाता. पण जेव्हां एखाद्या सजीव प्राण्याला आत्मसात करून घ्यायचे असते त्यावेळी दुहेरी प्रक्रियेचा अवलंब करावयाचा असतो. तुम्हाला तुमच्या भावना विसरून दुसऱ्यांच्या भावनांचा स्वीकार करावयाचा असतो. माणसासारख्या सजीव प्राण्याशी एकरुपता ज्या व्यक्तीला साधते, तो वस्तूशी एकरूप झालेल्या व्यक्तीपेक्षा आत्मसाक्षात्काराच्या अधिक जवळ जातो.

गुरुभक्त

हे मी माझ्या स्वतःच्या अनुभवाविषयी लिहीत आहे. माझ्या अंतःकरणाची पाने मी पुन्हा पुन्हा चाळली. अगदी बारकाईने सगळी वाचली. शक्यतो आत्मशुद्धी करणारे सर्व अनुभव मी घेतले. माझ्या अनुभवावरून माझी अशी पक्की खात्री झाली आहे की, संघातील माझ्या सर्व बांधवांशी एकरूप होण्याचा प्रयत्न केल्याशिवाय आत्मसाक्षात्काराविषयी मी नुसते बोलू शकणार नाही.

माझ्या अंतःकरणात ही भावना खोलवर रुजली असल्यामुळे मी संघातील निरनिराळ्या सदस्यांशी एकरूप होऊ लागलो. मी एकाची निवड केली. कुणाची हे सांगण्याची गरज नाही. मी त्याच्याशी एकरूप झालो. आणि माझ्या भावना, संवेदना इत्यादी टाकून दिल्या. त्या माझ्या बंधूला मनात काही दुःख असेल

अनुक्रमणिका

तर त्या दुःखाने मी भारावून जात असे. काही पापी विचारांनी त्रस्त होऊन तो माझ्याकडे येई त्यावेळी त्याच्या अंतःकरणातील प्रक्षोभाची मला तीव्रतेने जाणीव होई व त्याने स्वतःच्या दुःखासंबंधी काही सांगण्यापूर्वीच माझ्या डोळ्यावाटे अश्रूंच्या धारा वाहत असत. ही अंतःकरणाची व आत्म्याची खरी एकरुपता. कोणती अलौकिक व गूढ शक्ती या विश्वाचे संचलन करीत आहे हे मी जाणत नाही. त्या प्रकाशाच्या काही अंधुक शलाका मला दिसतात. कधी कधी त्या अतिशय तेजस्वी प्रकाश झोताचे मला दर्शन घडते. निश्चितच तो तेजस्वी प्रकाश तेथे आहे. ते काही का असेना पण नैतिक पातळीवर मी त्या संबंधी फारसा आटापिटा केला नाही. तो प्रकाश तेथे आहे एवढेच मी जाणतो. बाकी काही नाही. मी काय करू शकतो, करू शकलो ते मी केले आहे हे मी जाणतो. मी संघातील बहुसंख्य सदस्यांशी एकरुपता साधली आहे. नुसते एका कोपऱ्यात बैस आणि म्हण तू शंकर आहेस किंवा अमृत तू युवराज, दास, गोपाळ अन् आणखी कोणी कोणी आणि मग हळूहळू तू तोच आहेस असे तुला आढळून येईल. याचा मी अनुभव घेतला आहे. हाच आत्मसाक्षात्कार असेल का? ते काय आहे हे मला माहीत नाही विकासाचा तो माझाच एक टप्पा! मी रड रड रडू शकतो तसेच सारी सृष्टी माझ्या हसण्याने दणाणून जाण्याइतका हस हस हसू शकतो!

गुरुभक्त

माझ्याजवळ विनिमयासाठी एक वस्तू आहे. ती मी फक्त एकाच पद्धतीने देऊ शकतो. तुझे एखादे पाप आहे काय? ते मला देऊन टाक. त्याच्या मोबदल्यात मी तुला पावित्र्य देईन. तुझ्या मनाला उदास वाटत असेल तर ती उदासीनता मला दे. मी तुला त्याऐवजी अंतःकरणातील उत्साह, ऊब देईन. तू मनात दुःखी आहेस काय? ते दुःख मला दे मी परतीत तुला आनंद देईन. मला पाप, दुःख, कष्ट, दैन्य इत्यादी सर्व पाहिजे आहे. त्या सर्वांच्या मोबदल्यात मी पवित्र प्रेम, आनंद देईन! माझा आतल्या आवाजाचा तसा आदेश आहे.

गुरुभक्त

**संपादकीय टीप :** या ठिकाणी आत्मसाक्षात्कारासाठीची तीव्र तळमळ जशी व्यक्त होते तशी त्यासाठी कराव्या लागणाऱ्या साधनेची स्पष्ट कल्पना येते. मी चे विलीनीकरण ही वाटते तितकी सोपी गोष्ट नाही पण त्यासाठी पू. स्वामीजी स्वतःवर कसा विजय प्राप्त करीत होते हे दिसून येते.

दसऱ्यापासून संन्याशाचे सारे नियम पाळायचे असे मागे सांगितले होते. त्यावेळी काही नियमही लिहून दिले होते. दसऱ्याच्या दिवशी कोणाच्या पाया पडायचे नाही. कुणाचे उष्टे खायचे नाही. जेवताना शिवायचे नाही. इत्यादी नियम पाळा असे म्हणाला होता. मला आता आठवते की पूर्वीच्या नियमात रात्रीच्या जेवणाचा एक नियम होता. तो पाळायचा की काय? एखादी गोष्ट नियम म्हणून जर घेतली नाही तर ती पाळणे थोडेसे मला तरी निदान कठीण जाते. तरी पाळावयाचे नियम पुढील पानावर लिहून द्यावे ते जसेच्या तसे न चुकता पाळीन.

गुरुभक्त

ॐ

शनिवारी रात्री मी आपणास एक पत्र दिले होते. त्यात रात्रीच्या शाळेची योजना होती ती कल्पना आपणास आवडली नाही. म्हणून तात्काळ त्या कल्पनेचा विसर पडला. जी गोष्ट रामाला आवडत नाही

तिचा विचार सुद्धा मनात आणू देणे हे पाप आहे. ही झाली भावना. पण त्याहीपेक्षा दुसऱ्या एका गोष्टीनेच मला तसे करणे भाग पडले. माझ्या मनातील भावना व विचार हे सर्व संघाच्या मालकीचे आहेत. त्यांच्यावर माझा ताबा नाही. संघ म्हणेल ते विचार व भावना व्यक्तींच्या झाल्या पहिजेत संघाच्या अध्यक्षांनी विरुद्ध मत दिले असता त्या भावनेला चिकटून बसणे म्हणजे दुसऱ्याच्या मालाचा अपहार करणेच होय! आपले अस्तित्वच राहिले नाही मग विचार, कल्पना व भावना कोठल्या!

गुरुभक्त
ॐ राम काका
आषाढ २, बुधवार

ॐ

काही ज्ञात भूप्रदेशावर आपलीच सत्ता कशी प्रस्थापित होईल या चिंतेत असतात. काही आपल्या सत्तेचा, मालकीचा एक तुकडाही नसावा अशी विवंचना करीत असतात.

राम

ॐ

काही महालांचे निरनिराळे नकाशे तयार करण्यात गुंग झालेले असतात. काही अनिकेत कसे व्हावे म्हणून विचार करीत बसलेले असतात.

राम

❑❑

अनुक्रमणिका

## ३ हा भाग मूळात इंग्रजीत आहे. त्या इंग्रजी लेखनाचा अनुवाद

तेव्हा मी नुकत्याच दहाव्या वर्षात पदार्पण केलेला मुलगा होतो. माझ्या वडिलांच्या बरोबर सीना नदीच्या काठावर मी उभा होतो. सकाळी ९ वाजण्याचा सुमार.....नदीचा प्रवाह एक सारखा व संथपणे वहात होता. माझे वडील एका खडकावर बसले होते. आणि मला न कळणाऱ्या कसल्यातरी अवस्थेत निमग्न होते. मला त्यांनी आपल्या बरोबर तेथे का नेले होते हे मला कळले नाही. त्यांनी आपल्या बरोबर काही फुले व बिल्वदले आणली होती. माझ्या दृष्टीने त्यांची ती अवस्था गाढ निद्रेची होती. त्या गाढ निद्रेतून ते जागे होऊन नदीत गुडघाभर पाण्यात चालत गेले व अर्ध नग्न अवस्थेत त्यांनी नदीत स्नान केले. ते किती मोठ्याने हसत होते. हे मला आता आठवते. त्यांनी मला आपल्याकडे बोलाविले. त्यांच्याजवळ गेल्यानंतर मला जाणवले की त्यांना माझ्याशी काही शब्द बोलायचे आहेत. आपले बाहू खूप पसरून त्यांनी मला विचारले "तुला लग्न करून घ्यायचे आहे काय?" नाही, कधीच नाही." मी तात्काळ उत्तर दिले. "मग तू जगात कसा वागशील?" त्यांनी विचारले "घरोघर भिक्षा मागून मी संन्याशा सारखा राहीन" मी म्हणालो. ते शब्द आता असे खरे ठरले!

आम्ही परत कातळापाशी आलो. माझे वडील त्यावर पहुडले. त्यांनी मला हातात फुले घेऊन नदीच्या पवित्र पाण्यात अर्पण करण्यास सांगितले. मी फुले अर्पण केली. माझे वडील तोंडाने काहीतरी पुटपुटत होते. आणि माझ्याशी बोलत होते. ते काय म्हणत होते हे मला कळत नव्हते. ते शब्द पुढीलप्रमाणे काहीतरी असावेत. 'ॐ ऐम् क्लीम सहू, सहू क्लीम ऐम्' जेव्हा मला वेळ मिळेल तेव्हा या शब्दांचे मी सारखे पठण करावे असे त्यांनी मला सांगितले, तथापि मी तो मंत्र जोराने म्हणू नये अशी ही खबरदारीची सूचना त्यांनी केली. त्या दिवसापासून श्री. आर. एस. आनंदमूर्तीच्या संपर्कात येईपर्यंत मी त्या मंत्राचा जप स्वतःशीच दिवसातून अधिकाधिक वेळ करीत आलो आहे.

त्यांची बाह्यवेशभूषा जरी साधू सन्यांशासारखी नव्हती तरी माझे वडील साधूच होते. काही काळ तर ते संन्यस्त वृत्तीनेच राहात होते. पण त्यांच्या गुरूच्या स्पष्ट आदेशानुसार पुन्हा त्यांनी गृहस्थाधर्माचा स्वीकार केला. त्यांनी सन्यस्त वृत्तीचा त्याग केल्यानंतर माझा जन्म झाला. कधी कधी ते प्रार्थनागीते म्हणत असत. मला त्या गीतांचा अर्थ कळत नव्हता. पण त्या गीतांचा मधुरध्वनी मला खूप आवडे. आपल्या उजव्या हाताची बोटे हलविण्याची त्यांना सवय होती. ते तसे का करतात असे मी त्यांना विचारीत असे. पण त्यांनी त्याचे कधी उत्तर दिले नाही. काही वेळेस त्यांच्याभोवती त्यांच्या काही शिष्यांचा घोळका जमा होत असलेला मी पाहिला आहे. ते त्यांना काय सांगत होते हे मला कळले नाही. काही वेळी ते प्राणायाम करीत गाढ ध्यानावस्थेत मग्न असलेले मी पाहिले आहे. हे सगळे प्रकार व माझ्या वडिलांच्या नावाशी निगडित असलेल्या आणखी किती तरी गोष्टींचा सहाजिकच माझ्या वृत्तीवर परिणाम होणे अनिवार्य होते व त्यामुळे माझ्या आध्यात्मिक प्रगतीचा मार्ग सुलभ झाला. येथे पहिला भाग संपतो.

**संपादकीय टीप :**— या छोट्याशा प्रकरणावरून आपणाला एक गोष्ट स्पष्ट होते. ती ही की व्यंकटेश खेडगीकरांची वृत्ती लहानपणापासूनच आध्यात्माकडे होती. त्या वृत्तीला पोषक असे जीवन त्याचे वडील व्यतीत करीत होते. त्यामुळे आध्यात्मिक जीवनाचा पाया लहानपणीच रचला गेला. तो व्यंकटेश खेडगीकराचा पुढे सहज धर्म बनला.

मी हायस्कूलात शिकत असताना माझ्या एका मित्राशी माझा घनिष्ठ संबंध आला. तेव्हा एका नव्या अध्यायाचा आरंभ झाला. आम्ही जवळजवळ सबंध दिवस एकमेकाच्या सहवासात घालवीत होतो व कितीतरी विविध विषयांवर आम्ही बालिशपणे खूप बोलत असू. सुटीच्या काळात कधी कधी आम्हाला

अनुक्रमणिका

एकमेकापासून दूर राहावे लागे. त्यामुळे होणाऱ्या वियोगाच्या दुःखाचे वर्णन करण्यास ही लेखणी असमर्थ आहे. आम्ही अधिकाधिक एकमेकाच्या जवळ येत गेलो. तसे तसे मला त्या दैवी, निर्व्याज प्रेमाचा प्रभाव जाणवू लागला. त्या प्रभावाचा अनुभव येत जाऊन मला आनंद वाटू लागला. त्या मित्राच्या प्रेमाने मी खूपच भारावून जाऊ लागलो. इतका की ही दोन हृदये एकमेकापासून दूर होऊ शकणार नाहीत असं शेवटी वाटू लागलं.

माझा मित्र शरीराने सुदृढ होता. त्याच्या निर्मल अंतःकरणाने मी भारावून गेलो होतो. मी त्यावेळी पापी होतो. मनाने दुर्बल व दुष्प्रवृत्तीचा होतो व शरीराने अशक्त होतो. मला कधी शांती लाभली नाही व मानसिक समाधान नव्हते. माझ्या निष्ठा प्रबळ नव्हत्या, प्रलोभनांना मी सहज बळी पडत असे. मी बुद्धिमान, हुशार व चुणचुणीत. त्यामुळे शिक्षकांची माझ्यावर खूप मर्जी होती. स्वभावता मला चार चौघांच्या सहवासात मिळून मिसळून राहणे खूप आवडायचे, इतके की कधी कधी ती सहज प्रवृत्ती अवगुण समजली जाई. मी विद्यार्थ्यात लोकप्रिय होतो. जवळजवळ ४५० विद्यार्थ्यांमध्ये बहुतेक सर्व विद्यार्थी मला ओळखत असत व माझ्याविषयी उच्च भावना बाळगीत असत. मी थट्टा मस्करी करीत असे, खोटे बोलत असे, दूरगामी परिणामाचा मी कधीच त्यावेळी विचार केला नाही. मी त्यावेळी पाचव्या इयत्तेत (म्हणजे आताची ८ वी इयत्ता) होतो. एका शिक्षकाबरोबर खटका उडाल्यामुळे माझ्या मित्राने हरिभाई देवकरण हायस्कूलमध्ये प्रवेश घेतला. ते विद्यालय नुकतेच त्याच वर्षी सुरू झाले होते. त्याने मीही त्या शाळेत जावे या दृष्टीने माझे मन वळविण्याचा प्रयत्न केला. पण माझी गरीबी मला भेडसावीत होती. त्या शाळेची फी देणे मला परवडणारे नव्हते. म्हणून माझ्या प्रियतम मित्राच्या प्रेमळ सहवासाला मुकण्याची मोठी हानी होऊनही मी जेथे होतो तेथेच राहाणे मला भाग होते.

आता माझ्या मित्राची दिवसातून एकदाच भेट होई. हळूहळू भेटी कमी कमी होऊ लागल्या आणि त्याच्या सहवासाचा माझ्या मनावर जो हितकर परिणाम व्हायचा तो नाहीसा झाला. मी आता वाईट संगतीत आलो. माझ्या जीवनाचे तारू आता सुकाणुविना दिशाहीन हेलकावे खात चालले होते. कोणत्याही क्षणी ते अनीतीच्या खडकावर जाऊन आदळण्याची खूप शक्यता होती. पापामागून पाप करीत मी चाललो होतो; आणि जवळजवळ आक्षेपार्ह मार्गात फसत होतो. माझ्या वयाच्या चौदाव्या वर्षी मी असा होतो.

जेव्हा या भूतकाळाकडे माझी दृष्टी वळली तेव्हा माझ्या पायाखालची माती सरकत असल्याची मला जाणीव झाली. स्फटिकासारख्या शुद्ध अंतःकरणाच्या एकमेव मित्राची मूर्ती माझ्या डोळ्यासमोर तरळू लागली. मी जेव्हा भविष्यात डोकावून पाहिले त्यावेळी ते जरी अंधुक वाटे तरी मी त्या मित्राइतकाच शुद्ध आहे असे मला वाटे पण वर्तमान मात्र अतिशय क्लेशदायक वाटे. मी वाईट शब्द उच्चारीत होतो. मी दुसऱ्याच्या भावना दुखवीत होतो. मी असंख्य खोटे बोलत असे. मी नेहमी सिनेमाला जात होतो. होटेलात जात होतो. धूम्रपान मात्र करीत नव्हतो. दोन तीन वेळा मी माझे नसलेले दोन-चार आण्यांचे पैसे चोरले होते. माझ्याकडून लैंगिक पाप मात्र घडले नव्हते. परमेश्वराने मला त्यापासून वाचविले पण मी ज्यांच्या सहवासात वावरत होतो त्यावरून मी तो भ्रष्टाचारही करीत असेन अशी प्रत्येक जण शंका घेत असे. पण अद्यापि मी पूर्णपणे वाया गेलो नव्हतो. कुणीतरी मला दुर्मार्गाने नेत आहे हे मला कळत होते. माझ्यात सुधारणा घडवून आणण्यास एवढी जाणीव पुरेशी होती. अगदी क्षुल्लक एखादे पापकृत्य का असेना पण त्यायोगे माझ्या सद्सद्विवेक बुद्धीला बोचणी लागत असे. ती सद्सद्विवेक बुद्धी म्हणजेच एक निरंकुश दंड. या दंडाच्या मार्गेच माणसाला विवेक प्राप्त होऊ शकतो व त्यांना मनुष्यत्व प्राप्त होऊ शकते. याच मार्गाने मी जात राहिलो तर माझा सर्वनाश ओढवणार हे मला कळू लागले. अशा प्रकारचे जीवन जगणे मी

अनुक्रमणिका

सोडून दिलेच पाहिजे याची मला जाणीव होऊ लागली. पण मी तसे करू शकलो नाही. कसल्याही प्रकारच्या आनंदाविषयी मला आसक्ती उरली नाही. माझ्या चेहऱ्यावरचा उत्साह व तजेला नाहीसा झाला. मी खाईनासा झालो. मी न काही खेळत असे न कसला अभ्यास करीत होतो. माझ्या मित्राला भेटण्याचे मला धैर्य होईना, असेच दोन महिने गेले. आणि आमची भेट झाली. माझ्यामध्ये जो अनिष्ट बदल झाला होता त्याची माझ्या मित्राला काहीच कल्पना नव्हती. तो नेहमीप्रमाणे माझ्याशी स्पष्टपणे बोलला. पूर्वीइतकाच तो मोकळा-चाकळा वागला. त्याच्या निरागसतेने मी लाजलो. पण थोडाच वेळ ही लज्जास्पद अवस्था तशीच कायम टिकून राहावी असे मला फार वाटले. पण अरेरे! तसे व्हायचे नव्हते.

जरी सद्सद्विवेक बुद्धीची बोचणी तीव्र स्वरुपाची होती, तरी ज्या मार्गाने मी चाललो होतो त्या मार्गावरून मला मागे खेचण्याइतकी ती प्रबळ नव्हती. सहजपणे मी प्रलोभनाच्या आहारी जात असे. अगदी खरे! पण कुठल्या तरी शक्तीने अटळ अशा नष्टचर्यापासून वाचविले. माझ्या मित्राची किडकिडीत मूर्ती नेहमी माझ्या चेहऱ्याकडे टक लावून पाहत असे, आणि मी हजारदा त्याची क्षमा मागून ज्या कुकर्मांमुळे माझे अंतःकरण निरुत्साही, दुबळे झाले होते. त्या दुष्कृत्यांबद्दल मला क्षमा करावी अशी मी त्याला याचना केली. एवढेच नव्हे तर पुष्कळदा मी कुठेतरी एखाद्या एकांत स्थळी जाऊन बसत असे, अन् त्यावेळी विरोधी भावनांचा तीव्र संघर्ष सुरू होई. अशा वेळी माझ्या डोळ्यावाटे अश्रूधारा वाहत असत. अन् अनेक हुंदके देत मी स्वतःलाच विचारीत असे “तुझ्या मित्राच्या प्रेमाला तू पात्र आहेस काय?” आणि असं सांगताना मला खूप मनस्ताप होतो की माझ्या आतल्या आवाजाने ‘निश्चित नाही’ असे उत्तर दिले. यामुळे मी त्रस्त झालो. माझ्या मित्राच्या निर्मलतेच्या मानदंडाने पाहाता मी खूपच भ्रष्ट झालो होतो. हे मी जाणत होतो. केव्हा तरी ती शुद्धता मला प्राप्त होऊ शकेल काय हा एकच विचार माझ्या डोक्यात घोळत होता. माझ्या मित्राच्या हृदयात स्थान मिळण्यास मी अगदी अपात्र आहे याची मला जाणीव होती. मी सोलापूर शहराच्या बाहेर एकटाच फिरत असे. स्वतःला सुधारण्याबाबतीत मी पूर्ण निराश झालो होतो. मी विफलतेच्या गर्तेत अडकून पडल्यासारखे मला वाटू लागले. मी अगदी निराश झालो आणि आत्महत्येचा विचार मनात येऊ लागला.

पण तसे व्हायचे नव्हते. किती तरी उन्हाळे मला पाहावयाचे होते. अन् तेही अगदी प्रकाशमय. माझा मित्र माझ्या साह्याला आला. माझ्या मनःस्थितीच्या कारणाची त्याला कल्पना नव्हती. पण माझ्या प्रदीर्घ मौनाचे मात्र त्याला फार आश्चर्य वाटले. अन् मग माझ्या अंतःकरणातील शल्य जाणून घेण्याचा निरनिराळ्या मार्गांनी प्रयत्न केला. माझ्या अस्तित्वालाच ग्रासून टाकणाऱ्या दुःखाला किंवा मनस्तापाला मी कधीच वाचा फोडली नव्हती. माझ्या मित्राच्या अंतःकरणातील आनंद हिरावून घेण्याची माझी इच्छा नव्हती. बस्! ते दुःख माझ्यापुरतेच राहू दे. ज्या संकटात मी गुरफटलो गेलो होतो त्या संकटाचा माझ्या मित्राच्या अंतःकरणाला सुगावाही लागू देऊ नये असे मला वाटत होते. पण अनेक, विनवण्या करून—कधी हुंदके देत, कधी प्रेमळ शब्दांनी त्याने माझ्यावर मात केली. पण या सगळ्यांनी मी कधी बधलो नाही. तो म्हणाला, “ते काही का असेना, पण हे लक्षात ठेव की एका शुद्ध अंतःकरणात तुझ्याविषयी नेहमीसाठीच सदिच्छा वास करतील.” एवढे बोलून तो निघून गेला.

माझ्या अंतःकरणातील संघर्ष अधिकच तीव्र झाला. एक सच्चा मित्र व वाईट संगत यामध्ये माझे मन हेलकावे खात राहिले. शरीराने तो जरी फार दूर होता तरी माझे मन नेहमी त्याचा मागोवा घेत राहिले.

माझे दुःख वाटून घेण्यास आणखी एक अंतःकरण असताना मी एकट्यानेच का रडत बसावे. “ऊठ अन् त्याचा आश्रय घे.” माझ्या आतल्या आवाजाने कौल दिला. ताबडतोब मी त्याच्याकडे गेलो आणि

त्याला सांगितले की माझ्या अंतःकरणावरील भार नाहीसा झाला आहे. असे म्हणून त्याच्या मधुर हास्यात विलीन झालो. आता पुन्हा एकदा पापाच्या गर्तेत पडण्याची माझ्यावर पाळी येणार नाही असे वाटू लागले. सगळे धैर्य एकवटून माझ्या पापी कृत्यांची, शब्दांची व विचारांची मी माझ्या सद्सद्विवेक बुद्धी पुढे प्रांजळ कबूली दिली. त्यामुळे माझ्या मनावरचे दडपण कमी होऊन मला समाधान लाभले. दुष्ट प्रवृत्तींवर विजय मिळवून मी पूर्वीसारखा शुद्ध, निर्मळ झाल्यासारखे मला वाटू लागले. पण पुढील काळातही अनुभवाने माझ्या असे लक्षात आले की, मला एका मोठ्याच कसोटीला उतरायचे आहे.

१ ऑगस्ट १९२० हा दिवस साऱ्या भारतभर सार्वत्रिक शोकदिवस होता. सर्व देशभर मृतवत शांतता पसरली होती. त्या दिवशी लोकमान्य टिळकांचे देहावसान झाले होते. यापूर्वी मला कधीच इतके निरुत्साही व उदासीन वाटले नव्हते जितके त्या दिवशी वाटले. आपोआप माझी पाउले माझ्या मित्राकडच्या घराकडे वळली तोदेखील माझ्याकडेच निघाला होता. आम्ही दोघे अर्ध्या वाटेतच भेटलो. त्याचा चेहराही खूप उतरला होता. त्याला खूपच अस्वस्थता जाणवू लागली होती व दिलाशासाठी तो माझ्याकडे निघाला होता. असे त्यांनी मला सांगितले. त्याने आपले हात माझ्या मानेभोवती टाकले अन् तो रडू लागला. माझे डोळे सुद्धा दुःखाश्रूंच्या सागरात बुडून गेले. तो म्हणाला "भारताची एक फार थोर व्यक्ती नाहीशी झाली आहे." आपल्या मातृभूमीसाठी थोडे बहूत तरी काही ना काही तरी करणे हे आपले कर्तव्य नाही का?" त्याने विचारले, मी माझी मान हलविली व त्याच्या विचारांशी संपूर्ण सहमती दर्शविली. तो पुढे म्हणाला, "हे पाहा बंधू, जोपर्यंत भारताच्या स्वातंत्र्यासाठी या देशातील तरुण आपले जीवन देण्याचा संकल्प करणार नाहीत, तोपर्यंत लोकमान्य टिळकांच्या आत्म्यास शांती लाभणार नाही. आपण सच्चे भारतीय बनू या व तशी प्रतिज्ञा घेऊ या" मी माझ्या मित्राला म्हणालो. "आपण जेथे उभे आहोत तो सार्वजनिक रस्ता आहे. आपण आणखी दूर बाजूला जाऊ या. यावेळीपावेतो त्या थोर देशभक्ताला श्रद्धांजली वाहण्यासाठी एक शोकसभा आयोजित केली गेली असल्याचे आम्हाला कळले. आम्ही त्या सभेला गेलो. तेथे एका डॉक्टरांचे भाषण खूपच भावनाप्रधान असे झाले. ते भाषण माझ्या अंतःकरणाला जाऊन भिडले. अत्यंत शोकाकुल होऊन अश्रूपूर्ण नेत्रांनी ते आपले मनोभाव व्यक्त करीत असताना मी मनातल्या मनात गंभीरपणे अशी शपथ घेतली की, "मी दारिद्र्याचा स्वीकार करीन व प्रिय भारताच्या सेवेसाठी स्वतःला समर्पित करीन."

* * *

१९२१ चे वर्ष होते. मी मॅट्रिकच्या परीक्षेसाठी पुण्याला गेलो होतो. माझ्या बरोबरच्या मित्रांच्याकडे त्यांचे स्वतःचे घड्याळ होते. मी खूप गरीब होतो. त्यामुळे मला स्वतःचेच घड्याळ घेणे परवडणे शक्य नव्हते. मी माझ्या एका मित्राकडून एक घड्याळ उसने घेतले होते. माझे काम होताच ते परत करीन असे मी सांगितले होते. परीक्षा होताच आम्ही सोलापूरला परत निघालो होतो. गाडी अति वेगाने धावत होती. माझ्या मनगटावर बांधलेल्या घड्याळाकडे माझी दृष्टी गेली. मला त्या घड्याळाने भाळून टाकले. मी पुन्हा पुन्हा त्याकडे पहात राहिलो. आणि प्रत्येक क्षणी ते घड्याळ माझे स्वतःचेच असायला हवे होते असे वाटू लागले. त्याविषयी सहजपणे मला आत्मीयता वाटू लागली, आणि ते कधीच देऊन टाकू नये अशी इच्छा निर्माण झाली. "हे घड्याळ माझे कसे होईल?" हाच विचार माझ्या मनाला प्रोत्साहित करीत होता. तत्काळ माझ्या मनात एक विचार चमकून गेला. ते घड्याळ हरवले असे सांगून टाकावे अशी एक कल्पना मला सुचली. शेवटी एक सोपा मार्ग सापडला म्हणून मला आनंद झाला. पण आतल्या सद्सद्विवेक बुद्धीची तीव्र बोचणी सुरू झाली. मी अवलंबित असलेला मार्ग हा अपकीर्तिकारक आहे अशी धोक्याची

अनुक्रमणिका

सूचना विवेकाने दिली. त्यामुळे मी स्वतःचेच किती नुकसान करून घेत आहे याची जाणीव करून दिली. यामुळे हा मार्ग म्हणजे माझ्या स्वतःच्या कल्याणाच्या शवपेटीवरील पहिला खिळा आहे हे मला कळत होते. “हे तू करता कामा नये” असा विवेकाने स्पष्ट आदेश सुद्धा दिला. तरी पण दुसरी एक प्रबळ शक्ती मला तिकडे ओढत होती. दोन विचारांच्या संघर्षात मी सापडलो. मी इकडे एकदा पाहिले, तिकडे एकदा पाहिले, थोडासा थांबलो आणि सरतेशेवटी मी म्हणालो “हे घड्याळ माझेच आहे” सोलापूरला पोहचल्यानंतर मी त्या गृहस्थाला सांगून टाकले की दौंड जंक्शनवर मी लघवीला गेलो असताना ते घड्याळ चोरीला गेले.

* * *

मनुष्य आपले थडगे स्वतःच्या कृत्यांनीच खणत असतो. मनुष्य स्वभाव हा सर्वत्र सारखाच असतो. मी याला अपवाद होऊ शकलो नाही. कसोटीचा एकच क्षण असतो. त्यावेळी मनुष्य कुठल्यातरी मोहाला बळी पडला की, त्याचा कायमचाच नाश होतो. पण जर त्या मोहावर त्याने मात केली तर तो हजार पटीने भाग्यवान ठरतो. सद्‌गुण आणि दुर्गुण यामधील संघर्षात दुर्गुण संपूर्णपणे बलवान ठरून त्याने सद्‌गुणावर मात केली होती. सूक्ष्म सुंदर भावना नष्ट झाल्या होत्या. सैतानाने माझ्या अंतःकरणाचा ताबा घेतला होता. त्याने मला पापाच्या भोवऱ्यात फेकून दिले होते. एखाद्या खात्रीच्या मार्गदर्शकाप्रमाणे त्या सैतानाने मला थेट दुष्ट अनैतिक मार्गावर आणून सोडले. माझे स्वतःचे पापकृत्य झाकण्यासाठी त्याने मला अगदी झटपट अमलात येऊ शकणारी योजना सुचविली. पहिल्या असत्यात हजार असत्ये दडलेली असतात. एक पापकृत्य पापांची कधी न संपणारी एक मालिकाच निर्माण करते. चुकीने टाकलेले एक पाऊल माणसाची हानी करते. मला त्यावेळी ते कळले नाही. आता पुन्हा त्या कथेकडे वळतो.

मी आतापर्यंत घड्याळ लपवून ठेवले होते. माझ्या मित्रांनी त्या घड्याळाची चौकशी करू नये म्हणून ते मी बाहेर काढलेच नव्हते, पण अशा स्थितीत मी किती वेळ राहू शकणार होतो? एक ना एक दिवस मला ते घड्याळ वापरायलाच हवे होते. पण प्रत्यक्ष त्या घड्याळाचा इतरांना सुगावा लागण्याचा दिवस शक्य तितका लांबणीवर टाकत गेलो. माझ्या एका बहिणीकडे ते घड्याळ हस्तांतरित करू इच्छित होतो. ती त्यावेळी सोलापूरपासून सहा सात स्टेशनांच्या अंतरावर राहात होती. थोडा वेळ का होईना मी तिच्या गावी जाऊ इच्छित होतो. मी रात्रीच्या गाडीने जाण्याचे ठरविले. रात्री १ वाजता मी गाडीची वाट पाहात प्लॅटफॉर्मवर उभा होतो. दुर्देवाने घड्याळ माझ्या मनगटावर होते. गाडी आली आणि त्या गाडीतून माझा आणखी एक मित्र उतरला आणि अगदी सहजपणे किती वाजले असे त्यांनी मला विचारले. मी मनगटाकडे पाहिले आणि सव्वा वाजल्याचे सांगितले. तो निघून गेला आणि माझा प्रवास सुरू झाला.

* * *

त्यानंतर दोन दिवसांनी मी सोलापूरला परत आलो. मी दररोज माझ्या मित्राला भेटत होतो. या मनगटी घड्याळाभोवतीच्या गूढतेविषयी मी त्याच्यापुढे कधीच बोललो नाही. नेहमीच्या सलगीने मी त्याच्याशी बोलत होतो. पुष्कळदा आम्ही पुढे काय करायचे याविषयी बोलण्यातच गुंग होऊन जात असू. मी असहकारी चळवळीत भाग घेतला होता. आता दोघांचे मार्ग एकमेकापासून फार भिन्न होते. आम्ही निरनिराळ्या कॉलेजात जाणार होतो. तरीसुद्धा पदवी घेतल्यानंतर मातृभूमीच्या सेवेसाठी एकाच क्षेत्रात काम करीत भेटत राहाता यावे या उद्देशाने आम्ही एकच अभ्यासक्रम घ्यावा हाच माझ्या मित्राचा माझ्याशी

अनुक्रमणिका

झालेल्या बोलण्याचा मथितार्थ होता. तो जे म्हणेल ते मला पटायचे. मी त्याला मान्यता देत राहिलो. पण खरे तर एका पवित्र आत्म्याची वंचना करणे हे मृत्युहून भयंकर आहे असे अंतरात्म्याला वाटू लागले. विद्यालयीन वर्षाचा आरंभ झाला. आणि आम्ही एकमेकापासून दुरावलो. मी अमळनेर येथील राष्ट्रीय महाविद्यालयात प्रवेश घेतला. अन् त्याने पुण्याच्या फर्ग्युसन कॉलेजात. मी वैद्यकीय विद्यार्थ्यांच्या गटात प्रवेश घेतल्याचे माझ्या मित्राला कळविले. त्याने आपली संपूर्ण नापसंती दर्शविली आणि मला आर्टस् (मानव्य) च्या गटात जाण्याचा सल्ला दिला. पत्रकारितेकडे जाण्यासाठी हाच एक सुलभ मार्ग असल्याचे त्याने कळविले. पत्रकारिता हे आमच्या जीवनांचे ध्येय आधीच ठरल्यासारखे झाले. दुसऱ्या दिवसापासूनच मी माझा अभ्यासक्रम बदलून बी.ए. च्या अभ्यासक्रमाला गेलो. इतिहास, अर्थशास्त्र व राज्य नीतिशास्त्र हे माझे मुख्य विषय होते.

दिवाळीची सुट्टी सुरू झाली. आणि पुन्हा एकदा माझ्या मित्राचा प्रेमळ सहवास मला लाभला. दिवस कसे गेले हे आम्हाला कळलेच नाही. आता एकमेकापासून दूर जाण्यास दोन तीन दिवसच उरले होते. मी माझा मित्र व ज्याचे घड्याळ मी चोरले होते तो माझा साथीदार खरच 'चोरले' हा शब्द वापरण्यास मला बिलकुल संकोच वाटत नाही—व माझ्या बहिणीच्या गावाकडे जाताना रेल्वे प्लॅटफॉर्मवर भेटलेला मित्र असे आम्ही एका संध्याकाळी फिरायला गेलो होतो. फिरून परत आलो व आपापल्या दिशेने निघालो. तेव्हा माझ्या साथीदाराने माझा दंड जोराने धरला. तो सुदृढ शरीराचा आणि सहा फूट उंचीचा. त्याने मला विचारले "मनगटी घड्याळ कुठे आहे"? मी त्याच्या चेहऱ्याकडे पाहू शकत नव्हतो. तो भयानक वाटला. "ते हरविले नाही हे मला माहीत आहे. तू फसवेगिरी करीत आहेस, लफंगा आहेस. येथे सडकेवरच तुझ्यावर लत्ताप्रहार करतो." मला हे खूपच झाले. मी कुठे उभा होतो हेच मला कळेना. सारे जग माझ्या विरुद्ध उठून उभे राहात आहे असे वाटू लागले. माझ्या निर्मल मनाच्या मित्रासमोर झालेल्या इतक्या अवहेलनेपेक्षा मरून गेलो असतो, तर बरे झाले असते असे मला वाटू लागले. मित्राला ते प्रकरण समजू नये असे वाटत होते. मी माझ्या साथीदाराचा हात धरला आणि त्याला बाजूला नेले अन् त्याच्या कानात हळूच सांगितले की 'तसे घड्याळ माझ्याजवळ नसून माझ्या एका बहिणीकडे आहे. मी ते एक दोन दिवसात परत करीत आहे.' त्याचे समाधान झाल्यासारखे दिसले. मग मी माझ्या मित्राला बरोबर घेतले. त्यानी त्या गृहस्थाशी बोलावे असे मला वाटले नाही. नुकत्याच घडलेल्या घटनेमुळे तो पूर्णपणे गोंधळून गेला होता. मोठे आश्चर्य म्हणजे त्यांनी प्रश्नांचा भडिमार केला. मी अत्यंत गोंधळलेल्या मनस्थितीत असल्यामुळे सध्या मला एकांत हवा आहे असे मी त्याला सांगितले आणि उद्या दुपारी या प्रकरणाचा अगदी खडानखडा तपशील मी कळवीन असे आश्वासन दिले. एवढे बोलून आम्ही हस्तांदोलन केले आणि निघून गेलो.

* * *

त्याच दिवशी रात्री मी माझ्या बहिणीच्या घरी गेलो. आणि दुसऱ्याच दिवशी घड्याळ ज्याचे होते त्याच्या घरी पोचते केले. पूर्वी वचन दिल्याप्रमाणे मी माझ्या मित्राकडे गेलो व त्या प्रकरणाविषयी कपोलकल्पित अशी काही माहिती त्याला सांगितली. माझ्या खात्यावर जमा झालेल्या पापांच्या संख्येत आणखी एक पापाची भर पडली. मी त्याचे समाधान करू शकलो नाही, हे मी ओळखले. मी त्याची रजा घेतली व कॉलेजला गेलो.

यथावकाश मी अमळनेरला पोचलो. त्यावेळी असहकाराच्या आंदोलनाला खूप जोर चढला होता. दररोज शेकडो स्वयंसेवक तुरुंगात डांबले जात होते. कुणा ना कुणा थोर देशभक्ताला अटक केली नाही

अनुक्रमणिका

असा एकही दिवस जात नव्हता. राष्ट्रभक्तीच्या भावनेची लाट साऱ्या भारतभर पसल्यासारखी दिसत होती. स्वार्थत्यागाने खूप उच्च पातळी गाठली. जालियनवाला हत्याकांड, आणि रौलटॲक्ट यामुळे लोकांची मने भडकली. त्याचा संताप वाढत चालला. खलीफांच्या अपमानाने मुसलमानांच्या भावना दुखविल्या गेल्या. तो अपमान गिळणे त्यांना असह्य झाले. महात्मा गांधींनी लढ्याचे रणशिंग फुंकले. त्यामुळे लोकांना आपल्या खडतर कर्तव्याची जाणीव झाली. अगदी निःसंदिग्ध शब्दात महात्मा गांधींनी विचार, उच्चार व आचरणात अहिंसेच्या तत्त्वाचा अवलंब करण्याची नितांत आवश्यकता असल्याचे प्रतिपादन केले. आत्मशुद्धीकरण हा त्यांचा सिद्धांताचा गाभा होता. आपल्या 'यंग इंडिया' या मुखपत्रातून आपल्या सिद्धांताचा प्रचार करीत असत. त्या पत्राचा मी नियमित वाचक होतो. त्यातील प्रत्येक शब्द मी वाचीत असे. लेखकाची तळमळ, त्याचा उत्साह, तो प्रामाणिक सूर, आणि या सर्वांहून अधिक म्हणजे अंतःकरणाचा सरळपणा व साधेपणा इत्यादी गुण मी आत्मसात करीत होतो. त्यांच्या विचारांनी मी प्रभावित होत होतो. त्या भावना माझ्या स्वतःच्याच बनल्या. सर्व कॉलेजचे वातावरण राष्ट्रवादाच्या विचारांनी भारावून गेले. प्रत्येकजण चळवळीविषयी बोलत होता व चर्चा करीत होता. विद्यार्थ्यांच्या वादविवाद मंडळात त्याच विषयावर भाषणे झाली. मीच प्रमुख वक्ता होतो. माझे भाषण खूप जहाल झाले. सर्व मुले प्रभावित झाली. सभेच्या अध्यक्षस्थानी जे. जी. गुणे (नंतरचे स्वामी कुवलयानंद) होते. त्यांच्या मनावर तर माझ्या भाषणाचा अमिट ठसा उमटला. माझ्या भाषणातील प्रामाणिकपणाबद्दल कुणी शंका घेणे शक्य नव्हते. मी आता विद्यार्थ्यांचा पुढारी बनलो होतो. विद्यार्थ्यांसंबंधी कोणत्याही प्रश्नावर माझा सल्ला घेतला जाई. माझ्यावर त्यांचा संपूर्ण विश्वास होता. मी माझ्या योग्यतेनुसार त्यांची अधिकाधिक सेवा करीत होतो. आमची दिवसभराची कामे संपल्यानंतर प्रत्येकजण झोपत असे, त्यावेळी मी जागत बसे. डाव्या हातावर डोके डाव्या बाजूने टेकून मी माझ्या टेबलपाशी बसून माझ्या स्वतःच्या मनःस्थितीविषयी खूप खूप विचार करायचो (मी किती पापी होतो हे मला कळले. मी स्वतःला फसविले होते. मी त्या निर्मात्याला फसविले होते. एवढेच नव्हे मी त्या माझ्या मित्राला—त्या निष्पाप आत्म्याला फसविले होते). हे सारे मला असह्य व्हायचे. माझ्या हातून जे घडले त्यासाठी मी हजार वेळा पश्चाताप व्यक्त करी. मी खूप खूप रडत असे. रात्रीच्या रात्री अश्रू गाळीत बसे. "आत्मशुद्धी हाच जीवनाचा एकमेव उद्देश वाटू लागला." मला ही आत्मशुद्धी कशी साध्य व्हायची? मी खूप अंतर्मूख व्हायचो. मी सूक्ष्मपणे आत्मशोध चालविला. पश्चातापाची शक्ती खूप प्रबळ होती. पश्चातापाने सगळ्या जीवनातच क्रांती घडून आली. मला शुद्ध आणि निष्पाप बनले पाहिजे. शुद्धता, स्फटिकासारखी शुद्धता, शुद्धतेची निरागसता. अंतःकरणाला तोच एक शब्द लागू होऊ शकतो. ती शुद्धता आत्मसात करण्याचा मी जीव तोडून प्रयत्न केला. माझ्या टेबलपाशी बसलो म्हणजे माझ्या मनःश्चक्षूला पहिले दर्शन घडायचे ते दूर असलेल्या माझ्या मित्राच्या कृश आकृतीचे. तो माझ्यावर रागावला होता. त्याला माझी सर्व पापकृत्ये व उद्दिष्टे कळली होती. त्यानी मला एका ओळीचे पत्रही पाठविले नाही. त्यानी केले ते योग्यच होते हे मी जाणत होतो. वर सांगितल्याप्रमाणे मी माझ्या टेबलासमोर बसलो. माझ्या भावना पूर्णपणे व्यक्त केल्या. स्वतः लबाड, ढोंगी आणि मोकाट झालो.

मी लिहू लागलो. माझ्या भावनांची नोंद करू लागलो. मी गतकाळ आठवू लागलो आणि मला पश्चाताप होऊ लागला. पुन्हा पुन्हा रडू लागलो. शुद्धतेशिवाय आता तरुणोपाय नाही असे वाटू लागले. नंतर त्या महात्म्यांचे प्रेमळ व प्रामाणिक अंतःकरण मी पाहू शकलो. अश्रूपूर्ण नेत्रांनी मी सारखा विचार करू लागलो आणि त्या महात्म्याचा योग्य असा अनुयायी बनण्याची आशा बाळगू लागलो. भारत मातेचे प्रेम माझ्या नसानसातून वाहू लागले. अन् मी तासन्तास रडत असे.

अनुक्रमणिका

एका रात्री असाच मी अंतर्मुख होऊन विचारमग्न स्थितीत असताना मानसशास्त्राचे प्राध्यापक खोलीत आले. ते माझ्या पाठीमागे जवळजवळ सहा तास उभे होते. मला त्याची कल्पनाच नव्हती. तितका वेळ मी सारखा रडतच होतो. अरुणोदयाचा समय होता. त्यांनी माझ्या खांद्याला स्पर्श केला आणि अगदी हलक्या आवाजातच बोलू लागले. "बाबा, ऊठ, तुला रडायला काय झाले?" तरी मी भानावर आलो नाही. ते पुन्हा जरा मोठ्याने बोलले. तेव्हां कुठे मी भानावर आलो. त्यांना पाहाताच मी दचकलो आणि त्यांना काही कळू नये म्हणून मी माझे लेखन ड्रॉवरमध्ये ठेवले. त्याला अगदी काळजीपूर्वक कुलुप लावले आणि आनंदाचे नाटक करीत त्यांच्याबरोबर खोलीच्या बाहेर पडलो. त्यांनी पुन्हा विचारले. त्यावेळी देशाची सेवा मला उत्तम रीतीने कशी करता येईल याविषयी मी विचार करीत होतो असे त्यांना सांगितले.

मी दररोज दैनंदिनी लिहित होतो. प्रथम ज्या योगे माझे इतके पतन झाले अशा माझ्या जीवनात पूर्वी घडलेल्या घटना आठवून अत्यंत प्रामाणिकपणे मी पश्चाताप व्यक्त करीत असे. मग मी अंतर्मुख होऊन त्या दिवशी मनात आलेला विचार व घडलेल्या कृती आठवून त्यांचे विश्लेषण करीत असे. मी पापी विचारांचा, उच्चारांचा व आचाराचा हिशोब करीत असे. दिवसभर मी माझ्या स्वतःवर अगदी काळजीपूर्वक नजर ठेवीत असे. त्या सगळ्यांची दैनंदिनीत नोंद करीत असे. नंतर भारतमातेविषयीच्या भक्तीच्या भावना त्याही मी कागदावर टिपून ठेवी आणि शेवटी अंतःकरणाची शुद्धता व आत्मसर्मपणाच्या भावनेचीही मी गांभीर्याने नोंद करीत असे. चार वर्षांपर्यंत हा क्रम मी चालविला. त्या नोंदी आता माझ्याजवळ नाहीत. १९२७ मध्ये पुणे येथील प्रदीर्घ काळ चाललेल्या माझ्या आजारपणात ते सारे लिखाण जाळून टाकण्यात आले.

* * *

माझ्या मित्राकडून मला एकही पत्र आले नसल्याचे मी यापूर्वी सांगितले आहे. प्रदीर्घकाळ चालत आलेल्या त्यांच्या मौनाचे कारण मला कळत होते. त्यामुळे माझ्या अंतःकरणाला खूप वेदना होत. दररोज मी टपालवाल्याची वाट पाहात असे. पण माझी निराशा होई. त्याच्याकडून काही निरोप कळण्याची माझी सगळी आशा नष्ट झाली. माझे सगळे जीवनच हादरले. मला झोप येईना. मी ना अभ्यास करू शकत होतो ना कोणाशी बोलू शकत होतो. आयुष्याविषयी काळजी वाटू लागली आणि जीवनाचा उबग येऊ लागला. तथापि आपल्या जीवनाचा मी अंत करून घेऊ इच्छित नव्हतो. सरतेशेवटी माझ्या मित्रापुढे मी माझे सगळे अंतःकरण मोकळे करण्याचा निर्धार केला. संक्रातीपूर्वी दहा दिवस आधी एका रात्री मी हातात लेखणी घेतली, कागद घेतला आणि लिहायला आरंभ केला. मी किती पापी आहे सांगून त्या घड्याळाचे सगळे प्रकरण खऱ्या तपशीलासह त्याला कळविले. हे सगळे अगदी भावपूर्ण हृदय हलवून सोडणाऱ्या भाषेत मी लिहिले. या दुष्ट अंतःकरणाने त्याच्यावर किती प्रेम केले हे लिहिले त्याची क्षमा मागून एक ना एक दिवस मी पूर्ण शुद्ध होऊन त्याच्या मैत्रीच्या योग्य होईन असा निर्धार केला. तोपर्यंत मी त्याला भेटणार नव्हतो. या जन्मात त्याची भेट झाली नाही तरी निदान पुढच्या जन्मी तरी मी त्याची भेट घेईन असे कळविले. अशा रीतीने ते पत्र माझ्या जीवनाला कलाटणी देणारा बिंदू ठरला.

* * *

अज्ञात अशा मार्गांनी निसर्गाचे कार्य चालले असते. अंतःकरणातील आंतरिक शक्ती ही माणसाच्या आकलनापलीकडची असते. तो अदृश्य हात सदैव जागरूक असतो. त्याच रात्री त्यावेळी तो मित्र सुद्धा

अनुक्रमणिका

आपल्या खोलीत जागत बसला होता आणि माझ्याबरोबर केलेल्या कठोर वर्तनाबद्दल तो सारखा रडत बसला होता. अशा दोन रात्री त्यांनी काढल्या. तिसऱ्या दिवशी दुपारी तो मला पत्र लिहिणार होता त्याचवेळी माझे पत्र त्याच्या हाती पडले. किती उत्सुकतेने त्याने ते उघडले. ते वाचत असताना त्याचे डोळे अश्रूंनी किती भरून आले होते आणि किती प्रेमळपणाने त्यानी मला लिहिले या सगळ्या गोष्टींचे वर्णन मी करू शकत नाही. मला संक्रातीच्या दिवशी त्याचे उत्तर मिळाले एवढे सांगितले तर पुरे. त्या पत्रात त्यानी लिहिले होते की, ही आपल्या जीवनातील खरी संक्रात (संक्रमण) आहे. त्या दिवसापासून मी अगदी शुद्ध जीवन जगत आलो आहे.

अत्यंत गरीबीमुळे विद्यार्थीदशेत फार खडतर जीवन मला जगावे लागले. माझ्या पालकाची परिस्थिती बरी होती. तरी पण माझ्या शिक्षणाचा भार ते उचलू शकत नव्हते. माझे वडीलभाऊ कसे-बसे स्वतःपुरते पाहून घेत होते. मी नेहमी निःशुल्क विद्यार्थी होतो. हायस्कूलच्या वर्गात एक पोऱ्या असताना कधी कधी शाळेच्या वसतीगृहात भोजनालयात एक पोऱ्या म्हणून काम करून माझे पोट भरून घ्यावे लागे. कॉलेजातील माझ्या पहिल्या प्रवेशाचा प्रसंग मला आठवतो. त्यावेळी माझे खिशात रुपये ५-६ आणे ऐवढी मोठी रक्कम होती. कॉलेजच्या ग्रंथालयात दररोज तीन तास मी काम करीत असे. त्यासाठी मला १५ रु. मिळत असत. माझ्या बंधूंच्याकडून मला १० रु. येत. बाकीचे पैसे माझ्या खोलीत राहाणारा मित्र केवळ माझ्यावरील प्रेमामुळे देत असे. पहिले वर्ष अशा रीतीने गेले. वर्षाच्या शेवटी माझ्या खात्यावर ६० रु. बाकी निघाली. उन्हाळ्याच्या सुटीत कॉलेजचे आवार सोडून सोलापुरास जाण्यापूर्वी सोलापुरच्या दोन प्रतिष्ठित गृहस्थांची हमीपत्रे दाखल करावी लागली. ही बाकी फेडण्यासाठी मी दोन महिने काम केले. मला दुसरे वर्ष तर याहून बिकट गेले. माझ्यासाठी पालकांना यापुढे काही खर्च करणे शक्य नव्हते. आमच्यात तसे रक्ताचे संबंध असल्यासारखे नव्हते. माझ्या प्रगतीविषयी त्यांना अभिमान वाटत असला तरी माझ्यावर त्यांचे प्रेम नव्हते. माझ्या वरिष्ठांशी मागल्या वर्षी काही बाबतीत विरोध केला म्हणून माझ्या फी माफीत अर्ध्यावर कपात करण्यात आली. माझ्या वडिलांकडून मला दहा रुपये मिळत. मी वसतीगृह सोडून दिले आणि तेथील भोजनगृहही सोडले. दोन मैल दूर असलेल्या एका शेतातील अर्धवट पडलेल्या एका बंगल्यात मी राहायला गेलो. मी तेथे एकटाच होतो. एक शेत, तेथील विहीर व तेथील गुरेढोरे एवढ्याचीच काय ती मला साथ होती. मी एका गुजराथी बाईकडे जेवायला जात असे. तेथे प्रत्येक वेळी त्या बाई मला दोन भाकऱ्या व थोडेसे वरण किंवा भाजी देत असत. त्यासाठी माझ्याकडून दोन रुपये घेत असत. माझ्या जीवनातील ते दिवस अत्यंत सुखाचे होते. मी एखाद्या संन्याशासारखा एकांतात वेळ घालवीत असे. मला नेसायला धोतर नव्हते. एक फाटका शर्ट होता तोही इतका फाटका की तो वापरण्यासारखाही नव्हता. माझी एक निकर होती. कुणीतरी मला लेखनसाहित्य पुरविले. इतक्या अडचणी असताना सुद्धा माझी प्रकृती अनपेक्षितपणे सुंदर होती. माझ्या चेहऱ्यावर लालसर रंगछटा पसरली होती. आणि चेहऱ्यावर लक्षणीय असे तेज झळकू लागले होते. अत्यंत गरिबीत सुद्धा माझ्या चेहऱ्यावरील चकाकी पाहून प्राचार्यांना आश्चर्य वाटलेले पाहून मलाही खूप आश्चर्य वाटले. माझ्या दैनंदिनीतील एखादे पान जरी त्यांनी उघडून पाहिले असते तरी त्यांना याचे कारण सापडले असते. अंतःकरणाची खरीखुरी शुद्धता कपाळावर स्वतःच प्रकट होते. मनाला असीम समाधान लाभत होते. मी सदा शांत, प्रसन्न, आंनदी आणि विचारमग्न असे. माझे स्वतःचे व्यक्तिमत्व वाढत होते. मी खूप खूप विकसित होत होतो. माझ्या निर्मलतेविषयीच्या विचारात मी माझा वेळ घालवीत होतो. सेवक संघात माझा प्रवेश होईपर्यंतच्या माझ्या उर्वरित जीवनासंबंधी थोडक्यात सांगतो. टिळक विद्यापिठातून मी इ. स. १९२५ मध्ये पदवीधर झालो. एकूण गुणांपैकी शेकडा ७६% गुण मिळवून मी पहिला आलो होतो. दोन वर्षांकरिता माझी "फेलो" म्हणून नियुक्ती झाली होती. त्या काळात मी एम. ए. साठी एक प्रबंध लिहिला. सर्व्हंट्स ऑफ इंडिया सोसायटीत (भारत सेवक समाज) प्रविष्ट

झालो. श्री. ना. म. जोशी यांचा सहाय्यक बनलो. त्यांनी मला सेवा वृत्तीचे व कठीण परिश्रमाचे उत्कृष्ट प्रशिक्षण दिले. नंतर माझे आजारपण झाले. त्यातून उठलो. नऊ महिने सोलापुरी विश्रांती घेतली. अन् ९ जून १९२९ ला मी हिप्परगे येथे जाऊन बसलो.

* * *

थोडक्यात सांगायचे तर मला उच्च प्रतीचा आध्यात्मिक वारसा मी आईच्या गर्भात असतानाच माझ्या वडिलांकडून मिळाला होता. जणू जन्माला यायच्या काळाचीच तो वाट पाहात होता. प्रेमावरची स्वार्थरहित निष्ठा माझ्या नसानसातून वाहात होती. याचे श्रेय माझ्या मित्रालाच जाते. अंतःकरणाचा सूक्ष्म शोध घेतल्यामुळे मी कुठल्याही निर्मल वस्तूसारखा निर्मल झालो होतो. दारिद्र्य माझा छंद बनला. सतत कार्यमग्न राहून कठीण परिश्रम करणे हाच माझ्या जीवनाचा नित्यक्रमच बनला होता. परित्याग ही सहज प्रवृत्ती बनली. प्रामाणिकपणा वादातीत होता. मी श्रेष्ठ प्रतीचा संघटक होतो. मी वक्ताही होतो. कित्येक हजारो श्रोत्यांसमोर मी यशस्वीपणे भाषण करू शकत होतो. माझ्या आयुष्यातील एकही क्षण मी वाया दवडला नव्हता. माझ्या एकाकी जीवनाचा मला लाभ झाला. मला एकांत फार आवडायचा. मी नेहमी विचारमग्न असे. मी भिडस्त स्वभावाचा होतो. माझ्या स्वतःच्या गुणाविषयी मी कधी बोलत नव्हतो. आजमितीस सुद्धा तोच माझा प्रमुख गुण. तो माझ्यात इतका मुरला आहे की, चर्चेच्या विषयासंबंधी मला काहीच कळत नाही असे लोक समजतात. त्याचे कारण मी या वा त्या बाजूने कोणतीच क्रिया करीत नाही. दैवी प्रेम, स्फटिकासारखी निर्मलता, कठोर आत्मसंयमन, मुक्त सेवाभाव, आणि माझ्या स्वतःपुरती कडक शिस्त—हिप्परग्याला आल्यावेळी श्री. व्यं. भ. खेडगीकर असा होतो.

* * *

दिसायला ही गोष्ट चमत्कारिक वाटली तरी हे खरे की, ती संस्था पहिल्यांदाच पाहाताक्षणी, मी तिच्यावर भाळून गेलो. ती संस्था मी माझीच करून टाकली. मी लगेच सुपरिटेंडेंटाना सांगून टाकले की, मी संस्थेची अंतर्गत व्यवस्था पाहून घेतो आणि त्यांनी संपूर्णपणे बाहेरच्या प्रचाराकडे पाहावे

* * *

तेथील वातावरणात मला थोडीशी शिथीलता आढळली. मी प्रत्येक गोष्टीचे सूक्ष्म निरीक्षण करीत होतो आणि जास्तीत जास्त तपासणी करीत होतो. मला विद्यार्थ्यांचे आकर्षण वाटायचे, त्यांचा निरागस आनंद मला नेहमी हवासा वाटे. कामगारात काम करीत असताना सुद्धा मी स्वतःचा राहात नव्हतो. माझे काहीतरी हरविले आहे असे वाटायचे. बालकांच्या त्या मधुर अनुबंधाने त्या उमलत्या फुलांच्या नुसत्या दर्शनाने माझे अंतःकरण जिंकून घेतले होते. परिस्थिती अनुकूल राहिली तर कायमचे इथेच राहण्याचा मी निर्णय घेतला. ती संस्था खऱ्या अर्थाने राष्ट्रीय स्वरूपाची होती हे मी जाणले होते. यापूर्वी त्या संस्थेशी बरोबरी करणारी संस्था मी पाहिली नव्हती. तेथे प्रामाणिकपणा होता. तेथे मी स्वतः उत्तम रीतीने सेवा करू शकेन असे मला वाटले. मला नावाची किंवा प्रसिद्धीची कधीच अभिलाशा नव्हती. माझ्या उर्वरित आयुष्यासाठी मला एक निवांत स्थळ हवे होते. ते मला येथे मिळाले.

अनुक्रमणिका

भारतमातेच्या प्रेमाने माझे अतःकरण स्फुरत होते. आजसुद्धा मातृभूमीच्या विचाराने माझ्या गालावरून अश्रुधारा वाहातात. मला तिच्याभोवती आकर्षक असे दृश्य दिसते. मला राष्ट्रभक्त बनविण्यात महात्माजींनी मोठी भूमिका पार पाडली होती. त्या दिवशी महात्माजींचा वाढदिवस होता. माझ्या सांगण्यावरून मुलांनी उपवास केला होता. मुलांशी व्यक्तीशः व सामुदायिकपणे बोलायचे मी आधीच ठरविले होते. सकाळपासूनच मी एका एका विद्यार्थ्याला भेटलो आणि तो सर्व दृष्टींनी शुद्ध आहे का? नसेल तर ती शुद्धता प्राप्त करून घेण्यासाठी तो काय करू इच्छितो असा प्रश्न मी त्याला विचारला. आत्मशोधाची सवय लागून घेण्यास त्याना मी सांगितले पण तेवढ्याने माझे समाधान झाले नाही. त्यावेळी सुपरिटेंडेंट तेथे नव्हते पण त्यांनी माझे विचार ऐकण्यासाठी माझ्याकडे ते पाठविणार असलेल्या काही निवडक मुलांशी मी बोलावे असे त्यांनी सांगितले होते.

दुपारची वेळ होती. महंत माझ्याकडे आले (ते नाव मला नंतर कळले) त्यांच्याबरोबर मी मागोमाग जावे असे त्यानी सांगितले. जवळच असलेल्या ओढ्यापाशी आम्ही गेलो. दोन आंब्यांची झाडे मी पाहिली. मी ओढ्यात उतरलो. तेथे जवळजवळ ३० मुले होती. ते आपले पाय धूत होती. मीही पाय धुतले. महंतांनी मग मला औदुंबरच्या झाडाजवळ नेले. ते मोठे पवित्र स्थळ असून मधूनमधून ते त्या ठिकाणी येत असल्याचे त्यांनी सांगितले. मी अत्यंत नम्रतेने माझे मस्तक नमविले व अत्यंत आदराने साष्टांग नमस्कार घातला. मी तेथे बसून बोलेन का असे त्यांनी मला विचारले. ती जागा घाणेरडी होती, आणि आंब्याच्या झाडाखाली बसणे मी पसंत केले. मुले डावीकडे व उजवीकडे दोन रांगा करून बसली. त्या दिवशी मी विचारात पूर्णपणे गढून गेलो होतो. मी त्यांच्यासमोर एक तासाहून अधिक वेळ बोललो व कोणताही संकोच न बाळगता माझे अंतःकरण त्यांच्यासमोर उघडे केले. त्या उच्चमनाच्या व्यक्तीवर मी काय परिणाम करू शकलो हे मी सांगू शकत नाही. पण मला जे जाणवले ते असे की, माझ्या अंतःकरणाच्या प्रामाणिकपणाविषयी त्यांची खात्री झाली होती व माझा दृष्टिकोण स्वीकारण्याची त्यांची तयारी दिसली. आपल्या अंतःकरणातील व्यवहारावर अगदी कडक नजर ठेवून ते पूर्णपणे शुद्ध ठेवण्याची मी त्यांना विनंती केली. कारण आपल्या अंतःकरणातील सर्व घाणीचे विरेचन केल्याशिवाय आपल्या हातून कोणतेही सेवा कार्य होणे शक्य नसते. माझे भाषण संपल्यानंतर त्यांच्या रीतीप्रमाणे ते माझ्याकडे आले. माझ्या पाया पडून ते माझे दर्शन घेऊ इच्छित होते. मात्र स्वतःला मी तितक्या मोठ्या योग्यतेचा समजत नव्हतो. त्यामुळे मी कुणालाही माझ्या पायाला स्पर्श करू देत नव्हतो. माझ्या पायाला स्पर्श करण्याची त्यांची इच्छा पाहून मी बाजूला पळालो व हात जोडून अगदी विनम्रपणे त्यांनी माझे दर्शन न घेता काकांचे दर्शन घ्यावे अशी विनंती केली (त्यांचे आवडते नाव) मी अजूनही एक अज्ञानी बाळ आहे आणि मला अद्यापी पुष्कळ गोष्टी शिकायच्या आहेत.

* * *

माझ्या जीवनाची दोन मार्गदर्शक तत्त्वे आहेत. विकासाच्या या टप्प्यापर्यंत मला आणून सोडण्यात ती दोन तत्त्वे खूप उपयोगी पडली. वाचकांना ती तत्त्वे तितकीच लाभदायक ठरतील की नाही हे मी सांगू शकत नाही. पण मला त्यांचा खूपच लाभ झाला. पहिली गोष्ट म्हणजे माझा ज्या गोष्टीशी कसलाच संबंध नसतो त्या गोष्टीत मी कधीच लक्ष घालीत नाही. माझ्या कक्षेबाहेरच्या गोष्टीची मी कधीच चिंता बाळगत नाही. 'हस्तक्षेप नको' हे माझ्या वागण्याचे आवश्यक असे सूत्र आहे. म्हणून माझ्या भावना पूर्वग्रहमुक्त असतात. मी जी गोष्ट पूर्णपणे पाहिली नाही त्या गोष्टीविषयी मी एकाच बाजूने विचार करू शकत नाही. दुसरी गोष्ट म्हणजे मी जगाचा व जगरहाटीचा कधीच विरोध केला नाही. मी शाब्दिक संघर्षात कधीच पडलो नाही. जगाला मी नेहमी त्याच्या मार्गानेच जाऊ देतो आणि मी माझ्या मार्गानेच जातो. माझ्या दृढ

अनुक्रमणिका

श्रद्धा जगाला पटवून देण्याचा मी कधीच प्रयत्न केला नाही. मी माझ्या अंतःकरणाला पटलेली तत्त्वे पूर्ण एकाकीपणे माझ्यापुरती मी पाळली आहेत. आणि जेव्हा कोणी मला प्रश्न विचारले तेव्हा मी मौन पाळले आहे. मी कधीच चर्चा, वादविवादाच्या फंदात पडत नाही. अंतःकरणाची सचोटी, उद्दिष्टाचा प्रामाणिकपणा आणि भक्तीच्या बळावरच शुष्क तर्कशास्त्र आणि अंतःकरणातील भावना जाणून त्या इतरांना कळविण्याच्या बुद्धी सामर्थ्यापेक्षा अधिक भर देतो. माझ्या दृष्टीने बुद्धी ही दुर्लक्ष करण्याइतकी बाब नसली तरी मी अंतःकरण अधिक मोलाचे मानतो.

* * *

त्यांची व माझी पहिली भेट सोलापूर येथे माझ्याच खोलीत झाली. त्यावेळी गिरणी कामगार संघाचा चिटणीस म्हणून मी काम करीत होतो. त्यांनी त्या शाळेच्या वार्षिक स्नेहसंम्मेलनास येण्याचे निमंत्रण दिले. कामगार पुढाऱ्याला साजेलशा औपचारिकतेने मी मान्यता दिली. कारण तेथे नेल्याशिवाय ते मला सोडणार नाहीत. याची मला पूर्ण जाणीव होती. दोन अपरिचित व्यक्तींमधील ती भेट होती. त्या भेटीच्या गर्भात दोघांची अपेक्षित युती दडली होती. भौतिक पातळीवर आमची भेट झाली होती. पण त्यावेळी पुढे एखाद्या दिवशी आम्ही आध्यात्मिक पातळीवर भेटू अशी स्वप्नातही कल्पना केली नव्हती.

नंतर मी त्याना अधिकाऱ्याच्या नात्याने भेटलो. ते सुपरींटेंडेंट होते व मी एक शिक्षक व पुढे मुख्याध्यापक. उद्दिष्ट व कृतीच्या बाबतीत मी स्टष्ट, कळकळीचा व प्रामाणिक होतो. ते या बाबतीत माझ्यापेक्षाही अधिक कळकळीचे व प्रामाणिक असल्यासारखे दिसले. एकटी व्यक्ती कुणाचेही साह्य नसता एतके छान काम करीत असलेली पाहून मी प्रभावित झालो. त्या व्यक्तीने अंगिकारलेल्या कार्यात स्वतःला संपूर्णपणे झोकून द्यायचा निर्णय मी त्याच क्षणी घेतला. त्यांचे कार्य हे मी माझेच म्हणून स्वीकारले आणि एखाद्या कळकळीच्या सहकाऱ्याच्या आणि मित्राच्या श्रद्धेने मी सेवेला आरंभ केला.

* * *

या ठिकाणी आंतरिक भावनांसंबंधीचा थोडासा विचार येथे नमूद करण्याजोगा आहे. आतासुद्धा माझ्या डोळ्यासमोर त्या पूर्वी इतक्याच ताज्या आहेत. मी असे ऐकले होते की, पूर्वीच्या एका मुख्याध्यापकासंबंधी प्रतिकूल शेरा मारण्यात आला होता. त्यांच्यात व सुपरींटेंडेंड मध्ये काही मतभेद निर्माण झाले होते. त्या मुख्याध्यापकांना आपल्या जागेचा राजीनामा द्यावा लागला होता. त्या दोघांमधील वैयक्तिक आकस इतक्या थराला गेला होता की, संस्थेच्या हितालाच धक्का देण्यासही त्यानी मागे-पुढे पाहिले नाही. मुख्याध्यापक पद स्वीकारण्यापूर्वीच हे प्रकरण मला माहीत झाले होते. मी स्वतःपुरती माझीच अशी एक कार्यपद्धती ठरविली. "संपूर्णपणे मतैक्य झाले तर उत्तमच; तसे झाले नाही तरी जेवढ्या बाबतीत समान विचार असतील तेवढ्यापुरते अगदी अंतःकरण ओतून काम करायचे व बाकीच्या संबंधी विचार करून तू स्वतःला त्रास करून घ्यायचा नाही." शिवाय गहन चिंतनाच्या वेळी माझे अंतःकरण शुद्ध आहे असे मला वाटते. म्हणजे माझ्यावर संस्थेच्या हिताला बाध येईल असे प्रसंग कधी आणू नकोस अशी अत्यंत भक्तीभावाने मी परमेश्वराची प्रार्थना करीत असे. दुर्दैवाने सुपरिंटेंडेंट आणि माझ्यामध्ये दुरावा निर्माण झालाच तर मी हे ठिकाण सोडून जाईन. पण त्यांच्या तीव्र परिश्रमाला आलेल्या मधुर फळांना मी कधीच क्षती पोचविणार नाही. परमेश्वरी कृपेने माझ्यावर तसा प्रसंग कधीच आला नाही.

अनुक्रमणिका

ओघाओघाने सांगून टाकतो की इथे एक 'आध्यात्मिक गृह' होते. तो पर्यंत मी आध्यात्माविषयी काहीच जाणत नव्हतो. तरी मी निरीश्वरवादी नव्हतो. देव आहे हे मी जाणत होतो. त्याची प्राप्ती करून घेण्यासाठी, त्याला समोरासमोर भेटण्यासाठी माणसाचे अंतःकरण अगदी शुद्ध असायला हवे. जास्तीत जास्त मी एवढे जाणत होतो की, अंतःकरणाचे पूर्ण समाधान लाभण्याकरिता माणसाने संपूर्णपणे दुसऱ्याच्या सेवेला वाहून घ्यावे. मातृभूमीची सेवा मला आध्यात्मिक सुखाच्या आगारात घेऊन जाईल. अशा अंधविश्वासाने मी १९२६ मध्ये सेवा कार्याला आरंभ केला. मी रामतीर्थांचे ग्रंथ वाचले होते. स्वामी विवेकानंदाविषयी मला काही माहिती होती. दासबोधाचे मी वाचन केले होते. आणि साधुसंतांच्याबद्दल खूप ऐकले होते. स्वामी कुवलयानंदांचे कडक ब्रम्हचर्य मी पाहिले होते. आजन्म ब्रम्हचारी राहाण्यासाठी मी काय करावे असे मी त्यांना विचारले होते. त्यावेळी अशा माणसाने शक्य तितक्या लवकर विवाहित व्हावे असे त्यानी उत्तर दिले होते. याला जर आध्यात्म म्हणता आले तर मला एवढेच आध्यात्म माहीत होते. अंतःकरणाची शुद्धता, निर्व्याज प्रेम, एकांतप्रियता, सेवेविषयी आसक्ती आणि याहून अधिक म्हणजे शिकण्याची इच्छा एवढ्या सिद्धतेसह मी उभा होतो. आत्म्याचा मला कधीच अनुभव नव्हता. खरेतर आतापर्यंत ते जाणून घेण्याच्या भानगडीत पडलो नाही. मी चुकीच्या मार्गाने जात नव्हतो एवढे मी जाणत होतो. आणि तेवढे मला पुरेसे होते. मी माझे एक अवयवही हलविले नाही, किंवा एक शब्दही बोललो नाही. परंतु वारा जसा वाहील तसा भरकटत राहिलो.

* * *

मी उच्च महत्त्वाकांक्षा बाळगणारा मनुष्य आहे. माझ्याशी कुणी बरोबरी केलेली मला सहन होत नाही. भौतिक तसेच आध्यात्मिक क्रीडांगणावर माझ्या कोणाही प्रतिस्पर्ध्याला मागे टाकण्याचा मी आटोकाट प्रयत्न करू इच्छितो. तो माझा प्रकृतीधर्म आहे. कधीच मी पराभव स्वीकारला नाही. मी कधीच इतरांच्या अधीन राहिलो नाही. मी कधीच आज्ञा पाळली नाही. उलट माझीच आज्ञा नेहमी पाळली गेली. केवळ अंतःकरणाच्या शुद्धतेच्या बळावर. शाळकरी मुलगा असताना असो वा कुटुंबातील एक घटक म्हणून असो, व पुढे सार्वजनिक कार्यकर्ता म्हणून असो, माझे इतरांच्यावर वर्चस्व राहात आले. सद्‌गुणासाठी चाललेल्या व्यापक शर्यतीत माझा नेहमी पहिला क्रमांक राहात आला आहे आणि आज सुद्धा मी मागे पडणार नाही. तो माझा स्वभाव आहे. इथे मात्र मी अगदी लीन झालो, इतका की सगळ्यात विनम्र प्राणी सुद्धा माझ्या पेक्षा मला खूप उच्च दर्जाचा वाटतो. आध्यात्मिक विकासाला आवश्यक असलेल्या एखाद्या सिद्धीमध्ये जेव्हा एखादा संघ माझ्या पेक्षा थोडासा सुद्धा वरचढ आहे असे मला आढळून येते तेव्हा मी पूर्णपणे अस्वस्थ होतो. मी जर चुकत असेन तर मी सुधारण्यास तयार आहे.

इथे जे आध्यात्मिक शिक्षण दिले जाते त्याला विरोध करणाऱ्या व्यक्तींचा एक गट येथे असल्याचे मी ऐकले. मला त्यांची माहिती नव्हती. तसेच तेथे दिले जात असलेल्या प्रशिक्षणाविषयीही मला काही कल्पना नव्हती. प्राचीन युगातील ऋषी मुनींनी, द्रष्ट्यांनी केलेले परिश्रम वाया जात असताना, आणि त्यांची वचने ही अरण्यरुदन ठरली जात असताना अशा प्रकारच्या प्रशिक्षणाला आमूलाग्र विरोध करण्याचे धैर्य या मंडळीना कसे होत असेल याचे मला फार आश्चर्य वाटले. लोकांच्या आध्यात्मिक साधनेला व प्रशिक्षणाला विरोध करीत त्यांच्या प्रगतीस खीळ घालणे हा शुद्ध वेडेपणा आहे असे मला वाटले. मी त्या कृत्यात कधीच सहभागी होणार नाही. मी स्वतःलाच म्हणालो "बाबा उठ, त्यांच्यात सामील होता येते का पाहा; नसता स्वस्थ बैस. त्यांच्यात आणि त्यांच्या संकल्पित ध्येयाच्या आड येणे हे महान पाप आहे." मला येथे एक सुखाचा निवारा मिळाला म्हणून मी सारखा स्वतःला त्रिवार धन्य समजत होतो.

अनुक्रमणिका

* * *

सहा महिने गेले. मध्यंतरात आध्यात्मिक वर्गापासून मी दूर राहू शकलो नाही. वस्तुतः त्या वर्गाशी माझा सूर अधिकाधिक जुळत चालला होता. मी पुष्कळ वेळा तेथील भक्तांना भेटत असे. मी त्यांच्या दैनंदिनी वाचून काढल्या. मी त्यातील प्रत्येक शब्द वाचला. त्या डायऱ्यातील भाव जाणला. मी त्याच्यावर विचार केला. त्याच्यावर मनन केले व तो आत्मसात केला. कुण्या ना कुण्या उदात्त व्यक्तीची दैनंदिनी हातात घेऊन वाचण्यात. त्या वाचून त्यावर सखोल चिंतन करण्यात व शब्दांचा गर्भितार्थ समजून घेण्यात मी रात्रीच्या रात्री घालविल्या.

संघाविषयी मी अगदी भक्तिभावनेने माहिती करून घेत होतो. भक्त मंडळी त्यांच्या इष्ट देवतेची भजने अगदी उत्कटतेने म्हणत असलेली मी पाहिली आहेत. ती भजने ऐकली आहेत. त्यावेळी त्यांच्या गुलाबी गालावरून मोत्यासारखे अश्रूबिंदू ओघळत असताना मी पाहिले आहे. जेव्हा एखादा भक्त भजनासाठी बाहेर पडे त्यावेळी मी हळूच माझ्या अंथरुणातून उठून त्याला नकळत त्याच्या मागे मागे जात असे आणि दूर अंतरावरून त्याचे भजन ऐकत असे. संघातील शुद्धता, तेथील प्रेमभक्ती आणि आध्यात्मिक विकासाची उच्च पातळी पाहून मी अगदी गोंधळून जात असे. थोड्यावेळापुरता मी स्तंभित होऊन जात असे.

पुष्कळ संघीयांच्या मी जणू प्रेमात पडलो होतो. एक दोघांबरोबर मी अधिक जवळीक साधली होती. एखाद्या नवख्या व्यक्तीला आक्षेपार्ह वाटण्या इतकी ती जवळीक होती. तथापि आम्ही अगदी शुद्ध होतो. मी सर्व संघीयांच्या बरोबर एकदा माणिक प्रभूंच्या दर्शनाला माणिकनगरला गेलो होतो. माझा अद्यापि महाराजांना परिचय करून देण्यात आला नव्हता. तेथे भजन झाले. मी व बंधु परांजपे (परांजपे यांना युवराज असे नाव प्राप्त झाले होते.) बाहेर आलो. संस्थेविषयी बोललो. संस्थेत ते आजन्म राहू शकतील का असेही बोलणे झाले त्यांनी जवळजवळ संमती दिली. मी परत आलो. आणि नेहमीप्रमाणे मी डायऱ्या वाचू लागलो. परमात्म्याच्या विरहाचे नव्हे तर मातेच्या विरहाचे दुःखच त्या डायऱ्यातून अधिक व्यक्त झाले होते. त्यांनी माझे अंतःकरण जिंकले होते. त्या व्यक्तीचा विशेष उल्लेख मी पुढे केव्हातरी करेन. त्या भक्तांपैकीच मी व्हावे असे मला फार वाटायचे. ते तसे होण्यास काही अडचण नसावी असे मला वाटले. “विद्यार्थी हो म्हणजे पुरे” मी स्वतःशीच बोललो. माझ्या दृष्टीने ती गोष्ट फार सुलभ होती. एका क्षणाच्या सूचनेने मी माझे सारे मोठेपण विसरू शकलो होतो. मी तसे केले आणि मी यशस्वी झालो.

माझ्या नैतिक चारित्र्याविषयी शंका घेतली जात असल्याची कुणी तरी कुजबुज केली. संघातील महानुभाव माझ्या शुद्धतेबद्दल व अंतःकरणाच्या पावित्र्याबद्दल संशय घेऊ लागले आणि त्यांना माझ्याविषयी तिटकारा वाटू लागला. माझ्याविषयी असे आक्षेप ऐकण्यापेक्षा मरण बरे असे मला वाटू लागले. मी अगदी निर्दोष होतो. हे मी जाणत होतो. पण त्या मंडळींना हे कसे पटवून द्यायचे? मी अयशस्वी ठरलो. त्याबाबतीत इच्छेनुसार जे चालले होते ते चालू दिले. एक ना एक दिवस मळभ नाहीसे होईल यावर माझा अटळ विश्वास असल्यामुळे मी त्यात ढवळाढवळ करण्याचा कधीच प्रयत्न केला नाही.

मी सारखा विचार करीत होतो. मी नेहमी चौकशी करीत राहिलो. समस्याचा परिहार शोधण्याचा प्रयत्न करीत राहिलो. मला काहीच कळेना. कधी ते सांगत, कधी सांगत नव्हते. माझे अंतःकरण अगदी प्रक्षुब्ध झाले. अतःकरणात वादळ, प्रचंड तूफान निर्माण झाले. अंतःकरण इकडून तिकडे हेलकावे खाऊ

अनुक्रमणिका

लागले. मन छिन्न विछिन्न झाले. एका मागून एक सतत येणाऱ्या विचारांनी मनात एकच गर्दी केली. अज्ञात गोष्टींची मनाला हुरहुर लागली. माझ्या जीवनात कधीच न जाणवलेली मानसिक घालमेल मी अनुभवू लागलो. मी माझ्या सर्व जबाबदाऱ्या पार पाडीत होतो. संस्थेचा प्रमुख म्हणून माझे कर्तव्य करीत होतो. आपले अंतःकरण मोकळे करण्यास माझा कोणी सांगाती नसल्यामुळे मी माझ्या मनातील प्रक्षोभाविषयी कुणापुढे वाच्यता केली नाही. मी पूर्णपणे अस्वस्थ झालो होतो. मला काहीतरी हवे होते असे वाटे पण नक्की काय हे सांगता येत नव्हते. मला कशाची तरी ओढ लागली होती. ती वस्तू इथेच असली पाहिजे असे मला वाटले. आंतरिकपणे ती येथे असावी अशी मी मनातल्या मनात इच्छा बाळगून राहिलो.

* * *

मी धडपडलोच धडपडलो, भावना शांत करण्याचा प्रयत्न केला. पण छे! भावनांनी पूर्णपणे माझ्यावर मात केली होती. एका डायरीतून मिळालेल्या एका आकर्षक विचाराने मी भाळून गेलो होतो. खूप मोठी किंमत दिल्यानंतर त्या गोष्टीची प्राप्ती होते असे मी वाचले होते. प्राणाचेही मोल द्यावे लागते. मी स्वतःला म्हणालो. "मी आधीच ही किंमत दिली आहे. माझ्याजवळ आता शिल्लक नाही." केव्हा आणि कुठे मी हिशोब पूर्ण केला हे मला आठवत नाही. पण खर्चाच्या बाजूला काहीच नव्हते. असे माझा आतला आवाज मला सांगत होता. मी माझी किंमत देऊन टाकली आहे आणि माझा हक्क तू हिरावून घेऊ शकत नाहीस असे मी स्वतःला म्हणालो.

सरतेशेवटी संक्रातीचा तो संस्मरणीय दिवस उजाडला. दुपार होण्यापूर्वीच ते आले. जेवण झाल्यानंतर ते भजन म्हणतील असे मी ऐकले होते. भक्तांना झोपडीकडे एकामागून एक धावत जात असताना मी पाहिले. तो भजनाचा तास होता हे मला माहीत होते. मी माझ्या पथारीवर पहूडलो होतो. आपणही तेथे असायला पाहिजे असे मला वाटत होते. मी स्वतःला अडविण्याचा प्रयत्न करू लागलो. पण मी तसे करू शकलो नाही. मी कागद आणि लेखणी घेतली आणि काही ओळी लिहून मला भजन ऐकण्याची इच्छा आहे. माझा जर त्रास होणार नसेल तर मला तेथे येण्याची परवानगी द्यावी अशी विनंती केली. एका संधियाकडून ती चिठ्ठी मी पाठविली. एक तास संपला उत्तर आले नाही. मी खूप खूप वाट पाहिली पण व्यर्थ. भजनाला जाण्याची परवानगी मिळण्याची माझी सर्व आशा नष्ट झाली. माझ्या अशुद्धतेबद्दल त्यांची खात्री झाली असली पाहिजे; म्हणूनच त्यांच्या भक्तापासून ते मला दूर ठेवत असले पाहिजेत. अशी मी क्ल्पना केली. मी खूप खूप रडलो आणि त्या शुद्ध महानुभावांबरोबर राहाण्यास अपात्र ठरण्याइतका मी महान पापी आहे. असे मी समजलो. कदाचित मी एक मोठा मनुष्य होतो आणि सामाजिक शिष्टाचार आमच्यामध्ये आडवा आला असेल. शाळेचा मुख्याध्यापक होण्याऐवजी एक विद्यार्थी असतो तर बरे झाले असते. असे वाटू लागले. माझ्याइतके दुर्दैवी कुणीच नव्हते मी जर त्यांचा होऊ शकत नाही तर मी ते ठिकाण सोडून जायला हवे. उदात्तवृत्तीच्या व्यक्तीकडून तुच्छ लेखले जाऊन इथे राहाण्यात अर्थ नाही असे वाटू लागले.

मी झोपडी सोडून थोडा विरंगुळा मिळेल तर पाहावे या उद्देशाने व त्यांनी शक्य तितक्या लवकर मला मुक्त केल्यानंतर तेथून कायमचे निघून जाण्याचा निर्णय त्यांना शेवटी कळविण्याचे ठरवून मी एकटाच एका एकांत ठिकाणी गेलो. आता मी केवळ शुद्धतेच्या शोधात होतो. शुद्धता! निर्भेळ (अक्षत) शुद्धता! स्फटिकवत शुद्धता! मला दुसऱ्या कशाचीही इच्छा नव्हती. शुद्धतेशिवाय कुणालाही आध्यात्मिक अस्तित्त्वाचा एक अंशसुद्धा प्राप्त होऊ शकत नाही असे माझ्या मित्राने मला सांगितले होते. मी त्याला

साधने विचारली. मला अगदी आनंदाने त्याने साधन सांगितले. शांतिप्रिय वाचकांच्या हितासाठी मी तेच येथे देतो. शुद्धतेपर्यंत त्याने कशी उडी मारली हे त्याने मला सांगितले. ते सारे पत्ररूपात आहे. ते पत्रच जसेच्या तसे मी पुढे देत आहे.

ॐ

स्वामी **K. PURNANAND**
यांस

तुज जे शिकविले प्रस्तुत
ते शिष्योपदेश संप्रदायार्थ
तूं ठायींचा गुणातीत
तुज हे समस्त स्पर्शेना

पौ. शु. १ शके १८५३. शुक्रवार.
**R. S. ANANDMURTI**

ए. भा. अध्याय २९
५२ ओळी

प्रिय,

मी तुमच्यावर जितके प्रेम करतो तितके दुसऱ्यावर जर करीत नसेन तर तुमच्यावर केलेले माझे प्रेम व्यर्थ ठरेल. मी त्या अवस्थेपर्यंत आता येऊन पोचलो आहे. स्वस्ती स्वामी रामानंदतीर्थ

ॐ

तुज जे शिष्य येती शरण । ते नीच न म्हणावे आपण ।
हे गुरुतापणाचे पूर्णपण शिष्य ही पूर्ण पूर्णत्वे देखे ॥
सद्गुरुशी सर्वभूती । सर्वदा ब्रह्म प्रतीही । तेथे शिष्याचिये
भूतव्यक्ती काय ब्रह्मस्थिती पळाली? ॥
या लागी शिष्याचे नीचपण । सर्वथा न देखावे आपण ।
शिष्य देखावा ब्रह्मपूर्ण । हे मुख्य लक्षण गुरुत्वाचे ॥

ए. भा. अध्या २९/४३

❑❑

अनुक्रमणिका

## “दैवी प्रेमाचा एक नवा व अदभूत अनुभव”

आयुष्यभर मी एक प्रयोगशील व्यक्ती म्हणून राहात आलो आहे. एक मोठा प्रयोजक माझ्या लहानपणापासून मला धाडसी, कसोटीचे व धोक्याचे असे विविध बौद्धिक व हार्दिक प्रयोग करावे लागले होते. मी काही वाचीत होतो. त्याच्यावर विश्वास ठेवत होतो. ते आचरणात आणण्याचा आटोकाट प्रयत्न करीत होतो. त्याचे बरे वाईट किंवा किरकोळ स्वरूपाचे सारे परिणाम मी स्वतःच भोगत होतो. सर्वसामान्य माणसांतील मी एक पापी मुलगा. परमेश्वराने मला त्याच्या चरणकमलाची धूळ बनून टाकले आहे. शेवटी मला खूप लाभ झाला. त्याचे मला सर्वाधिक मोल वाटते. माझे स्वतःचे अनुभव सांगावेत अशी मला आंतरिक प्रेरणा होते. शांतताप्रेमी वाचकांच्या मार्गदर्शनासाठी मी ते सांगत आहे. असे करताना मी त्यांच्यापेक्षा श्रेष्ठ आहे हा अहंगंड मी बाळगत नाही. तो अहंगंड माझ्यापासून फार दूर राहो. ईश्वर प्राप्तीची इच्छा बाळगणाऱ्या एका नम्र साधकाने, भक्तांने, योग्याने किंवा आणखी कुणीही आपण ईश्वरनिर्मित सृष्टीत अगदी शेवटचे आहोत असे मानले पाहिजे. अतिमानव अशा गुरूंचा मी एक एकनिष्ठ शिष्य आहे. असे मी स्वतःला मानीत असल्यामुळे मी स्वतःला एक क्षणभर जरी श्रेष्ठ समजून वागलो तर मी त्यांचा अपमान केल्यासारखे होईल. आणि त्यांच्याबरोबर सगळ्या आध्यात्मिक अस्तित्वाला व ज्या सेवक संघाचा मी स्वतःला एक घटक मानतो त्या सेवक संघाचाही अपमान केल्यासारखे होईल.

प्रिय वाचक हो, —

माझ्यावर विश्वास ठेवा. मी एक नम्र प्रामाणिक, भक्तिपरायण मित्र आहे. तुमच्या पायाच्या धुळीची ही मला सर येणार नाही. पण मी स्वतःला तुमचा मानतो. या निकटच्या नात्याने माझ्या जीवनातील एका मोठ्या प्रयोगाचा मी आरंभ करीत आहे. गैरकृत्याच्या व कर्तव्यच्युतीचे दोष माझे आहेत. बाकी सर्व त्या जगच्चालकाचे आहे. मी आता सुरू करतो.

कुण्या थोर व्यक्तीने (मी चुकत नसेल तर) अरिस्टाटलने माणसाची व्याख्या ‘सामाजिक प्राणी’ अशी केली आहे! अगदी बरोबर! आणखी कुणीतरी असे सांगतो की मनुष्य हा समग्र सेंद्रीय वस्तूचे मूळ व फांदी आहे. मनुष्याच्या आणखी विविध प्रकारच्या व्याख्या आढळतात. लेखकाचे लक्ष ज्या विविध बाजूंनी वेधले जाते त्या प्रमाणात त्या व्याख्या बदलत जातात. मला जर माणसाचे वर्णन करायला सांगितले तर मी असे म्हणेन “मनुष्य हा प्रेममय प्राणी आहे. तो प्रेमात जन्मतो, प्रेमात राहातो, आणि त्याचा अंतही प्रेमातच होतो.”

माझ्या दृष्टीने जीवन हे प्रेम आहे. हे सर्वांनी मान्य केले आहे. तुम्ही जर प्रत्येक माणसाला वेगळे वेगळे विचारले की “बाबा! प्रेम कसे करतात? तू कुणावर प्रेम केले आहेस काय?” तर तो हजारो उदाहरणे देईल. कुणी आपल्या देशाविषयी बोलेल, आपल्या बांधवांच्या दुःस्थितीसंबंधी बोलेल, राज्यकर्त्यांच्या जुलुमाविषयी; शासकीय अधिकाऱ्यांच्याकडून होत असलेल्या छळाविषयी बोलेल, आणि पुढे या सर्वांविरूद्ध आपणास तीव्र लढा कसा द्यावा लागला व शेवटी देशाच्या थोर देशभक्तांच्या यादीत आपणास कसे स्थान मिळाले याचे सविस्तर वर्णन करील. दुसरा एखादा आपल्या दांपत्यप्रेमाबद्दल सांगेल, आणखी कुणी आपल्या सर्व मानवजातीच्या जिव्हाळ्यासंबंधी सांगेल आणि असेच अनेकजण निरनिराळे काही सांगतील. या प्रेमिकांच्या यादीत आणखी वाढ करून मी आपल्या सहनशक्तीची परीक्षा घेऊ इच्छित नाही. माझ्यावर विश्वास ठेवा. ही सारी त्यांच्या जीवनातील तात्पुरती अवस्था आहे. त्यांनी नुसते प्रेम केले. त्यांनी

फक्त तेवढेच केले. गरीब बिचारे! त्याना प्रेम कसे करावे हे माहीत नव्हते. हे जग अशा प्रेमभग्न प्रेमिकांनी भरलेले आहे. त्यांच्या प्रेम करण्याच्या कामात निराश झालेले प्रेमिक! ते जेथे जातील तेथे प्रेमाचे भूत त्यांचा पाठलाग करते आणि त्यांचे अंतःकरण पूर्णपणे अविचारी करून टाकते. अरेरे! प्रेमाचे दुःख! हे कसे टाळायचे? मी ते सांगतो.

मी एक भक्त आहे. (डिव्होटी) सगळ्यांवर प्रेम करावे असे मला वाटते. सगळ्यांशी एकत्व साधता आले तर मला खूपच आनंद होईल. सर्व प्राणीमात्र म्हणजे मी स्वतःच अशा दृष्टीने त्यांच्याकडे पाहाता आले तर मी किती धन्य होईन! मी जर सूर्याबरोबर उठलो व वाऱ्याबरोबर वाहात राहिलो तर सुदैवाने तसे होईल! सगळे हात माझे हात, सगळी डोकी माझी डोकी, माझ्यात सर्व! मी सर्वात! याहून दुसऱ्या कशालाही मी अधिक महत्त्व देणार नाही. सर्वांत मी देवत्व पाहू इच्छितो.

सर्व रुपांत त्याचेच (जगान्नियंत्याचे) रूप मला पाहाता आले पाहिजे. हीच माझी तीव्र इच्छा. त्यासाठी माझी धडपड चालली आहे. माझे अंतःकरण दैवी प्रेमाने भरून गेले पाहिजे. तीच एक इच्छा माझ्या अंतःकरणात खोलवर रुजलेली आहे.

मी एका वस्तूवर प्रेम करायला सुरू करतो. एक दृश्य आकार, एक मूर्ती, किंवा एक प्रतिमा! प्रेम हे अमूर्त आहे. कुठल्या तरी मूर्तरूपाशिवाय प्रेम स्वतः प्रकट होऊ शकत नाही. तुम्ही शून्यावर प्रेम करू शकत नाही. प्रेम करण्यासाठी तुम्हाला एखाद्या वस्तूची, व्यक्तीची, गोष्टीची निवड केली पाहिजे. बरे! सध्या एक मूर्ती कोणत्यातरी देवतेची प्रतिमा माझा प्रेमाचा विषय बनली आहे. मी तिची पूजा करतो. नुसती मूर्ती पाहिली तर ती पवित्र दगड आहे, धातू आहे. निर्जीव वस्तू तिला भावना नाहीत, जाणीवा नाहीत, संवेदना नाहीत, ती पूर्ण निर्विकार आहे. मी ती का घेतली? माझ्या दृष्टीने ती भावपूर्ण आहे. ती माझ्याशी बोलते! ती माझ्याबरोबरच असते. मी जेव्हा रडतो तेव्हा तिच्या डोळ्यातूनही अश्रू ओघळतात. माझ्या इच्छेनुसार माझ्या हाताने मी जे तिला अर्पण करतो तिचा ती स्वीकार करते. मी तिला जात्यावर नेतो आणि मागावर काम करायला लावतो. माझ्या सांगण्याप्रमाणे ती सगळे काही करते. मी तिच्यावर प्रेम करतो आणि ती माझ्यावर प्रेम करते. तिच्यावर प्रेम केल्यामुळे मी स्वतः अधिक प्रेममय होतो असे मला वाटते.

आपण अंशतः मानवी, अंशतः दैवी आहोत. मनुष्यत्व हा आपल्या जीवनाचा एक पैलू आणि देवत्व हा दुसरा पैलू. आपल्यामध्ये मानवी तसेच दैवी घटक आहेत. मानवी घटक हा अपूर्ण आहे आणि दैवी घटक पूर्ण. मानवी घटकांचा शेवट दुःखात होत असतो. दैवी घटक आपल्याला प्रीती, आनंद आणि शांतीच्या चिरकालीन निवासस्थानाकडे घेऊन जातात. मनुष्यवृत्तीची किंवा त्याहून अधिक योग्य शब्द वापरावयाचा झाला तर पशुवृत्तीची वाढ म्हणजे आपल्या दुःखात हजारो पटींनी वाढ करायची. दैवी वृत्तीमुळे आपणास निश्चितपणे सुख, आनंद आणि देवत्व प्राप्त होते. म्हणून दैवी वृत्तीचा विकास म्हणजे आपल्यातील मानवी वृत्तीचा हळूहळू लोप. ज्या प्रमाणात तुम्ही अमानवी बनत राहाल त्याच प्रमाणात तुमचे देवत्त्वामध्ये रुपांतर होत राहील. "तुम्हाला जर पवित्र आत्म्याची भेट घ्यायची असेल तर तुमच्यामधील सैतानाला दूर केला पाहिजे" या उक्तीत निर्भेळ सत्य आहे. तुम्ही जर मनुष्य प्राण्याचे विश्लेषण कराल तर तुम्हाला असे आढळून येईल की त्याच्या मानसिक व बौद्धिक पातळीवर विचार, जाणिवा, भावना, संवेदना इत्यादी आढळतील. त्याच्या मनाच्या चेतन, जड (अचेतन) व अंतर्मानसिक अशा सर्व अवस्थांचा आम्ही त्यात समावेश करतो. माणसाची आध्यात्मिक उन्नती म्हणजे दैवी रंगाने केलेल्या व्यक्तीच्या अंतरंगाच्या रंगरंगोटी समान आहे. याचाच अर्थ असा की, तुमचे सर्व विचार, जाणिवा, भावना व संवेदना या दैवी झाल्या पाहिजेत.

अनुक्रमणिका

पूर्णपणे दैवी! आरंभाला त्या अंशतः मानवी आणि अंशतः दैवी असतात. शेवटी त्या सर्व दैवी बनतात. तो दैवी पुरुष बनतो. म्हणून आपल्यामध्ये असलेल्या देवत्वाचा साक्षात्कार करून घेण्याचा सगळ्यात सोपा मार्ग म्हणजे आपल्यामधील भौतिकत्वाचा निचरा करून टाकणे हा होय. सर्व धर्मसंस्थापकांनी हाच निर्णय दिला आहे.

पुन्हा एकदा मूर्तीपूजक अशा त्या भक्तांकडे वळू या. तो एका प्रतिमेची पूजा करतो. का? कारण, स्वर्गीय धामाच्या प्रवासात तो या मूर्तीचा तो साधन म्हणून उपयोग करून घेऊ इच्छितो. ती मूर्ती त्याची सांगाती असते. साथीदार व जीवलग मित्र असते. त्याच्या संकटकाळी कसोटीच्या प्रसंगी धोक्याच्या वेळी ती त्याला धीर देते. त्याला सामर्थ्य देते. त्याच्यासाठी ती मूलस्त्रोत असते. साठा असते. त्याच्या सगळ्या प्रेरणेचे स्त्रोत असते. तो तिच्यावर प्रेम करतो. बरे! आता प्रेम या भावनेचे आपण विश्लेषण करू या. इथे प्रेमिक ही मानवी व दैवी असा विकार, विचार व भावनांनी युक्त अशी एक जिवंत व्यक्ती आहे. जेव्हा तो एक प्रतिमा घेतो व तिच्यावर प्रेम करू लागतो, तेव्हा त्याच्यातील मानवी तसेच दैवी घटक तिच्याकडे ओढले जातात. प्रतिमेत जीव नसतो. ती निर्जीव वस्तू. त्याचा अर्थ असा की, प्रतिमेला विचार, भावना किंवा संवेदना नसतात. तेथे प्रतिसादशीलता नसते. विश्लेषणात्मक व वैज्ञानिक दृष्टिकोणातून पाहाता प्रतिमा ही निर्जीव निर्विकार आहे. तिचे स्वतःचे असे काही नसते. तुम्ही तिच्यात प्राणप्रतिष्ठा करता. तुम्ही तिला भावना देता. तुमच्या स्वतःचे विचार, विकार देता. तिच्यात शिरा म्हणजे ती तुमच्याबरोबर हसते आहे, रडते आहे, असे आढळून येईल. तेथे केवळ एका बाजूनेच व्यवहार चाललेला असतो. तुम्ही मूर्तीस जे द्याल तेच ती मूर्ती तुम्हाला परत देईल. तुम्ही मूर्तीपूजक आहात तेव्हां तुम्हाला मानवी प्रवृत्ती विरुद्ध तुमच्या सर्व शक्ती उभ्या केल्या पाहिजेत व तुमच्या अंतःकरणात दैवी प्रवृत्तींचा विकास केला पाहिजे. ती मूर्ती किंवा निर्जीव साथीदारीण आपोआपच तुमचे अनुकरण करील व सरतेशेवटी जेव्हा तुम्ही तुमच्या सर्व भौतिक प्रवृत्तींना कह्यात ठेवाल तेव्हा तुम्ही केवळ आपल्या स्वतःतच दैवी संपत्तीची भर घालणार नाही तर त्या मूर्तीत सुद्धा आणि अशा रीतीने तुमची दुहेरी सिद्धता झाल्यामुळे तुम्ही “ज्ञानज्योतीकडे” कूच करता. दोघांमुळे प्रेमाचा आरंभ होतो पण त्याचा शेवट एकातच होतो. हे आतापर्यंत तुम्ही सतत शिकत आला आहात. टप्प्याटप्प्याने दैवी प्रेमाची अत्युच्च स्थिती तुम्हाला प्राप्त होते. म्हणजेच निसर्गातील सर्व सजीव निर्जीव वस्तूंशी व त्या पलीकडच्या सर्व वस्तूंशी तादात्म्य पावता.

बहुसंख्य भक्त त्याच सर्वसामान्य मार्गाचा अवलंब करीत असतात. मी अशा भक्तांपैकी एक आहे असे मी स्वतःला मानत नाही. मला निर्जीव प्रतिमेचे आकर्षण नाही. सजीव मानवी रुपाचा मी आश्रय घ्यावा अशी त्या जगन्नियंत्याची इच्छा आहे. माझ्यापेक्षा निःसंशय श्रेष्ठ असा भक्त माझा सहप्रवासी आहे. मूर्तीच्या ऐवजी त्याची निवड केली. निर्जीव वस्तूंची कुणीही सहज पूजा करू शकतो. फुले वाहिली जाऊ शकतात, नैवेद्य दाखविला जाऊ शकतो, यात कसलीच अडचण नाही. मी जिवंत रुपाची पूजा कशी करू शकतो? कधी कधी मी फुलेही वाहीन. स्नानाचा प्रश्नच नव्हता. नैवेद्य सुद्धा क्वचितच. तरी मी त्याची पूजा केली असे मला वाटायचे. याठिकाणी पूजेची सर्वसामान्य पद्धत लागू होण्यासारखी नव्हती. मी त्याच्यावर प्रेम करीन, त्याच्याविषयी खूप जिव्हाळा वाटेल, मी त्याच्याशी बोलेन, मी त्याचे चुंबनही घेईन, हे सारे अगदी मनापासून! पण त्याला मूर्त स्वरुप कधीच आले नाही. जेव्हा मी त्याच्यावर प्रेम केले, माझ्यातील मानवी तसा दैवी प्रेमाचा ओघ त्याच्याकडे वळला हे मला माहीत आहे. मला हेही कळत होते की, माझ्या प्रेमाची वस्तू एक सजीव वस्तू आहे आणि माझ्यासारख्याच त्याच्याजवळही मानवी व दैवी भावना आहेत. निर्जीव वस्तूंच्या संदर्भात तेथे प्रतिसाद नव्हता. त्यामुळे भावनांचा खटका उडण्याची शक्यता नव्हती पण येथे किती वेळातरी अंतःकरणांची टक्कर झाली. कधीकधी माझ्या भावनांकडे दुर्लक्ष केले गेल्याचे मला दिसून आले.

तर कधी कधी माझ्या भावनांची खूप वाहवा झाल्याचेही मी पाहिले. काय ही भूताटकी! जिवंत मूर्ती चांगली आणि वाईट! मी फारच गोंधळात पडलो! मी जस जसा अधिक विचार करू लागलो तसे तसे ते कोडे अधिकच बिकट होई. पण मी त्याच्या मागेच होतो. मी त्यावर खूपखूप विचार करीत राहिलो आणि सरतेशेवटी प्रेमाचे गूढ मला उकलले.

बारकाईने केलेल्या तपासणीनंतर व सूक्ष्म निरीक्षणानंतर मला असे दिसून आले की, मनुष्यत्व व दैविकता यामध्ये सारखा संघर्ष चालला असतो. दोघांमध्ये तीव्र कलह चाललेला असतो. जेव्हा मानवी अंश दैविक अंशाच्या संपर्कात येतो तेव्हा दोघांत खटका उडणे अपरिहार्य. तेव्हा एकात्मता नष्ट होते. मेळ संपुष्टात येतो. येथे माझ्या प्रेमाची सजीव वस्तू मानवी रूपातही मनुष्यत्व व दैविकता दोन्हींनी युक्त आहे. जेव्हा एकामधील दैविकता दुसऱ्यातील दैविकतेला भेटते त्यावळी आनंद आणि स्वर्गसुख प्राप्त होते. जेव्हा एकातील दैविकता आणि दुसऱ्याचा मानवी स्वभाव याची भेट होते आणि त्याच्या उलट किंवा दोन्ही मानवी प्रवृत्तींची भेट झाली तर निश्चितपणे तेथे बदसूर निर्माण होतो. मी त्याच्यावर प्रेम केले, माझी पशुवृत्ती जागृत झाली मला पश्चाताप झाला. मी त्याच्यावर प्रेम केले. माझ्यातील दैवीवृत्ती प्रज्वलित झाली. आपल्या दैविक शक्तीची भेट झाली की त्याचे पर्यवसान आनंदात होते. मानवी प्रवृत्तीची भेट झाली की कमी आनंद, आनंद कमी होणे आणि दुःखच निष्पन्न होते. मानवी अंशाचे पूर्णपणे निर्मूलन केले पाहिजे. ते मी आता पाहू शकलो. मी त्याचा पिच्छाच पुरवला. मी त्यासाठी जणु वेडाच झालो. बापरे! मी आतल्या आत जळत होतो. मी पूर्णपणे दैविक असतो तर किती बरे झाले असते. त्याशिवाय मी पूर्ण बनणार नाही. स्वरुप अपूर्ण होते. आणि त्यातून दुःख निर्माण झाले हे मला कळले. मी त्याच्या पलीकडे जायला हवे. हे कसे करायचे? हे कधी तरी शक्य आहे काय? मी त्या स्वरुपापलीकडे जाऊ शकेन काय? मी माझ्या साथीदारांबरोबर कसा राहू शकणार? मी खूप खूप झगडलो आणि शेवटी मी यशस्वी झाल्याचे मला आढळून आहे.

माझ्यामधील दैविक अंशाने सांगितले "दैवी प्रेमात रूप व आकाराला काही स्थान नाही, मर्यादा नाही. प्रत्येक रूप हे दैवी असते! रुपावर प्रेम कर, जिवंत प्रतिमा, साथीदार यांच्यावर दैविक म्हणूनच प्रेम कर. तरच तो साथीदार साधन बनेल! नाही तर तोच एक मोठा अडसर बनेल."

दैवी प्रेमाने प्रेरित झाले की, व्यक्ती एखाद्या वस्तूवर पूर्णपणे प्रेम करते आणि पूर्णपणे तिला ही विसरून जाते. हे दिसायला विरोधाभासात्मक वाटेल. प्रेम स्वतःच स्वतःला विसरू शकत नसेल तर ते प्रेमच नव्हे. जोपर्यंत एखादी गोष्ट विसरू शकत नाही तोपर्यंत खरे प्रेम बनत नाही. तुमच्यातील दैवी अंश हाच तुमचा बळकट आधार असतो. तो दैवी अंश तुम्हाला भौतिकतेविरूद्ध उभे राहाण्यास वज्रासारखे सामर्थ्य देईल. तोच अंश तुमचे अंतःकरण द्रवून टाकून स्वर्गीय सुखाचे आनंदाश्रू तुमच्या डोळ्यांतून वाहायला कारणीभूत ठरेल. तुमच्यामधील देवत्व अभेद्य आहे. कोणत्याही कितीही मोठ्या प्रमाणातील मानवी अंश त्या देवत्वाला हलवू शकणार नाही. शांतिप्रिय वाचकांनो दैवी अंशाचा हा ध्वज फडकवावा. एकावर प्रेम करा, सर्वांवर प्रेम करा!

असे करताना तुम्ही स्वतःला गमावून आणि तुम्ही सर्वच गमावून बसता. माझ्या स्वतःच्या नम्र पद्धतीने सोडविलेले हे साधे गणित आहे. हे कुठल्या पुस्तकातून आलेले नाही. मी फारशी पुस्तेक वाचली नाहीत. हा अंतःकरणातील प्रवाह आहे. तुमच्या कसोटीला ते लावून बघा. त्याच्यावर विचार करा. तुम्हाला त्यात सुधारणा करावी वाटली तर करा. पण जर त्यात सत्याचे काही स्फुल्लिंग आढळले तर मग बंधूंनो, तुमच्यावर प्रेम करणाऱ्या भावाचे शब्द वाया जाऊ न देणे हे तुमचे कर्तव्य ठरते.

अनुक्रमणिका

“दैवी प्रेम हे पहिल्यांदा काहीच नसते, पण शेवटी मात्र तेच सर्व असते”.

**स्वामी रामानंदतीर्थ**

❑ ❑

अनुक्रमणिका

# माझ्या दैनंदिनीतील एक पान
# (दैविकता कशी शिकवावी)

माझ्या स्वतःच्या दृढ श्रद्धेच्या वेदिकेवर स्वतःला मी समर्पित केले पाहिजे. खरोखरच मला कशाचे तरी दर्शन झाले असेल तर कितीही शाब्दिक वादविवाद, विरोध झाले तरी त्यांचा माझ्यावर काही परिणाम होऊ शकणार नाही. मी त्याला महत्त्व देणार नाही. मी अभेद्य असा दैवी अंश आहे असे मला वाटते. माझ्या दृष्टीने ते कठोर वास्तव आहे. एक निरीश्वरवादी माझ्याकडे येऊन माझ्या ईश्वरी अंशाची थट्टा करतो. गरीब बिचारा! स्वतःमधील ईश्वरी अंश न जाणून घेता दुसऱ्यामध्ये असलेला अंश बाहेर घालवू इच्छितो. काय ही शोचनीय स्थिती!

मी त्याला त्याच्या स्वतःचा दैवी अंश कसा दाखवू? त्या सर्वव्यापी आत्म्याचा तो एक अविभाज्य अंग आहे. नव्हे तो आत्माच आहे असे त्याला कधीतरी जाणवेल काय? त्याला त्याच्या दैवी अंशाकडे नेण्याचा कोणता तरी मार्ग आहे काय? तसे करण्याचा मी एकच मार्ग जाणतो. तो म्हणजे प्रत्येकाच्या स्वतःच्या उदाहरणाने दुसऱ्याला देवत्व दाखविण्यासाठी तुम्ही स्वतः ते दैवी जीवन जगलेले असले पाहिजे. इतरांच्याकडे जाऊन त्यांना दैवी अंशाची जाणीव करून घेण्यास प्रवृत्त करण्याआधी तुम्हाला स्वतःला त्याची जाणीव झालेली असली पाहिजे. तुम्ही स्वतःचा उद्धार करून घ्या. आणि जगाचा उद्धार करा. तुम्ही ईश्वर आहात असे समजा, तुमच्या अंतःकरणातील प्रकाशावर विश्वास ठेवा मग तुम्ही खरोखरच वैश्विक ईश्वरश्रद्धेचे पथप्रदर्शक व्हाल. स्वामी रामाशी वाद घालणाऱ्या एका ख्रिश्चन प्राध्यापकाला स्वामींनी पुढील प्रश्न विचारला. तुम्ही खिस्ताला पाहिले काय? तुम्ही त्याला पाहू इच्छिता काय? आणि स्वतःकडे बोट दाखवून म्हणाले "हे पाहा, इथे खिस्त उभा आहे."

उद्धारक होण्यापूर्वी तुम्ही स्वतःला प्रथम तारलेले असले पाहिजे. दाता होण्यापूर्वी तुम्हाला स्वतःलाच काही तरी प्राप्त झालेले असले पाहिजे. जगाला दैवत्वाची शिकवण देण्यासाठी तुम्ही स्वतःलाच ती शिकवण दिलेली असली पाहिजे. "तुम्ही स्वतःला शिकवा आणि मग तुम्ही जगाला शिकवा, स्वतःचा आत्मा शुद्ध करा. तुम्ही साऱ्या सृष्टीला शुद्ध करा. स्वतःला दैवी समजा आणि तुमच्याबरोबर जग दैवी समजा. देवत्वाची शिकवण म्हणजे देवत्व जगणे होय" एवढेच मी जाणतो.

❑❑

अनुक्रमणिका

==============================================================================

शेवटचा भाग

या भागातील बरेचसे लेखन मराठीत आहे. मधून मधून इंग्रजी वाक्ये
किंवा परिच्छेद आलेले आहेत. त्यांचा अनुवाद
तेथेच कंसात केलेला आहे.

## भाग ४ था

==============================================================================

अनुक्रमणिका

स्वामीं रामतीर्थांचे पट्टशिष्य श्रीमान् आर. एस. नारायणस्वामी त्यांच्या दर्शनास व भेटीस जाण्याची आज्ञा बरेच दिवसांपूर्वी झाली होती. नारायणस्वामींची व माझी पत्रोत्तरी बरीच ओळख झाली होती. स्वामीजींना पत्राद्वारे संघाची बरीच माहिती कळविली होती. परंतु लांब राहून शेकडो पत्रे पाठविली तरी प्रत्यक्ष भेटीअंती जी समग्र माहिती त्यांना देता आली असती ती थोडीच साधणार आहे? संघाची इत्यंभूत माहिती त्याना द्यावी व जुळल्यास त्यांना हिप्परग्यास येण्याचे निमंत्रण द्यावे हा लखनौला येण्याचा मुख्य हेतू होता. स्वामी नारायण हे रामतीर्थांचे पट्टशिष्य. अतएव स्वामी रामतीर्थांच्या चरित्रात न लिहिल्या गेलेल्या कितीतरी गोष्टी, प्रसंग व अवस्था प्रत्यक्ष नारायणस्वामींच्या तोंडून ऐकाव्या व आपल्या पितामहाच्या गुणगानांत काही काळ शुद्ध भावनेत व्यतीत व्हावा हा दुसरा हेतू होता. त्याशिवाय आणखी एका उद्देशाने लखनौच्या प्रवासाचा योग जुळला होता. बरेच दिवसांपासून आपण संन्यासाश्रम स्वीकारावा अशी माझी इच्छा होती. त्यातच गु. काकांची या गोष्टीला संमती दिसली. गेल्या संक्रातीला जेव्हा भिक्षांदेहीचे व्रत स्वीकारले तेव्हा येत्या संक्रातीस संन्यास घ्यावा व तो नारायणस्वामीजींच्या हस्ते व्हावा अशी गु. काकांची इच्छा दिसली. संन्यास घ्यायचा झाला तर विवेकानंद, नारायणस्वामी यांच्यासारखा संन्यास घ्यावयास पाहिजे, कारण आपणास सेवा करावयाची आहे. मातृभूमीची सेवा हीच आपली तपश्चर्या व तद्द्वारेच आत्मोन्नती प्राप्त करून घ्यावयाची मग आपणास ध्यानधारणांत सर्व काळ निमग्न असणाऱ्या संन्याशाचे प्रमाण कसे स्वीकारता येणार? तेव्हा संन्यास धर्माचे नियम काय आहेत व आपल्या ध्येयाला न सोडता त्याचा स्वीकार करता येतो अगर नाही त्याचीही माहिती स्वामीजींकडून घ्यावी हाही आमचा मानस होता. वरील तीन हेतू आमच्या ह्या उत्तर हिंदुस्थानाच्या प्रवासाच्या बुडांशी होते.

प्रथम नारायणस्वामींना भेटण्यास जाण्याचे जेव्हा ठरले तेव्हा मनाला बराच हुरुप वाटला. आपणास एका महान संन्याशाचे पुण्यदर्शन होणार त्या भावनेने चित्त उल्हसित झाले. पण ते क्षणमात्रच! पुन्हा विचार केला "वेड्या! नारायणस्वामीला पाहायला तुला का बाहेर जायचे आहे? अरे! तुझ्या संघात कितीतरी नारायणस्वामी आहेत! अरे प्रत्यक्ष तूच नारायणस्वामी आहेस! तुला गु. काकांनी हा माझा नारायणस्वामी असे कितीदा तरी संबोधिले आहे. खरेच का मी नारायणस्वामी आहे?" अशी कितीतरी वेळा माझ्या मनात शंका येत असत. एकदा वाटे 'मी आहेच नारायणस्वामी' पण ही भावना सदैव टिकत नसे. तेव्हा प्रत्यक्ष नारायणस्वामीला पाहून त्याचा आपला पडताळा पाहावा हा सूक्ष्म विचार व्यक्तिशः गुरुभक्ताच्या अंतःकरणात होता व प्रस्तुत हकीकत त्याच अनुरोधाने लिहिली आहे.

हिप्परग्यास असताना कितीतरी वेळा वाटत असे की, नारायणस्वामींची गुरुभक्तांहून कितीतरी जास्त योग्यता, गुरुभक्त त्यांना काय सांगणार? त्यांच्यापुढे गुरुभक्ताचे काय तेज पडणार? पण पुनः विचार येई. 'गुरुभक्त तुझे तेज आहे कोठे?' ज्याचे तेज आहे तो येईल. योग्यप्रसंगी प्रगट करील आपले तेज, तू का विनाकारण मध्येच आपलेपणा घेण्याचा हव्यास धरतोस? त्या विचाराने मनात फार समाधान वाटत असे. शिवाय भजनात पुष्कळवेळा मनात गुरुभक्ताला म्हणत असे, "तू जा सगळे काम करील राम!" त्या आश्वासनानंतर कोणत्याच प्रकारची भीती मनास वाटेनाशी झाली. त्यानंतर पुष्कळवेळा संघातील इतर बंधुबरोबर भजन करीत असता गुरुभक्त म्हणत असे "ह्या हास्याची एक लकेर अगर त्या अश्रूंचा एक सर जरी नारायणस्वामींच्या दृष्टीस पडला तरी बेट्याला ओढून आणील गुरुभक्त!" एके दिवशी नरसिंहाच्या मंदिराच्या मागच्या पारावर भिक्षेचे अन्न खात असता बंधु अमृतबरोबर तास दीड तास भजन केले व खुदमस्तीच्या आवेशजनक लहरीत म्हटले "असेल बेट्याच्या नशीबात हे तेज पाहायचे तर येईल

हिरप्परग्याला. नारायणस्वामीला एक क्षणांत आपलेसे करण्याची खात्री गुरुभक्ताला रामाने दिली आहे." असे काही क्षण वाटत असे. बाकी सर्व वेळा स्वामीजीविषयी अत्यंत पूज्य भाव असे. असो.

आम्ही हिप्परगे तारीख ५ मे. मंगळवार रोजी सोडले. त्याच्या आदले दिवशी म्हणजे सोमवारी रात्री भजन करीत असतांना रामाने आम्हास निरोप दिला. चि. मोहन जेव्हा रामाच्या पाया पडावयास गेला, तेव्हा "मोहनराव" असे म्हणून रामाने त्यास एकदा संबोधिले. बराच वेळ त्याजकडे पाहिले व नंतर त्यास संबोधून म्हटले "आता तुम्ही नारायणस्वामींच्या भेटीस जाणार? माझ्या रामाच्या पुष्कळ गोष्टी ऐका अं!" असे म्हणून दर्शनासाठी बंधू माळगे यांनी रामास दिलेली पाडुरंगाची मूर्ती दिली. नंतर राम म्हणाला "गुरुभक्त, आता तू दर्शनाला ये, एकदमच निरोप देणे उरकू दे." निरोप घ्यावा असे काही आगाऊ ठरले नव्हते पण आता प्रसंगच आला आहे ते छान झाले. नंतर गुरुभक्त रामाच्या आसनापुढे जाऊन बसला रामाने त्यास बुक्का लाविला व प्रेमाश्रूंनी भरलेल्या नेत्राने पाहत म्हटले, "गुरुभक्त, स्वामी नारायण कडून माझ्या मनाच्या अवस्थेचे वर्णन ऐक! माझ्या गुरुची एकही अवस्था मला पाहता आली नाही. खूब मजा येणार आहे तेथे! तुझे व त्यांचे खूप जुळेल आणि मग वाटल्यास हा बुक्का त्यांना दे." असे म्हणून बुक्याची डबी रामाने दिली. दुसरे दिवशी गुरुभक्ताने हिप्परगे सोडले.

शनिवार ९ मे,

गुरुभक्त सकाळी आठ वाजता नारायणखेडहून लखनौला जाण्यासाठी मोटारीने निघाले. आता रामापासून दूर जावे लागणार त्या विचाराने मन बरेच उद्विग्न झाले. पोचविण्यास बरीच मंडळी आली होती. ती आली नसती तर बरे, असे पुष्कळदा वाटले. कारण आता रामाजवळ मुक्त कंठाने अश्रू ढाळता येणे शक्य नव्हते. मंडळीबरोबर नमस्कार चमत्कार चालले होते. पण ते नुसतेच, मन सारे रामाच्या मनःस्थितीचे चित्र रेखाटण्यात गुंतले होते. मोटारीत बसतेवेळी रामाच्या पाया पडलो. तो डोळ्यात अश्रु आले. कोणास ते दाखवू नयेत म्हणून तसेच दाबले. गुरुभक्त मोटारीत बसला. रामाचे भजन चालले होते. रामही आपले अश्रू बळेच सावरून धरतो आहे असे दिसले. "जा जा नारायणस्वामीकडे जा, माझ्या वडील भावाचे दर्शन घे व रामाविषयी खूप खूप माहिती घे. आता आनंदच आनंद! माझ्या रामाविषयी आता कितीतरी नवी माहिती मिळेल!" असा म्हणण्याचा त्याचा मानस दिसला. अंतःकरण प्रेमाने दाटून आले होते; व त्यातच तल्लीन झाल्याकारणाने आजूबाजूच्या परिस्थितीचेही आम्हास भान राहिले नाही. मोटार निघण्याची वेळ झाली. पुनः एकदा रामाकडे पाहिले. रामाच्या डोळ्यात अश्रुबिंदू चमकत होते. त्यांचे दर्शन घेतले. स्वतःचे तोंड एकीकडे करून आलेले अश्रू पुसले व बराच वेळ तोंडाने ॐ म्हणत बसलो. काही वेळाने मोहनकडे पाहिले तो त्याच्याही डोळ्यांत अश्रू होते व तो दाबण्याचा प्रयत्न करीत होता.

मंगळवार, ता. १२ मे १९३१ रोजी कानपूरहून लखनौच्या गाडीत गुरुभक्त बसला. संध्याकाळी साडेपाचचा सुमार होता. पुढचे स्टेशन लखनौचे होते. गुरुभक्ताचे मन बाह्यजगापासून दूर गेले. मनात पूर्ण नारायणस्वामींचे चित्र होते. त्यांना आपण कसे भेटावे? रामाच्या संगतीने पवित्र झालेला तो. रामाच्या संगतीने पवित्र झालेला गुरुभक्त! दोन पवित्र आत्म्यांची भेट होणार! पण गुरुभक्त, "तुझ्या संघाचा विशेष अश्रू आहे. तू अश्रूंनी भरलेल्या नेत्रांनी नारायणस्वामींचे दर्शन घे. तुझी त्याची खरी भेट तेव्हा होईल!" असे विचार चालले होते व डोळ्यांतून सारख्या अश्रुधारा चालल्या होत्या, पण ते पवित्र अश्रू लोकांपासून लपविण्याची जरुरी वाटू लागली. म्हणून तोंड शालीने झाकून घेतले व सारे अश्रू आवरण्याचा आटोकाट प्रयत्न केला.

अनुक्रमणिका

अशा मनःस्थितीत लखनौला येऊन पोहोचलो; व शहरात "रामतीर्थ पब्लिकेशन" लीगच्या ऑफिसात जाऊन चौकशी केली. आमची सर्व व्यवस्था करण्यात आली. स्वामीजी बाहेर गेले होते. ते येईपर्यंत खाटेवर विचार करीत बसलो. जवळच लीगचे मॅनेजर बसले होते. त्यांच्यापासून लीगची काही माहिती घेतली. लीगच्या जागीच राहणारे ५ सभासद असून शहरात ७ राहतात. बाहेर ३० सभासद आहेत. तेथील एकाही माणसाच्या अंगावर खादी नव्हती. तेव्हा कसेसच वाटले. पातळ तलम कापड डोळ्याला सहनच होई ना!

❑❑

ॐ

बुधवार वैशाख व. ११

दुपारी जेवणापूर्वी आम्हाला बोलावून घेतले व स्वामीजींनी एका अमेरिकन बाईचे पत्र वाचण्यास दिले. अमेरिकेतील बायांचे देखील विचार कितीतरी उच्च व अंतःकरणापासून निघालेले असतात हे त्यांनी विशद केले. जेवताना सेवकसंघाविषयी आणखी जास्त माहिती मी दिली. संघात ब्रह्मचारी सभासद किती आहेत. त्यांची वर्गवारी, वयात आलेल्या सभासदांची संख्या वगैरे माहिती दिली. संघातील मंडळींना मालमत्तेचा हक्क नाही, त्यांच्या मालमत्तेवर संघाचा सर्वस्वी ताबा असणार हे ऐकून त्यास फार आनंद झाला. संघातील सभासदांचे आईबाप अद्याप हयात असल्यामुळे अद्याप संघातील सभासदांना संपत्ती घेता आलेली नाही. परंतु इष्टेट त्यांच्या ताब्यात येताच ती सर्व संघाच्या मालकीची होईल.

**इंग्रजीतील लेखनाचा मराठी अनुवाद**

जेवण झाल्यानंतर मी स्वामीजींना विचारले की, संन्यास स्वीकारण्यासाठी काही ठराविक नियम आहेत काय? संन्याशाने एखाद्या ठिकाणी काही दिवसांपेक्षा जास्त राहू नये हे खरे आहे काय? संन्याशावर अशी कोणतीच बंधने नाहीत असे स्वामीजींनी उत्तर दिले. संन्याशी सर्व बंधनापासून मुक्त असतो. शास्त्राप्रमाणे चार प्रकारचे संन्यास आहेत. एक प्रकारच्या संन्यासात संन्याशाने स्वतः बांधलेल्या किंवा दुसऱ्याने बांधून दिलेल्या झोपडीत राहायचे व त्या खेड्यातील किंवा शेजारच्या गावातील लोकांच्यावर आपल्या उपजिवेकेसाठी अवलंबून राहायचे असते. संन्यास धर्माच्या काही बंधनामुळे संन्यास घेतल्यानंतर मानवजातीच्या सेवेच्या कार्यात काही बाधा निर्माण होते का असे मी त्यांना विचारले. स्वामीजींनी उत्तर दिले की, आपले कौटुंबिक असे वैयक्तिक संबंध, तसेच एखाद्या कामाविषयीची किंवा एखाद्या वस्तुविषयीची किंबहुना सेवेविषयीची सुद्धा आसक्ती सोडून देणे म्हणजेच संन्यास, संन्यासाने एखाद्या ठिकाणी तीन दिवसांपेक्षा अधिक काळ राहू नये हा नियम एवढ्याचसाठी करण्यात आला की, त्यायोगे मानव समाजाला त्या संन्यासाचा अधिक उपयोग व्हावा. एखाद्या ठिकाणी अनेक वर्षे राहून जर संन्यासी मानव समाजाला अधिकाधिक उपयुक्त ठरत असेल तर त्याला कुठलीच अडचण नाही. दुसऱ्या प्रकारच्या संन्यासात संन्याशाने नदीच्या काठी राहून सभोवतालच्या खेड्यातून भिक्षा मागून आणावी. त्याशिवाय हंस आणि परम हंस असे संन्यासी असतात. त्यांना कसलीच बंधने नसतात. त्यांनी कुठेतरी राहावे, कुठेतरी भिक्षा मागावी, कुठेही कार्य करावे, त्यांनी सतत भ्रमंती करीत राहावे किंवा जन्मभर ते एकाच ठिकाणी राहू शकतात. फक्त अट एवढीच की त्यांनी मानवसमाजाची सेवा करीत राहावे.

मग मी स्वामीजींना संक्रातीच्या दिवशी संन्यास घेण्याचा निर्णय घेतला असल्याचे सांगितले. स्वामीजी म्हणाले, माझ्या आयुष्यात मी केवळ एकाच व्यक्तीला संन्यास दीक्षा दिली. पण मी तेथे फसलो. त्या शहरातील लब्धप्रतिष्ठ मंडळी त्यांच्याकडे मोठ्या आदराने, उच्च भावनेने पाहात असल्याचे जेव्हा त्याला आढळून आले तेव्हा तो फुगुन गेला व त्याला इतका गर्व चढला की, तो नीट वागेनासा झाला. त्याचा गुरू असलेल्या माझासुद्धा अनादर करू लागला. स्वामी रामांनी आपल्या आयुष्यात केवळ पाचजणांनाच संन्यास दिला. पण प्रत्येकाला संन्यास घेण्यास सांगणे हे चुकीचे आहे असे ते नेहमी म्हणायचे. संन्यासाश्रमाचा तुम्ही जर योग्यरीतीने उपयोग करून घेतला तर तुमचे खूपच उन्नयन होईल, पण जर दुरुपयोग केला तर तो तुम्हाला अधःपतनाच्या खोल गर्तेत ढकलून देईल. आजकाल संन्याश्याच्या बाबत दोन अडथळे किंवा अडचणी आहेत. पहिली गोष्ट अशी की, सुशिक्षीत समाज हा संन्याशाकडे समाजावरील बांडगुळे या दृष्टीने पाहातो. म्हणून संन्याशाचे जीवन मोठे कठीण झाले आहे. आणि दुसरी गोष्ट म्हणजे संन्यासी शारीरिक दृष्टीने सुद्धा संन्यास धर्मातील नियम पालन करण्यास व कष्ट सहन करण्यास असमर्थ असतात. पण मनाने कणखर असलेल्या माणसाला मात्र संन्यासाचा खूप लाभ होऊ शकतो. संन्यास मार्ग हा धाडसी मार्ग आहे. तसाच तो फार धोक्याचाही आहे. पायऱ्या फार निसरड्या आहेत. रामाच्या कृपेने अथवा देवदयेने गेली एकतीस वर्षे संन्यासधर्माचे काटेकोर पालन करण्यात मी यशस्वी झालो आहे. तरी पण शेवटपर्यंत मी असाच राहू शकेन याची खात्री देऊ शकत नाही. संन्यास धर्माचे पालन करणे हे फार कठीण काम आहे. मध्येच मी म्हणालो "म्हणजे जेव्हा आपले प्राणोत्क्रमण होईल तेव्हाच आपण स्वतःला साधू म्हणवून घेऊ शकू."

मला जेव्हा एखाद्याच्या मानसिक सामर्थ्याची खात्री होते तेव्हाच मी त्याला संन्यास देतो. त्याने भिक्षेवर राहिले पाहिजे आणि अतिशय कडक जीवन जगले पाहिजे. 'माझ्या बाबतीत सामर्थ्याचा प्रश्न नाही. असे मी म्हणालो. ते म्हणाले 'मी संन्यास घ्यावा की नाही यासंबंधी माझे गुरुच श्रेष्ठ निर्णायक होते.' माझ्या गुरुने स्वामीजींच्याकडून संन्यास दीक्षा घेण्यास सांगितले आहे. असे मी त्यांना सांगितले.

गृहस्थाच्याकडून नैतिकभंग झाला तर त्याचा परिणाम त्याला एकट्यालाच भोगावा लागतो. पण संन्याशाकडून नीतिभंग झाला तर त्याचा परिणाम साऱ्या समाजावर होतो. आपल्या दैनंदिन कार्यक्रमात ध्यानासाठी काही वेळ देता का असे मी स्वामीजींना विचारल्यावर स्वामीजींनी सांगितले की, त्यांचा सगळा वेळ हा ध्यानासाठीच असतो. १९१६ पूर्वी आपला सगळा वेळ ते एकांतात घालवीत असलेला काळ होता. पण सार्वजनिक कामामुळे त्यांना समाजात खेचले. त्यांना ध्यानासाठी वेळच न मिळता कित्येक दिवस गेले. कामाचे खूप दडपण आले तर ते हिमालयात जाऊन तेथे दोन तीन महिने राहात असत. आमच्या संघात ध्यानासाठी काही तास ठेवण्यात आले आहेत का असे स्वामीजींनी मला विचारले. तेव्हा मी नाही असे सांगितले.

**प्रश्न :** स्वामी रामतीर्थांचे कोणी नातेवाईक अजून जिवंत आहेत काय?

**उत्तर :** स्वामी रामांचे रक्तसंबंधी कोणी नव्हते. आम्ही सगळेच त्यांचे नातेवाईक आहोत. त्यांना दोन मुलगे होते. जेव्हा त्यांनी संन्यास घेतला त्यावेळी धाकटा मुलगा एक वर्षाचा होता व मोठा सात वर्षांचा. जेव्हा त्यांनी जगाचा निरोप घेतला त्यावेळी धाकटा माझ्या मांडीवर होता. त्यांच्यापैकी एकजण पतियाळा संस्थानात इंजिनियर होता. दुसरा बी.ए., एल.एल.बी. झाला होता. आता ते कुठे आहेत हे मला माहीत नाही. ते बेकार आहेत असे मी ऐकतो.

अनुक्रमणिका

**प्रश्न :** ते प्रत्यक्ष काही कार्य करीत होते काय? एकांतातून बाहेर येऊन तुमच्यासारखे कार्य करण्याचा त्यांनी विचार केला नाही काय?

**उत्तर :** ओ! त्यांच्याच आदर्शानुसार मी काम करीत आहे. राम कार्यमग्न असत, भलतेच कार्यमग्न असत. त्यांच्या आयुष्याच्या शेवटच्या क्षणापर्यंत ते कार्यमग्न होते. गंगेला स्नानासाठी जाण्यापूर्वी त्यांनी 'मृत्युला आवाहान' अशी एक कविता लिहिली. या ठिकाणी स्वामीजींनी ती मृत्यूची कविता गाऊन दाखविली. जेव्हा ते सपाट मैदानी प्रदेशावर येत, उदाहरणार्थ लखनौसारख्या ठिकाणी येत त्यावेळी ते अगणित लोकांशी बोलण्यात, त्यांच्याशी चर्चा करण्यात, त्यांना काही सांगण्यात गर्क असत. अशा रीतीने प्रत्येक क्षण ते कार्यात मग्न असत. कार्यमग्न हेच त्यांचे जीवन होते. ते स्वस्थ बसलेले कधी दिसले नाहीत. पर्वतावर असताना मात्र ते फारसे बोलत नसत. मला सुद्धा त्यांच्यापासून दूर राहावे लागे. आमच्या झोपड्या फार दूर अंतरावर होत्या. आम्ही जेवायच्या वेळी अथवा विशेष प्रसंगीच भेटत असू. मला जेव्हा काही समस्या कठीण वाटायच्या त्यावेळी स्वामीजी अगदी सहजपणे त्या समस्यांचा परिहार करायचे. नाहीतर एरवी आम्ही वाचन व लेखन करीत असू. आळशी संन्याशांचा स्वामी रामतीर्थ फार तिटकारा करायचे. संन्याशांनी मनाने, बुद्धीने आणि कृतीने अगदी समर्थ असले पाहिजे असे स्वामीजींना वाटत होते. हा उद्देश सफल करण्यासाठी वेदांती वसाहतीची त्यांची कल्पना होती. केवळ एक बुद्धिमान व्यक्ती म्हणूनच न राहाता संन्याशाने स्वतःला सर्व प्रकारचे काम करण्यास समर्थ बनले पाहिजे अशी स्वामींची इच्छा होती. केवळ सूक्ष्म असा बौद्धिक विषय समजून घेण्याचीच पात्रता संन्याशाजवळ असून चालणार नाही. तर त्याला जमिनीची लागवड करता आली पाहिजे. शेतात नांगर चालविता आला पाहिजे आणि हाताची विविध कामे करता पाहिजेत, याव्यतिरिक्त त्यांच्या मनाचे खूपच उन्नयन झाले असले पाहिजे. अमेरिकेत असताना वेदांत वसाहत स्थापन करण्याची आपली कल्पना जेव्हा त्यांनी बोलून दाखविली त्यावेळी एक महिला आपली पाच चौरस मैलाची आपली जागा स्वामींना घ्यायला पुढे आली, पण त्यांचा राष्ट्रवाद आड आला. ते म्हणाले इथे अमेरिकेत मी जर वेदांत वसाहत स्थापन केली तर अमेरिकनांना त्याचा लाभ होईल. भारतीयांना त्याचा लाभ घेता येणार नाही. भारतीयांना लाभ घेण्यासाठी ती वसाहत मला भारतातच स्थापन केली पाहिजे. पण ते हिंदुस्थानला परत आले. तेव्हा अशा तऱ्हेने जागा देणारा कुणी पुढे आला नाही. लोकांच्याकडून प्रतिसाद नव्हता. म्हणूनच शेवटी हिंदुस्थानला परत येण्यास मी फार मोठी चूक केली असे ते म्हणाले. ते जर अमेरिकेत राहिले असते तर खात्रीने त्यांनी असंख्य लोकांच्या मनाचे उन्नयन केले असते. अमेरिकेहून परत येण्यापूर्वी त्यांची योग्यता कुणाला फारशी जाणविली नव्हती. पण अमेरिकेहून परत आल्यानंतर मात्र लोक त्यांचा खूप आदर करू लागले. ते जर अमेरिकेला गेले नसते तर त्यांना जे स्थान प्राप्त झाले ते त्यांना मिळाले असते की नाही याबद्दल शंकाच वाटते. आम्हाला दुसऱ्यांच्या किंवा बाहेरच्या लोकांकडून दृष्टी प्राप्त होते, आपल्या स्वतःच्या लोकांना मान्यता देण्याची क्षमता हिंदुस्थानात नाही. स्वामी विवेकानंद, रामाच्या बाबतीत तसेच घडले व सध्या महात्मा गांधींच्या बाबतीत तेच घडत आहे. म्हणून आपल्या विचाराबद्दल, सिद्धांताबद्दल लोक तितका उत्साह दाखवीत नाहीत. असे जेव्हा स्वामीरामांना दिसून आले तेव्हा ते अरण्यात, वृक्षराईत जाऊन राहिले. त्यांना तेथे उत्कट आनंदाचा अनुभव आला. जेव्हा ते येथे असत तेव्हा ते सकाळपासून संध्याकाळपर्यंत कार्यमग्न असत. निष्क्रियता म्हणजे मृत्यू असे ते मानीत. असे माझे गुरू असल्यामुळे मी माझ्या आयुष्यातील बराच काळ इतका कार्यमग्न राहिलो असेन त्यात आश्चर्य नाही.

**प्रश्न :** त्यांनी एखादी मिशन (प्रचार संस्था) स्थापन केली नाही का?

अनुक्रमणिका

**उत्तर :** नाही. राम अशी मिशन स्थापण्याच्या विरुद्ध होते. त्या काळात अशा जितक्या संस्था होत्या त्या सर्व संस्थांतून आपण काम करतो असे ते म्हणत. "सर्वमिशन (संस्था) संघ माझेच आहेत" असे ते म्हणत. ब्रह्मसमाज किंवा प्रार्थनासमाज सारखे संप्रदाय सुरू करण्याची त्यांची इच्छा नव्हती. रामकृष्ण मिशनमध्ये एक दोष दिसून येतो. तो म्हणजे त्यांनी स्वतःला अतिशय संकुचित अशा क्षेत्रात कोंडून घेतले आहे. बाहेरच्या एखाद्या व्यक्तीने लिहिलेले एखादे लिखाण कितीही उत्तम असले तरी ते प्रकाशीत करणार नाहीत. तेच त्यांच्याच पैकी कुणी लिहिलेले लिखाण कितीही गचाळ असले तरी ते त्याला अधिक प्राधान्य देतील. रामकृष्ण मिशनचा संस्था म्हणून व संख्येच्या दृष्टीने कितीही व्याप वाढला असला तरी आध्यात्मिक दृष्टीने त्या संस्थेचा अधिक विकास होणार नाही. त्याचे कारण असे की त्या संस्थेच्या सदस्यांची स्वतःशी बांधिलकी आहे. खरे तर प्रचारकाच्या भूमिकेसाठी गरज आहे ती संपूर्ण निःसंगपणाची. हा दोष आपल्या प्रचार संस्थेत शिरेल अशी भीती रामांना वाटली. म्हणूनच खरंतर त्यांनी एखाद्या मिशनची स्थापना केली नाही. रामांचे हे तत्त्व जर तुमच्या संघाने अंगिकारले तर त्या संघाची भरभराट होईल.

**प्रश्न :** रामांच्या निधनानंतर त्यांची समाधी बांधली आहे काय?

**उत्तर :** नाही. तसा प्रसंगच आला नाही. जेव्हा रामाने आपले शरीर पवित्र गंगेला अर्पण केले तेव्हा मला थोड्या अंतरावर पाण्यावर तरंगत असलेले दिसले. मी ते बाहेर काढले. एका पेटीत ठेवले व ती पेटी गंगेच्या मुख्य प्रवाहात सोडून दिली. पहिल्यांदा गंगेच्या एका उपनदीत तो देह फेकला गेला. गंगा नदी नसती तर कदाचित समाधी बांधली जाण्याची शक्यता होती. तरी हरिद्वार येथे स्वामींचा एक संगमरवरी पुतळा आहे. आम्ही तो येथे आणू इच्छितो. येथे शहराबाहेर थोडीशी जमीन विकत घेऊन स्वामी रामांच्या वसाहतीच्या कल्पनेला मूर्त स्वरूप देऊन त्यांची इच्छा सफल करण्याचा प्रयत्न करू इच्छितो. पण आम्हाला सहाय्य करायला येणाऱ्या अनेक बांधवांवर ते अवलंबून आहे. आमच्या आवारातील मध्यभागी तो पुतळा ठेवू इच्छितो. तेथे अभ्यासकांचे स्वागत होईल. आणि इतर कामे चालतील. स्वामी रामाची इच्छा असेल तर हे करून घेतील, नाहीतर नाही. मी स्वतः त्या संबंधी उगीचच का धडपड करावी? ते काम झाले काय किंवा न झाले काय दोन्ही मला सारखेच. निदान इतके तरी होईल असे कोण सांगू शकले असते? आपल्या हातून काही गोष्टी होतात. तेवढेच करून मुक्त व्हा. कामात आनंद माना. माझ्या कामातील प्रत्येक क्षण मला उसळणारा आनंद देतो.

हृषीकेश येथे कुणा एका व्यक्तीला रामांच्या स्मरणार्थ एक आश्रम व एक ग्रंथालय काढायचे होते. त्यासाठी त्याने विनामूल्य एक भूखंड मिळविला. पण पुढे स्वार्थी उद्देशाने तो वागू लागला. आणि रामाश्रम या नावाने जरी तो आश्रम ओळखला जात होता तरी तो पुढे रामाचा आश्रम उरला नाही. कारण ती व्यक्ती महिन्याला केवळ पंचवीस रुपयेच आश्रमासाठी राखून ठेवू लागली. एवढ्यात आश्रमाचे काम चालू राहाण्याची अपेक्षा तुम्ही कशी करू शकणार?

स्वामीजींची स्मृती म्हणून स्वामीजी वापरीत असलेली एखादी वस्तू आम्हाला देण्याची मी नारायण स्वामींना विनंती केली. तशी एखादी वस्तू देण्यात त्यांना खूप आनंद झाला असता. पण स्वामी रामांच्या वस्तूंपैकी एकही वस्तू नसल्याबद्दल त्यांनी दिलगीरी व्यक्त केली. नारायण स्वामींनी स्वामी रामांच्या किती तरी वस्तू जपून ठेवल्या होत्या पण जेव्हा ते काश्मीरच्या महाराजांच्याकडे राहात असत तेव्हा एका नोकराने त्या वस्तू हरवून टाकल्या. त्या वस्तूमध्ये एका संगमरवरी दगडात तोंडात लोण्याचा गोळा असलेली बाळकृष्णाची एक लहानशी पण अतिशय सुंदर मूर्ती कोरलेली होती. स्वामी राम त्या मूर्तीला बाळकृष्ण

म्हणत असत. मग त्याच्या हाताने लिहिलेल्या काही टिपण वह्या आहेत. पण आम्ही त्या प्रकाशित करणार असल्यामुळे त्याही तुम्हाला देता येत नाहीत. तथापि स्वामीजींनी लिहिलेले काही कागदाचे तुकडे मी तुम्हाला देऊ शकेन. तुमच्या संघासाठी स्वामीजींचा संदेश तुम्ही मागताहात. त्या बाबतीत म्हणाल तर त्यांनी पुष्कळ संदेश दिले आहेत आणि ते सगळे तुम्ही वाचले आहेत. मी याहून अधिक काय देऊ शकेन? तरी पण तुमचा आग्रहच असेल तर तुमच्या संघातील बांधवांसाठी काही तरी टिपून देईन.

**प्रश्न :** स्वामी राम आपल्या सहयोग्यांसाठी खाजगीत काही भजने म्हणत होते काय?

**उत्तर :** नाही. त्यांच्यापाशी आतले वर्तुळ व बाहेरचे वर्तुळ असे काही नव्हते. ते मोकळेपणाने बोलत असत. केव्हाही कुणाचेही त्यांच्यापाशी स्वागत होत असे. तथापि एखाद्याला इतरांच्या उपस्थितीत आपले अंतःकरण उकलण्याचा संकोच वाटत असेल तर मात्र ती व्यक्ती स्वामी रामांना खाजगीरीतीने भेटू शकत असे. नाहीतर त्यांचे दरवाजे सर्वांच्याकरिता सदा उघडलेले असायचे. मी कितीतरी वर्षे त्यांचा निकटवर्ती होतो. तरी माझ्याविषयी किंवा इतरांच्या विषयी खास किंवा विशेष ओढ किंवा मनोभाव त्यांनी दाखविला नाही. रामांचे सर्वांवर प्रेम होते. राम सर्वांना बरोबर घेऊन राहिले आणि सर्वांमध्ये स्वतःला त्यांनी विलीन करून घेतले होते. त्यांच्या हृदयात विशेषत्वाला काही वावच नव्हता.

मी काश्मीर धामाहून परत येत असताना धन्नमलने मला त्याच्या घरी उतरायला सांगितले आणि स्वामी रामांनी त्याला लिहिलेली ११०० पत्रे दाखविली. मी त्यांपैकी तीनशे पत्रे निवडली आणि ती प्रकाशित केली. दुसरी पत्रे खाजगी होती. तो मनुष्य फार गरीब होता. म्हणून त्यांनी ती पत्रे एका गाडग्यात ठेवली होती. एका सूक्ष्मदर्शक भिंगातून त्या पत्रांवरच्या तारखा मी ओळखू शकलो. धन्नमल धातूची भांडी घडवीत असे. स्वामी रामांचे वडील त्याच्या दुकानात जात असत व कधी कधी काही विकत घेत असत. अशा रीतीने त्यांच्यामध्ये दोस्ती वाढत गेली.

दुपारी स्वामीजींनी जेवणानंतर आम्हाला त्यांच्या संघाच्या कार्यालयात नेले. मी रामाची काही पुस्तके आणि फोटो विकत घेतले. दुपारी अडीचच्या सुमारास त्यांच्या संघाच्या काही सदस्यांना एकत्र बोलावून घेतले व हार्मोनियमच्या (पेटी) साथीवर 'राम वर्षा' मधील काही भजने गाऊन दाखविली. स्वामीजी स्वतःच पेटी वाजवीत होते. आधी ते स्वतः भजन म्हणत होते व मग आम्ही त्यांच्यामागून म्हणत होतो. तीन गाणी म्हटल्यानंतर आम्ही त्यांना 'अल्विदा' म्हणायला सांगितले. अतिशय प्रभाविपणे त्यांनी ते गीत म्हटले. त्यांच्या मागून आम्ही त्याची पुनरावृत्ती केली. हे झाल्यानंतर मी स्वामीजींना स्वामी रामांच्या मृत्यूसंबंधी खरी हकीगत काय असे विचारले. स्वामीजी म्हणाले "दीपावळीच्या अमावस्येचा तो दिवस होता. त्या दिवशी स्वामी रामाने आपल्या नोकराला त्याचे जेवण झाले काय असे विचारले. स्नान केल्यानंतर आपण जेवू असे त्याने सांगितले. सामान्यपणे तो स्वयंपाकी दररोज स्नान करीत नसे. म्हणून स्वामी रामांना त्याच्या उत्तराचे आश्चर्य वाटले आणि त्याच दिवशी स्नान करण्याचा त्यांनी का विचार केला असे त्याला विचारले. त्यावर त्या नोकराने असे उत्तर दिले की, आज सणाचा शुभदिवस आहे म्हणून स्नान केल्याशिवाय मी जेवणार नाही. मग स्वामी म्हणाले "तसं असेल तर आज मी सुद्धा घरी स्नान करणार नाही (कित्येक दिवसापासून स्वामी घरीच स्नान करीत होते) तर पवित्र गंगेतच स्नान करीन" म्हणून स्वामी राम गंगेला स्नानाला गेले. त्यांचा नोकरही त्यांच्याबरोबर गेला. स्वामीराम व्यायाम करीत होते. त्यावेळी नोकरानेच प्रथम स्नान केले. त्यानंतर स्वामी नदीत उतरले. ते नेहमी खोल पाण्यात स्नान करीत असत. पण ते कधीच वाहत्या प्रवाहात जात नव्हते. पोहण्यात ते तसे तरबेज नव्हते. त्यावेळी शरीराने ते फार

अशक्त झाले होते. ज्या दगडावर ते उभे होते त्या दगडाखालची वाळू वाहून गेली आणि ते प्रवाहात फेकले गेले. प्रवाहात वाहात चालले असता दहा मिनिटे काठावर येण्यासाठी फार धडपड केली. पण लगेच ते एका मोठ्या भोवऱ्यात आले. त्या भोवऱ्यात गटांगळ्या खाऊ लागले. ते बाहेर येऊ शकले नाहीत. ते पाण्यात बुडाले व तळाशी गेले व थोड्या अंतरावर वर आले. प्रवाहाच्या मध्यभागी आले. काठावर येण्यासाठी त्यांनी पुन्हा पुन्हा खूप प्रयत्न केले. पण ते व्यर्थ ठरले. सरते शेवटी ते म्हणाले हे शरीर जर कोणत्याच काठाला जाऊ शकत नसेल तर ते प्रवाहात जाऊ दे. म्हणून त्यांनी स्वतःला मुक्तपणे वाहून जाऊ दिले. जेव्हा शरीर हेलकावे खात पाण्यावर तरंगत होते त्यावेळी ॐ मंत्र जोराने म्हणू लागले. काही अंतरावर प्रवाह एका भोवऱ्यात शिरला. रामानी तिकडे झेप घेतली आणि त्यांचे शरीर खाली गेले. एक आठवडाभर शरीर पाण्याच्या पृष्ठभागावर आले नाही. शरीर वाहून जाऊ नये म्हणून एक जाड दोर प्रवाहात बांधण्यात आला. सात दिवसानंतर अरुणोदयापूर्वी पहाटे तीनच्या सुमारास त्यांचे शरीर वर आले. त्यावेळी शरीर बाहेर काढणे शक्य नव्हते. सकाळी ते बाहेर काढण्यात आले. शरीर फुगले होते. त्यांचे एक फुफ्फुस जलचरांनी कुर्तडून खाऊन टाकले होते. म्हणून त्या शरीरात प्राण फुंकण्याचा प्रयत्न व्यर्थ होता. भाई पुरणचे प्रयत्न व्यर्थ ठरले.

स्वामी रामाच्या जाण्याने आता सुद्धा हानी झाल्याची जाणीव होते का असे मी स्वामीजींना विचारले. त्यांनी तात्काळ नाही असे उत्तर दिले. त्यावेळी सुद्धा मला तसे वाटले नाही. त्यावेळी मी रडलो सुद्धा नाही. घरी परत येताना मात्र माझे अश्रू मी आवरू शकलो नाही. मृत्युला उद्देशून लिहिलेला मजकूर मला आढळला. साश्रू नेत्रांनी मी चुटपटलो. 'यानंतर कोण बरे असे सुंदर लेखन करील.' मला प्रत्येक ठिकाणी स्वामी राम दिसतात. नाही तरी शरीर म्हणजे काय असते? शरीर हे नगण्य आहे. प्रत्यक्ष शरीराने आमच्यामध्ये होते. त्यापेक्षा शरीराबाहेरचे राम मानवजातीची अधिक सेवा करीत आहेत. तुमच्या गुरूंनी रामाला पाहिले आहे काय? नाही, तुम्ही सुद्धा पाहिले नसणार पण किती उत्तम रीतीने ते काम करीत आहेत ते पाहा.

रात्री स्वामीजींशी बोलताना आम्ही आमच्या संघाला कोणते स्वरूप दिले नाही, असे त्यांना सांगितले. देशातील आमचा भाग हा मागासलेला आहे. आणि जर लोकांना हे कळले की, आपली मुले सर्वसंगपरित्यागाचे ध्येय असलेल्या संस्थेचे सदस्य आहेत तर लोकांना ते सहन होणार नाही. म्हणून संघाची कोणाला माहिती नाही. त्यावर स्वामीजी म्हणाले की, संघाची माहिती नाही हे फारच चांगले झाले, कारण त्यामुळे खऱ्या स्वरूपाचे काम होऊ शकेल. संघाचा लाभ झाला असे नाही पण तो लाभ कुणाला दाखविला गेला नाही. व्यवहारिक दृष्टीने जर विचार करता संघ जर निजाम स्टेटच्या बाहेर नेला तर बरे होईल. त्यामुळे एका संस्थानिकाच्या लहरीला बळी पडणार नाही. एतद्देशीय राजे, राजवाडे आपल्या स्वार्थी उद्दिष्टांसाठी कशाचाही बळी घेतील.

मी नंतर त्यांना असे कळविले "आम्ही संघाला स्वामी रामांच्या कल्पनेनुसार वेदांतिक वसाहतीचेच रूप देऊ इच्छितो आणि मग त्याचा विकास त्यांच्यावरच राहील." मी पुढे म्हणालो "त्यांच्या इच्छेप्रमाणेच आमचे रूप बनत जाईल आणि आमच्याकडून कार्य करून घेतले जाईल." नवा कच्चा माल उत्तमातला उत्तम तेथे तयार आहे. त्याचा उत्तमरीतीने उपयोग करणे हे त्यांच्यावर अवलंबून आहे.

आमच्या गावी नदीकाठ आहे काय? असे स्वामीजींनी विचारले. मी नाही म्हणून उत्तर दिले. मग त्यांनी विचारले की, आम्ही आमच्या संस्थेसाठी असे स्थळ का निवडले? मी त्यांना सांगितले की, ते गाव

अनुक्रमणिका

त्या संस्थेच्या संस्थापकांचे आहे. त्यांच्या बंधूंनी आपली सर्व मालमत्ता संस्थेला समर्पण केली आहे. ही संस्था आमच्या संघासाठी एक प्रयोगशाळा बनली आहे. आम्ही फार थोडे नोकर ठेवले आहेत. रोजचे झाड-लोट, भांडी-धुणी असले दैनंदिन काम आम्हीच करतो. आम्ही रामाची शिकवणूक ऐकतो आणि वाचतो व आचरणात आणतो. आम्ही धर्मातीत शिक्षणाच्या नावाखाली विद्यार्थ्यांना धार्मिक शिक्षण देऊन त्यांना मानवतेच्या मुक्त सेवेसाठी तयार करीत असतो आणि त्यांच्या मनात धर्मातीत शिक्षणाच्या बुरख्याखाली राष्ट्रीयतेची ज्योत प्रज्वलीत करीत असतो. असे केले नाही तर पालक त्यांच्या मुलांना आमच्याकडे पाठविणार नाहीत. थोडक्यात मी त्यांना सांगितले “आम्ही पालकांना फसवीत आहोत.” ते फसविणे नव्हे, फसवणूक ही मुलतः वाईट गोष्ट नाही. फसवणुकीचा दुरुपयोग करण्याचा मात्र निषेध केला पाहिजे. मी आणि तुम्ही आणि सगळेजण प्रत्येक क्षणी फसवीत आहोत. उदाहरणार्थ मी परमेश्वर आहे. याची खात्री झाली असताना सुद्धा मी म्हणजे शरीर आहे आणि मी म्हणजे श्रीयुत अमुक अमुक आहे असे म्हणतो. आमच्या दृष्टीकोणातून जग आम्हाला फसवीत आहे, आणि जगाच्या दृष्टीकोणातून आम्ही जगाला फसवीत आहोत. फसवणुकीची भीती बाळगू नका; “ही फसवणूक नव्हे.” असे स्वामीजींनी तात्काळ उत्तर दिले.

❑❑

अयोध्या

१६-५-३१. शनिवार

गु. काकांचे चरणी

गुरूभक्ताचा साष्टांग नमस्कार

गुरूभक्ताचा साष्टांग नमस्कार,

कालच्या पत्रात लिहिलेल्याप्रमाणे सविस्तर हकीकतीचे पत्र धाडीत आहे.

परवा संध्याकाळी गुरुवारी ७-३० वाजता. उद्या लखनौ सोडणार म्हणून शहरातील काही प्रेक्षणीय स्थळे होती ती पाहून आलो. आम्ही बिऱ्हाडी आलो व चार पाच मिनिटे लोटली असतील नसतील स्वामीजी बाहेर जाण्यास निघाले. बरोबर त्यांचा एक devotee (भक्त) होता. आम्ही फिरून आलो काय अशी त्यांनी चौकशी केली. व ते बाहेर गेले. हे पाहून आम्ही आत गेलो व आमचा कार्यक्रम आखण्यात मग्न झालो. पंधरावीस मिनिटे झाली असतील, आम्हाला निरोप आला. “स्वामीजी बुला रहें हैं.” मी व मोहन ताबडतोब त्यांजकडे गेलो. आम्ही निजावयाच्या जागी खाटेवर ते लवंडले होते. आम्ही गेल्यावर शिवो ऽ ऽ हं म्हणून त्यांनी नमस्कार केला. त्यांच्या चर्येवरून व वृत्तीवरून काही तरी गोष्ट त्यांना विचारावीशी वाटते असे निश्चित वाटले. प्रथम त्यांनी शाळेसंबंधी माहिती विचारली. ती सांगत असता ब्रिटिश मुलुख किती लांब आहे, व्यवस्था कशी आहे, विद्यार्थी किती आहेत, खर्च काय येतो, आर्थिक व्यवस्था काय आहे. वगैरे गोष्टी विचारल्या व मीही त्यांची समग्र माहिती दिली व विद्यार्थ्यांचा सर्वसाधारण दिनक्रम सांगितला. शाळेवरून संघावर गोष्टी गेल्या. संघाविषयी माहिती त्यापूर्वीच त्यांना पुष्कळ झाली होती. त्यांनी विचारले “जर संघाच्या सभासदांचा त्यांच्या संपत्तीवर अगर इष्टेटीवर हक्क नाही तर संघाच्या मालकीची सर्व संपत्ती झाली आहे काय?” “मी म्हटले, “नाही.” अद्याप बहुतेक सर्व सभासदांचे पालक हयात असल्याकारणाने मालमत्ता हाती आलेली नाही. परंतु ती हाती येताक्षणीच संघाला मिळेल. संघाच्या काही सभासदांना मालमत्ताच नाही. एकाने संघाला आपली सारी इष्टेट दिली आहे व इतर काही थोड्याच अवधीत देतील.

अनुक्रमणिका

वरील माहिती सांगत असताना संस्थेत संघाची किती मंडळी काम करतात हे सांगत होतो. सांगता सांगता संस्थेतील विद्यार्थी, विद्यार्थी नसून परमात्मा निराळे रूप धारण करून आला आहे व त्याचीच आम्ही सेवा करीत आहो. ह्या शुद्ध भावनेने आम्ही सर्व काम करतो. त्या सेवेपासून आम्ही कोणत्याही तऱ्हेची अपेक्षा ठेवली नाही. मोबदला आम्ही मागतच नाही. आनंदाचीसुद्धा अपेक्षा नाही. पण तो अनायासे मिळतो असे मी म्हणालो. व असे म्हणताना पूर्णवृत्ती होती. स्वामीजी अत्यंत लक्षपूर्वक ऐकत व पाहात होते. हे ऐकल्यावर That is beautiful (सुंदर, फार सुंदर) असे ते म्हणाले व बराच काळ अगदी शांत पडून राहिले. मी अजून काही सांगतच होतो. परंतु स्वामी ऐकेनासे झाले हे पाहून मी थांबलो. मला वाटते की स्वामीजींना झोप लागली. परंतु ते तसे नव्हते. स्वामीजी विचारात पूर्ण गढून गेले होते. ते एकदम मला म्हणाले "How aged is your preceptor?" (गुरू) (तुमचे गुरूंचे वय काय?) मी उत्तर दिले "He is only 33 years old" (ते फक्त ३३ वर्षांचे आहेत) ते पुन्हा बराच वेळ विचारात मग्न होते. आता गोष्ट धसाला छान लागली हे पाहून मी बोलू लागलो. कारण स्वामीजी ऐकण्याच्या पूर्ण अवस्थेत होते. "He is not only so young but though he has not read any book on vedanta, he can give best teachings of vedant. He has not even read Ramas works. But he can reproduce all of Ramas philosophy. It is not only 8 or 9 years that he began teaching Vedanta. Before that he was nothing." (ते इतके तरुण आहेत इतकेच नव्हे तर, स्वामीजी, त्यांनी वेदांतावर एकही पुस्तक वाचले नसतानाही वेदांत ते उत्तम शिकवू शकतात. त्यांनी रामाची पुस्तकेसुद्धा वाचली नाहीत. पण रामाचे तत्त्वज्ञान हुबेहुब सांगू शकतात, केवळ आठ नऊ वर्षांपासून ते वेदांत शिकवतात. त्यापूर्वी ते काहीच नव्हते.

हे ऐकून स्वामीजी चकित झाले व म्हणाले "What? He has not read any thing? Do you mean to say what he gives out is all inspired?" (काय! त्यांनी काहीच वाचले नाही? ते जे सांगतात ते सर्व उत्स्फूर्त आहे असे तुम्हाला म्हणायचे आहे काय?)

"Exactly so" (अगदी तेच) असे मी चटकन उत्तर दिले. "Are any of his writings published?" (त्यांचे काही लिखाण प्रसिद्ध झाले आहे काय?) "No, not only that he has not written anything nor any of his speeches have been published but he is not even known as a religious teacher. At the most, the people of that part know him as a self sacrificing man, doing whatever he can in the field of education and trying his utmost for the upliftment of his countrymen. He is popularly known as the superintendent of the High School." स्वामीजी तेव्हा म्हणाले "He is not only the superintendent of the school but also the superintendent of the Hearts" मी व ते दोघेही खूप मोठ्याने हसलो. संघाच्या लोकांच्या Sincerity, Honesty, Truthfulness (सचोटी, प्रामाणिकपणा, व सत्यता) वगैरेबद्दल काहींच शंका नाही असे ते म्हणाले. नंतर आम्ही त्यांच्या बैठकीच्या जागी गेलो. स्वामीजी विचारात पूर्ण मग्न होते. आम्ही समोरासमोर खुर्चीवर बसलो. मध्ये एक टेबल होते. एकमेकांच्या चेहऱ्याकडे सूक्ष्म दृष्टीने आम्ही पाहात होतो. दहाबारा मिनिटे त्या अवस्थेत गेली. नंतर स्वामीजी बोलू लागले. "Inform your preceptor that I am over joyed to know the constitution and the aim of your sangh and that I am one amongst you, Though physically at a great distance, I am ever present there in spirit. After all, it is not a question of physical body. The law that like comes to like is true and the minds on the same plane of development are naturally dragged together. My heart is with him." (तुमच्या गुरुजींना सांगा की तुमच्या संघाची घटना आणि उद्देश पाहून मला अतिशय आनंद झाला आहे. शरीराने मी जरी दूर असलो तरी मी

अनुक्रमणिका

तुमच्यापैकी एक आहे असे त्यांना सांगा. मी मनाने सदैव तेथेच आहे. नाही तर ही भौतिक शरीराची संवेदना नाही. समान वस्तू समान वस्तूकडे येते हा नियम खरा आहे. आणि तसेच विकासाच्या समपातळीवरील मने स्वाभाविकपणे एकमेकांकडे खेचली जाऊन एकत्र येतात. माझे मन त्यांच्याबरोबरच आहे.)

स्वामींजींबरोबर दोन-तीन दिवसांत माझे जरी पुष्कळ संभाषण झाले होते तरी पण आपण दिलेला बुक्का त्यांना द्यावा असे अद्याप वाटले नाही. मोहनने मात्र त्याबद्दल दोन-तीनदा हटकले पंरतु मी म्हणालो "मला जेव्हा खरे द्यावे वाटेल तेव्हा देईन. आणि जर मुळीच वाटले नाही तर देणारही नाही." पण वरील उद्‍गार काढताना त्यांची जी अवस्था होती त्याबरोबर खूप आनंद झाला व त्या भरात म्हणालो "Swamiji, my preceptor has given you something as token of love" "oh! yes then fetch it" स्वामीजी माझ्या गुरूंनी आपणासाठी प्रेमाची खूण म्हणून काही तरी दिले आहे. अरे वा! छान, मग ती इकडे आणा असे ते म्हणाले. मी चिं. मोहन यास बुक्याची डबी आणण्यास सांगितले. मोहन गेल्यावर मी बोलू लागलो. "I have invited you to come there on the sankranti day simply because I am to be initiated into sanyasa that day. If you feel that you should come there earlier you are quite welcome anytime." Swamiji said. "It is no question of welcoming me it is a question of this body being dragged there. This body has been entirely given to the charge of DIVINITY and I have no control over it. Whenever He will it goes. Who could say that it would remain here for a great number of years in a place like lucknow which is quite unadaptable to its temper. Rama has worked through this body and is working still. If he wills, I am sure to be there (Hipparge) I may be here or there there is no question of body." (मी आपणास संक्रातीच्या दिवशी तेथे येण्याचे निमंत्रण एवढ्यासाठीच दिले आहे की, त्या दिवशी मला संन्यास दीक्षा घ्यायची आहे. त्या आधी आपल्याला यावे असे वाटले तर केव्हाही आपले स्वागत आहे. त्यावर स्वामीजी म्हणाले "माझ्या स्वागताचा हा प्रश्न नाही. प्रश्न आहे या शरीराला तेथे ओढून घेऊन जाण्याचा. हे शरीर पूर्णपणे त्या दैवीशक्तीच्या ताब्यात आहे. माझा त्याच्यावर ताबा नाही. जशी परेमश्वराची इच्छा तशी हे हालचाल करणार. जिथे या शरीराच्या प्रवृत्तीला प्रतिकूल वातावरण आहे या लखनौसारख्या ठिकाणी इतकी वर्षे मी राहू शकेन असे कोणी सांगू शकला असता का? या शरीराद्वारे रामच सगळी क्रिया घडवून आणतो. आतासुद्धा तो रामच ती क्रिया करीत आहे. आणि जर रामाची इच्छा असेल तर निश्तिच मी हिप्परग्यास येईन. मी येथे असलो काय न् तिथे असलो काय, शरीराचा प्रश्नच नाही.") असे म्हणून विदेहावस्थेत ते शांत बसले.

माझे अंतःकरण प्रेमाने दाटले व डोळे अश्रूंनी चिंब झाले होते. इतक्यात मोहन आला. स्वामीजींनी डोळे उघडले व माझे अश्रू पाहिले व त्यांच्याही अंतःकरणात खूप प्रेम भरून आले व त्यांनी पुन्हा डोळे मिटले. काही काळ असा गेला. "I cannot check my tears to know that you say you are one amongst us openly Swamiji" आपण आमच्यापैकीच एक आहात असे जाहीरपणे सांगत आहात. ते ऐकून माझ्या अश्रूंना मी रोखू शकत नाही. हे ऐकून स्वामीजींना आपला हुंदका आवरला नाही. वस्तुतः आम्ही त्यांचा अखेरचा निरोप घेण्यासाठी आलो होतो. परंतु त्यांच्या एकंदर चेहऱ्यावरून आम्ही इतक्यात जाऊ नये असे त्यांना वाटलेसे दिसले व ते म्हणाले "Have you settled your programme? व मी "No Sir" (तुम्ही तुमचा कार्यक्रम निश्चित केला आहे का? 'नाही महाराज' मी उत्तर दिले. नंतर ते म्हणाले,) "Come to Hrishikesh with me so that the idea still lurking in my mind may be cleared up." (माझ्याबरोबर हृषीकेशला चला म्हणजे अजूनही माझ्या मनात घोळत असलेली कल्पना स्पष्ट करता येईल.)

अनुक्रमणिका

नंतर मी बुक्याची डबी घेतली व ती उघडून त्यातील बुका त्यांच्या कापाळाला लाविला. व त्यांनी माझ्या कपाळाला लाविला व आम्ही एकमेकांच्या पाया पडलो नंतर ते म्हणाले “Have you got another pot” (डबी)? (तुझ्याकडे आणखी एक डबी आहे का?) मी नाही म्हटले “You can keep it for you” (तुम्ही ती ठेऊन घेऊ शकता) असे मी म्हणालो “Yes, very well, but I want you to take back a portion of it.” (बरं, ठीक आहे. पण तुम्ही त्यातील थोडेसे ठेऊन घ्यावे. अशी माझी इच्छा आहे.) असे म्हणून एका पाकिटात डबीतला काही बुका घालून तो मला दिला. इतक्यात त्यांचा एक शिष्य आला व त्याने विचारले “स्वामीजी, ये कपाल पर क्या है?” स्वामीजींने उत्तर दिले “इन्ह लोगोने कुछ प्रसाद लाया है. ये डबी लो और ऊपर पूजा स्थान में रखो.” नंतर स्वामीजी मला म्हणाले “Have you seen my पूजास्थान? You can see it when you come again” (तुम्ही माझे पूजास्थान पाहिले आहे का? तुम्ही पुन्हा जेव्हा याल, तेव्हा पाहू शकता) असे ते म्हणाले. नंतर त्यांनी आम्हाला अयोध्या, बनारस, आलाहाबाद वगैरे ठिकाणी पत्रे लिहून दिली व त्यांच्या पाया पडून आम्ही रात्रीपुरता त्यांचा निरोप घेतला. दुसरे दिवशी येथे आलो. आमची व्यवस्था फारच छान आहे. प्रवासाचा काहीच त्रास नाही. सर्व डायरीत लिहीत आहे. प्रत्यक्ष भेटीअंती पुष्कळ सांगायचे आहे. पण मुख्य व महत्त्वाचा प्रसंग कळवला आहे.

आपला
*गुरूभक्त.*

❑❑

२१ मे १९३१.

गुरुभक्तांनी पुनः गुरुवारी रात्री स्वामीजींशी बोलायला आरंभ केला. गुरुभक्तांनी प्रथम विचारले, ‘स्वामीजी, गेल्या खेपेला तुमच्यापासून निघालो, त्या वेळी आपल्या मनात घोळत असलेल्या विचारांना स्पष्ट रूप देण्याच्या दृष्टीने मी आणखी काही काळ येथे राहावे असे तुम्ही म्हणाला होता.” स्वामीजींनी उत्तर दिले, “होय, मला तुम्हाला दोन गोष्टी सांगायच्या आहेत. पहिली आणि अत्यंत महत्त्वाची म्हणजे तुमच्या संस्थेची जागा बदलून निझाम प्रांताच्या बाहेर कोठे तरी ती घ्यावी, ही एक व्यवहार्य सूचना आहे. दुसरी गोष्ट ही की, जर स्वामी रामांच्या नावाने एखादी प्रचार संस्था (मिशन) काढावयाचे मी ठरविले असते तर मी मागेच काढली असती. पण स्वामी रामांचा त्याला विरोध होता. सध्याच्या प्रचार संस्थांतून संप्रदायिकतेचा दोष शिरलेला आहे. रामकृष्ण मिशनमध्ये सुद्धा हा दोष आढळतो. या सर्व मिशन्समध्ये एक प्रकारच्या संकुचित मनोवृत्तीचा प्रादुर्भाव झालेला दिसतो. स्वामी रामांच्या नावावर अशा संकुचित दृष्टीची मिशन काढण्याची आमची इच्छा नाही. स्वामी रामांची तत्त्वे बिंबविण्याच्या दृष्टीने सर्व प्रकारांच्या आणि सर्व पंथांच्या लोकांचा समावेश करू शकणारी एखादी प्रचार संस्था निघाली तर निश्चितपणे त्याचे स्वागत करतो आणि त्या संस्थेच्या कार्यासाठी मी माझी सर्व शक्ती लावायला तयार होईन. स्वामी राम सर्व विश्वाकरिता होते आणि म्हणून आपण सांप्रदायिक बनणे चुकीचे आहे. प्रेम, शुद्ध प्रेम, यातच आम्ही जगतो. तरी पण या दिशेने आपण काही तरी केलेच पाहिजे. स्वामी रामांच्या नावाने ज्या निरनिराळ्या संस्था काम करीत आहेत. त्या सगळ्या एका केंद्रीय संघटनेखाली एकत्र आणण्याची आज वेळ आली आहे. या निरनिराळ्या संस्थांच्यावर केंद्रीय संघटनेचे नियंत्रण असणे आवश्यक आहे. सध्या त्या संस्था विखुरलेल्या आहेत. त्यांच्या मालमत्तेवर नियंत्रण नाही. ही एक माझी सूचना आहे. या दृष्टीने तुम्ही काही प्रयत्न करावा असे मला वाटते.

२२ मे १९३१

हृषीकेशला जाताना स्वामीजी आम्हाला म्हणाले, “हे बघा बंधू, तुमच्या गुरुजींना आपल्या अंतःकरणामध्ये माझ्याकरिता थोडी जागा ठेवायला सांगा. प्रत्यक्ष भेटण्याचा प्रश्न येत नाही. पुढे केव्हांतरी आपण प्रत्यक्ष भेटू या. आपल्या अंतःकरणात आध्यात्मिक पातळीवर आम्ही भेटत आहोत.

“दिल के आयने में रखी है तसबीरे यार ।
झट्से गरदन झुका दे और देख लें. ।”

प्रेमाच्या माणसांची प्रतिमा ही अंतःकरणातच साठविलेली असते. तुमची नजर थोडीशी अंतरंगाकडे वळवा म्हणजे तुम्हाला सुंदर वस्तू दिसेल. अशारीतीने अंतःकरणच आपल्या भेटीचे ठिकाण असते. प्रत्यक्ष शरीराने भेटण्यापेक्षा आपण आध्यात्मिक पातळीवर भेटत जाऊ.”

आर. एस. स्वामीनारायण.

❑❑

अनुक्रमणिका

हिप्परगे
१५-६-१९३१.

परम पूज्य भगवत्पाद,

माझ्या गुरूंच्या सांगण्यावरून मी हे पत्र आपणास लिहीत आहे.

८ जूनच्या सुमारास मी येथे येऊन पोचलो. माझा सगळा प्रवास सहज सुखाचा झाला. येथे आल्यानंतर शाळा सुरू होण्यापूर्वी करावयाची पुष्कळ कामे तुंबून बसली होती. माझे गुरुजी आणि त्यांचे साथीदार निरनिराळ्या विभागांची व्यवस्था करण्यात पूर्णपणे गुंतले होते. त्यामुळे लखनौ येथे आपल्यात व माझ्यात जी चर्चा झाली ती चर्चा त्यांना कळविण्यात मला वेळच मिळाला नाही. तरी थोडक्यात एक-दोन मुद्दे त्यांना मी सांगितले. एका आठवड्यानंतर त्यांचे काम संपल्यानंतर त्यांना हायसे वाटले व त्यांना वेळ मिळाला. स्वामीजी, आम्ही आपलेच बंधू असल्यामुळे आम्ही कट्टर कर्मयोग्याच्या मुशीत ढाळले जात आहोत यात आश्चर्य नाही. आज सकाळी माझे गुरूजी काही कामासाठी बाहेरगावी गेले.

आपला
*गुरुभक्त*

रात्री सुमारे ९-१५ चे सुमारास स्वामीजी बाहेरून परत आले. त्यांनी आम्ही आलो आहो की काय त्याची चौकशी केली. गुरुभक्त जाऊन लगेच त्यांच्या पाया पडला व त्यांच्या तोंडून उद्‌गार निघाले “I am so very glad to see you swamiji” (आपली भेट घेताना मला खूप आनंद होतोय स्वामीजी) स्वामीनी शिवो ऽ हं, हरि, ॐ नारायण म्हणून त्याचा स्वीकार केला व आत नेले.

स्वामीजींच्या प्रथम दर्शनानेच मन बरेच प्रसन्न झाले. तेव्हा पूर्वी उद्‌भविलेल्या साऱ्या शंका कुशंका तर नाहीशा झाल्या. बैठकीच्या जागी आल्यावर स्वामीजींची मूर्ती पाहता आली. चेहऱ्यावर पूर्ण आनंद व्यक्त होत होता. तेजःपुंज भाळप्रदेश व प्रखर वैराग्य चटकन समजून येत. प्रथमपासूनच स्वामीजीविषयी आपलेपणा व प्रेम वाटू लागले व तेही एखाद्या बऱ्याच दिवसाच्या सलगीच्या मित्रांशी ज्या मोकळ्या मनाने बोलावे तसे बोलत होते. स्वामीजींचे दर्शन तर झाले. त्यांच्याविषयी आदर व पूज्य भाव वाटू लागला. पण अश्रू आले नाहीत. “मग कसली झाली भेट”. असे म्हणून गुरुभक्ताला बरेच वाईट वाटले. पण पुनः विचार आला “अद्याप भेट पुढेच व्हायची आहे. सध्या नुसत्या स्थूल देहांची भाषा चालू आहे. सूक्ष्म देह जेव्हा परस्परांशी बोलू लागतील तेव्हा खरी भेट होईल.” असा विचार करून गुरुभक्त स्वस्थ बसला.

स्वामीजींनी प्रथम पाऊण एक तास स्वतः विषयींची माहिती सांगितली. त्यांना संन्यास घेऊन ३१ वर्षे झाली. आपल्याला जे काही मिळाले ते रामाच्या कृपेमुळे. आता सुद्धा त्यांच्या हातून घडते ते सारे रामाच्या प्रेरणेनेच असा त्यांचा विश्वास आहे. त्यांची वृत्ती सहज व उल्हसित आहे. बोलताना अगदी लहान मुलाप्रमाणे बोलतात. आवाज अत्यंत प्रेमळ पण डौलदार आहे. उंच व भव्य देहयष्टीने त्यांच्या डौलात भर पडली आहे. नाक सरळ आहे. त्यांचा भगवा संन्यास वेष फारच खुलून दिसतो. कार्य करीत असता त्यांचे सर्व लक्ष कामातच असते. त्यांना स्वस्थ बसलेले कधी पाहिले नाही. गुरुभक्ताने एकदा सहज त्यांना विचारले. आपण ध्यानधारणा करण्यासाठी काही ठराविक वेळ राखून ठेविला आहे का? तेव्हा त्यांनी उत्तर

दिले “माझा प्रत्येक क्षण उच्च अशा ध्यान धारणेंत जातो.” Every moment is of deep meditation’ त्या वेळेची स्वामीजींची अवस्था गुरुभक्ताच्या अंतःकरणात जशीच्या तशी उमटली आहे. वाटले संन्याशी व्हावे तर नारायणस्वामीसारखे व्हावे. सेवाच सेवा, स्वामीजी म्हणाले. वरवर पाहणाऱ्याला वाटते आम्ही त्या भानगडीत पडून जगाचा व्याप वाढवितो व विनाकारण उपाधीग्रस्त होऊन त्रास करून घेतो. परंतु जेवढ्या उपाधी जास्त तितका आमचा आनंद दुणावतो. जे क्षण त्या लोकांना पूर्ण दुःखमय वाटतात तेच क्षण आमच्या उच्च ब्रह्मानंदाचे असतात. जेव्हा आपणच सर्व होतो तेव्हा सेवा ही भावनाच राहत नाही. “मी दुसऱ्याची सेवा कधीच केली नाही. हे सारे माझे स्वतःचे काम आहे.” “When I become one with all, there is no point of serving humanity. I am serving myself”. स्वामीजींनी कर्मयोगावर सुदंर संभाषण केले. परंतु संघाला त्यात काही नवीन वाटणार नाही. म्हणून गुरुभक्ताला लिहिणे बरे वाटत नाही.

गुरुभक्ताने संघाविषयी बरीच माहिती दिली व तो संघाच्या एका जबाबदार व्यक्तीला व संघाच्या तत्त्वाला, रूपाला साजेल अशा पद्धतीने, वृत्तीने दिली. स्वामीजींना जेव्हा येण्याचे निमंत्रण दिले व गुरुभक्ताच्या संघात रामासाठी अहर्निश अश्रू ढाळणारे किती तरी साधू आहेत असे सांगितले. त्यावेळी गुरुभक्ताच्या डोळ्यात अश्रू आले व त्या क्षणीच वाटले आपण नारायणस्वामींचे आता खरे दर्शन घेतले.

स्वामीजींच्या सहवासात बराच काळ गेल्यानंतर वाटू लागले, “आपण आता अजून कितीतरी गोष्टी साधायच्या आहेत. आतापर्यंत संघाविषयी एक प्रकारचा अभिमान व मोठेपणा वाटत असे. कर्मयोग मूर्तिमंत माझ्या संघात आहे. संघाच्या सारखी मंडळी बाहेर पाहाण्यास मिळणार नाहीत अशी भावना होती. पण स्वामीजींना पाहून ही सारी अहंता गेली. मन अत्यंत लीन झाले. पण पुनःविचार आला माझा संघ अजून Secural education (धर्मातीत शिक्षण) मध्ये मागे असेल पण Spiritual development (आध्यात्मिक विकासामध्ये) नारायणस्वामींच्या तोडीचे कितीतरी माझे बंधू आहेत. आनंद हा माझ्या संघाच्या दारी लोळतो आहे असे विचार गुरुभक्ताच्या डोक्यात घोळत होते.

नारायणस्वामींना एकदा गुरुभक्तांने प्रश्न केला “स्वामीजी आपणास अद्याप रामाची आठवण होऊन दुःख वाटत असेल नाही?” त्यावर स्वामीजींनी आपले दोनही हात पसरून उत्तर दिले, “दुःख! ते कशाकरीता? राम तर माझ्या भोवतालच्या कणाकणांत भरलेला आहे. लीन झाला तेव्हा देखील माझ्या नेत्रावाटे अश्रू आले नाहींत आणि आता का? रामाच्या देहावर का मी प्रेम करतो? ज्याच्यावर प्रेम केले ते तर माझ्यातच आहे. राम गंगेत बुडाला हे कळल्यावर जेव्हां परत त्याच्या निवासस्थानाकडे आलो व त्यांनी मृत्यूला दिलेले आव्हान वाचले तेव्हा माझ्याने अश्रू आवरेनात! खूप अश्रुपात केला व म्हणालो “आता पुन्हा असे लिखाण कोणी लिहील का? (Will there be any another who will produce such a sort of writing)” हे सारं स्वामीजींचे उद्‌गार ऐकून गुरुभक्ताला वाटले “नारायणस्वामी तर स्वामी रामतीर्थांचे पट्टशिष्य व त्यांच्या मृत्यूने काहीच दुःख वाटू नये हे आश्चर्य नव्हे काय? पण पुनः विचार आला स्वामीजींना वाटते तेच खरे आहे. माझ्या रामाचाही देहपतनाचा काळ केव्हा न केव्हा येणारच! मग गुरुभक्त तू तूझ्या गुरूच्या देहाकरिता त्याच्या अंतानंतर अश्रू ढाळीत बसणार काय? लगेच आतून ध्वनि निघाला, “जर तुझ्या गुरूचे भजन तुझ्या नसानसातून भिनले असेल तर खास त्यांच्या मरणसमयी तुला दुःख होणार नाही. त्याच्या अंतसमयी आलेला प्रत्येक हुंदका तुझ्या अवनतीचा द्योतक आहे. तुझा गुरू अमर आहे. तो तुझ्यात आहे. जा, त्याचे कार्य कर, त्यातच तुझा मोक्ष आहे. खबरदार अश्रू ढाळशील तर!

अनुक्रमणिका

स्वामी रामतीर्थांच्या तत्त्वांचा प्रसार करणाऱ्या सर्व संस्थांचे एकीकरण करून एक मध्यवर्ती संस्था निर्माण करावी व तिच्यातर्फे सर्व संस्थांचे कार्य चालावे अशी एक आपली योजना असल्याचे स्वामीजींनी गुरुभक्ताला सांगितले. त्याविषयी बोलताना गुरुभक्त मोहनजवळ म्हणाला, "ही स्वामीजींची योजना व्यवहार्य आहे असे मला वाटत नाही. खुद्द माझ्या संघाविषयीच बोलावयाचे झाल्यास, माझ्या संघाइतका त्याग केलेला अगर आत्मोन्नत झालेला जर एखादा दुसरा संघ अगर व्यक्ती असेल तर त्यांच्याशीच आमचे जुळणार. आत्मोन्नतीच्या शेवटच्या पायरीवर बसून एकीकडे स्वतःचे रूप अवलोकन करून ब्रह्मानंदात तल्लीन होऊन बेहोषपणे डुलणारा व दुसरीकडे जगाच्या तुफान दर्येत आनंदाचा शोध करणाऱ्या व निराशेने ग्रस्त झालेल्या जीवांना आशेचा किरण दाखविणारा संघ सांप्रत भारतात तरी खास नाही. माझ्या संघाचे सहाय्य कोणास पाहिजे असेल तर अट ही "सर्वस्वाचा त्याग करा, मरा, झिजा, संपूर्ण नष्ट व्हा" मग पाहा, हा संघ आपल्या विशाल अंतःकरणात तुम्हास जागा देईल. माझ्या संघाच्या योग्यतेचा एक नारायणस्वामी आहे खरा".

❑❑

ब्रह्मपुरी<br>
रविवार, २४/६/३१

आपण लछमन झूल्यापर्यंत आलो. ब्रह्मपुरी ५ मैल आहे. आता त्या जागेचे दर्शन आपणास घडणार नाही. असे विचार येऊन बरेच वाईट होते परंतु पुढे जेव्हा कळले की, ही ब्रह्मपुरी अवघी २ मैलाच्या अंतरावर आहे तेव्हा फारच आनंद झाला. रस्ता बिकट का असेना एकदा ब्रह्मपुरीला जावयाचे व आपल्या पितामहाने भजन करून भारलेल्या वातारवरणातील हवा एकदा तरी मनमुराद भोगावयाची. त्या विचाराने चित्तवृत्ती उल्हसित होत होती व पहाडाच्या अरुंद खबदडीतून जरी चाललो होतो तरी कोणत्याही प्रकारचे शारीरिक क्लेश वाटले नाहीत. ब्रह्मपुरीस आलो तो एक कुटी दिसली. वाटले हीच रामाची झोपडी असावी. अधीरतेने त्या झोपडीकडे गेलो. आत एक ब्रह्मचारी बसला होता. त्यास पाहिले, बरे वाटेना. बरोबर वाटाड्या आणला होता. त्यास विचारले "गड्या, स्वामी रामतीर्थ ह्याच जागी राहात होते का?" तो म्हणाला. "नाही, 'त्या नाल्याच्या पलीकडे एक जागा आहे, तेथे ते राहात असत." "मग चल तिकडे" असे म्हणून वाटाड्यांच्या पुढे मी धावलो. अखेर रामाच्या भजनाच्या जागी आम्ही आलो. झोपडीचा वगैरे काहीच मागमूस नव्हता. कारण गंगामातेने आठ वर्षांपूर्वी आपल्या पुरात ते सर्व वाहून नेले होते. वाटाड्याला मी विचारले, "तू स्वतः ती झोपडी पाहिली आहेस कां?" तो म्हणाला, "होय; ही ती झोपडीची जागा". त्याने दाखविलेल्या जागेचे दर्शन घेतले व त्या जागी बसलो. तों वृत्ती एकाग्र झाली. डोळे मिटले व देह गेला. असा किती वेळ बसलो होतो कुणास ठाऊक. आनंद खूप होता. इतक्यात वाटाड्याने जोराने हाक मारली. निद्रेतून जागे व्हावे तसें दचकून उठलो. वाटाड्या म्हणाला काय दिवसभर इथेंच बसायचे आहे? "नाही" असे त्यास उत्तर देऊन उठू लागलो. पण हालवेना. मग रामास उद्देशून आपल्याशीच बोलू लागलो. "हे पाहा राम, तुझ्या संघाची तुझी गाठ घालण्यासाठी आज येथवर आलो. किती रे लांब तू येऊन बसलास. तू म्हणशील तू एकटाच का आलास. पण मी एकटा नाही. गुरुभक्त म्हणजे संघ, अरे, माझ्यात सारा संघ आहे. संघ म्हणजेच मी. मी म्हणजेच संघ. इतका माझ्या संघाशी एकरूप झालो आहे बघ. माझ्या संघाला आशिर्वाद दे. येथे हे वृक्ष आहेत. त्यांना तू कितीतरी भजने ऐकविली असशील, पण त्या वृक्षांचे व येथील प्राण्यांचे काम झाले दिसते. हे सारेच मोक्षास गेले का रे? होय तसेच असले पाहिजे. नाहीतर त्यांना सोडून तू हिप्परग्याला का आला असतास? आता असे कर, तेथे जी झाडे, जे प्राणी, जी हवा, जे जीव, जे मनुष्य

असतील त्या साऱ्यांना असाच आनंद दे. राम! माझ्या संघासारखा आनंद सगळ्या जगाला केव्हां मिळेल रे" असे विचार येत असता अश्रूंचा आनंदच आनंद! फार उशीर होऊ लागला. रामाच्या जागेचे स्मरण म्हणून मूठभर त्या जागेची वाळू घेतली. पुनः एकवार त्या जागेवर डोके ठेवले, व हृषीकेशच्या मार्गाला लागलो.

स्वामीजींना गुरुभक्तांने एकदा विचारले आप R. S. Naryanswami असे का म्हणवून घेता? तेव्हां त्यांनी उत्तर दिले की R. S. हे माझ्या गुरुचे नाव आहे व मी ते initial (अज्ञाक्षर) म्हणून लावतो. तेव्हा सहज विचार आला आपण संन्यासाश्रम स्वीकारल्यानंतर कोणते नाव घ्यावे? पूर्णानंद हे नाव निश्चित मान्य झाले आहे. पण नुसते पूर्णानंद हे नाव नको. सध्या आपणाला 'गुरुभक्त' असे संबोधितात. पण गुरुभक्त पूर्णानंदात गुरूचा जरी संबंध आला तरी काका ह्या शब्दाचा उठाव येत नाही. तेव्हा वाटले आपणास K. Purnanand असे नाव असावे. K म्हणजे काका! हो हेच नाव बरे.

आगगाडी इटारसीहून खांडव्याला चालली होती. डोक्यात युवराजाविषयी विचार चालले होते. युवराज राहतील किंवा नाही त्याबद्दल भवती न भवति चालली होती... एकदा वाटे, राहिला बिचारा तर कल्याण होईल त्याचे! पुनः असे वाटे, तो राहिला काय अगर न राहिला काय संघाच्या दृष्टीने ते सारखेच आहे. कारण आता त्याच्या हवाली संघ करू नये असे गुरुभक्ताला वाटते. युवराजाची ही अनिश्चित अवस्था खास जाईल. परंतु जरी त्याची वृत्ती स्थिर झाली तरी त्यापुढे संघाची जबाबदारी टाकणे गैर होईल. परंतु रामाला युवराज स्थिर राहील असे वाटून त्यालाच पुनश्च सर्वाधिकार दिला तर केवळ रामाची आज्ञा म्हणून मान्य करण्याला गुरुभक्त तयार आहे. पण तो एक शिस्तीचा प्रकार म्हणून. त्या आज्ञापालनेंत मात्र गुरुभक्ताकडून यत्किंचितही कसूर होणार नाही. युवराजाच्या ऐवजी इतर कोणत्याही भाईला स्थान दिले तर पूर्वी युवराजावर जे प्रेम करीत असे तेच प्रेम नवीन युवराजावर गुरूभक्त करील पण आता गुरुभक्ताची भावना पालटली आहे. आता युवराजाचे स्थान पुरे! रामाला पुत्र नसतो. सर्वाधिकार द्या. पण युवराज ह्या नावाखाली नको. एकदा ह्या शब्दाची व त्यामागील भावनेची विटंबना झाली ती पुरे! ह्यापुढे असे प्रकार होणे संघाच्या कार्याच्या दृष्टीने हितावह नव्हे.

युवराज संघ सोडून गेला तर संघाचे त्यात नुकसान नाही का? नुकसान तर निश्चित आहे. कारण एक सुंदर व्यक्ती कायमची मुकते. पण मग संघाला त्याहून सुंदर अशा व्यक्तीचा सहवास जास्त दिवस लाभणार! मग युवराज जाण्यात संघाचा फायदा कि तोटा! आणि गुरुभक्त तुझी किती चैन आहे पाहा. गु. काका पांच वर्षांत ब्रह्मीभूत होणार अशी तुझी व इतरांची श्रद्धा होती व त्याच श्रद्धेच्या निश्चयावर रामांनी तुला त्याच्या पश्चात झोपडीत त्याच्या भजनाच्या जागी त्यास पुरून त्या जागेवर बसून तुला ॐ गाण्याची आज्ञा केली होती. आता सारे पारडे उलटे होणार! कारण काका जास्त दिवस राहणार! आता संघ खूप प्रबल होणार! कारण युवराजांचे वय ते किती! आता गुरुभक्ताच्यापूर्वी काका न मरता गुरुभक्तच गुरुच्या पूर्वी मरणार! वा! खूप मजा आहे बुवा! गुरुभक्त आता तुझी खरी चैन आहे. कारण आता काका राहणार, काका राहणार. माझा संघ असाच आनंदाने फुलणार! गुरुभक्त त्या आनंदाच्या पुरात मग्न असता शेवटचा उच्छ्वास टाकणार आणि मग काका, तुम्ही मला राम मंदिरात भजनाच्या जागी न पुरता, तुम्ही मला त्या जागी पुरा ज्या जागेवर गुरुभक्ताला बसवून ॐ गाण्याची आज्ञा केली होती, पण योग आला नाही आता सारे पारडे उलटे होणार. आता त्या जागी गुरुभक्ताच्या शवावर रामाच्या ॐ चे गायन होणार! तुला जी आज्ञा झाली ती रामाची, रामाला व त्यात तुझ्या हट्टाची भर! मग तुझा देह त्या पवित्र जागी पडून पवित्र ललकाऱ्याच्या साथीत पवित्र होणार, काका आता गुरुभक्त तुम्हाला हक्काने, हट्टाने विनवीत आहे "सींगकी

कर शिंगोटी, मांस रांधकर खाव, इस ख्यालू पे बैठकर सुस्वर बीन बजाव” Oh! Joy! Oh Bliss! Oh Nonentity!! (किती आनंद! किती सुख!)

ॐ! ॐ! ॐ!

❑ ❑

अनुक्रमणिका

ॐ

गुरुवार
मि. पौष वद्य. १३ शके १८५३.

आज ५-४५ वाजता संघातील सर्व मंडळींना व ऐकणाऱ्या सर्व देवांना संध्याकाळच्या योजनेची आठवण देऊन, बरोबर ६ वाजता बाळ्यांने दिलेल्या काठीसह बाहेर पडलो. बाहेर येता क्षणीच वाटू लागले, आज मी किती तरी देहांतून भजन करणार? माझा एक देह वडाच्या झाडाकडे झपझप पावले टाकीत चालला आहे. माझा दुसरा देह झोपडीत बसून राहिला आहे. माझा तिसरा देह यारे, नाचू प्रेमानंदे म्हणून नाचतो आहे. चौथा "मुखे गातो गीत" म्हणून राऊळ निनादून सोडीत आहे, आणखी एका देहातून मी "तुझ्या दारीचा कुतरा" म्हणून आक्रोश करीत आहे. आणखी एक माझा जीव "ये रे ये रे" असे ओरडत तळमळत आहे, कोणी एखादा देह गिरक्या मारीत आहे व एक देह बाळ्याची काठी घेऊन जोरजोराने 'हैदोस धुल्ला' करीत रानारानांने पळत, नाचत, उड्या मारीत चालला आहे. रामानंद? तूच रडतोस, तूच हसतोस, तूच नाचतोस, तूच तळमळतोस, तू सर्व ठायी भरलो म्हणतो नाना रूपे नटलो जगी ईश्वर होऊन भरलो, असे म्हणणारा तू तुझ्या दारीचा कुत्रा म्हणून आक्रोश का करावा? ये रे ये रे म्हणून उत्कंठा धरावी खुळ्या!! खुळ्या!! खुळ्या!! असे म्हणत जोरजोराने हसत नाचत होता.

हातात काठी होती. सभोवार विस्तृत मैदान, आकाशात तारकांचे पुंज सभोवार विस्तीर्ण झाडी अशा स्थळी एकदम उभा राहिलो. वाटलो आपण साऱ्या विश्वातील पदार्थांना जागे करण्यासाठी ईश्वराने धाडून दिलेले प्रेषित आहो. व एकदम "हुश्यार जागों प्यारे जागों" असे गस्तवाल्याप्रमाणे ओरडत होतो. सारे विश्व माझ्या पायाखाली असून काठीने साऱ्यांना मी खुणावीत आहे. "तू आत्मा आहेस" असे वाटत होते.

एक भक्त ये रे ये रे ये रे म्हणून भजन करीत होता. त्याची अवस्था पाहिली. एकदम संघाचे स्मरण झाले. अभिमान वाटला व तुम्हाला भक्त पाहायचे असतील तर या माझ्या संघाकडे असे मोठ्याने ओरडलो.

गुरुवारी सकाळच्या भजनातील अवस्था डोळ्यासमोरून अगदी हालत नाही. गु. काकांच्या पुष्कळ अवस्था पाहिल्या, त्यापैकी कित्येक उच्च असतील; परंतु त्याहूनही सकाळी व्याघ्रचर्म पांघरुन बसलेले ध्यान अंतःकरणात पूर्ण भिनून गेले आहे. इतक्या लक्षपूर्वक; कोणतीही अवस्था पाहिली नाही. समाधी लावणाऱ्या सर्वांनी रांगेने, बसावे. राम समाधी लावील हे रामाच्या तोंडचे उद्‌गार ऐकताच मनाला वाईट वाटले. मला समाधी लावणे मनापासून नको वाटत होते. पण पुनः रामाची इच्छा म्हणून स्वस्थ बसलो. भजन चालू असताना डोळ्यांना सारखे बजावीत होतो "डोळ्यांनो, घ्या एकदा पाहून हे ध्यान! त्या आनंदाचे आकंठ सेवन करा. तृप्त हाईपर्यंत त्याचे दर्शन घ्या! फिरून एकवार डोळे भरून हे पाहून घ्या! पुनः ही अवस्था पाहाण्याचा योग येणार नाही. भाग्य तुमचे, "तुम्हाला त्या अवस्था दिसत आहेत तोपर्यंत मनमुराद त्यांचे सेवन करा" असे तेव्हा व हरघडी आतापर्यंत सांगत आहे. काका! मला भजनात समाधी लावणे खरेच नको हो! मला भजन पाहायचे आहे. पुष्कळ पाहायचे आहे. मला भजनही पुष्कळ ऐकावे वाटते. पण ते अश्रूंचे प्रेमळ सगुण पाहिजे. मी मोठा, माझे काम झाले, आता खुशाल सेवा कर असे म्हणून माझ्या भजनाचा योग आणीत नाही. पण मला तुमच्याच मुखातून अजून कितीतरी गीते ऐकावी वाटतात. तुम्ही पूर्वी एकतारीवर जसे प्रेमाने गाणे म्हणत होता व मी अश्रू ढाळीत होतो तसे पुरेपूर अश्रू मला पाहिजेत. मला अजून कितीतरी शिकावयाचे आहे. मला उगीचच तुम्ही पूर्ण म्हणता व इतरही तसे समजून माझ्या बरोबर

कोणताही संघीय भजन करीत नाही. नाही म्हणायला पंपाळने गुरुवारी संध्याकाळी हाक मारून अलख निरंजनचे भस्मचर्चित बैराग्याचे नग्नावस्थेंत दर्शन दिले. आतापर्यंत इतर कोणीही मजबरोबर भजन केलेले नाही. तेव्हां तुम्हीतरी प्रेमळ भजन पुष्कळ करा. नाही तर आपल्याला नाही चैन पडत बुवा.

मी संघातील काही व्यक्तींकडे पाहातो तर कोणी निष्ठेने, कोणी प्रेमाने, कोणी सेवेत कोणी पावित्र्याच्या दृष्टीने माझ्याहून कितीतरी उच्च वृत्तीचे आहेत असे वाटते व मनाला सारखी हरहुर.. लागते. अमृताचे स्मरण दिवसांतून कितीतरी वेळा करतो. अंतःकरण भरून येथे व अश्रूंचा प्रवाह चालतो. अत्यंत कळवळून प्रार्थना करतो, "अमृत तुझे पावित्र्य, प्रेम व शांती मला दे—तुझ्या शुद्ध अंतःकरणाने एकदा जरी माझे स्मरण झाले तरी आहे त्याहून अनंत पटीने जास्त शुद्ध होईन. देवाचे ध्यान करावे वाटले म्हणजे संघातील व्यक्तीशिवाय इतर मूर्ती डोळ्यासमोर येतच नाहीत. एखादा संघीय आठवावा त्याची अंतःकरणात स्थापन करावी, त्याचे सद्गुण आठवावेत. तोच आपला देव अशी भावना करून त्याची भक्ती भावाने मानसपूजा बांधावी. अश्रूंनी त्याला न्हाऊ घालावे. "I am not worth even the dust of your feet" असे म्हणून त्याच्या पायाशी लोळण घ्यावी. माझी सेवा गोड करून घे देवा, अशी त्याची काकुळतीने विनवणी करावी, हे माझ्या सगुण भक्तीचे मुख्य लक्षण आहे.

अशी पूजा भक्तियुक्त अंतःकरणाने बऱ्याच देवांची मी केली आहे. माझ्या अंतःकरणात मी काही कप्पे केलेले आहेत. एक प्रेमाचा, दुसरा निष्ठेचा, तिसरा पावित्र्याचा, वगैरे वगैरे. संघाचे काही देव एका कप्प्यांत. काही दुसऱ्या कप्प्यांत असे देवांचे गट निरनिराळ्या कप्प्यांत घालून ठेवले आहेत. आपणास प्रेम पाहिजे वाटले, की उघडतो प्रेमाचा कप्पा व आत बसलेल्या मूर्तीचे दर्शन घेतो. देवा हृदयमंचकावर तू अधिष्ठित असतांना मी प्रेमाची विवंचना उगीचच का करावी रे! असे अमृताला विनवून प्रेमाश्रूंनी त्याच्या मूर्तीवर अनेक वार सिंचन करतो व प्रेमरुप होऊन पडतो. माझ्या प्रेमाच्या कप्प्यात अमृताने बरीच जागा व्यापली आहे. त्यातच दास, नरहर, शंकर, युवराज, धोंडोसिंग, रंगनाथ, विनायक बोरगांव, स्वामी, लोभे, पांपाळ, गोपाळ वगैरे मंडळी आहेत. निष्ठेच्या कप्प्यात प्रमुख स्थान चि. विश्वंभराचे आहे. त्याच कप्प्यात मोहनला जागा दिली आहे. त्या देहाकडून जेव्हा आचार्योपासनेसंबंधी काही सांगितले जाते तेव्हा ते सर्व विश्वंभरचेच आहे अशी शुद्ध भावना असते.

त्यागाच्या कप्प्यात सारेच संघीय घातले आहेत. तरी पण ते आण्णांच्या त्यागाचे जास्त मनन करतो. अलीकडे सेवेत धोंडोसिंग आदर्श वाटू लागला आहे. त्याच्या सेवेचं पूजन करीत असतो. सेवेपासून मन मोकळे झाले की संघीयाशिवाय दुसरा मननाला विषयच नसतो. मी पुष्कळांना संघीयांविषयी कसे मनन करीत असतो हे दाखविले व तुम्ही असे इतके मनन एखाद्या तुमच्या आपल्या आवडत्या संघीयांचे करीत असता का? असे विचारले असता बहुतेकांनी नाही असे उत्तर दिले. हाच मी व तुम्ही ह्यात भेद आहे. असे मी म्हणालो आणि जर माझी जलद प्रगती झाली असेल त्यात नवल काय? मला जो आदर, निष्ठा, प्रेम, काकांविषयी तोच आदर निष्ठा व प्रेम संघातील साऱ्या व्यक्तिविषयी अंतःकरणपूर्वक वाटते.

❑❑

अनुक्रमणिका

आई, कितीतरी दिवसांनी तुला ह्या गोड शब्दांनी हाक मारतो आहे ग! तुला गुरु म्हणत असे. गुरु माऊली म्हणत असे. देव म्हणत असे. तूच ब्रह्म आहेस ह्या भावनेने अनेकदा तुझे दर्शन घेतले. पण आई; या हाकेसरशी अंतःकरणात जे प्रेम उचंबळून येते ते मला नाही सांगता येत! आई, तू देव कशी ग होशील? तू ब्रह्म नाहीस, तू माझी आई, आई हो, आईच आहेस! मग हाक मारू ना तुला त्या नावाने "आई! आई! आई!!!.

आई अलीकडे मी फार प्रेमळ झालो आहे ग! तुझ्या लहानलहान लेकरांवर की नाही फारच फार अगदी तुझ्या इतके प्रेम करतो बरं! आज दुपारी की नाही आई, झोळी सोडून बसलो बरं का! आणि काय झाले एकदम तू आठवलीस; तू आणखी तीन चार वर्षांनी आम्हाला सोडून जाणार मग आम्ही काय करावे ग! मला एकदम तुझा लाडका धोंडूसिंग, दाम्या, लोभे, आठवले, त्याना हाक मारून आणले. मांडिवर विनायक समाधी लावून पडला होता. व रड रड रडलो ग! दाम्याला म्हणालो "दामुबुवा काल आपली आई येथे आली होती. सकाळीच तिची भेट झाली आणि बरं का दामू तिची प्रकृती बरीच सुधारली आहे रे! असा आनंद झाला म्हणून सांगू, दामू तुला! व मनांत अत्यंत काकुळतीने प्रार्थना केली 'देवा माझ्या आईला पुष्कळ पुष्कळ आयुष्य दे अं! ती म्हणते चारच वर्षात आम्हाला सोडून जाणार! देवा हे खरे का रे! धोंडोसिंग आपण देवाचे लाडके आहो. देव आपले ऐकतो. त्याला सांगू माझे व तुझे आयुष्य घेऊन माझ्या आईला दे, तिला उदंड आयुष्य दे. मी तू मरून आई जिवंत राहील तर दाम्या, लोभे, सायगाव कितीतरी लहान भावंडांना दूध पाजवील. मला कुठे रे आनंद देता येतो तुला दामू! आई तू आणखी जिवंत राहा गडे! मी तुझा वडील मुलगा. माझा हट्ट पुरवू नयेस का ग आई. खरंच माझ्याकरिता तू स्वतःचे मरण मला दे! एवढी सेवा माझी घे ना!

आई, मला तू स्वामी रामानंद म्हणतेस गडे, मला खरच ग फार वाईट वाटत. तुझ्या तोंडून बाळ अशी हाक सदैव ऐकू येईल त्याविषयी मन अत्यंत काकुळतीला येते ग! आई, मला तुझे सारे प्रेम दे! आई, तुझ्या लेकावर मी तुझ्या इतके प्रेम करतो ग! तूच सांग खरे काय ते पण तसा प्रयत्न तरी सदा करतो आहे बरं का! आई तू गोपाळकृष्ण नाहीस, रामतीर्थ नाहीस, काका नाहीस, आनंदमूर्ति नव्हेस, तू आई आहेस, आई हो आईच!

आई लेकराला कधी स्वामी रामानंद या बसा म्हणते का ग! तू मला बाळ समजतेस ना! का नाही समजत? तसे एकदाचे सांगून तरी टाक! म्हणजे रडत बसेन! "आई, आई, आई" करीत! देवा मला नसता मोठेपणा का रे दिलास! बरं तुझी मर्जी बुवा!

आई, जगापुढे तू मला स्वामी रामानंद म्हण. मी तुला गु. आर. एस्. आनंदमूर्ती म्हणेन. पण हा जगाचा व्यवहार झाला. झोपडीत, भजनात तू मला बाळच म्हणत जा व मी तुला त्यापुढे आई, त्याखेरीज कोणत्याही नावाने हाक मारणार नाही. आणि माझ्या भावंडांनी मला दादाच म्हणून हाक मारावी मी त्यांचा स्वामी रामनंद नाही. मी झोपडीत तुझ्या संन्यास धर्माचे नियम माझ्या भावंडांशी पाळणार नाही गडे. मी कितीतरी वेळा त्यांच्याबरोबर जेवता जेवता घास घेतले आहेत.

आई, मी तुझ्या साऱ्या लेकरांचे किती मनःपूर्वक स्मरण करतो हे तुला तुझी सारी लेकरे सांगतील! आज की नाही आई, अमृत मला तुझ्या मांडीवर घेऊन अंगाई म्हण रे! असे म्हणत रडत होते! दास माझा दास, माझा लाडका दास कुठे आहे असे मोठ्यांने ओरडत, रडत होतो! मोहन, मोहन, असा जप करीत होतो! व दाम्याला म्हणालो "दामू तूझ्या दादाला आज तू खरे पाहिलेस!" आई, तुझ्या लेकरावर, तुझ्याखेरीज माझ्याइतके प्रेम खचित कोणी करीत नसेल. आई माझी भावंडे मला फारच फार आवडत असतात. आई, खरंच ग, ह्यांच्यावरून ओवाळून जावे, इतकी गोड आहेत ग! आई, मला ह्या तुझ्या लेकरांची सेवा करता येईल ना?

आई, तू राज्ञी आणि तुला युवराज आहे. त्याच्या हवाली तू राज्य केलेस, परवा गुरुवारच्या मौनात सांगितले माझ्या भावंडांना "बाळांनो, युवराजांचे स्मरण झाले की संकल्प करीत जा. आईच्या आज्ञेत ज्या प्रेमाने, निष्ठेने, आदराने वागतो. त्याच प्रेमाने व आदराने युवराजाशी वागू" बाळांनो माझ्या विषयी वाटणारे प्रेम, निष्ठा, सारी माझ्या युवराजाला द्या! बाळ युवराज उदंड आयुष्यवंत हो! आई, मी तुझ्या लेकरांचा दादा शोभतो ना ग! आई, धाकट्या भावंडांसाठी वडील भावाचा जन्म असतो ना! मग माझ्या भावंडांच्या सेवेत त्याहून जास्त त्याग मी कोणता करू! देवा! तू क्षीराब्धीत शेषशायी होऊन लक्ष्मी समवेत खुशांल सुखोपभोग घे! मुमुक्षु भक्त जनाने. तुम्ही 'विठ्ठल विठ्ठल' म्हणून खुशाल पंढरीचा मार्ग धरा! योग्यानों तुमचे यज्ञयाग, व त्यापासून मिळणारे निर्वाणपण तुम्ही सुखेनैव भोगा! माझी आई, माझी प्रेमळ भावंडे व माझा दरिद्री भारत हाच क्षीराब्धी, हीच पंढरी व हेच निर्वाणपद!

आई, तुझ्या प्रेमावाचून तुझ्या लेकरांना मी कधी काही सुद्धा दुसरे सांगितले नाही ग! आई, मी खरंच की नाही अगदी, अगदी शुद्ध आहे बरे का. मी तुझ्या लेकरांना कुरवाळतो, भेटतो, नाचतो, रडतो, किती किती तरी गोष्टी करतो. सगळ्या शुद्ध प्रेमाने अं! आई, मी कधी कोणाला नवीन भजन सांगू लागलो की नाही तुझे प्रेम सांगतो. तुझ्या विषयी निष्ठा, आदर प्रेम, वाढविण्यास शिकवितो. माझ्याकडे काही घेत नाहीस म्हणूनच आई भजनाचे एवढे अपूर्व सामर्थ्य मला तू दिलेस! आई, मी जे प्रेम माझ्या लहान भावंडांवर करतो ते प्रेम सर्व भावंडांनी परस्परांवर करावे असे मला वाटते व असे करण्याविषयी कितीतरी वेळा अश्रूंनी विनविले आहे. पण आई, माझे काही भाऊ माझ्याशीच नीट बोलत नाहीत–नाही. अबोला धरतात, तिरस्कार करतात ग! आई, माझ्या सगळ्या भावांनी अत्यंत प्रेमाने वागावे निदान अनादर तरी नसावा नाही?

आई, मी तुला काही विशेष कळवणार आहे. आई, तुझे प्रेम, ध्यान, वेड लागावे म्हणून दीड-दोन वर्षापूर्वी एका भावाला जवळ केले. त्याच्यावर प्रेम, आई! आईप्रमाणे केले व तुझ्याजवळ आल्यावर, त्याला धाकटे भावंड समजून दादा ह्या नात्याने पूर्वीसारखेच उत्कट प्रेम करीत आलो. आई, गेल्या उन्हाळ्यात लखनौला जाण्यासाठी नारायणखेडहून निघालो तेव्हापर्यंत तो ही माझ्यावर तितकेच निःसीम प्रेम करीत असे. पण लखनौहून आलो तर सारे बदललेले दिसले. त्याला मी पुष्कळ विनवून पाहिले पण काहीच सांगितले नाही. मला तेव्हा फार दुःख झाले व ते तुम्हाला औदुंबराखाली सांगितले. त्याचा तेव्हापासून नाद सोडला. कामापुरते बोलत असे. पुढे एकंदर त्याच्या वागण्यावरून त्याला अनादर वाटतो असे दिसले व पुढे तिरस्कारात त्याचे रुपांतर झाले. आई, खरेच ग मी त्याच्या तिरस्कारास पात्र होण्यासारखे काहीच केले नाही. आई, तुझ्या विषयीचे प्रेम वाढले म्हणजे माझ्याविषयी कमी व्हावे का ग! आई तुझ्यावर इतके निःसीम प्रेम करून साऱ्यावर तुझ्याइतके प्रेम मी नाही का करीत? आई, माझ्याशी नको का ग त्यांने पूर्वीप्रमाणे वागायला? पण आई तो माझ्याशी फार फटकून वागतो ग! आणखी की नाही मला फार त्रास

अनुक्रमणिका

होतो ग! पण आई, माझे प्रेम तसेच कायम आहे. आई, भजनात नेहमी त्याची आठवण होते व शुद्ध पवित्र भावनेने मी तुझी प्रार्थना करतो." आई, माझ्या अत्यंत आवडत्या भावाला लौकर जवळ कर व माझ्यासारखा त्याला आनंद दे ग! माझ्यासारखी त्यांने झोळी घ्यावी, ब्रह्मचारी रहावे व संन्यास घ्यावा! आई, त्याच्या झोळीतले तुकडे खाल्यावर माझी खरी तृप्ती होईल! आई, त्याला तू संन्यास देशील ना! आई, भजनात माझ्या स्मरणांतून तो जातच नाही. इतर वेळेला त्याचे मला भानही नसते.

आई, संघातील इतर काही व्यक्तीप्रमाणे मी त्याच्याशी एकरुप झालो आहे. गेल्या पावसाळ्यापासून त्याच्या मनात मजविषयी जो अनादर भाव आला आहे तो जावा म्हणून आदराचं काही तरी व्रत करावे म्हणून तो तेव्हापासून आज आठ महिने मारुतिरायाच्या दर्शनासही जात असतो व मनोभावाने प्रार्थना करतो "देवा, माझ्या रंगनाथचे अंतःकरण शुद्ध कर" सकलांच्या पाया माझे दंडवत. आपुलाले चित शुद्ध करा." हे चरण मारुतिरायाच्या पायाशी अचूक आठवते. हा नियम न चुकता त्याचा हा अनादर भाव जाऊन पूर्वीसारखा तो वागेपर्यंत मी पाळण्याचा निश्चय केला आहे ही गोष्ट इतर सर्वांस ठाऊक आहे. तुलाही ठाऊक असेल. पण मी होऊन आज तुला कळविली आहे. आई, मी त्याच्याबरोबर पुष्कळ भजन केले आहे तो माझ्याबरोबर किती तरी वेळा रडला आहे. असा पुनः तो रडेल का? आई, त्याला चांगला रंग चढव, म्हणजे तो माझ्याशी नीट प्रेमाने वागेल. आई, मी त्याला केव्हा, पुनः पूर्वीसारखे भेटेन, रडेन, असे वाटते व त्याची स्मृति झाली म्हणजे "आई, त्याला पूर्ण शुद्ध कर" अशी काकुळतीने तुझी विनवणी करीत असतो.

आई, इतक्यात आजीला जाऊन विचारले, "आजी, आईला तू इतक्या लवकर नेणार! मग आमचे कसे होईल?" ती म्हणाली "नाही बाळ! ती अजून बरीच वर्षे जगेल" आई मला किती आनंद झाला म्हणून सांगू! आजी तू फसवू नकोस अं मला. वाटले तर माझे प्राण घे व हे दे माझे आयुष्य माझ्या आईला असे म्हणून खूप अश्रू गाळले. आई तू जिवंत असतांना तुझ्या मांडीवर मला शेवटचा निःश्वास टाकता येईल का? तू काही म्हण आई मला तसे खास वाटते!

आई, तुझ्या प्रेमाने वेडावून काही तरी लिहीत बसलो आहे ग! पण की नाही आई, अगदी अंतःकरण खरेखुरे उघडे केलेय बघ. तुझे गुण आठवावेत व वेडावून जावे. आई, त्यापेक्षा लेक काय जास्त करणार? आई, आई, आई.

तुझा बाळ
(स्वामी रामानंद)

मुंबई
गुरुवार, २७-१०-३२.

**"संन्यास घेतल्यानंतरचे काही नवीन अनुभव"**

मी जो पोषाख स्वीकारला होता, तो लोकांच्या मोठ्या आकर्षणाचा विषय बनला होता. मी कुर्डुवाडीच्या Platform वर फिरत होतो. कोणीतरी 'महाराज' अशी हाक मारली व माझं लक्ष तिकडे गेलं लोक मला नमस्कार करू लागले.

अनुक्रमणिका

लोक माझ्याकडे मोठ्या आश्चर्याने पाहात होते. गाडीत बसल्यानंतर प्रत्येकजण मोठा आतिथ्यशील वाटला. मला चांगली झोप लागली. कल्याण स्टेशनवर मला मुंबईला जाण्यासाठी गाडी बदलायची होती. म्हणून मी मद्रास मेलमधून उतरलो व लोकल Platform कडे चाललो. मी एकटाच होतो. भाई सत्यवान तिकीट आणण्यासाठी गेले होते. पहाटे ५-१५ ची वेळ होती. एका बाकावर बसून मी विचारत गढून गेलो. माझ्याजवळ कमंडलुशिवाय काहीच नव्हतं. कोणीतरी मला नमस्कार केला आणि 'शिवो ऽ हम्' असे मी म्हणालो. काही क्षणानंतर एका पोलिसांने असभ्यपणे मला हटकले तो म्हणाला 'महाराज बाहेर चलो.' मी त्याच्याशी एक शब्दही बोललो नाही. तो मला एक भणंग संन्याशी आणि निरुद्योगी फकीर असे समजला असला पाहिजे. त्याकरिता त्यांनी मला Platform सोडून जाण्याचा हुकूम सोडला. तोच आदेश त्यांनी पुन्हा दिला. मी हललोच नाही. तो खूप चिडलेला दिसला. तो माझ्या अंगावरही आला असता. पण तितक्यात सत्यवान तेथे आले. त्यांनी आपल्या लष्करी पद्धतीप्रमाणे त्या शिपायाची खूप हाजरी घेतली. त्यावेळी त्या पोलिसाला कुठेतरी समजले की, ज्या संन्याश्याचा अपमान केला होता तो भणंग संन्याशी नव्हता. मी म्हणालो, "परमेश्वराच्या कृपेमुळे मी वाचलो".

**Getting down at Dadar (दादरला उतरल्यानंतर)**

श्री. प्रधानांच्या वसतिस्थानाकडे चाललो होतो. रस्त्याने येणारे लोक नमस्कार करीत होते. त्यात उत्तर हिन्दुस्थानातील भय्ये लोक जास्त वाटले. बिऱ्हाडी आलो व मुंडन करण्याची इच्छा प्रगट केली. त्यांनी एक Private न्हावी आणला. त्यांनी आपल्याजवळचे आसन वगैरे घातले. थोड्या वेळाने मी हजामतीसाठी जाऊन बसलो... चपापला! त्याला वाटले आज आपल्याला चांगलाच शकुन झाला! संन्याशीच प्रथम समोर, प्रथम तो बराच घाबरलेला दिसला. पण पुढे कसे तरी हिय्या करून म्हणाला, "पहिल्यांदा दुसऱ्यांची हजामत करायची आहे." मी बरं आहे म्हणून उठलो. संन्याशाची हजामत प्रथमच करणे हे त्याच्या धंद्याच्या दृष्टीने नुकसानीचे वाटले असावे असो. थोड्या वेळाने त्याने मला बोलाविले. मी समोर बसलो. त्यांनी प्रथम दाढी करावयास आरंभ केला. शहराच्या रिवाजाप्रमाणे प्रथम त्याने दोनही बाजूला कट्स मारल्या. मी स्वस्थच होतो. पुढे त्यांने दाढी केली. दोनदा हत्यार फिरवून व्यवस्थित काम झालेले दाखविले व 'आता संपले' अशा मुद्रेने त्यांने माझ्याकडे पाहिले. मी म्हणालो 'कधी संन्याशाची हजामत केली नाही वाटते!' नाही असे उत्तर आले. आता त्याला संन्याशाच्या मुंडनाचे धडे दिल्यावाचून गत्यंतर नव्हते. मी मुकाट्याने माझ्या ओठाकडे बोट केले. मिश्या गेल्या तो पुनः न्हावी थंडच! अरे गृहस्था; "डोक्याचे सर्व केस काढ" असे मी म्हणालो. त्याने उत्तर दिले. "महाराज उभ्या जन्मात सबंध डोक्याची हजामत मी केली नाही." त्याने त्याच तीक्ष्ण वस्त्राचा पहिला प्रयोग आमच्याच डोक्यावर झाला! एकदाची कशीतरी हजामत संपविली व त्या प्रकरणातून शिर सलामत बाहेर आलो.

लखनौ<br>शुक्रवार, २८-१०-१९३२.

संध्याकाळी ७-३५ ला लखनौला उतरून मी ८ च्या सुमारास रामतीर्थ लीगच्या कार्यालयात पोचलो. स्वामीजी बाहेर गेलेत असे कुणीतरी आम्हाला सांगितले. पण सुदैवाने आम्ही तेथे पोहचल्यानंतर ते लगेच परत आले. मी त्यांना लवून नमस्कार केला. ते आमच्याशी हसत मोठ्या आनंदाने बोलत होते. काही प्राथमिक प्रश्नोत्तरे झाली. आम्ही कार्यालयाच्या खोलीत बसलो होतो. त्यांनी 'आनंदमूर्ती' कसे आहेत असे मला विचारले तेव्हा आनंदमूर्ती हृषीकेशला रविवारी निघणार असल्याचे सांगितले.

अनुक्रमणिका

त्यांच्याबरोबर भगवान व संघाचे इतर तीन बंधू निघाल्याचे सांगितले. झांशी जिल्ह्यातील एक बंधू माझ्याजवळ बसले होते. त्यांना स्वामीजींनी आमच्या संघाविषयी व आनंदमूर्तीविषयी व त्यांच्या पदयात्रेविषयी माहिती दिली. स्वामीजींनी आनंदमूर्ती आपल्याला भेटणार आहेत का? असे विचारले. मी म्हणालो, "अर्थात, पण परत जाण्याच्या वेळी ते भेटतील." आनंदमूर्तींनी त्यांना हृषीकेशच्या ऐवजी लखनौलाच भेटावे अशी स्वामीजींची इच्छा दिसली. त्यांनी भगवानविषयी चौकशी केली. मी भगवानविषयी सगळे काही सांगितले पण स्वामीजींची सेवा करण्यासाठी त्यांना येथेच ठेवणार आहेत ही गोष्ट मात्र सांगितली नाही. नंतर चर्चेचा ओघ स्वामी ॐकारजींच्या हिप्परगेच्या भेटीकडे वळला. बऱ्याच दिवसापासून त्यांच्या भेटीचे चालले होते. आश्रमाच्या कामातून सुटका मिळताच ते हिप्परग्याला येतील असे मला सांगण्यात आले. मध्येच आमच्या जेवण्याची व्यवस्था करण्याकरिता ते आत गेले. त्यावेळी मी तेथे बसलेल्या झांशीहून आलेल्या बंधूबरोबर बोलत बसलो. आमची हकीगत ऐकून ते फार प्रभावित झाले. मी त्यांना आनंदमूर्ती विषयी आणखी काही जास्त माहिती दिली. ती ऐकून त्यांचे डोळे भरून आले. डोळ्यावाटे अश्रू वाहत असताना ते म्हणाले "तेच राम येथे काम करतात."

स्वामीजी आतून बाहेर आले. मी पुनः त्यांना आमच्याकडे अलिकडे चाललेल्या कामांची माहिती दिली. येणेगूर या गावातील शाळेविषयी सगळी माहिती दिली तेथील दलित वर्गीयांपैकी धेड जमातीने घेतलेल्या शपथांची कल्पना त्यांना दिली. यात्रेवरून परतल्यानंतर हिप्परगा येथील संस्थेसारखीच आणखी एक शैक्षणिक संस्था योग्य ठिकाण पाहून उघडण्याचा आनंदमूर्तींचा विचार आहे असे मी त्यांना सांगितले. स्वामीजींनी त्या कल्पनेचे स्वागत केले. पण तेथे शिक्षक कुठून मिळतील अशी शंका व्यक्त केली. संघात दुप्पट संख्येने शिक्षक असल्यामुळे त्यापैकी अर्ध्या शिक्षकांची बदली करून तिकडे पाठविता येईल असे मी त्यांना सांगितले. हे ऐकून स्वामीजींचे समाधान झाले.

नंतर स्वामीजींनी आमचा संघ स्वामी रामतीर्थ लीगचा सदस्य म्हणून रजिस्टर करण्यासंबंधी आम्ही काय निर्णय घेतला असेल असे विचारले. रजिस्ट्रेशनची वर्गणी दोनशे भरावी लागेल. सध्या आर्थिक चणचण भासत असल्यामुळे पुढील वर्षी रजिस्ट्रेशन करून घेऊ असे मी सांगितले. त्यावर ते म्हणाले या संस्थांना ऐकमेकाच्या जवळ आणण्याचा हा सध्या एकच मार्ग आहे. एका संस्थेने आपले काम करीत दुसऱ्या संस्थेच्या कामावरही देखरेख ठेवली पाहिजे. स्वामीजींनी पुढे विचारले "तुमची संस्था किती वर्षाची आहे?" मी म्हणालो "गेल्या दसऱ्याला त्या संस्थेने ११ वर्षे पूर्ण केली." यावेळी स्वामीजी एकदम विचारमग्न झाले. काही मिनिटानंतर ते म्हणाले, हे पाहा स्वामीजी, निसर्ग किती सुंदर रीतीने काम करितो! तुमचा आश्रम स्थापन झाल्यानंतर एक दोन वर्षाच्या अंतरानेच आमच्या लीगची स्थापना झाली. त्याच सुमारास शांती आश्रमही स्थापन झाला. रामच या सगळ्यामध्ये काम करीत असतात. एकाच दैवी उपक्रमाची ही निरनिराळी केंद्रे आहेत. ही लीग म्हणजे प्रकाशन केंद्र आहे. तुमचा संघ शैक्षणिक कार्य करतो. आणि शांती आश्रम हे ध्यानधारणेचे केंद्र आहे. त्यांच्या या कल्पनेने मी पूर्णपणे भारावून गेलो. आणि मनातल्यामनात मी स्वामी रामांना आणि त्यांचे शिष्य आनंदमूर्ती यांना विनम्र अभिवादन केले.

मग स्वामीजींनी आमच्या संस्थानातील सरकारी नियमाप्रमाणे आमचा संघ रजिस्टर करून घेण्यासंबंधी विचारले. त्यावेळी मी त्यांना आम्ही अत्यंत बिकट परिस्थितीत कसे काम करीत आहोत याची कल्पना दिली. त्या विशिष्ट परिस्थितीची आणि तेथील अधिकाऱ्यांच्या मनोवृत्तीमुळे तेथे काम करणे किती कठीण आहे हे स्पष्ट केले. अशा तऱ्हेने आमच्या संघास प्रसिद्धि देण्याने आमच्या कामाला साह्य होण्याच्या ऐवजी तेथील जे चांगले कार्य चाललेले आहे त्या कार्याला हानी होण्याच्या शक्यता जास्त असल्याचे त्यांना

अनुक्रमणिका

समजावून दिले. सरकारने हिप्परगा तेथील काम बंद पाडायचे ठरविले तर त्या स्थितीत इतर केंद्रातील कार्य बिनधोकपणे चालू शकेल, निरनिराळ्या केंद्रांतून चाललेले कार्य हिप्परगा येथील संस्थेच्या मार्गदर्शनाच्या खालीच चाललेले आहे. हे जर सरकारला कळले तर सगळे कार्यच थांबून जाईल. म्हणून सरकारला याची माहिती मिळू नये अशीच आमची इच्छा आहे. माझा दृष्टिकोण स्वामीजींना पटल्यासारखा दिसला. थोड्या वेळाने विचार करून ते म्हणाले. तुमच्या दृष्टीकोणातील तथ्य मला पटले आहे. आणि शेवटी त्यांनी मला सांगितले "निझाम राज्याच्या सरहद्दी संघाचे रजिस्ट्रेशन करू नये. पण निझामी संस्थान आणि ब्रिटीश इंडियाच्या सरहद्दीवरील ब्रिटीश मुलखात रजिस्टर करावे. संघाचे प्रमुख कार्यालय तेथे राहावे आणि हिप्परगा आणि निझाम हद्दीतील इतर ठिकाणी त्याची केंद्रे चालवावीत." त्यांनी मला पुनः विचारले की, हिप्परग्यापासून ब्रिटीश सरहद्द किती दूर आहे. त्यांना मी सांगितले की ब्रिटीश सरहद्द थोड्या मैलाच्या अंतरावरच आहे. मग ते म्हणाले माझ्या मते पंढरपूर हे ठिकाण आपल्यासाठी योग्य होईल. पहिली गोष्ट अशी की ते क्षेत्राचे ठिकाण असल्यामुळे त्याला स्वतःचे विशेष पावित्र्य आहे. दरवर्षी लक्षावधी यात्रेकरू तिथे जातात. या शिवाय तेथे नदी काठ आहे. आमचा आश्रम पंढरपूर शहरात सुरू न करता पंढरपुरपासून ३ मैल अंतरावर नदीच्या काठावर सुरू करावा असे त्यानी सुचविले. जर हिप्परग्याला ज्या दैवीसेवेच्या वृत्तीने काम चालले आहे. त्याच वृत्तीने तेथेही काम चालले तर पंढरपुरच्या दर्शनाला येणारे यात्रेकरू या आश्रमालाही निश्चितपणे भेट देतील व आपापल्या परीने आश्रमाला साह्य करतील. "हरिद्वारला गुरुकुल का स्थापन झाले हे तुम्हाला माहित आहे का?" असे त्यांनी मला विचारले. लक्षावधी यात्रेकरू तेथे जातात. आणि त्या यात्रेकरुंच्याकडून त्या गुरुकुलात दोन लाखांच्या वर देणगी मिळते. हे ऐकून तुम्हाला आश्चर्य वाटेल. तसेच तुमच्या बाबतीतही घडेल. असे त्यांनी सांगितले. एकूण संघाचे मुख्य कार्यालय हिप्परग्याहून हलविण्याच्या विचाराने स्वामीजी पूर्ण भारावून गेल्यासारखे दिसले.

संस्थानातील हिंदूंच्या दुःखदस्थितीविषयी स्वामीजींना फार कळवळा वाटतो. काही काळानंतर संघाला त्या कामाकडे लक्ष द्यावे लागेल. निदान दहा वर्षे संघाला केवळ शै क्षणिक कार्यच करावे लागेल असे मी त्यांना सांगितले. माझा विचार बरोबर असल्याचे त्यांनी सांगितले. त्याच कारणासाठी धारुर येथे एक नवी संस्था काढण्याची कल्पना त्यांना आवडली. तेथे शिक्षकांची काय व्यवस्था करणार असे त्यांनी विचारले. संघापैकी काही बंधूंना शिक्षक म्हणून तिकडे पाठविता येईल असे मी त्यांना सांगितले. ते ऐकून त्यांना खूप आनंद झाला. 'सुंदर' ते म्हणाले.

दुपारी स्वामीजींनी माझा परिचय मद्रास प्रांतातील स्वामी ब्रह्मानंदजींना करून दिला. संन्यासाश्रम स्वीकारण्यापूर्वी ते राजमहेंद्री कॉलेजचे प्राचार्य होते. गुरुकुलाच्या धर्तीवर चालवीत असलेल्या एका संस्थेचा मी आधारस्तंभ आहे. असे माझ्याविषयी त्यांना सांगितले. बंधू आनंदमूर्ती त्या आश्रमाचे संस्थापक आहेत. देशाच्या त्या मागासलेल्या भागातील जनता अन्याय अत्याचाराखाली चिरडली जाते, त्या ठिकाणी आनंदमूर्तीच्या स्वरुपात रामच तेथे काम करीत आहे आणि म्हणाले "देव जगासमोर आला! का धन्यता वाटू नये!"

स्वामीजी आपल्या कामात सारखे मग्न होते. आमचे जेवण झाल्यानंतर त्यानी मला सगळा ग्रंथसंग्रह दाखवला. त्या संग्रहासंबंधी सविस्तर माहिती दिली. मी जेव्हां तो संग्रह पाहिला तेव्हा स्वामीजींनी त्या संग्रहासाठी विलक्षण कष्ट घेतले असतील हे कळून आले. त्यानी स्वतःच्याच हस्ताक्षरात सर्व लिहून ठेवलेले दिसले. सगळे कॅटलॉग, सगळी रजिस्टरे त्यांनी स्वतःच लिहून ठेवली होती. अत्यंत काटेकोरपणे ते व्यवहार करीत होते. त्यांना एकाच वेळी व्यवस्थापकाची, निरीक्षकाची व हमालाची भूमिका

वठवावी लागत असे. त्यांनी सांगितले स्वतःच्याच खांद्यावरून पुस्तके हलवावी लागतात. पेट्यांची व्यवस्था त्यांनाच करावी लागते. आम्ही त्यांना त्यांच्या कामात मदत केली. ते आपल्या कामात गुंतले असताना मी त्यांना म्हणालो, "आपण जरा उतरल्यासारखे दिसता" ते म्हणाले "होय" कित्येक दिवस मला भूकच लागली नाही. सतत चार पाच दिवस मला उपाशीच रहावे लागले. तरी मी दररोज बारा तास काम करू शकलो. शरीर अन्नाशिवाय काम करू शकत असले तर ती खरी आनंदाची गोष्ट आहे.

स्वामीजींच्या निवासाच्या अगदी जवळच एक गरीब शेजारी राहतो. या शेजाऱ्याचा एक नातेवाईक आजारी होता. तो जवळजवळ बेशुद्धावस्थेत होता. स्वामीजी स्वतः त्याच्याकडे गेले आणि त्यानी त्यांचे संपूर्ण तीस तास त्याच्या शुश्रुषेत घालविले. रोग्यांच्या शुश्रुषेत स्वामीजी खूप निष्णात होते.

सर्व दिवसभर ते कामात होते. मी फिरायला गेलो होतो. संध्याकाळी ६ ला मी परत आलो. त्यावेळी काळोख पडला होता. तरी स्वामीजी कामातच होते. मी त्यांच्याबरोबर कार्यालयात एक तासभर होतो. ते तेथील सामान मोजत होते. सकाळी ७ पासून ते खूप काम करीत होते. त्यांना एक मिनटाची देखील सवड मिळाली नव्हती. त्यांचे काम संपल्यावर मला घेऊन ते व्हरांड्यात आले. आपले दोनही बाहू लांबवर पसरवीत म्हणाले. "शाबास घोडे, अच्छा काम किया हे पाहा रामानंद. हे शरीर घोड्यासारखे आहे. जेव्हा घोडा चांगले काम करतो, तेव्हा आपण त्याची पाठ थोपटली पाहिजे. जेव्हा मी काम करतो त्यावेळी मी त्या कामाशी एकरुप होतो. मी कोणती भूमिका वठवितो याचा मी विचारच करीत नाही. किंवा पुढे माझ्या वाट्याला कोणते काम येईल याचाही मी विचार करीत नाही. १९१८ पूर्वी मी तांब्याचे नाणे सुद्धा हाताळले नव्हते किंवा नाण्याचा विनिमय केला नव्हता. मी ती भूमिका अगदी उत्तम रीतीने वठविली होती त्याच पद्धतीने मी जगभर प्रवास केला. त्यानंर सार्वजनिक काम करावे लागले. आणि संस्था चालवाव्या लागल्या. फंड गोळा करावा लागला. मग मला नियमितपणे हिशोब ठेवावा लागला. मी उत्तम लेखापाल ठरलो."

"नंतर मी सेवासमितीत गेलो. आणि स्वयंसेवक दल संघटीत केले. मी उत्तम स्वयंसेवक बनलो. पुढे मी दलप्रमुख बनलो. मी घोड्यांची लीद, माणसाची विष्ठा काढली आहे. मी आजाऱ्यांची शुश्रुषा केली आहे. विशेषतः प्लेग व कॉलरा झालेल्या लोकांची सुद्धा मी सुश्रुषा केली आहे. आणि मी उत्तम नर्स ठरलो आहे. आता मी व्यापार करतो. त्यातही उत्तम व्यापार उदीम करणारा असे म्हणवून घेतल पाहिजे. सध्या मला कूली (हमाल) म्हणून उत्तम प्रकारे काम करायचे आहे. आतापर्यंत मी घाणेरडा मळका पोषाख घातला होता. आता तो काढून ठेवून चांगला पोषाख घातला पाहिजे. भंग्याच्या कामाच्या वेळी भंग्याचा पोषाख" असे म्हणून व इकडून तिकडे उड्या मारीत खदखदा हसले.

"ही क्रीडा आहे, खेळ आहे. तुम्ही आपल्या वाट्याला आलेली भूमिका उत्तम रीतीने वठवा आणि सोडून द्या बस्स एवढेच."

ग्वाल्हेरहून आलेल्या एका प्राध्यापकांना स्वामीजींनी माझी ओळख करून दिली. ते प्राध्यापक स्वामी रामतीर्थांची पुस्तके विद्यार्थ्यांना मोफत वाटत आले आहेत. ते प्राध्यापक म्हणजे अगदी प्रामाणिक, साधे व जिज्ञासू व्यक्तिमत्व.

रात्री पुन्हा माझा परिचय पंजाबातील जालंदरच्या के. सी. पराशर या गृहस्थांना करून दिला. मी त्यांना आमच्या आश्रमाची संपूर्ण माहिती दिली. त्यांनी आनंदमूर्तींच्या ह्षिकेशच्या यात्रेची बातमी लिहून घेतली. त्यांना ती बातमी प्रसिद्ध करायची होती. मी ती प्रसिद्ध करण्यास अनुमती दिली. दुपारी स्वामीजी एक खोली साफ करत होते. त्यांनी एक जुनी पेटी काढली. त्या पेटीत एक स्टोव्ह आणि स्वयंपाकाची भांडी-कुंडी होती. ते सगळे साहित्य फार घाण कळकट झाले होते. मला नंतर असे कळले की, स्वामी नारायणस्वामी मद्रास प्रांतात संचार करीत असता या स्टोव्ह व भांड्याचा उपयोग करीत असत. त्यापैकी काही मी स्वामीजींच्या आठवणीचे प्रतीक म्हणून माझ्याबरोबर घेतली. माझ्या गावी ती जपून ठेवण्याची माझी इच्छा आहे.

सोमवार

मी अगदी पहाटे उठून सकाळचा कार्यक्रम आटोपला. स्नान करून मी स्वामीजींचे दर्शन घेतले. त्यांनी अद्यापि स्नान केले नव्हते. ते सर्व वस्तू नीट नेटक्या ठेवीत होते. मी त्यांच्या बाजूला बसलो. त्यावेळी ते आपल्या नेहमीच्या प्रेममय व विचारमग्न अवस्थेत होते ते म्हणाले "हे पाहा रामानंदजी, मी हमाला (कुली) सारखा काम करतो. मी सगळी कामे स्वतः माझ्या हातांनी करतो. साधू लोक येथे येतात व माझी टीका करतात आणि म्हणतात, 'हे गृहस्थ बनले आहेत आणि व्यापारी बनले आहते' हे पाहा, ते मूर्ख आहेत. मी कामाचे अवमूल्यन करतो की या कामाला प्रतिष्ठा प्राप्त करून देतो. हे यांना समजत नाही आणि ते समजू शकणारही नाहीत. हे पाहा, तुमच्या संस्थेतील विद्यार्थ्यांपैकी कुणालाही कामाचा तिटकारा वाटता कामा नये. काम! काम! त्या कामामुळेच संन्याशाचे उदात्तीकरण होते. आजकाल साधु पण भ्रष्ट झाले आहेत. संन्याशाच्या वस्त्रांना अप्रतिष्ठा प्राप्त झाली आहे. रामानंदजी, सर्व प्रकारची कामे करा. तुम्ही स्वतःच संडास साफ केले पाहिजेत, मी ते केले आहे. आता सुद्धा मी ते करीत आहे. महात्मा गांधीनी एक रात्र ह्षीकेश येथे माझ्याबरोबर काढली. त्यांनी मला विचारले होते, "साधू कोण?" मी लगेच उत्तर दिले होते "जो संडास साफ करतो तो" यानंतर त्यांनी स्वतः आपल्या साबरमती आश्रमात संडास साफ करण्याचे काम सुरू केले. त्यापूर्वी आश्रमवासी आळीपाळीने संडास साफ करण्याचे काम करीत होते.

रामतीर्थ लीगच्या इमारतीचा पुढचा भाग त्यांनी स्वतः बांधला, असे स्वामींनी सांगितले. मजूराबरोबर त्यांनी खूप कष्टाचे काम केल्याची माहिती त्यांनी दिली. एकदा कमानीचे बांधकाम चालले असता ते खाली पडले व त्यांच्या कपाळाला खोच पडली असे सांगून अजूनही त्या जखमेची खूण कपाळावर असल्याचे दाखविले. ती जखम सुद्धा आनंदच असे म्हणून स्वामीजी मनापासून हसले.

❑❑

**मुंबई-दादर येथे पोपटलालच्या चाळीत ता. १३ नोव्हेंबर १९३२ रविवार रोजी रात्री ९-३० वाजता दिलेल्या व्याख्यानाचे मुद्दे. —**

(१) विषय प्रवेश : वेदांत सोपा आहे/कठीण नाही.

(२) भारतीय संस्कृतीचा विशेष : वृत्ती—सत्

अनुक्रमणिका

(३) भारतीय संस्कृतीचा विशेष : शरणागति—चित्

(४) भारतीय संस्कृतीचा विशेष : निष्ठा—आनंद

(५) From cradle to grave (जन्मापासून मृत्यूपर्यंत) : विधी—मदालसा राणीची गोष्ट

(६) आचरणात कसे आणावयाचे?

(७) नवविधा भक्ती; भिन्न मार्ग : चोर व शेजारच्या खोलीतील अमोल संपत्ती. (ज्ञान, योग, भक्ती, कर्म)

(८) दास्य भक्ति म्हणजे सेवा.

(९) सर्व मार्गांत common ground (Self dedication) (सामान्य भूमिका आप्तसमर्पक)

(१०) १९ व्या शतकातील भारतीय धार्मिक विचारांरात झालेली अपूर्व क्रान्ती :—

(१. ब्रह्मो समाज, २. आर्य-समाज, ३. रामकृष्ण-विवेकानंद)

The greatest of all the symbol is the man In man we find the highest manifestations of the divine potentialities. This worship of Godman is one of the greatest contributions of Ramkrishna, Vivekananda in this age.

सर्व प्रतिकांमध्ये मनुष्य हा सगळ्यात मोठा आहे. मनुष्यामध्ये सगळ्यात जास्त दैविक शक्तिचा आविष्कार आढळतो. या युगामधे अशा दैवि पुरुषांची पूजाही, रामकृष्ण आणि विवेकानंदसारख्या विभूतींची सर्वांत मोठी देणगी आहे.—

(११) सोरटी सोमनाथ—लाला लजपतराय

(१२) भावनांचे साम्राज्य : (वृंदावनास जाणाऱ्या बाईची गोष्ट)

(१३) सर्व संबंध मानीव आहेत : भावनेने मी पुत्र, भ्राता, माता, पिता संबंधी आहे. असे म्हणता येते तर मी ईश्वर आहे ही भावना का करू नये?

(१४) सेवकाची भूमिका. —

१. आत्म समर्पण,
२. तत्वन्य चित्तशुद्धी व चित्ताची एकाग्रता,
३. निरपेक्ष सेवा.

अनुक्रमणिका

**आध्यात्मिक सेवकाचे विशेष. —**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | परोपकारार्थ सेवा | १. | ईश्वरसेवा म्हणून सेवा |
| २. | दुसऱ्याचे कल्याण करतो ही भावना | २. | आत्मोन्नतीची भावना |
| ३. | दुसरा दुबळा, मी समर्थ ही वृत्ती | ३. | मी दुबळा, मी समर्थ ही वृत्ती |
| ४. | भूतदया-अनुकंपा | ४. | ईश पूजा-**Who can help God**? |

समारोप

"I have Severed all my connections My relation is only with thee"

Swami Ramananda Teertha.

मी माझे सर्व संबंध तोडले आहेत. माझे नाते फक्त तुझ्याशी आहे.

स्वामी रामानंदतीर्थ.

ॐ ॐ ॐ

| | | |
|---|---|---|
| काका | काका | काका |
| अमृत | अमृत | अमृत |
| विश्वंभर | विश्वंभर | विश्वंभर |
| युवराज | युवराज | युवराज |
| मोहन | मोहन | मोहन |
| दास | दास | दास |

सेवक संघकी जय!!

❑❑

(लखनौच्या दुसऱ्या प्रवासातील खर्च) :—

| जमा | | खर्च | |
|---|---|---|---|
| ९०८८ ॥ | श्री. संतुकराव वकील | १०८८ = | रेल्वे तिकीट |
| ६० | पू. नारायण स्वामी | २३ ॥। | मोटार व गंगा |
| ५० | श्री. रंगराव मामासाहेब | ५ ॥=॥ | हमाली |
| १० | श्री. जेरुरकर | ९ । | किरकोळ (पू. श्री. भुस्कुटे, वर्तमान पत्र, |

अनुक्रमणिका

| | | | |
|---|---|---|---|
| | | | हजाम, तार, साबण इत्यादी) |
| ५ | चि. दास | | |
| २१५८८ ॥ | | १२ ॥।=॥ | फराळ, जेवण, Fruits |
| | | २ ॥—॥ | कार्ड, पाकिटे |
| | | ८८— | खादी शिलाई |
| | | ।≡ | काव व रंग |
| | | ॥≡ | बॅग |
| | | १८ = | गंगा |
| | | ॥≡॥ | आसन |
| | | १८ = | Paper—weight |
| | | .।. | पिशवी |
| | | १७ = | १ ग्लोबसेल—सेल |
| | | १७६ ॥.। | |
| | | ३८ ॥.। | शिल्लक |
| | | २१५८८ ॥. | |

रामानंद.

❏❏

अनुक्रमणिका

मंगळवार
अश्विन वद्य. ११

आज सकाळी ९-३० च्या सुमारास हिप्परगे सोडले. सोडतानाचा प्रसंग संघाच्या डायरीत लिहिला आहे. त्याची येथे पुनरूक्ती करीत नाही. मंडळी ओढ्याच्या पलीकडील ... पर्यंत पोचावयास आली होती. मी अद्याप कोणाशीही विशेष बोललो नव्हतो. फक्त युवराजांशी काही कामासंबंधी बोलणे झाले. गु. काकांनी माझा हात धरून आपल्याबरोबर चालविल्यामुळे एक तर इकडे तिकडे जाता येत नव्हते. शिवाय आपण काय बोलणार? काका येथे आहेतच अशा एका अस्पष्ट भावनेमुळे मनाला आपोआपच मुग्धता आली होती. वाटत होते संघीय आपणास काय म्हणत असतील. स्वामीजी एखाद्या लहान लेकराप्रमाणे हसत खिदळत मोकळ्या मनाने बोलायचे; परंतु आज असें का? पण मी शांतच होतो. आपल्याला बोलायचे आहे. पुष्कळ बोलायचे आहे पण ते प्रवासाहून आल्यानंतर. असे एक मन सांगत होते; तर दुसरे मन निदान अमृतशी तरी बोल असे बजावीत होते. गाडीत चढण्याची आज्ञा झाली. मी गाडीला हात लावला.

❑❑

लखनौ
सोमवार १-१०-३२.

गु. काकांचे चरणी

सविनय नमस्कार.

काल संध्याकाळी बरोबर ४ वाजता जयंतीच्या समारंभास प्रारंभ झाला. समारभांस अदमासे चारशेच्या वर मंडळी उपस्थित होती. लखनौ शहरातील बहुतेक सर्व प्रोफेसर, प्रमुख वकील व बॅरिस्टर, हेड मास्टर, सुशिक्षित समाज व ४/५ संन्याशी उपस्थित होते. पू. नारायणस्वामी नंतर म्हणाले "The cream of lucknow has gathered here" (लखनौतील प्रतिष्ठित लोक इथे जमले आहेत.) प्रथम पू. नारायण स्वामींनी गंध पुष्पासहित स्वामी रामतीर्थांची पूजा केली व शंखाच्या नादात सर्वांनी उभे राहून आरती म्हटली. त्यानंतर सर्वांना गंध लावण्यात आले. ते गंध व माझ्या गळ्यात घातलेला हार व प्रसाद आपणांकडे धाडीत आहे.

मी भाषण करावे किंवा नाही ह्याविषयी पू. स्वामीजींना विचारले होते तेव्हा ते म्हणाले. "वेळ मिळेल किंवा नाही कुणाला ठाऊक. निमंत्रितांना प्रथम वेळ दिला पाहिजे. जुळल्यास करता येईल. नक्की नाही." तेव्हा बोलण्यास जुळायाचे नाही. असेच वाटले होते. सभेत भाषण करणे जुळो न जुळो आपण आपली रामतीर्थांच्या पुढे हजेरी द्यावी म्हणून स्वामीजींच्या ऑफिसात टांगलेल्या मोठ्या तसबिरीसमोर दुपारी २ वाजता भाषण केले होते. बहुतेक भाषणाचा प्रसंग येणार नाही. अशीच माझी व सत्यवानाची भावना होती. प्रथम १-३० तास रामवर्षा मधून भजनाची पदे झाली. प्रो. सत्येंद्रनाथ रॉय बोलण्यास उठले. ते ब्रह्मी समाजाचे अनुयायी आहेत. त्यांचे भाषण हिंदीत झाले. त्यांना वक्तृत्व नव्हते. भाषा नव्हती. विचारही नव्हते. नंतरचे वक्ते बॅरिस्टर A. P. Sen हे बोलले; पण पांचच मिनिटे; कारण त्यांना ताप आला होता. तिसरे वक्ते मि. मुखर्जी हे अनुपस्थित होते. मध्यंतरी एका वक्त्याचे ५/७ मिनीटे गाणे झाले. कारण त्याना ताप आला होता ते चालू असताना स्वामीजी म्हणाले "Now you are to speak, Speak as effectively as you can" (आता तुम्हांला बोलायचे आहे; जितक्या प्रभावी रितीने बोलता येईल तितके बोला.) मी होय म्हणालो. गाण्यानंतर पू. स्वामीजींनी माझी ओळख सर्वांना करून दिली. प्रथम आपल्या संस्थेचे स्वरूप अत्यंत सुंदरपणे समजावून दिले. तुमची माहिती सांगितली. आपणा साऱ्यांच्या आत्मसमर्पणाचा गौरव केला. स्वामीजींच्या तोंडचे उद्‌गार ऐकताना फारच धन्यता वाटत होती. रामतीर्थांनी आपली सेवा मान्य केली व आशिर्वाद दिला असे वाटून अंतःकरण भरून आले व नकळत नेत्रातून अश्रू आले ते कसे तरी पुसून प्रथम आपले, नंतर अमृतचे व विश्वंभर मोहन युवराज यांचे व एकंदर संघाचे स्मरण करून मनात रामतीर्थ नारायण स्वामी आनंद मूर्तिसेवक संघ यांचा जय जयकार करून मी माझ्या भाषणास आरंभ केला. पंधरा मिनिटे बोललो. भाषणात आवेश व flow (ओघ) दोन्ही होते. भाषण उत्तम, सर्वांहून चांगले व परिणामकारक झाले. रामतीर्थांची सेवा घडली व गु. काकांची आज्ञा पाळली. म्हणून समाधान वाटले. भाषणाने जमलेल्या मंडळीवर फार परिणाम झाला. Faizabad चे एक वृद्ध राम प्रेमी गृहस्थ मजकडे आले. व म्हणाले "Swami you have enlightened me today Now I know what self dedication is I do not know how to express my feelings to you." "स्वामीजी तुम्ही आज माझे खूप उद्‌बोधन केले. आता मला आत्मसमर्पण म्हणजे काय हे माहीत झाले. माझ्या भावना कशा व्यक्त कराव्या हे कळत नाही. अत्यंत प्रेमाने व सद्‌गदित अंतःकरणाने बोलत होते. 'फैजाबादला या. तेथील मंडळीना आपल्या उपदेशाचा लाभ

घडेल’ असे ते म्हणाले. स्वामीजींना विचारून ते म्हणतील तसे करणार आहे. पुष्कळांनी पत्ता टिपून घेतला आहे. काहींनी तर माझ्या भाषणाची प्रत टाईप करून घेण्याचे ठरविले आहे. तेथील दोन प्रोफेसरांनी मला स्वतंत्र हार मुद्दाम घातले. सभेनंतर लोक जेव्हा मजकडे माहिती विचारण्याकरिता आले तेव्हा सत्यवानाकडे मी बोट करीत असे. अलाहाबादला भाषण करण्याचा प्रसंग येईल असे वाटले.

आई, लेकराप्रमाणे मी काहीतरी लिहीत आहे. ते सारे तुझ्या कौतुकाकरिता व आशीर्वादाकरिता आहे. आई, तुझी सेवा घडली ना? तुझ्याच प्रेरणेने घडलेली ही सेवा तुझ्याच चरणी अर्पण आहे. देवा अशीच सेवा अनंत जन्मी करून घे.

**स्वामी रामतीर्थ महाराज की जय**
**स्वामी आनंदमूर्ती महाराज की जय**
**सेवक संघ की जय**
**काका! काका! काका!**

अमृत, विश्वंभर, युवराज , मोहन, दास, विठ्ठल, दाम्या, पू. स्वामीजी निघण्याची गोष्ट काढली की, विनोदाने काही तरी बोलून पुढे बोलूच देत नाहीत. केव्हा निघणे होते कोणास ठाऊक. स्वामीजी फारच फार प्रेमाने वागले. आपली व माझी ओळख करून देताना त्यांना अत्यंत जिव्हाळा वाटत होता. आपल्या प्रवासाचे वृत्त इकडील वर्तमानपत्रात एक-दोन दिवसात जाहीर होईल. सर्वांचे चरणी नमस्कार.

रामानंद

(ता. क. — माझे भाषण काही वृत्तपत्रातून येणार आहे असे वाटते.)

ॐ

पुणे
मंगळवार, १५-११-३२.

**चि. दास ह्यास केलेल्या सूचना. —**

(१) नियमित कुस्ती खेळणे व व्यायामासाठी तालमीत जाणे.

(२) विशेष गोष्ट घडली अगर पाहिली म्हणजे ती स्मरणवहीत नमूद करून ठेवणे.

(३) सकाळी दूध घेणे.

(४) वर्तमानपत्र अर्धा तास नियमित वाचणे.

अनुक्रमणिका

(५) इतिवृत्ताचे सदर पाहून प्रसिद्ध वक्त्यांची व्याख्याने असल्यास ऐकावयास जरूर जाणे. काय ऐकले किंवा आपल्या मनात काय विचार आले ते नमूद करून ठेवणे.

(६) ग्रंथ कसा वाचावा?

(७) निझाम प्रांतातील विद्यार्थ्यांची शक्य तितकी जास्त ओळख करून घेणे.

(८) देहू, आळंदी, वानवडी, चिंचवड, तळेगाव, सिंहगड, पुरंदर, कडेगाव, मळवली, लोणावळा, खंडाळ्याचा घाट वगैरे पाहणे.

(९) आठवड्याचे पत्र इंग्रजीत धाडणे.

(१०) पाश्चात्य सुधारणेचा अंमल ज्याच्यावर बसला आहे त्यांचे रीतिरिवाज अत्यंत सूक्ष्म रीतीने अभ्यासावे.

(११) दररोज अर्धा तास भजन करणे.

(१२) कॉलेज मधील एखाद्या activity (उपक्रमात) मध्ये भाग घेणे.

(१३) थोडे का होईना पण पुन्हा पुन्हा वाचणे.

❑❑

अनुक्रमणिका

ॐ

**चि. दासच्या पुण्याच्या खोलीतल्या काही सूचना. —**

(१) नको असलेले घेण्याची सवय लागली की, हवे असेलेले विकण्याची पाळी आलीच.

(२) विचाराशिवाय उच्चार म्हणजे नेमाशिवाय गोळी.

(३) दुसऱ्याचे दोष पाहू नका पण स्वतःच्या जाणीवा ठेवा.

(४) शब्दांपेक्षा कामच मोठ्याने बोलते.

(५) लिखितमपि ललाटे प्रोक्झितुं कः समर्थ.

(६) अविवेकः परमापदाम् पदम्

(७) Hate the sin not the sinner पापी माणसाचा द्वेष करू नका, पापाचा द्वेश करा.

(८) Compassion for all creatures. सर्व प्राणीमात्राविषयी अनुकंपा.

(९) The first test of a truly great religion. कोणत्याही खऱ्या श्रेष्ठ धर्माची पहिली कसोटी.

श्री

शके १८३८ फाल्गुन शुक्रवार १२ सोमवार घ. ३६ पळे ४ पुष्य नक्षत्र घ. ३९ पळे ४१ सुर्योदयात गत घ. १० पळे ३३ पुष्य नक्षत्र तृतीय चरण मध्य नाडी देवगण कर्क राशी.

जन्म लग्न कुंडली दिवसा १० ॥१०॥ वाजत




चि. जनार्दन याचे टिपण

अनुक्रमणिका




ॐ

शुक्रवार
१० मे ३१

**दिनचर्येत काय लिहावे?**

(१) हातून घडलेल्या वाईट गोष्टी, मनात आलेली ती पापवासना, वगैरे नमूद करणे.

(२) त्याविषयी झालेला पश्चाताप.

(३) सकाळी उठल्याक्षणी 'मी पवित्र होणार' असा संकल्प करणे.

(४) दिवसभर मनावर नजर राखणे.

(५) आलेले वाईट विचार टिपून ठेवणे

(६) रात्री निजण्यापूर्वी मागील दिनचर्या वाचून पाहाणे व त्या दिवसाची लिहिणे.

(७) रात्री निजण्यापूर्वी ५ मिनिटे इतरांशी संभाषण वर्ज्य करून शुद्ध भावनेने देवाचे स्मरण करणे.

(८) एखाद्या पुण्यवान व्यक्तीचे अगर चित्राचे अगर मूर्तीचे दर्शन घेणे व 'तुझे पावित्र्य मला दे' अशी अंतःकरणपूर्वक विनवणी करणे.

❑❑

अनुक्रमणिका

=====================================================================

EXTRACTS FROM

MAHATMA GANDHI’S BOOK

=====================================================================

अनुक्रमणिका

==================================================================

परिशिष्ट

# APPENDIX

## पूज्य स्वामी रामानंदतीर्थांच्या दैनंदिनीतील मूळ इंग्रजी भाग
## तसेच महात्मा गांधीजींचे इंग्रजी उतारे

# भाग ६ वा

==================================================================

अनुक्रमणिका

The Seeker after Truth must be humbler than the dust. The world crushes the dust under its feet, but the seeker of truth should be so humble him self that the dust could crush him. Only then and not till then will he have a glimpse of truth.

(Introduction page XXII)

Let hundreds like me perish, but let truth, remain.

(Introduction page XXII)

"What is possible for one is possible for all" Ex.

(Introduction page XIX)

So long as my acts satisfy my reason and my heart, I must firmly adhere to my original conclusions.

(Introduction page XX)

I have not yet found Him, yet I am seeking after Him. I am prepared to sacrifice the thing dearest to me in pursuit of this quest. Even if sacrifice demanded my very life, I hope I may be prepared for it.

(Introduction page XXI)

For it is an unbroken torture to me that I am still so far from Him, who, as I fully know, governs every breath of my life and whose off spring I am. I know that it is the evil passions within me that keep me far From Him and yet I cannot be away from them.

(Introduction page XXIII)

"He who would be friends with God, must remain alone, or make the whole world his friend".

Interpretation of pledges has been a fruitful source of strike all the world over. No matter how explicit the pledge, People will turn and twist, the text, to suit their own purposes. They are to be met from among all classes of society from the rich down to the poor, from the prince down to the peasant. Selfishness turns them blind and by the use of the ambiguous middle, they deceive themselves and seek to deceive the world and God. Another is to

accept the interpretation of the weaker party where there are two interpretation possible. Rejection of these two rules gives rise to strife and inequity which are rooted in untruthfulness.

Page 84 (I Vol.)

"Experience has taught me that silence is a part of spiritual discipline of a Votary of Truth".

Who that has prided himself on his spiritual strength has not seen it humbled down to the dust?

